म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
वा. नं. १०७

३९८
काव्य

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
काव्य
संग्रहालय क्रमांक
३९७
लेखक मुकुंद मो. गोरे
सन
१८९८
पुस्तकाचें नांव यमुना
मोरो ग. गोरे यांच्या काव्यसंग्रह

दक्षिणप्राइझ कमिटीनें बक्षीस दिलेलें,

# यमुना,

## अथवा म्हातारा नवरा आणि लहान नवरी.

हें पुस्तक,

मोरो गणेश लोंढे,

हेडमास्तर, पनवेल, यांणीं लिहिलें.

आवृत्ति पहिली—प्रती १०००.

मुंबईत "निर्णयसागर छापखान्यांत छापिलें".

सन १८९८.

किंमत दीड आणा.

( सर्व हक्क राखिले आहेत. )

# वाचकांस विनंति.

'मोलें उणें व्यजन तें धरितां पुढारीं, छाया करी, तपनदीप्तिसही निवारी' या **रघुनाथ पंडितांच्या** उक्तीकडे लक्ष दिल्यानें, बारीकसारीक वस्तूचाही किती उपयोग होतो हें सहज लक्षांत येईल. हें कवितेचें पुस्तकही लहानच आहे, परंतु समाजांतील एका वाईट चालीचें निर्मूलन व्हावें, हा त्याचा हेतु आहे; याकरितां व्यक्तिमात्रानें एक वेळ तरी हें अवश्य वाचावें, एवढीच प्रार्थना आहे.

पनवेल. **मोरो गणेश लोंढे.**

तारीख १ जुलै १८९८.

## लोंढे यांनीं केलेलीं उपदेशपर पुस्तकें.

**बोधशतकः**–( आवृत्ति चौथी ) किंमत दीड आणा. श्लोकबद्ध. अभिप्राय. " हें पुस्तक प्रत्येक लहान मुलानें वाचल्याशिवाय व त्यांतील बोधपर कविता पाठ केल्याशिवाय राहूं नये अशी आमची त्यांना शिफारस आहे. "

**केसरी.**

**संगीतसुधाः**–( आवृत्ति तिसरी ) किंमत दीड आणा. साक्या, दिंड्या, पदें वगैरे कविता. अभिप्राय. " यांतील कविता सरळ, सोपी व मनावर ठसा उमटण्याजोगी साधली आहे. "

**सुबोधपत्रिका.**

**उपदेशमालाः**–( आवृत्ति सातवी ) किंमत दीड आणा. श्लोकबद्ध.

पा. आ. ८१०

# यमुना, अथवा म्हातारा नवरा आणि लहान नवरी.

श्लोक. (द्रुतविलंबित.)

जन जया म्हणती बहुधा मुका
धन तया करितें बहु बोलका ।
जन जया गणिती[1] बधिरापरी[2]
श्रवण[3] तीक्ष्ण[4] तदीयहि[5] तें करी! ॥ १ ॥
न जन जो सहसा बघतो वरी
धन तया वरतीं बघता[6] करी ।
पळवितें पळ पंगुस[7] तें पहा
स्थिर करी पळत्यास कसें अहा! ॥ २ ॥
जन जया म्हणती बहु बोलका
धन तया करितें अगदीं मुका ।
धन कडी[8] सकळांवरती करी[9]
विरळ जो गवसे नचि तत्करीं ॥ ३ ॥
निज मनीं ममता असतां खरी
निज गुणें धन दूर तिला करी ।

---

१ समजतात. २ बहिऱ्याप्रमाणें. ३ कान. ४ तिखट. ५ त्याचे. ६ पाहणारा. ७ पांगळ्याला. ८ वरचढपणा करितें. ९ त्या (धना)च्या हातांत.

उपजवी नव जेथ मुळीं नसे
धन समर्थ तरी न ह्मणा कसें! ॥ ४ ॥
घडवितें न घडे जगतांत तें
निज गुणें सुजनां भ्रम पाडितें ।
फिरवितें विपिनां[1]मधिं ही कुणा
धन समर्थ तरी न कसें ह्मणा! ॥ ५ ॥
धन जनां उदधीं[2]मधिं घालवी
बहुत वेळ उन्हामधिं रावें[3]वी ।
धन तयार करी मरणाप्रती
धनपराक्रम येथ वदूं किती! ॥ ६ ॥
धन तरी जरठा[4] तरुणी मिळे
धन तरी जडता[5] अगदीं पळे! ।
धन तरी कमती न जगीं असे
नमन त्या न धनास करा कसें! ॥ ७ ॥
जनक शत्रु धनार्थ[6]चि होतसे
स्वतनुजा[7] जरठास विकीतसे ।
सतत लालन[8]पालन जो करी
असुखं[9] संततं[10] दे तिजला तरी! ॥ ८ ॥
बहु सदा ममता दुहितेवरी[11]
जनक तुष्ट[12] मनें जरि तो करी ।

---

१ रानात. २ समुद्रांत. ३ खपवितें. ४ ह्मातान्याला. ५ जडपणा–अज्ञान. ६ पैशाकरितां. ७ आपली मुलगी. ८ रक्षण. ९ दुःख. १० नेहमीं. ११ मुलीवर. १२ आनंदित.

कनक[1] तो बघतां मनिं घाबरे
न ममता पहिली अगदीं उरे ॥ ९ ॥
जरि कधीं यमुना बहु हट्ट घे
जनक रुष्ट[2] मनें न तरी बघे ।
बहु झटून तिचा पुरवी लळा
जनक[3]-लोभ असा अति आगळा[4] ॥ १० ॥
कनक अंध करी परि लोचन[5]
न दुसरा सुविचार करी मन ।
श्रवण अन्य कथेस[6] न ऐकती
भरलिसे मनिं एकच गोष्ट ती[7]! ॥ ११ ॥
" गवसती रुपये मज सातशें
कनक या यमुनेस कमी नसे ।
सुनग[9]मंडित तो[10] इजला करी
कमलजा[11] यमुना दुसरी खरी! ॥ १२ ॥
अधिक होय जरी वय थोडकें
तरि न साठ, असे मज ठाउकें ।
जन किती वरुषें[12] शत[13] वांचती
भय न यास हि वत्सर[12] विंशती[14] ॥ १३ ॥
न तरणा दिसतो जरि नोवरा

---

१ सोनें. २ रागावून. ३ बापाची माया. ४ फार. ५ डोळे. ६ दुसऱ्या गोष्टीला. ७ श्लोक ८।९ यांत सांगितलेली. ८ मिळतील. ९ चांगल्या डागिन्यांनीं युक्त. १० नवरा ( मनांत योजलेला ). ११ लक्ष्मी. १२ वर्षे. १३ शंभर. १४ वीस.

तरि न[1] यास अजून वरी[1] जरा[1] ।
जरि न सुंदर, होय सशक्त[2] हा
चुरडितो रदनांत[3] चणे पहा ! ॥ १४. ॥
न सदनीं[4] कमती मुळि खावया
कनकभूषणभार[5] हि ल्यावया[6] ।
दिसतसे नवरा अगदीं निका[7]
मज उणें न दिसे दुहितासुखा[8] ॥ १५ ॥
स्थळ असे बरवें **यमुनेस** तें ॥
इजमुळें मजही धन लाभतें ।
न रुपया गवसे मज एरवीं
प्रियतमा[9] **यमुना** न निधीचं[10] वी[11] ! ॥ १६ ॥
प्रथमपासुन भिक्षुक मी असें
मज ह्मणून मुळीं लिहिणें नसे ।
तरि मिळेल कशी मज चाकरी
धन कसें बहु ये तरि या करीं ! ॥ १७ ॥
जरि बघून दिला तरणा वर
मज न लाभ घडे अगदीं तर ।
नियम काय जगेल विशेष तो
तरुण काय यमास न[12] लाधतो[12] ! ॥ १८ ॥

---

१ ह्मातारपण आलें नाहीं. २ मजबूत. ३ दांतांत. ४ घरांत. ५ सोन्याचे पुष्कळ डागिने. ६ आंगावर घालण्याला. ७ छानदार–योग्य. ८ मुलीच्या सुखाला. ९ स्त्री. १० ठेवा. ११ व्याली–प्रसवली. ( वाचको यमुनेस प्रसवली असें नव्हे तर ठेव्यास प्रसवली ! ) १२ मिळत नाहीं.

वर[1] किती तरणे मरती जनीं
बहुत सान मुलींप्रति नाडुनी[2] ।
जरठ ते उलटे बहु वांचती
मग उगे जन कां मज हांसती! ॥ १९ ॥

सकल दैव जनीं करितें कृती[3]
मनुज[4] होय निमित्त तयाप्रती ।
धनद[5] मित्र तरी उघडा हर[6]
मनुज काय करील तिथें तर! ॥ २० ॥

सबळ दैव तरी बहु तो जगे
समय घालवणें अति वांवगें[7] ।
बहुत होय सुते[8]प्रति संतती[9]
न असुखें[10] तिजला मग वाटती! ॥ २१ ॥

चिडविलें जरि आज तिला कुणीं
बहुत खिन्न[11] तरी मनिं होउनी ।
जरि करील मनामधि शोक ती
हळुहळू विसरेल तयाप्रती! ॥ २२ ॥

बहुत भूषणभार[12] तनूवरी[13]
पति[14] सदा ममता बरवी करी ।
अमित[15] वित्त[16] कमी न मुळीं घरीं
सुख गमेल तिला मग अंतरीं[17] ॥ २३ ॥

---

१ नवरे. २ गुंतवून ( लग्न झाल्यामुळें ). ३ कामें–कार्य. ४ माणूस. ५ कुवेर. ६ शंकर. ७ वाईट. ८ मुलीला–यमुनेला. ९ मुलें. १० दुःखें. ११ दुःखी. १२ पुष्कळ डागिने. १३ शरिरावर–आंगावर. १४ नवरा. १५ पुष्कळ. १६ पैसा. १७ मनांत.

पळ रुसून घरीं गृहिणी[1] जरी
बहुत होय मनामधिं घाबरी ।
क्षणभरें समजाविन मी तिला
न इतुकें बहु दुर्लभ तें मला ! ॥ २४ ॥

जन मला ह्मणती न भला जरी
गरज काय तदीय[2] मला तरी !
वितरती[3] मजला न कधीं रुका[4]
विफल[5] जें वदणें वदती फुका ॥ २५ ॥

तरि करून मनामधिं निश्चय
सकल दूर करूनहि संशय ।
भरतसे शुभकर्म[6] मनांत तें
उरकणें बरवें मज वाटतें ॥ २६ ॥

विधिवळें[7] सहजामधिं जें जमे
लवकरी करणें बरवें गमे ।
जरि करांतिल सुस्थळ[8] जाय हें
न सहसा शुभ[9] योग फिरून ये ॥ २७ ॥"

मन करी स्थिर जाय वराकडे
पदरिं घे रुपये मग रोकडे ।
लवकरी उरका ह्मणतो तयां
उपजणें बरवें न चि विघ्न या ॥ २८ ॥

---

१ आपली बायको. २ त्यांची–लोकांची. ३ देतात. ४ पैसा. ५ फुकट. ६ चांगलें काम. ७ नशिबानें. ८ चांगलें ठिकाण. ९ चांगला

लवकरी सदनीं[1] मग येतसे
प्रियतमेस[2] कथी मनि ये तसें ।
"लवकरी कर ऊठ ग सिद्धता
पळहि घालवणें न वरें वृथा[3] ॥ २९ ॥
निज सुतेस[4] असे स्थळ पाहिलें
मन बघून 'वरें स्थळ' लोभलें ।
विधिबळें[5] जमलें, तिथि योजिली,
जवळ ते अगदीं बघ पातली ॥ ३० ॥
बहुत तूं अससी गृहिणी निकी[6]
कुशलता मजला तव ठाउकी ।
झडकरी करिं गे तरि सिद्धता
बहुत ये न मला तुज सांगतां ॥ ३१ ॥"
"कवण तो नवरा परि पाहिला
कथनें कां न करा[7] तरि तें मला ।
सधन[8] निर्धन[9] कीं मजला वदा
बहु नमून पुसें तुमच्या पदा ॥ ३२ ॥
वरि असे **यमुना** बहु नेणती[10]
मज अजून गमे जणुं बाल ती ।
तरि कशास विवाह तिचा करा
प्रियकरा सुविचार करा जरा ! ॥ ३३ ॥
समज तोहि तिला अगदीं नसे
सहजही वदतां बहुधा रुसे ।

१ घरांत. २ आपल्या स्त्रियेस. ३ फुकट. ४ मुलीला. ५ नशिबानें. ६ चांगली. ७ सांगत नाहीं. ८ धनवान्. ९ दरिद्री. १० अज्ञान.

रडतसे दिवसांतुन तीनदां
करितसां जलदी तरि कां वदा! ॥ ३४ ॥
मजविणें[1] न तिला करमे अहा
पळभरी परेती[2] न सरे पहा! ।
पतिगृहीं तरि काय करील ती
बहुत हो भिववी मजला भिती! ॥ ३५ ॥
वँर[3] कुठें वसतो, वय त्या किती,
जनक, बंधु तशा भँगिनी[4] किती, ।
सुजननीहि असे अथवा नसे
सदनें[5] दूर किती न वदा कसें!" ॥ ३६ ॥
"न धरिं संशय गे प्रमदे[6] पहा
मज न काय तिची ममता अहा! ।
सुतनुंजा[7] **यमुना** तव लाडकी
न करि मन्मन[8] लाड तसेंच कीं! ॥ ३७ ॥
जरि असे **यमुना** बहु नेणती
तुज अजून अजागळ[9] वाटती ।
तरि दिसे बरवी मज नोवरी
सुखद[10] कारणें[11] बाळपणीं [12]वेरी ॥ ३८ ॥
हळुहळू सगळें समजे तिला
न परि चांग ठिकाण मिळे मला ।

---

१ चैन पडत नाहीं. २ पलीकडे. ३ नवरा. ४ वहिणी. ५ घर. ६ हे स्त्रिये. ७ चांगली मुलगी. ८ माझें मन. ९ मूर्ख. १० सुख देणारें. ११ कार्य—लग्न वगैरे. १२ आणखी.

41.91.c.72



पतिगृहीं सगळ्या मग[1] वागती
बहु बऱ्या, **यमुना** तरि कां न ती! ॥ ३९ ॥
बहुत योग्य ठिकाण मला मिळे
वर-पढून विवाह-तुला कळे।
स्ववदनें करणें न बरें स्तुती
लव[2] न जाण उणें **यमुने**प्रती ॥ ४० ॥
सधन[3] गे नवरा बहु तो असे
वयहि फार तया सजणे नसे।
न यश त्यास कमी जगतामधीं
सकल लोक तया ह्मणती सुधी ॥ ४१ ॥
प्रथमच्या दयितेजवळूनियां[6]
मुळिं न संतति होय सखे तया।
नव ह्मणून दुजी दयिता करी
सकल संशय दूर करीं तरी! ॥ ४२ ॥
बिजवरा मुलगी निज ओर्पणें
मम मना न रुचे, परि हें मनें।
बहु ठिकाण बघूनचि चांगलें
झडकरी दुहितार्पण योजिलें ॥ ४३ ॥
सवत होय जरी **यमुने**प्रती
सुगुणयुक्तंचि ती मज वाटती।
पतिसि[11] दे सुख ती निजवर्तनें[12]

१ मोठेपणीं. २ थोडें. ३ द्रव्यवान्. ४ हे स्त्रिये. ५ बुद्धिवान्. ६ वायकोपासून. ७ दुसरी. ८ देणें. ९ मुलगी देणें. १० चांगल्या गुणांनीं युक्त. ११ नवऱ्याला. १२ आपल्या वागणुकीनें.

न दिसतें यमुनेंस मुळीं उणें ॥ ४४ ॥
विजवरा दिधली[1] न सुता[2] जरी
कवण मान्य तयेस करी तरी ।
न नवरा गवसे-वरदक्षिणा[3]-
न दिधली-बरवा तरि आपणा ॥ ४५ ॥
न बळ गे मजला धन वेंचण्या
न वरवें गवसे स्थळ आपणा ।
सहज हें जमलें विधिचे बळें
उरकणें वरवें मज वाटलें ॥ ४६ ॥
उभयतांस मुहूर्तहि लाभतो
न वदवे मजला बहु लाभ तो ।
लवकरीं कर जा तरि सिद्धता
दवडणें न बरें निधि[4] लाधतां[5]! ॥ ४७ ॥"
न परि ती युवती[6] सुख पावली
रुखरुखीहि[7] तिला मनिं लागली ।
परि उपाय न अन्य तयाप्रती
हळुहळू सदनीं[8] करि काम ती! ॥ ४८ ॥
पति करी सगळी तंव सिद्धता
जनसमूह[9] मिळे हि निमंत्रितां[10]।
नवल हें जमलें तरि केधवां
न कळतांहि कुणाप्रति वाहवा! ॥ ४९ ॥

---

१ दिली. २ मुलगी. ३ हुंडा. ४ ठेवा. ५ मिळाला असतां. ६ तरुण स्त्री. ७ काळजी. ८ घरीं. ९ लोक. १० बोलावल्यावर.

वा. ग्रा. ८९८

## यमुना.

जन जमूनहि मंडप घालिती
जमविण्यास्तव जिन्नस धांवती।
वधुगृहीं बहु धांदल ती उडे
परि न तें गृहिणीप्रति आवडे! ॥ ९० ॥
मग जयाँ वरपूजन[1] जाहलें
तंव जनीं वररत्न[2] विलोकिलें[3]!
जननिचें तयिं हृच्चिर[4] फाटलें
बहुत दुःख तिच्या मनिं वाटलें ॥ ९१ ॥
खिजविती तिजला बहु बायका
“वर बहू दिसतो ह्मणती निका।
तनुवरी मुळिं केश न पांढरा!
बहुत होय तुह्मांप्रति आसरा ॥ ९२ ॥
प्रियसुता **यमुना** बहु लाडकी
वय असे कमती तरि नेटकी।
बघितली बरवी नव जोडि ही
वर असा न मिळे फिरतां मही[7]! ॥ ९३ ॥
न जननी-जनु[8] दे तरि ती-दिसे
न जनका जनकत्व अशा मिसें[9]।
ढकलणें विहिरींत बरें परी
वितरणें[10] न बरें जरठाकरीं[11]! ॥ ९४ ॥

---

१ नवऱ्याची पूजा. २ नवरा. ३ पाहिला. ४ हृदय हेंच वस्त्र. ५ चांगली. ६ जोडी (योग्य नवरा). ७ पृथ्वी. ८ जन्म. ९ गोष्टीनें. १० देणें. ११ म्हाताऱ्याच्या हातांत.

जनन[1] जीस दिलें अपुले कुशीं[2]
अदयता[3] करणें वरें[4] का तिशीं! ।
न बरवें जरठाप्रति ओपणें
सतत तीस विपत्तित टाकणें ॥ ९५ ॥

सतत जीस ळळा बहु लाविला
कधिं न ताप जिला अगदीं दिला ।
भरंवसा अपुल्यावर बैसला
गुतविणें बरवें न तिचा गळा ॥ ९६ ॥

बहुत जी मनिं मानितसे सदा
जननिला जनकास सुसंपदा[7] ।
फसवुनी तिजला अगदीं अशी
न भरणें बरवें अपुल्या कुशी! ॥ ९७ ॥

मिळवणें रुपये दुहितेवरी
खचित हे जनरीति[9] नसे बरी ।
न बघती दुहिताहित[10], नाशिती,
जरठहस्तिं[11] तयांप्रति ओपिती[12] ॥ ९८ ॥

जनक वा जननी ह्मणणें तयां
न बरवें मुळिं ज्यांस नसे दया ।
वर तयांहुन खाटिक वाटतो
निजकरें दुहितेस विकी न तो! ॥ ९९ ॥"

१ जन्म. २ पोटीं. ३ निर्दयपणा. ४ चांगला. ५ तिच्या जवळ. ६ ह्मातान्याला. ७ संपत्ति. ८ पोट. ९ लोकांची चाल. १० मुलीचा फायदा. ११ ह्मातान्याच्या हातांत. १२ देतात.

परिसतां रडली बहु माय ती
ढळढळां, बहु दुःसह ते स्थिती ।
मग रुसून घरांमधिं बापडी
बसतसे, बहु भागविली[1] कुंडी[2] ।। १० ।।
जवळ ये नवरा, न वदे परी
सकलही विधि[3] तोच पुरा करी ।
जननिला वदवे नच शब्द तो
रडरडून गळा बहु दाटतो! ।। ११ ।।
सदनिं त्या फिरती बहु माणसें
जननिला अगदीं न कुणी पुसे ।
बहुत खिन्न गृहीं जरि ती बसे
धुसमुसे, मनिं दुःखित होतसे ।। १२ ।।
बहु असे ममता दुहितेवरी
पतिवरी ममता हि सती करी ।
करितसे अहितों पति आपण
मन बघून कसें न शिणे पण! ।। १३ ।।
न कळलें यमुनेस खरें जरी
जननिला बघतां असुखा वरी ।
जनकवाक्य तिला करणें पडे
तरि कळे न कसें पुढती घडे! ।। १४ ।।
जनक दूर तिला न मुळीं करी
नवल तीस गमे बहु अंतरीं ।

---

१ श्रमविला. २ देह. ३ लग्नांतला विधि. ४ दुःखी. ५ अहिताला. ( कन्येच्या ). ६ त्रास पावे.

रडतसे जननी तरि कां अशी
करितसे **यमुना** मनिं चौकशी ॥ ६५ ॥
तंव उभी करिती नवऱ्यापुढें
बहु घरामधिं धांदलही उडे ।
परि न तीस तिचा पति तैं दिसे
मधिं जनीं धरिला पट[1] तो असे ॥ ६६ ॥
सुबक[2] माळ करीं, **यमुना** उभी
तरि मनांत तिला भिववीहि भी[3]
जवळ माय मुळीं न तिला दिसे
सहज ये न रडें तिजला कसें! ॥ ६७ ॥
सकल चित्त तिचें जननीकडे
सहज जाय गुतूनचि बापुडें ।
"बहु रडे जननी अति विव्हळा[4]
दिसतसे तरि कां न कळे मला ॥ ६८ ॥
जनक काय तिला तरि बोलला
बहुत तापद[5] जें गमलें तिला ।
जवळ ती न दिसे मजला कशी"
मनिं असे **यमुना** गुतली अशी! ॥ ६९ ॥
पडलिसे तंव माळ गळ्यामधीं
उचलिलें तिजलागिं कुणीं तधीं[6] ।
तंव तिची पडली पतिच्या गळां
पति उभा जवळी मग देखिला ॥ ७० ॥

---

१ अंतःपट. २ चांगली. ३ भीति. ४ दुःखी. ५ दुःख देणारें.
६ त्या वेळीं.

भय बहू उपजे बघतां मनीं
न बघवे वरती तंव लोचनीं[1] ।
नवल तोंच जमून तिच्या सख्या
चिडविती तिजला मग सारख्यां[2] ॥ ७१ ॥
मग तिला कळलें सगळें खरें
तयिं न तीस रडें मुळिं आवरे ।
बहुत बाप करी समजी परी
दिसतसे **यमुना** बहु घाबरी ॥ ७२ ॥
धुसमुसे, धरणीवरि आंसवें
पटपटां पडतीहि, न सांगवे ।
बहु करून गळा मग मोकळा
रडतसे दिसते बहु विव्हळा[3] ॥ ७३ ॥
सुजविलें नयनांस रडूनियां ।
न वरि नेत्र बघे उघडूनियां ।
बहु कथा तिजला जन सांगती
परि न कर्णे[4] तिचे मुळिं ऐकती ॥ ७४ ॥
जनक जाय तिची समजी[5] करूं
परि न तें समजे मुळिं लेंकरूं ।
बहुत धाक तिला जरि दाखवी
तरि न तें यमुनामन[6] तोष[7] वी ! ॥ ७५ ॥
जन बघून विलक्षण मानिती
असुख[8] फार मनीं निज पावती ।
जनक हा कसला तरि घातकी

---

१ डोळ्यांनीं. २ एकसारख्या. ३ दुःखी. ४ कान. ५ समजूत.
६ यमुनेचें अंतःकरण. ७ आनंद पावलें नाहीं. ८ दुःख.

स्वतनुजा जरठास पहा विकी! ॥ ७६ ॥
जनक तो भुलला बहु वैभवा
धन ह्मणे मिळवूं सुखवूं जिवा।
नयन वा मन दे न मुलीकडे
वर बघून परी नवरी रडे! ॥ ७७ ॥
नवरिला नवरा न गमे पति
जनकसा मनिं त्याप्रति मानिती[1]।
जवळ जाय न ती पळ त्याचिया
भय तिला गमतें बघतां तया ॥ ७८ ॥
नवरदेव तिला जरि लाभला
बहु असे जरि सन्निध[2] बैसला।
तरि बघे यमुना न मुळीं वरी
रडरडून दिसे बहु घाबरी! ॥ ७९ ॥
न रडणें मुकिं बंद तिचें पडे
तयिं पडे जनका[3] बहु सांकडें[4]।
सकळही पुढला विधि[5] संपवी
परि तया बहु तन्मन[6] तापवी! ॥ ८० ॥
जन मिळून जयीं ह्मणती विडी
नवरिच्या मुखिं द्या, तयिं बापुडी।
खळखळां हि फिरून वधू[7] रडे
सहज कां न तुटे मग आंतडें! ॥ ८१ ॥
नवरिच्या वदनीं जंव घांस दे
नवरदेव बघून पिता वदे।

---

१ मानित्ये. २ जवळ. ३ बापाला. ४ संकट. ५ कन्यादान, लज्जाहोम वगैरे. ६ त्याचें मन. ७ नवरी.

पतिमुखामधिं घांस हि दे मुलीं
तयिं दिसे **यमुना** हिरमूसली! ॥ ८२ ॥
नयन ती न करी न वदे वरी
नयन अश्रुजलें[१] पुरते भरी।
जन जरी तिजला समजाविती
तरि पटे न तिची समजूत ती! ॥ ८३ ॥
बहुत आग्रह तैं करिती तिला
पतिस घांस तिणें न मुळीं दिला।
परि उठून घरामधिं जातसे
असुख तैं पतिला बहु होतसे ॥ ८४ ॥
जननिच्या पडली मग ते गळां
न वदवे मज शोकचि आगळा।
बहु रडे भिजवी अवनीस ती
न बरवी जगतांत तिची गती! ॥ ८५ ॥
वरें[२] बघून असें असुखावला
निजमनीं अनुताप[३] करी भला।
"धन खपून उगें बहु रोकडें
मम गळां पडलें नव सांकडें ॥ ८६ ॥
बघितलें वय मीं अपुलें न कीं
करें[४] दिला समजून हि पावकीं[५]।
सुख कसें मज होय अशा गुणें
असुख[६] कां न मिळेल मला दुणें! ॥ ८७ ॥
मज गमे नवरी तरुणी मिळो

१ आंसवांनीं. २ नवरा. ३ पश्चात्ताप. ४ हात. ५ अग्नींत. ६ दुःख.

असुख सर्व भिऊन मला पळो ! ।
न परि तीस रुचे[1] पति वृद्ध हा
नवल यांत मुळींच नसे अहा ! ॥ ८८ ॥
मजकडे न बघे जरि नोवरी
सुखद[2] होय कशी मज हे तरी ।
रडरडून दिसे बहु घाबरी
जणुं उरांत तिच्या रुतली[3] सुरी ! ॥ ८९ ॥
जनक होय कबूल धनामुळें
नवरिला तरि तें न मुळीं कळे ।
उघड दोष परी मम होय हा
नवरिला पुसिलें न मुळीं पहा ! ॥ ९० ॥"
धनमदें[4] अगदीं जरि बावरे
जनकही स्वमनीं तरि घाबरे ।
पळभरी न सुचे करणी तया
निजमनीं बहु पावतसे भया ॥ ९१ ॥
" जरि असे **यमुना** बहु नेणती
तरि पहा असुखास वरी किती ! ।
खळखळां रडते बहु ओरडे
बहुत हें पडलें मज सांकडें ॥ ९२ ॥
खचित हे करणी[5] न असे बरी
जरि करून चुकें सहजीं तरी ।
स्वतनुजेस विकून धनाप्रती
मिळविलें, ह्मणतील मला कृती[6] ! ॥ ९३ ॥

---

१ आवडतो. २ सुख देणारी. ३ रुपली–लागली. ४ द्रव्याच्या गर्वानें. ५ काम. ६ शहाणे.

प्रिय मला तनुजा **यमुना** जरी
मज तिचा बहु रागचि ये तरी! ।
पळ हि हट्ट त्यजी न मुळीं कशी
रडतसे जणुं होउनियां पिशी[1] ॥ ९४ ॥
सकल लोक मदीय[2] मुखाकडे
बघति हे, बघवे न तयांकडे ।
परि न हे तनुजा अवरी रडें
असुख दे मज संकट एवढें ॥ ९५ ॥
जरि असे दयिता[3] तरि नावडे
सुतनुजेसह[4] तीहि पहा रडे ।
तरि करूंहि कसें न सुचे गती
कवण युक्ति मला बरवी कथी!" ॥ ९६ ॥
जरि विचार करी बहु बापुडा
जरि तयास मिळे बरवा धडा! ।
तरि न सौख्य मिळे **यमुने**प्रती
विफलें[5] जन्म तिचाच वदूं किती! ॥ ९७ ॥
हळुहळू जननी असुखाप्रती
विसरली, जन ही सुख पावती ।
जनकही विसरे अपुली चुकी
तरि न सौख्य मिळे **यमुनेस** कीं! ॥ ९८ ॥
विसरला नवरा अनुताप[6] तो
निज मनीं सुख फारचि मानितो ।
बहुत लोभ करी नवरीवरी

---

१ वेडी. २ माझ्या. ३ आवडती स्त्री. ४ चांगल्या मुलीसह.
५ फुकट. ६ पश्चात्ताप.

तरि न सौख्य मुळीं यमुना वरी[1]! ॥ ९९ ॥
सुजन काय तुह्मां बहु मानवे
अहित[2]कारक हें अथवा नव्हे ।
नयन कां मिटितां, न बघा वरी
कवण अन्य विचार करी तरी! ॥ १०० ॥
जनक जो विकितो निज कन्यका
कनक[3]लोभ धरून मनीं निका[4] ।
जनक तो न, दुजा वृक[5] वाटतो
निजकरें दुहिताहित नाशितो! ॥ १०१ ॥
न दुसरा पति होय तयांप्रती
तरुण त्यांस बघून करा पती ।
विधिबळें घडतें सगळें जरी
न गिळणें बरवें विष कीं तरी! ॥ १०२ ॥
जरठ कान्त[6] बघूनहि बापुडा
न ह्मणणें बरवें विधि[7] वांकडा! ।
उदरपूर्ति[8] घडे इतक्या मिसें
न करणें बरवें कधिं ही असें ॥ १०३ ॥
सुजन चित्त वळो विषयांत या
बहु करा नवरीवरती दया ।
सतत कीं सदुपायें[9] करूनियां
अहितकारक पद्धति न्यां लयां[10] ॥ १०४ ॥

---

१ घेई. २ तोटा करणारें. ३ सोन्याची आशा. ४ चांगला. ५ लांडगा. ६ नवरा. ७ दैव. ८ पोट भरणें. ९ चांगला उपाय. १० नाहींशी करा.

अभिप्राय. "लोंढे यांचा हा प्रयत्न त्यांच्या पूर्वीच्या प्रयत्नांप्रमाणेंच चांगला साधला आहे."

विविधज्ञानविस्तार.

**ऐतिहासिक संगीतः**-( आवृत्ति दुसरी ) किंमत दीड आणा, साक्या, दिंड्या, पदें वगैरे कविता. अभिप्राय. "कविता सुबोध, सोपी, व सहज रीतीनें केलेली आहे. इतिहासाचा नाद मुलांस लागण्यास हा चांगला मार्ग आहे."

ज्ञानचक्षु.

**बोधामृतः**- श्लोकबद्ध. किंमत दीड आणा. अभिप्राय. "पद्यें सुरस आणि बोध फार चांगला आहे. मुलांनीं अवश्य वाचावें."

बालबोध.

**बोधसुधाः**-( आवृत्ति दुसरी ) किंमत दीड आणा. साक्या, दिंड्या पदें वगैरे कविता. अभिप्राय. "मुलांस कवितेंत बोध केला आहे. चांगला व सोपा आहे."

पुणेंवैभव.

**पुष्पगुच्छः**-( आवृत्ति दुसरी ) किंमत दीड आणा. श्लोकबद्ध. अभिप्राय. "कविता चांगल्या आहेत. मुलांनीं वाचण्यास योग्य आहेत. रा. लोंढे हे अर्वाचीन कवींपैकीं एक आहेत".

मनोरंजन निबंधचंद्रिका.

**पुष्पमालाः**-श्लोकबद्ध. किंमत दीड आणा. अभिप्राय. "कविता साधी आणि हृदयंगम उतरली आहे. लोंढे यांनीं मुलांकरितां चांगला उपक्रम चालविला आहे."

काव्यरत्नावली.

**पुष्पावलीः**- श्लोकबद्ध. किंमत दीड आणा. अभिप्राय. "सोप्या लहान कविता आहेत. एकंदरींत पुस्तक चांगल्यांपैकीं आहे."

केसरी.

**बोधमालाः**-श्लोकबद्ध. किंमत दीड आणा. अभिप्राय. "रा. लोंढे यांस कविता रचण्याची हातोटी चांगली साधली आहे. कित्येक ठिकाणीं बोध चांगला साधला आहे."

इस्रायली धर्मदीप.

**मुलांचें प्राथमिक शिक्षण**:–किंमत साडेपांच आणे. अभिप्राय. "यांत लहान मुलांस प्रत्येक विषयांत प्राथमिक शिक्षण कसें द्यावें, हें सांगितलें आहे. हें साडेपांच आण्यांचें पुस्तक प्रत्येक शिक्षकास घेतां येणार आहे, व तें सर्व प्रकारें संग्रहणीय आहे."

**शाळापत्रक.**

**नदीय आणि उद्योग**:–किंमत साडेपांच आणे. अभिप्राय. "हा सुंदर निबंध सुप्रसिद्ध रा. मोरो गणेश लोंढे यांनीं लिहिला आहे आणि दक्षिणाप्राइझ कमिटीनें यास इनाम दिलें आहे. या दोन गोष्टींवरूनच निबंधाची योग्यता कळण्यासारखी आहे. रा. लोंढे यांची भाषा निसर्गत: सुबोध, गोड आणि साधी असून विषयवर्णन सप्रमाण व सयुक्तिक आहे. विषयविवेचन मुद्देसूद आणि मनोहर असल्यामुळें निबंध वाचनीय झाला आहे. तरुण जनांनीं अवश्य वाचावा."

## काव्यसंग्रह.

**शतकत्रय**:–अथवा तीनशें सुभाषित श्लोक. किं. ५ आणे. अभिप्राय. "कवीनें संस्कृत ग्रंथांतील विशेषत: सुभाषित ग्रंथांतील कल्पना, विचार, इत्यादि घेतले आहेत हें खरें, तथापि त्याच्या वाणींत 'प्रसाद' हा गुण चांगला साधला आहे आणि एकंदरींत रचना चांगली झाली आहे, असें वाटतें." **द. प्रा. क. स.**

**यमुना**:– अथवा ह्मातारा नवरा व लहान नवरी. किं. दीड आणा. अभिप्राय.–"जो बाप पैसा घेऊन आपली मुलगी ह्मातान्यास देतो त्याची निर्दयता, पैसा मिळवण्याची हांव, लग्न करणाराची विटंबना, मुलीच्या जन्माचें मातेरें, इतक्या गोष्टींचें चित्र हें पुस्तक वाचल्यानें डोळ्यांपुढें उभें रहातें." **द. प्रा. क. स.**

**गोदावरी नाटक किं. बारा आणे.**

आहे जरी फार हुशार बालक
नाहीं परी स्वच्छ शरीर वा मुख ।
घाणेरडें वस्त्र असे तनूवरी[1]
पाहून त्यां सौख्य न होय अंतरीं[2] ॥ ५ ॥

धुवावया तोंड न थोडकें जल — वंशस्थ
धुवावया वस्त्र न पाहिजे बल ।
छदाम ही खर्च न होय आपला
असून थोडें जन बोलती भला ॥ ६ ॥

दरिद्र.

दरिद्र कोणाप्रति ये न वारितां[3]
तरी न ये हा अपराध मानितां ।
करून उद्योग जनांस तोषवा
अपाप येणें मिळवाल वैभवा[4] ॥ ७ ॥

उद्योग.

उद्योग दे द्रव्य नरास फार
उद्योग विद्येप्रति दे अपार । — इंद्रवज्रा.
उद्योग हा सर्व कलांत सार[5]
उद्योग दे सर्व जनांस थार[6] ॥ ८ ॥

उद्योग दे सौख्य हरी[7] विपत्ति
उद्योग दे वैभव आणि कीर्ति । — उपजाति.
उद्योग हा थोरपणाप्रती ने
सदैव[8] उद्योग करा श्रमानें ॥ ९ ॥

---

१ आंगावर. २ मनांत. ३ नाहींसें करितां. ४ संपत्तीला. ५ श्रेष्ठ. ६ आश्रय. ७ नाहींशी करितो. ८ नेहमीं.

# बोधशतक.

## श्लोक. स्वच्छता.

मालि[nी]

उठुन सतत[1] बाळा आवडीनें सकाळीं
रदनमुख[2] धुवावें शुद्ध होऊन वेळीं ।
गमन मग करावें[3] शीघ्र विद्यालयांत[4]
असुन बहुत थोडें फायदा फार यांत ॥ १ ॥

इंद्रव

वस्त्रें तुझीं स्वच्छ सदा असावीं
फाटून भोंकें पडलीं नसावीं ।
वेळीं धुवीं स्वच्छ [illegible] होती
भोंकें शिवावीं पडतां त्वरें तीं ॥ २ ॥

मालि

मलिनपण[5] जनांच्या नावडे[6] मानसातें
मलिन तनय[7] नेत्रीं पाहतां दुःख होतें ।
सतत जवळ येतां तो कुणा आवडेल
मलिनपण तयाला खिन्न[8] तेव्हां करील ॥ ३ ॥

इंद्रवंश

वस्त्रें बहु स्वच्छ तसेंच[9] तें मुख
पाहून होतें बहु मानसा सुख ।
चातुर्य त्या भूषण देतसे वरी
व्हावें तुह्मी स्वच्छ ह्मणून यांपरी[10] ॥ ४ ॥

---

१ नेहमीं. २ दांत व तोंड. ३ जावें. ४ शाळेंत. ५ मळकटपणा
६ आवडत नाहीं. ७ मुलगा. ८ दुःखी. ९ आणखी. १० याप्रमाणें

## विद्या.

वाटे वरा बाळपणांत खेळ
जातो परि व्यर्थ उगाच वेळ । इंद्रवज्रा.
विद्या जशी बाळपणांत येते
तैशी न येई पुढती कधीं ते ॥ १० ॥

वांके जशी कोमल वेल लौकरी इंद्रवंशा.
बाल्यांत विद्या मति[1] तेंवि ती करी ।
वांके न होतां बहु थोर कीं लता[2]
विद्या न येई वय फार वाढतां ॥ ११ ॥

विद्या न येई शिकल्याविणें ती
परिश्रमें[3] वश्य[4] अपाप होती । उपजाति.
चोरावया शक्त[5] न तीस चोर
तिच्यामुळें सान[6] हि होय थोर ॥ १२ ॥

रक्षीतसे होउन नित्य माय[7]
हिता कथाया जणुं तात होय ।
कांतेपरी[8] अंतर[9] तोषवी ते
चौघांमधीं मान नरास देते ॥ १३ ॥

नासे न, होई न उणी[10], कदाही
मिळे न देतां न, कुणाप्रती ही ।
देतां तरी दुप्पट होय जाणा
विद्या धनाहून[11] विशेष माना ॥ १४ ॥

---

१ बुद्धि. २ वेल. ३ अभ्यासानें. ४ स्वाधीन. ५ समर्थ. ६ लहान. ७ आई. ८ बायकोप्रमाणें. ९ मन. १० कमी. ११ पैशापेक्षां.

साधावया यत्न इला कराल
तरी तुह्मां हे बहुधा मिळेल ।
देऊनियां वैभव तोषवील
आनंदवूनी वय घालवील ॥ १५ ॥

गुरु.

तुह्मांप्रती हे गुरु नित्य बोलती वंशस्थ.
करा न अभ्यास ह्मणून मारिती ।
तुह्मांस ते शत्रुसमान वाटती
तरी तुह्मां ते पथ[1] नीट दाविती ॥ १६ ॥
विद्या मिळो आज तुह्मांस सारी
विपत्ति येवो न तुह्मां पुढारीं[2] । उपजाति.
प्रयत्न ते यास्तव चालवीती
न शत्रु ते मित्र तुह्मांस होती[3] ॥ १७ ॥
लागे तुह्मां आज पदार्थ गोड
खातां करी रोग शरीर रोडें[4] । इंद्रवज्रा.
खातां कडू औषध रोग वारी[5]
तैसे तुह्मां हे गुरु सौख्यकारी[6] ॥ १८ ॥
जैशी आहे तीक्ष्ण[7] ही खड्गधारा[8] शालिनी.
तैसा वाटे शिक्षकांचा दरारा ।
होती हे तों पूर्ण चित्तीं दयेनें
शोभा देती सत्य विद्याधनानें[9] ॥ १९ ॥

---

१ रस्ता. २ पुढें. ३ आहेत. ४ रोडकें. ५ नाहींसा करतें. ६ सुख देणारे. ७ तिखट. ८ तरवारीची धार. ९ विद्यारूपी पैशानें.

उपरि[1] मकरें[2] तेंवि क्रूर हे वाटताती — मालिनी.
मधुर तरि सुधेनें[3] पूर्ण चित्तांत होती ।
करुन सदुपदेशा ताप[4] हे नाशिताती
करवुन मधुविद्यापान[5] संतोष देती ॥ २० ॥

वाटती सुगुरु रोगचिकित्सक[6] — यूथिका.
नाशुनी तम[7] मना करिती सुख ।
आळसास पिटिती शरिरांतुनी
ज्ञान हे नव सुधा[8] भरिती मनीं ॥ २१ ॥

सतत प्रयत्न.

शाळेंत वेळेवर जात जावें — इंद्रवज्रा.
विद्येवरी लक्ष सदा असावें ।
आज्ञा गुरूची स्वमनीं धरावी
विद्या प्रयत्नें अपुली करावी ॥ २२ ॥

नियम धरुन मुंगी जातसे अद्रिमाथां[9] — मालिनी.
करुन सतत यत्ना होय कोळी रहाता ।
भ्रमुन सतत माशी सांठवी कीं मधाला
तरि न[10] सतत यत्नें काय लाधे नराला ॥ २३ ॥

आहे कठीण बहु हें न ह्मणा धड्याला — वसंततिलका.
यत्नें करा झटुन येइल तो तुह्माला ।

---

१ वर. २ सुसर. ३ अमृतानें. ४ संताप. ५ मधासारखें गोड असें विद्येचें प्राशन. ६ रोग दूर करणारे वैद्य. ७ अज्ञान. ८ अमृत. ९ पर्वताच्या शिखरावर. १० मिळत नाहीं.

येई न तो तरि तयास नकाच टाकूं
प्रेमें करा अधिक यत्न करा न कांकूं ॥ २४ ॥

कोळ्याचें गृह मोडतां करितसे यत्नें फिरूनी नवें शा. वि.
माशीचें गृह मोडतां फिरुन ती कामास लागे जवें[1]।
आहे काय कठीण यापरि झटे त्याला जगीं या अहा !
माशीचें मुख केवढें मध किती ती सांठवी कीं पहा ॥ २५ ॥

वेळ.

हा तास जागा करितो तुह्मांस
जातो[2] किती वेळ उगा[3] लयास[2]। इंद्रवज्रा.
द्रव्याहुनी वेळ विशेष माना
विद्येंत कां वेंचुन[4] धन्य व्हाना ! ॥ २६ ॥
शाळेंतली वेळ चुकून गेली
तेणें तुह्मांला बहु हानि[5] जाली।
शिक्षेस होऊन तुह्मीच पात्र[6]
अभ्यास गेला वुडवून मात्र ! ॥ २७ ॥
पळे सदा वेळ जवें बहूत हा वंशस्थ.
धरी तया उद्यमयुक्त[7] तो पहा।
न सांपडे वेळ जडाप्रती[8] कदा
फसून पावे बहु नित्य आपदा[9] ॥ २८ ॥
आहे मुला आळस थोर वैरी उपजाति.
सन्मित्र उद्योगचि सौख्यकारी।

१ वेगानें. २ नाहींसा होतो. ३ उगीच. ४ खर्चून. ५ नाश.
६ योग्य. ७ उद्योगी. ८ आळशाला. ९ दुःख.

विपत्ति[1] येते पहिल्यास घेतां
संपत्ति लाधे दुसऱ्यास गातां ॥ २९ ॥
लक्ष्मी न[2] होई[2] वश[2] आळशाला
विपत्ति लोभें वरिते तयाला ।
लक्ष्मी वरी नित्य निरालसाला[3] ।
सत्कीर्ति आणीक वरी तयाला ॥ ३० ॥

## खेळ.

इंद्रवंशा.

वाटे तुह्मांला जरि खेळ गोड हा
खेळा, परी त्यांत न लोभुनी रहा ।
अभ्यास साधून हि खेळ साधितां
होई तुह्मांला मग कोण बोलता ॥ ३१ ॥

## सत्य.

भुजंगप्रयात.

सदा सत्य बोला मुखानें स्वकीयें[4]
जगीं धन्यता त्यामुळें प्राप्त होय ।
लबाडास विश्वासितो कोण पाहीं
खरें बोलणें ठाउकें ज्यास नाहीं ॥ ३२ ॥
जरी बोलला शब्द तो सर्व सत्य
जनां वाटती तत्क्षणीं[5] ते असत्य[6] ।
असत्यामुळें सत्य जालें असत्य
अशा टाकुनी कां न बोलाल सत्य ॥ ३३ ॥

---

१ गरीबी. २ मिळत नाहीं. ३ उद्योग्याला. ४ आपल्या.
५ त्याच वेळीं. ६ खोटें.

## मित्र.

करितां अहितांवरी[१] हि माया
नलगे वेळ तयास मित्र व्हाया । माल्यभारा.
करितां स्वहितीं[२] तशीच माया
तरि तो कां न वळेल साह्य द्याया ! ॥ ३४ ॥

अवश्य सन्मित्र[३] जगीं तुह्मां असे
करा न, जो दुष्ट तसा भला नसे । वंशस्थ.
मिळेल सन्मित्र तरी घडे सुख
मिळेल दोघांस जगांत लौकिक ॥ ३५ ॥

बोधूनियां नित्य मनास तोषवी इंद्रवंशा
दारिद्र्य[४] येतां बहु लोभ दाखवी ।
उद्विग्न[५] होऊं न[६] मनास देतसे
साह्य[७] स्वतां फार तया करीतसे ॥ ३६ ॥

चाले स्वतां उत्तम चाल पाहुनी
मित्रास दे मार्ग हि तोच लावुनी ।
सन्मित्र तूं मान तयास आपला
लोकीं असे दुर्लभ[८] मित्र चांगला ॥ ३७ ॥

## मित्र मिळण्यास उपाय.

उपाय कथितों[९] तुह्मांप्रति सुमित्र लाधावया पृथ्वी.
करा मदत त्या क्षणीं गरज लागते जैं तया ।

---

१ शत्रूवर. २ आपल्या मित्रावर. ३ चांगला मित्र. ४ गरीबी. ५ दुःखी. ६ देत नाहीं. ७ मदत. ८ मिळण्यास कठीण. ९ सांगतों.

असेल जरि चांगला गरज तो तुह्मां लागतां
करील तरि तोषुनी बहुत साह्य हें जाणतां ॥ ३८ ॥

अन्यापाशीं जेंवि तूं वागतोसी
तैशा भावें तोहि वागे तुझ्यासीं । शालिनी.
प्रेमें जैशा वागवावें दुज्यातें
तैशा प्रेमें वागवी तोहि तूतें ॥ ३९ ॥

अडचणीमुळें मागणें पडे शुद्धकामदा.
गरज भागतां प्रेम तैं जडे ।
उभयतां पुढें नीट वागतां
मग दुणावतें प्रेम तत्वता ॥ ४० ॥

होई कुठें खेळ पथांत चांगला
पाहावया बालसमूह थांबला । इंद्रवंशा.
गर्दीमुळें खेळ पडे न दृष्टिला
मागें उभा बालक एक राहिला ॥ ४१ ॥

होऊन मागें जरि अन्य बालक
दावावया खेळ तयास उत्सुक ।
झाला, तरी खेळ बघून थोडका
देईल जागा फिरुनी न त्यास का ? ॥४२ ॥

आनंद दोघांप्रति होय यामुळें
दोघांमधीं प्रेम अपाप तैं जुळे ।

---

१ दुसऱ्याजवळ. २ रीतीनें. ३ पुरली असतां. ४ दुप्पट होतें. ५ खरोखर. ६ पुष्कळ मुलें. ७ दुसरा. ८ तयार.

दोघे पुढें नीट सदैव वागतां
दोघांमधीं लोभहि होय वाढता ॥ ४३ ॥
शाळेंत आज्ञा गुरुची मनीं धरा
मातापिता जें कथिती घरीं करा ।
देऊनियां जन्म तुह्मांस वाढवी
आई, पिता शिक्षणें[1] नित्य चालवी ॥ ४४ ॥

आई.

पाजी बाळपणीं तुह्मांप्रति पयो[2] ती कोण सांगा बरें शा.वि.
विश्रांतिस्तव[3] पाळण्यांत निजवी जी थोपटूनी करें ।
गालांचे वरचेवरी मृदु[4] मुके जी घेतसे फारशी
ऐशा या जननीप्रती[5] विसरतां हे भ्रांति होते कशी ॥ ४५ ॥
दुःखें व्यापुनियां तुह्मी रडतसां पाहून शोकें भरे
ग्रासी[6] काळ तुह्मांस काय ह्मणुनी जीतें रडें नावरे[7] ।
जी बैसे जवळी उपायहि करी देवा स्तवी फारशी
ऐशा या जननीप्रती विसरतां हे भ्रांति होते कशी ॥ ४६ ॥
घेऊनी कडियेवरी[8] मिरविलें संगोपना ठेविलें[9]
हातें औषध तें उगाळुन जिणें प्रेमें तुह्मां पाजिलें ।
लावूनी उटणें सुवासिक जलें न्हाणून ठेवी खुशी
ऐशा या जननीप्रती विसरतां हे भ्रांति होते कशी ॥ ४७ ॥

---

१ शिकवणें. २ दुधाला. ३ विसांवा मिळावा—झोंप लागावी—म्हणून. ४ हळूहळू, गोडगोड. ५ आईला. ६ गिळील. ७ आटोपत नाहीं. ८ कडेवर. ९ चांगलें रक्षण केलें.

ऐसे कष्ट तिचे स्मरून वचना माना तिच्या सादर
ठेवा मान तिचा न लोभ विसरा प्रेमें करा आदर ।
होतां वृद्ध जपा तुह्मांस जपली बाल्यांत[1] माता जशी
ऐशा या जननीप्रती विसरतां हे भ्रांति होते कशी ॥ ४८ ॥

बाप.

वंशस्थ.

तुह्मांस जो बोधसुधेस[2] पाजितो
तुह्मी शिकावें स्वमनांत इच्छितो ।
जनीं मिळो नित्य तुह्मांस लौकिक
मनास ज्याच्या बहु हेंच दे सुख ॥ ४९ ॥
जपे तुह्मां नित्य सुमार्गे[3] दाखवी
हितास सांगे सुपथांत वागवी ।
सुखास दे नित्य हितार्थ[4] तो झटे
पित्यापरी मित्र तुह्मां मिळे कुठें ! ॥ ५० ॥

इंद्रवज्रा.

आज्ञा तयाची स्वमनीं धरावी
माया तयाच्या वरती करावी ।
सांगे जसें वागत तेंवि जावें
वृद्धत्वें[5] येतां बहु त्या जपावें ॥ ५१ ॥

इंद्रवंशा.

दे लागतां भूकहि माय खावया
वाटेल तें अंबर[6] तात ल्यावया[7] ।
होतां तुह्मां दुःख कुणास सांगतां
देंतां कुणी इष्ट[8] पदार्थ तोषतां ॥ ५२ ॥

---

१ बालपणांत. २ उपदेशरूप अमृताला. ३ चांगला रस्ता. ४ फायद्याकरितां. ५ ह्मातारपण. ६ वस्त्र. ७ आंगावर घेण्याला. ८ इच्छिलेला.

वंशस्थ.

महत्त्व[1] त्यांचें[2] न मनीं जरी भरे
जयांस नाहींत तयां पहा बरें ।
उदास[3] कैसीं दिसतात बालकें
तयांस हीं कोठुन लाधती सुखें ! ॥ ५३ ॥

कृतघ्न[4] व्हावें न तुह्मी तयांप्रती
धरा तयांचे चरणीं सदा रती[5] ।
तयांस देतां सुख तें तुह्मां सुख
जनांत वाढेल अपाप लौकिक ॥ ५४ ॥

### व्यसन.

तोटक.

सहसा व्यसनांत शिरा न मुळीं
जडतां मग तें न सुटे समुळीं[6] ।
चिखलांत जसा मदमत्त[7] करी[8]
रुततां[9] निघतो न कधीं हि वरी ॥ ५५ ॥

### राग.

शरिरामधिं राग नसेच बरा
जडतां बहु ताप करी शरिरा ।
करितो बहु संगतिलागिं[10] नड
ह्मणती जन त्यास तयीं तुसड ॥ ५६ ॥

### काम.

मदनाकुल[11] होउन चार करी
बुडवी धन आणिक कीर्ति बरी ।

---

१ मोठेपण. २ आईवापांचें. ३ दीनवाणीं. ४ उपकार विसरणारें. ५ प्रीति. ६ अगदीं. ७ मदोन्मत्त, माजलेला. ८ हत्ती. ९ अडकला असतां. १० सोबतीला. ११ मदनानें वेडावलेला.

वरितो अपकीर्ति जनांत सदा
वरिते मग त्यास सुखें विपदा ॥ ५७ ॥

लोभ.

पर[1]वित्त मिळो न धरा स्वमनीं
बरवा विपरीत[2] न लोभ जनीं ।
अपकीर्ति जनांमधिं होउनियां
सुजनत्व[3] समग्र हि जाय लया ॥ ५८ ॥

... ग्रंथ संग्रहाल ... नं. ... ता. ...

मद.

विनयें युत[4] बालक शोभतसे
न मदें युत तेंवि जनीं विलसे ।
विनयाविण जाणिव हीन दिसे
सुमनाविण[5] वल्लि[6] न ती विलसे ॥ ५९ ॥

मोह.

मनुजावर लोभ करा असतां
न करा परि शोक बहू मरतां ।
उपजे जन नाश तया असतो
करितां परि शोक न तो उठतो ॥ ६० ॥
निज लोभ मना जरि दुःख करी
करुनी हि विवेक[7] तयास हरीं[8] ।
अमरत्व[9] नसे कवणा[10] हि जना
मिळणें सकलांस असे निधना[11] ॥ ६१ ॥

---

१ दुसऱ्याचें द्रव्य. २ उलटा, वाईट. ३ भलेपण. ४ नम्रतेनें युक्त. ५ फुलाशिवाय. ६ वेल. ७ विचार. ८ दूर कर. ९ अमरपणा. १० कोणत्याही. ११ मरणाला.

### मत्सर.

न करा परमत्सर हेंच बरें
करितां तव दुःख कुठून सरे ।
न मिळे तुज सौख्य तदीय[1] कदा
सुख जाउन त्यास नये विपदा ॥ ६२ ॥

विपदा जरि त्यास मिळे, तुजला
तरि काय नफा बघ होय मुला ।
न करीं परमत्सर हेंच बरें
सुख यांत तुला न मिळेल खरें ॥ ६३ ॥

### पैसा मिळवणें.

इंद्रवंशा.

विद्या करा, दूर करून आळस
उद्योग ही ठेवुन त्यांत मानस ।
लाधेल जें द्रव्य अशा बऱ्या पथें
देईल चित्तास अपार सौख्य तें ॥ ६४ ॥

इंद्रवज्रा.

संपादिलें जें धन निंद्य[2] पंथें[3]
देई न तें सौख्य कधीं मनातें ।
दृष्टीपुढें तीं दिसती कुकर्में
उच्चारिती लोकहि मात्र वर्में[4] ॥ ६५ ॥

### संतोष.

उपजाति.

सुखी असावें असल्या स्थितींत
इच्छूं नये अन्य[5] कधीं मनांत ।
संतोष हें मुख्य निधान[6] जाणा
तें प्राप्त होतां मग दुःख कोणा ! ॥ ६६ ॥

---

१ त्याचें. २ वाईट. ३ मार्गानें ४ उणीं. ५ दुसरी. ६ ठेवा.

स्रग्धरा.

चालें मी आज सौख्यें जरि निजचरणीं घालुनी चांग[1] जोडा
पाहावें ना तया जो बसुन मिरवतो घेउनी थोर घोडा।
चाले जोड्याविणें तो नर बघुन मना आपल्या तोष द्यावा
चित्तालागीं न द्यावें असुख[2] न मिळत्या बांधुनी थोर हांवा[3] ६७

वाईट काम.

कर्मास तूं यास्तव निंद्य सोडीं
दुर्बुद्धि[4] ही स्वीय मनीं न जोडीं। उपजाति.
कुकल्पना ठेविं न अल्प पोटीं
कृत्यें बऱ्या काळ[5] समग्र लोटीं ॥ ६८॥

चोरी.

न कळत दुसऱ्याची वस्तु केव्हां न घेईं मालिनी.
परत गवसलेली वस्तु तत्काळ[6] देईं।
मदत हरवलेली वस्तु शोधावयाला
कर, न निरुपयोगी हें तुला होय वाळा ॥ ६९॥

जुगार.

खेळें मुला तूं न जुवां[7] कधींही
वांदी[8] तुला ही फसवील पाहीं। इंद्रवज्रा.
राजा[9] तुला तो बहुधा न लाधे
या सोडतीच्यामधिं फार वांधे[10] ॥ ७०॥
द्रव्यार्थ ऐसे करितात खेळ उपजाति.
जमून हे मूर्ख समग्र टोळ।

---

१ चांगला. २ दुःख. ३ उमेदी; इच्छा. ४ वाईट बुद्धि. ५ घालव. ६ तावडतोब. ७ जुगार. ८ चामड्याची वादी. ९ क्याटांतला राजा. १० हरकती.

लागून नादीं जन मात्र वेळ
गमाविती द्रव्य हि रेळचेळ ॥ ७१ ॥

अपशब्द.

मार्गामधीं नित्य तुह्मांस लोक
जे भेटती त्यांत असे कितीक । इंद्रवज्रा.
जे बोलताती अपशब्द[1] फार
आहे बरें काय करा विचार ॥ ७२ ॥

वाणी तुह्मांला प्रभु देवराय
देई तिचा हा उपयोग काय । उपजाति.
कधीं नसे हें बरवें भल्याला
ह्मणून मी सांगतसें तुह्माला ॥ ७३ ॥

केला हि मोठा अपराध कोणें[2]
येईल तो काय भरून यानें[3] ।
दुजें[4] नसे शासन काय त्याला
मुखें कशाला अपशब्द बोला ! ॥ ७४ ॥

जरी मनाला बहु राग आला
क्षमा करावी गिळुनी तयाला । उपेंद्रवज्रा.
मुखें न बोला अपशब्द कोणा
तुह्मांस हें भूषण होय जाणा ॥ ७५ ॥

पाडी उराला अपशब्द भोंक इंद्रवज्रा.
दे ऐकणारास अपार शोकें[5] ।

---

१ वाईट शब्द, शिव्या. २ कोणी एकानें. ३ अपशब्दानें.
४ दुसरें. ५ दुःख.

दोघांमधीं भांडण वाढ घेई
तो मूळ[1] याला अपशब्द होई ॥ ७६ ॥
दावावयातें दुसऱ्यास राग
ये बोलणें त्या अपशब्द भाग ।
वाटे असें हा तरि दोष होय
नाहींत या काय दुजे उपाय ! ॥ ७७ ॥

यावा तयाचा स्वमनास वीट[2]
होईल जों वागणुकींत नीट ।
होईल हें शासन[3] फार त्याला
हें गोड वाटो तुमच्या मनाला ॥ ७८ ॥

वागणूक.

धरीं वयस्यांजवळी[4] बरोबरी — वंशस्थ.
वडील त्यांसन्निध नम्रता धरीं ।
लहान जे त्यांमधिं सुज्ञता वरीं
बरोबरी ते करितील नातरी ॥ ७९ ॥

बंधूंसवें वाग धरून लोभा
स्पर्धा[5] न ठेवीं भगिनींसवें[6] बा । — इंद्रवज्रा.
ज्याचें जसें चित्त दिसे मनाशीं
तैसेंच तूं वर्तन ठेव त्याशीं ॥ ८० ॥

गुह्यें[7] न सांगें भलत्या नराप्रती — इंद्रवंशा.
लोकांमधीं जाऊन सर्व तो कथी[8] ।

---

१ कारण. २ तिटकारा. ३ शिक्षा. ४ समान वयाच्या मंडळीबरोबर. ५ भांडण. ६ वहिणींबरोबर. ७ गुप्त गोष्टी. ८ सांगतो.

ग्रंथ संग्रह

चित्तांत जाणून असे कसा नर
विश्वास तूं ठेव तसाच त्यावर ॥ ८१ ॥

‘ अरे ’ न बोला हृदयास लागतें वंशस्थ.
‘ अहो ’ ह्मणाया तरि काय वेंचतें ।
लहानें[1] तूं ज्यास मनांत मानिसी
तयास वाटे न तसें स्वमानसीं ॥ ८२ ॥

मुखें वदें संतत[2] गोड भाषणें ।
सदा भल्याशीं सुहृदत्व जोडणें ।
प्रसंग पाहून वदें सुभाषण
नको वदूं भाषण धीर सोडुन ॥ ८३ ॥

कर्ज.

हातीं असेल धन खर्च करीं तसेंची । वसंततिलका.
काढून कर्ज सहसा न[3] कधींहि वेंचीं[3] ।
ठेवूं नको तव कदापि हॅटांत[4] खातें
खातें न तें तव यशास धनास खातें[5] ! ॥ ८४ ॥

मिळेल जें त्याहुन खर्च थोडा
करीं न होई स्वमनांत वेडा । उपजाति-
शिरे जरी कर्ज गृहांत बापा
देईल तूतें न फिरून तापा ॥ ८५ ॥

सदैव हें द्रव्य मिळे कसें तुला वंशस्थ-
करूनियां संचय[6] ठेव चांगला ।

---

१ मानानें लहान. २ नेहमीं. ३ खर्च करूं नको. ४ बाजारांत. ५ भक्षण करतें. ६ सांठा.

विपत्ति येतां उपयोग होतसे
न वित्त[1], तूतें तरि कोण बा पुसे ॥ ८६ ॥

वृद्धापकाळीं[2] न चले उपाय
सामर्थ्य जाई थकतात पाय । उपजाति.
तेव्हां तुला केंवि मिळेल पैसा
न ठेवितां बा परिणाम कैसा ॥ ८७ ॥

घेऊं नको फार उगाच झोंप
होईल तेणें तव बुद्धिलोप[3] । इंद्रवज्रा.
दे थार[4] निद्रा मनिं आळसाला
ती द्वेषिते[5] नित्य सदुद्यमाला[6] ॥ ८८ ॥

भूक.

लागेल जेव्हां तुजलागिं भूक
जेवीं तयीं हें तुज होय ठीक । उपजाति.
क्षुधेहुनी आणिक तूं न जेवीं
सुग्रास तूं दोन कमीच सेवीं[9] ॥ ८९ ॥

जेवितां बहु, भरेल आळस
उद्यमांत न रमेल मानस । रथोद्धता.
तें पचे न मग अन्न लौकर
रोग देह[10] तव हें करी घर ॥ ९० ॥

---

१ पैसा. २ म्हातारपणीं. ३ बुद्धीचा नाश. ४ आश्रय. ५ द्वेष करते. ६ चांगल्या उद्योगाला. ७ भुकेपेक्षां. ८ उत्तम भोजन, पक्वान्नें. ९ खा. १० शरीर.

परोपकार.

करें करावा उपकार सर्वदा ।
हरावया धांउन जा परापदा[1] ।
मुखें करावा उपदेश चांगला
परोपकारी नर तो जगीं भला ॥ ९१ ॥

ईश्वर.

दिली तुह्मांतें वर[2] दृष्टि[2] कोणीं ।
कोणीं दिली सुस्वर[3] चांग[4] वाणी ।   उपजाति.
कोणीं दिले हे कर आणि पाय
त्याची तुह्मांला स्मृति[5] होय काय ? ॥ ९२ ॥

मनुजत्व[6] तुह्मांस अर्पिलें   सुंदरी
वरवें ज्ञान तुह्मांप्रती दिलें ।
करितो वहु नित्य रक्षण
स्मरतां काय तयाप्रती पण ! ॥ ९३ ॥

अखिला[7] जगतास रक्षितो
सकळांतें सुखवून पोशितो ।
लघु ही बहु जीव पाहतो
धरितां काय मनांत देव तो ! ॥ ९४ ॥

वरितांक्षणिं जन्मे[8] बालक
करुनी दूध तयास दे सुख ।
पुढती जंव थोर होय तें
तंव तें दूध तसेंच वाढतें ॥ ९५ ॥

---

१ दुसऱ्याचें दुःख. २ चांगली नजर. ३ गोड. ४ चांगली.
५ आठवण ६ मनुष्यपण. ७ सगळया. ८ उपजतांच.

क.

करितो बहु तो कृपा अशी
स्मृति त्याची न धरा मनीं कशी ।
तरि त्यास सदा तुह्मी स्मरा
रुचतें त्यासं सदैव तें करा ॥ ९६ ॥
करितो बहु चांग कृत्य तो
नर त्याला वर नित्य वाटतो ।
करितो बहु दुष्ट कृत्य तो
नर त्याला रिपुं[1]साच वाटतो ॥ ९७ ॥
अपराध समग्र पाहतो
ह्मणती सज्जन दिव्यचक्षु[2] तो ।
न धराल मनीं तया जरी
गति होई न तुह्मां बरी तरी ॥ ९८ ॥
करुनी बहु शुद्ध अंतर[3]
प्रभुलागीं स्वमनामधीं धर ।
न बहु विषयांमधीं रम
तरि तो ईशें तुझे हरी श्रम ॥ ९९ ॥
सकलां सुख द्या सुवर्तनें[5]
भरवावी अवनी[6] सुकीर्तिनें ।
चरणीं हरिच्या धरा रती[7]
मग नाहीं निर्धनीं तुह्मां भिती ॥ १०० ॥

---

१ शत्रूप्रमाणें. २ दिव्यदृष्टि. ३ मन. ४ देव. ५ चांगल्या वागणुकें. ६ पृथ्वी. ७ प्रीति. ८ मरणांत.


गुच्छः–( दुसरी आवृत्ति ) "कविता चांगल्या आहेत. वाचण्यास योग्य आहेत. रा. लोंढे हे अर्वाचीन कवींपैकीं हित." मनोरंजन निबंधचंद्रिका.

पमालाः–( श्लोकबद्ध ) "कविता साधी आणि हृदयंगम आहे. लोंढे यांनीं मुलांकरितां चांगला उपक्रम चाल- आहे." काव्यरत्नावली.

पुष्पावलीः–( श्लोकबद्ध ) "कविता सुबोध व मुलांची क- ाशक्ति वाढविणारी अशी झाली आहे." पुणेंवैभव.

बोधमालाः–( श्लोकबद्ध ) "रा. लोंढे यांस कविता रच- ची हातोटी चांगली साधली आहे. कित्येक ठिकाणीं बोध गला साधला आहे." इस्राएली धर्मदीप.

मुलांचें प्राथमिक शिक्षणः–"यांत लहान मुलांस प्रत्येक यांत प्राथमिक शिक्षण कसें द्यावें, हें सांगितलें आहे. हें डेपांच आण्यांचें पुस्तक प्रत्येक शिक्षकास घेतां येणार आहे, तें सर्वप्रकारें संग्रहणीय आहे." शाळापत्रक.



# संगीतसुधा.

(मुलांकरितां)

हें

पुस्तक

मोरो गणेश लोंढे

खालापुर तालुके कर्जत जिल्हा ठाणें

येथील मराठी शाळेंतील शिक्षक

यांनीं रचिलें.

आवृत्ति तिसरी.

२,००० प्रति.

मुंबई:

"सुबोधप्रकाश" छापखान्यांत छापिलें.

सन १८९०.

किंमत दीड आणा.

( सर्व हक्क पुस्तककर्त्यानें राखिले आहेत. )

# लोंढे यांनीं केलेलीं

## उपदेशपर पुस्तकें.

### प्रत्येकाची किंमत दीड आणा.

**बोधशतकः**—( तिसरी आवृत्ति ) श्लोकबद्ध. "हें पुस्तक प्रत्येक लहान मुलानें वाचल्याशिवाय व आंतील बोधपर कविता पाठ केल्याशिवाय राहूं नये अशी आमची त्यांना शिफारस आहे" **केसरी.**

**संगीतसुधाः**—( तिसरी आवृत्ति ) साक्या, दिंड्या, पदें, वगैरे कविता- "यांतील कविता सरळ, सोपी व मनावर ठसा उमटण्याजोगी साधली आहे." **सुबोधपत्रिका.**

**उपदेशमाला**—: (सहावी आवृत्ति) श्लोकबद्ध. लोंढे यांचा हा प्रयत्न *त्यांच्या पूर्वीच्या प्रयत्नांप्रमाणेंच* चांगला साधला आहे कविता सोपी आहे." **विविधज्ञानविस्तार.**

**ऐतिहासिक संगीतः**—( दुसरी आवृत्ति ) साक्या, दिंड्या पदें वगैरे कविता. "कविता सुबोध, सोपी व सहज रीतीनें केलेली आहे. इतिहासाचा नाद मुलांस लागण्यास हा चांगला मार्ग आहे." **ज्ञानचक्षु.**

**बोधामृतः**—श्लोकबद्ध. "पद्यें सुरस, आणि बोध फार चांगला आहे. मुलांनीं अवश्य वाचावें." **बालबोध.**

**बोधसुधाः**—साक्या, दिंड्या, पदें वगैरे कविता. "मुलांस कवितेंत बोध केला आहे. चांगला व सोपा आहे."

**पुणेंवैभव.**

# संगीतसुधा.

(मुलांकरितां)

हें

पुस्तक

मोरो गणेश लोंढे

खालापुर तालुके कर्जत जिल्हा ठाणें
येथील मराठी शाळेंतील शिक्षक
यांनीं रचिलें.

आवृत्ति तिसरी.

२,००० प्रति.

मुंबई:
“सुबोधप्रकाश” छापखान्यांत छापिलें.

सन १८९०.

किंमत दीड आणा.

(सर्व हक्क पुस्तककर्त्यानें राखिले आहेत.)

# संगीतसुधा.

## प्रातःकाळ—साक्या.

गेली सरुनी रजनी[1] सारी रवि उदया[2] येताहे[2] ।
लोपुन गेले तारे जालें नभ[3] हीं तांबुस पाहें ॥ १ ॥
द्विजगण[4] गातो मंजुल[5] शब्दें भक्ष्य पहाया जातो ।
फुलें विकसलीं[6] सुवास सुटला शीतल वायु[7] वहातो ॥ २ ॥
पशू चराया जाती रानीं वत्सें[8] मधुर रवानें[9] ।
हंबरताती माते भोंतीं फिरती आनंदानें ॥ ३ ॥
कोकिळ मंजुळ शब्द करितसे [10]वेधी जनचित्तांला[11] ।
पांथां[12] झाली घाई अपुल्या मार्गा लागायाला ॥ ४ ॥
चंडोलाचा थोर रव कुठे रवि उदयाला येतां ।
ऐकूं येतो, कोठें दिसतो संघ[13] शुकांचा[14] उडतां ॥ ५ ॥
लाली जाउन पहा दिसतसे वरती बिंब रवीचें ।
किरणें नानारंगी शिरुनी बदले रूप नभाचें ॥ ६ ॥
उठा मुलांनो उठा त्वरेनें विद्यालयिं जायाला ।
वेळ बरी हे असे तुह्मांला आळस टाकायाला ॥ ७ ॥
मधमाशी मध मिळवायाला केव्हां उडून गेली ।
सुंदर आणिक मधुर फुलांच्या वर जी झेंपा घाली ॥ ८ ॥
जीस रुचेनां[15] आळस चित्तीं सर्व दिवस जी श्रमते ।
उद्योम[16] खेळाहून बरा हें जीस निजमनीं[17] गमतें[18] ॥ ९ ॥
आनंदी हे सृष्टि दिसतसे या वेळीं लोकांनीं[19] ।
आलस्येंयुत[20] दुःखी व्हावें कोण बुध[21] असें मानी ॥ १० ॥

---

१ रात्र. २ उगवत आहे. ३ आकाश. ४ पक्ष्यांचा समुदाय. ५ गोड. ६ फुलली. ७ वारा. ८ वासरें. ९ गोड शब्दानें. १० मोहित करतो. ११ लोकांच्या मनाला. १२ प्रवाशांना. १३ समुदाय. १४ पोपटांचा. १५ आवडत नाहीं. १६ उद्योग. १७ आपल्या मनांत. १८ वाटतें. १९ मुलांनीं. २० आळसानें युक्त. २१ शहाणा.

उठून आळस टाका, पक्ष्यांसम संतोषास वरा[1] ।
मधमाशीच्या सारा[2] उद्यम लावुन चित्तास करा ॥ ११ ॥

**सतत प्रयत्न. पद. [ नकळे होइल गति कैसी. ]**

संततयत्नांवीण[3] तुला । कैसी सिद्धि[4] घडे ॥ ध्रु० ॥
जेव्हां करिशी कामाला । लावीं तिकडे चित्ताला ॥
नेहमी धरितां नियमाला । मग तुजला काय अडे ॥ १ ॥ संत०
राहुन भूमीवरति उभा । नयनीं[5] अवलोकून[6] नभा ॥
यत्न न करितां शिखरीं[7] वा । शैलाच्या[8] कोण चढे ॥ २ ॥ संत०
सिद्धि न मिळतां पाहिल्यानें । खिन्न[9] न होई, हिमतीनें ॥
फिरुनि यत्न कर बहु तेणें । खचित मिळे सिद्धि पुढें ॥ सं०

**स्वतंत्रतेची आवड. दिंड्या.**

शुका[10] यावें मजजवळ रहायाला ।
तुला देइन पिंजरा वसायाला ॥
फळें देइन तुज मधुर मधुर खाया ।
स्वच्छ पाणी घालीन तुला प्याया ॥ १ ॥
मुला माझी काळजी तुला आहे ।
परी मानें[11] मज मोकळीक वा हे ॥
मला माझ्या कोठ्यांत सौख्य होतें ।
नसे सोन्याच्या पिंजऱ्यामधीं तें ॥ २ ॥
पावसाच्या पडतील सरी जेव्हां ।
दशदिशांना[12] व्यापील[13] उदक[14] तेव्हां ॥
मिळे स्थळ कोठें सुखद[15] असें[16] तूतें ।
शुका यावें मजजवळ रहायातें ॥ ३ ॥

---

१ घ्या. २ सारखा. ३ नेहमीच्या प्रयत्नाशिवाय. ४ फळ मिळेल. ५ डोळ्यांनीं. ६ पाहून. ७ मस्तकावर. ८ पर्वताच्या. ९ दुःखी. १० पोपटा. ११ आवडते. १२ दहा दिशांना. १३ भरून टाकील. १४ पाणी. १५ सुख देणारें. १६ या पिंजऱ्यासारखें.

नको आला घरट्यांत सुखानें मी ।
पडत असतां राहीन मेवे नामी ॥
नसे मोठा पर्जन्यवायु जेव्हां !
तुला येउन भेटेन मुला तेव्हां ॥ ४ ॥
कोण तुजलागीं दाखविल पथांतें ।
संकटामाधिं राखील कोण तूतें ॥
नको जाऊं, मजजवळ रहायाला ।
शुका यावें, बहु पावसी सुखाला ॥ ५ ॥
मुला दाखवितो देव मला वाट ।
संकटामाधिं राखितो नित्य पाठ ॥
दिली त्याणें बहु मोकळीक मातें ।
मना वाटे त्या स्थळीं जावयातें ॥ ६ ॥

**चिमणी काय म्हणते !**–( जाऊं नकारे विषयाटविची. )

चिवचिव चिवचिव चिमणी करिते काय वदे परिसा ।
मुंगीहुन लघु कीटक बघतो कोण असे ऐसा ॥ ध्रु० ॥
केवळ मी तर लहान पांखरूं हलक्या पदवीचें ।
माझेसाठीं काळजीस करी मानस तरि त्याचें ॥
पांघरूण मज दिलें तयानें साध्या पिच्छांचें ।
रंग कशाला कारण नाहीं मजला शोभेचें ॥
थंडी वारा पाऊस यांचें भय नाशी साचें ।
ऐसें नसतें व्यर्थ तरी तें असतां सोन्याचें ॥
करावा नलगे मज सांठा । ॥ चाल ॥
न पाडी तो मजला तोटा ।
पुरेसा देतो मज वांटा ।

---

१ पाऊस. २ चांगला. ३ पाऊस व वारा. ४ रस्त्याला. ५ रक्षण करतो. ६ बोलते. ७ ऐका. ८ लहान. ९ किडे. १० मन. ११ पिसांचें. १२ खरोखर—अगदीं. १३ लागत नाहीं.

असती चिमण्या किती भूवरी[1] ज्यास शोध ऐसा ।
पडतां संकट रक्षी भक्तां पूर्ण दयाघनसा[2] ॥ १ ॥ चिव०
लहान पक्षी ह्मणून कधीं तो आह्मां विसरेना ।
अशक्त आह्मी असुन भयाचा लेशहि[3] स्पर्शेना ॥
एकाकी[4] ही घोर[5] वनांतुन[6] संतत फिरतांना ।
उडून जातां आकाशांतुन मुळिं भय वाटेना ॥
सरितासागर[7] तरुनी जातां पंथा[8] हि चुकेना ।
मार्ग पहाया मध्यें आह्मां होका[9] लागेना ॥
मनाला वाटेल तेथें मी । चाल०
जातें, कांहीं मज न कमी ।
घेतो माझी तोच्च हमी[10] ।
अगाध[11] लीला[12] दाखवितो जो वंद्य[13] असे शिरसा ।
सांगें बाळा कोण असे तो जाणावा कैसा ॥ २ ॥ चिव०

## लहान गोष्टींवरून मोठीं कार्यें. ( अंजनीगीत. )

तास होतसे सान[14] क्षणांनीं ।
वृक्ष होतसे सान बियांनीं ।
ओढा होई लघु थेंबांनीं ।
जनसुखदायकसा[15] ॥ १ ॥
विचार जुळितां ग्रंथ होतसे ।
पद्यसमूहें[16] काव्य[17] ही तसें ।
सत्कृत्यांनीं[18] मोक्ष[19] मिळतसे । भल्या मनुजाला[20] ॥ २ ॥

---

१ जमिनीवर. २ दयारूपी मेघासारखा. ३ थोडें देखील भय वाटत नाहीं. ४ एकटी. ५ भयंकर. ६ रानांतून. ७ नद्या व समुद्र. ८ रस्ता. ९ दिशा दाखवणारें यंत्र १० जबाबदारी. ११ विचित्र. १२ करणी. १३ लोटांगण घालण्यास योग्य. १४ लहान. १५ लोकांना सुख देणारा असा. १६ पुष्कळ कविता मिळून. १७ कवितांचे पुस्तक १८ चांगल्या कामांनीं. १९ मुक्ति. २० मनुष्याला.

## मधमाशी व गांधिलमाशी यांचा संवाद.

( सुलभ उपाव हा भव तरण्याला. )

मधमाशीला गांधिल पुसते । करुं गे गति कैसी ॥ ध्रु० ॥
पाठ चकाके माझी भारी । वर्णें[1] हरी[2] कनकाची[3] थोरी[4] ॥
सुंदर माझी तनु[5] हे सारी । नित्य पहायासी ॥१॥ पुसते ॥
ऐशा थाटें हा देह[6] सजला । कोणी तरि गे न पुसे[7] मजला ॥
याचें कारण पुसतें तुजला । सांग सखे मजसीं ॥२॥ पु०
तूं गे केवळ साधी असतां । जो तो तुजला होतो पुसता ॥
याचें कारण तूं मज कथितां[8] । होइल मोद[9] मसीं ॥ ३ ॥पु०
अससी सुंदर रूपें भारी । होसी न[10] कुणा तरि सुखकारी[11] ॥
नांगी आहे जवळ विषारी । ती नडते त्यांसीं ॥४॥ पु०
साधी तरि मी मधुस[12] जमवितें । सांठवुनीयां त्यांसच देतें ॥
नित्य उद्यमामधिं रत[13] असतें । कारण हें यासीं ॥ ५ ॥ पु०

## कर्तव्यकर्म साक्या.

येउनियां नरजन्मीं[14] प्रेमें कर्तव्य[15] हेंच साधीं ।
आरंभुनि सत्कार्य[16] तयामधिं देह झिजव तूं आधीं ॥ १ ॥
साधारणपण टाकुन पुढती चांगुलपणें[17] तें ध्यावें ।
वय वाढे, तों तों लोकांनीं उत्तम पुरुष ह्मणावें ॥ २ ॥
जातां वपु[18] कीर्तिध्वज[19] मागें फडकत नित्य असावा ।
कुसुमपरिमळासारा[20] महिवर[21] यशःपवन[22] पसरावा ॥ ३ ॥
पातक अल्प न घडतां जावें वय सर्वहि मोदानें ।

---

१ रंगानें २ हरण करितये. ३ सोन्याचा. ४ मोठेपणा. ५ शरीर. ६ विचारित नाहीं. ७ सांगितलें असतां. ८ आनंद. ९ मला. १० होत नाहींस. ११ सुख देणारी. १२ मधाला १३ गुंतलेली. १४ मनुष्याचे जन्मांत. १५ अवश्य करण्याचें काम. १६ चांगलें काम. १७ चांगलेपणा. १८ शरीर. १९ यशाचा बावटा. २० फुलाच्या वासासारखा. २१ पृथ्वीवर. २२ कीर्ति हाच वारा.

येतां मृत्यू[1] सिद्ध असावें त्यातें आनंदानें ॥ ४ ॥
दुष्ट मतिस[2] धरुनी जो वांचे केवळ तो मृत[3] वाटे ।
कांटे रुतती[4] त्यातें चित्तीं येतां यम[5] भय दाटे ॥ ५ ॥
कार्य करा जें चित्तालागीं संतत[6] सौख्यचि देई ।
परपीडन[7] अन्तीं[8] चित्ताला केवळ तापद[9] होई ॥ ६ ॥

## **सायंकाळ पद.** ( गड्यांनों क्षणभंगुर संसार )

गड्यांनों झाला सायंकाळ ॥ ध्रु० ॥
गेला भास्कर क्षितिजाखालीं[10] झालें लाल अभाळें[11] ॥ १ ॥ ग०
विश्रांतिस्तव[12] पक्षी जाती घरट्यांमाजि खुशाल ॥ २ ॥ ग०
[13]सत्तेनें हें होई ज्याच्या तो गा पूर्णकृपाळ[14] ॥ ३ ॥ ग०

## **दृढ निश्चय.** ( घनःश्यामसुंदरा श्रीधरा अ. )

आरंभुनि कार्याला मग तें संपव नेटानें ॥
मुंगी हळु हळु गोधूम[15] जसा ओढुन मोठा ने ॥ध्रु०॥
केवळ मी अज्ञानी ऐसें नित्य मनीं ह्मणतां ।
येइल कैसें कांहीं तुजला आरंभ न करितां ।
विघ्नशतांना[16] सारुन मागें नित्य पुढें सरतां ।
भूगोलहि हा संपे चित्तीं दृढ निश्चय धरितां ॥
मोठेपण लाधतें[17] निश्चयें कार्य तडिस नेतां ।
श्रम होती व्यर्थ तें मध्यें सोडुनियां देतां ॥
पावले **रामशास्त्री** मान्यता या गुणानें । चाल०
घेतलें राज्य सारें या क्रमें **शिवाजीनें** ।

---

१ मरण. २ बुद्धीला. ३ मेलेला असा. ४ रुपतात ५ मरण. ६ नेहमीं. ७ दुसऱ्याला दुःख देणें. ८ शेवटीं. ९ दुःख देणार. १० काळ्या रेषेखालीं–दृष्टीच्या पलीकडे. ११ आकाश. १२ विसांवा घेण्याकरितां १३ सामर्थ्यानें. १४ मोठा दयाळू. १५ गहूं. १६ शेंकडों विघ्नांना. १७ मिळतें.

**बाजिराव** अटकेच्या[1] देतसे पारें ठाणें ।
येतां जन्माप्रती न कोणी युक्त असे ज्ञानें ।
जो तो वरितो जगीं मान्यता अपुल्या करणीनें[2] ॥२॥ आ.

## जन्माचें सार्थक. साकया.

सार्थक देहाचें । होइल मानीं तरि साचें ॥ ध्रु० ॥
संपादावें[3] बाळपणीं त्वां उत्तमशा ज्ञानाला ।
तरुणपणीं या लोकीं मिळवीं यत्नें शुद्ध[4] यशाला ॥ १ ॥
मेळविल्या विद्येचा द्यावा अवघ्या लाभ जनांला[5] ।
देशाच्या बाहेरी दवडा यत्नें अज्ञानाला ॥ २ ॥ सा.
मोठें मन करुनी लावावें निजदेशाच्या[6] कामीं ।
मी मी ह्मणुनी गर्वें फुगुनी लुब्ध[7] न व्हावें धामीं[8] ॥३॥सा.
सार्वजनिक[9] कामांत असावें नित्य पुढें उत्साहें ॥
देशासाठीं झीज लागतां दुःखहि होतां साहें[10] ॥४॥ सा.
पशुपक्षीही उदरालागीं[11] भरिती नित्य सुखानें ।
तरवीं[12] तुह्मी आचरितां[13] त्यांशीं[14] भेद[15] तुह्मांस कशानें ॥५॥
ज्ञान तुह्मांला दिलें प्रभूनें[16] करा विचार कशाला ।
बंधुजनांचें हित साधुनियां संतत गावें त्याला ॥ ६ ॥ सा.॥

## वर्षाऋतु. (केशवकरणी अद्भुत लीला.)

आला वर्षाकाळ[17] गड्यानों चित्ता जो तोषवी ।
सकलही धान्यांतें उपजवी ॥ ध्रु० ॥
वेळोवेळीं सुटे प्रभंजन[18] ढग जमतां अंबरीं[19] ।

---

१ अटक नदीच्या पलीकडे. २ करामतीनें. ३ मिळवावें. ४ निर्दोष. ५ लोकांला. ६ आपल्या देशाच्या. ७ गुतूं नये ८ घरखटल्यांत. ९ सर्व लोकांच्या. १० सोस. ११ पोटाला. १२ त्या पशुपक्ष्यांप्रमाणें. १३ वागाल तर. १४ पशुपक्ष्यांशीं. १५ फरक. १६ ईश्वरानें. १७ पावसाळा. १८ मोठा वारा. १९ आकाशांत.

न दिसती पहा लांबचे गिरी[1] ||
काळें जालें अंबर सगळें तरु[2] डुलती भूवरी |
प्रभंजन सों सों शब्दा करी ||
कोंकेंन्या ओरडती कोठें टिटवी टिवटिव करी |
सरडा रक्तवर्ण[3] स्वीकारी[4] ||
राळ ओरडे रात्रीं शोभा देति काजवे नवी |
पावती भेक[5] तसे टवटवी || १ || पहा ||

**उद्योग** ( काय वेड्या हरिणाची मजा. )

कांहीं तरि उद्योग कराया नर[6] जन्मा येती[7] |
आळसांत वय खपवायाला कोण जन्म वरिती || ध्रु० ||
नांगरून भूमीप्रति कोणी धान्यवृद्धि[8] करिती | गड्यारे.
त्यांना नांगर पुरवाया कुणि लोहकार[9] बनती ||
वस्त्रें पुरवायाला कोणी वस्त्रकार[10] होती | गड्यारे.
नाविक[11] होउन देशोदेशीं नौका[12] कुणि नेती ||
कोणी शिल्पी[13] धरिती वेगें शिल्पकला[14] हातीं | गड्यारे.
ज्ञानी चातुर्यानें अपुल्या साह्य तयां देती ||
स्वार्थदृष्टिनें[15] खपतां अन्यां[16] +लाभप्रद होती | गड्यारे.
पहा विचारें ईशकृपेनें[17] काय मजा घडती ! || २ || कां. ||
नृपासही धान्यार्थ[18] कृषीवलें[19] उपयोगी असती | गड्यारे.
होइल कैसा थोर आंगरखा जरि कातर नसती ||
वस्त्रकार नसतां वस्त्राविण काय मजा दिसती | गड्यारे.
नाविक नसतां वाड्यामध्यें काय चिजा[20] उरती[21] ||

---

१ पर्वत. २ झाडें. ३ तांबडा रंग. ४ घेतो. ५ बेडूक. ६ पुरुष. ७ जन्मास येतात. ८ दाण्याची विपुलता. ९ लोहार. १० कोष्टी. ११ नावाडी. १२ गलबतें. १३ कारागिरीचीं कामें करणारे. १४ कारागिरीचें काम. १५ आपल्या फायद्यावर नजर देऊन. १६ दुसऱ्याला + फायदेशीर. १७ ईश्वराच्या कृपेनें. १८ दाण्याकरितां. १९ शेतकरी. २० मौजेच्या वस्तु. २१ शिल्लक राहतील.

शिल्पी नसतां प्रासादाला कोण उभें करिती । गड्यारे.
चित्रें नानाविध भिंतींवर केवितरी निघती ॥
बुद्धिवैभवें नित्य नवनवे शोध जनां कळती । गड्यारे.
कल्पकता एकाची सकळां मनुजांतें फळती ॥ २ ॥ कां. ॥

यश. ( भक्तांसाठीं तो जगजेठी व. )

चंचल वैभव नाश पावतें ऐक सांगतों तुला ।
अमर यश मात्र कायतें मुला ॥ ध्रु ॥
पहा युगेंच्या युगें लोटलीं अगणित नर जन्मले ।
कितींचें नांव जगीं राहिलें ॥
ऐश्वर्यातें भोगुनियां बहु मग निधना पावले ।
व्यर्थ परि भारभूत जाहले ॥
ऐश्वर्यानें मत्त होउनी विषयसुखीं लोळले ।
तयीं त्यां असतिल जन भाळले ॥
यश न मिळवितां व्यर्थ दडविला जन्म तरी आपुला ॥ १ ॥ अ.
**कालिदास** कवि होउन गेला किति शतकें लोटलीं ।
अजुन तत्कृति सुख देते भली ॥
मिळवितसे जें राज्य **शिवाजी** राहे आज न मुळीं ।
राहिली अढळ कीर्ति भूतळीं ॥
**बाजीराव** न राहू देई सान हि अरिची मुळी ।
जाहला नरपुंगव द्विजकुळीं ॥
मार्ग असे हा सत्कीर्तीचा सर्वांलागीं खुला ॥ २ ॥ अ.

---

१ वाड्याला ( राजाच्या ) २ नानातऱ्हेचीं. ३ बुद्धीच्या सामर्थ्यानें. ४ योजनाशक्ति. ५ उपयोगीं पडते. ६ नाश पावणारें. ७ संपत्ति. ८ नाश न पावणारें. ९ निघून गेलीं. १० संपत्तीला. ११ मेले. १२ ओझ्यासारखे. १३ माजलेले १४ स्त्रीसुखांत. १५ मोहित झाले. १६ शंभर वर्षें, शेंकडे. १७ त्याचें काव्य. १८ कायम. १९ पृथ्वीवर २० लहान २१ शत्रूचें मूळ. २२ श्रेष्ठ पुरुष. २३ ब्राह्मणांच्या कुळांत २४ मोकळा.

## पुस्तक पद. ( ब्रह्मकुमरी पाव मला हे० )

लोक मला काय मुला सांग बोलती ॥ ध्रु० ॥
तरुण कधीं वृद्ध[1] असें । मुक्त[2] कधीं बद्ध[3] वसें ॥
न शिकुन ये ज्ञान कसें । सांग मजप्रती ॥ १ ॥ लो० ॥
चिंध्या कधिं पांघरतों । हेमवर्ण[4] कधिं वरितों ॥
अंध[5] परी दाखवितों । चांग[6] पद्धती[7] ॥ २ ॥ लो० ॥
गोरा मी कधिं दिसतों । काळाही कधिं असतों ॥
हलका वा[8] जड भरतों । देतसें मती[9] ॥ ३ ॥ लो० ॥
दुःखी वा आनंदी । असतों मी कधिं फंदी[10] ॥
राजाही मज वंदी[11] । धरुनियां भिती ॥ ४ ॥ लो० ॥
अस्थिमांस[12] मला नसे । चर्मानें[13] युक्त असें ॥
ध्वनिविण[14] मी गात वसें । नवल कीं अती ॥ ५ ॥ लो० ॥
लौकर मी कधिं मरतों । बहु वर्षे कधिं जगतों ॥
फ्रेंच[15] चिनी[16] इंग्लिश[17] मी । आर्य[18] वदुं किती ॥ ६ ॥ लो० ॥

### आळसी-दिंड्या.

उठविलें तूं लौकरी आज मातें ।
झोंप घ्याची आणखी मनीं येतें ॥
असें बोलुन तो जाय निजायाला ।
बिछान्यावर बहुवेळ लोळण्याला ॥ १ ॥
उठुन लागे तो हात खाजवाया ।
वेळ कामाविण घालवितो वायां[19] ॥

---

१ म्हातारा. २ मोकळा. ३ बांधलेला. ४ सोन्याचा रंग. ५ आंधळा. ६ चांगला. ७ मार्ग. ८ अथवा. ९ बुद्धि. १० चैनी. ११ नमस्कार करितो. १२ हाडें व मांस. १३ चामड्यानें. १४ आवाजाशिवाय. १५ फ्रान्स देशांत राहणारा. १६ चिनांत राहणारा. १७ इंग्लंडांत राहणारा. १८ हिंदुस्थानांत राहणारा. १९ व्यर्थ.

# बोधशतक.

(मुलांकरितां)

हें

पुस्तक

**मोरो गणेश लोंढे,**

नागांव तालुका अलीबाग, जिल्हा कुलाबा येथील

मराठी शाळेंतील शिक्षक.

यांनीं रचिलें.

आवृत्ति चौथी.

---

२,००० प्रती.

---

मुंबईत:—"निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.

---

सन १८९६.

---

किंमत दीड आणा.

---

[सर्व हक्क [illegible]

[illegible] १५ दव.

उभा राहे वा स्तंभ[1]तसा कोठें ।
काम करणें हें दुःख जया मोठें ॥ २ ॥
मलिनें[2] वसनें[3] नेसतो सर्वदा तो ।
व्यर्थ भूमीला भार जगीं होतो ॥
आळसानें जोडितो आपदेला[4] ।
करुन ऐसें तो हिंडतो भुकेला ॥ ३ ॥
स्वप्न सांगाया त्यास हौस वाटे ।
भोजनाच्या गोष्टींत सौख्य मोठें ॥
ग्रंथवाचन[5] त्याप्रती आवडेना ।
विचारीं मन घालणें मानवेना ॥ ४ ॥

## ईश्वर-अंजनीगीत.

बैसुन तरुवर[6] पक्षी गाती ।
मधुर रवानें मोदा देती ।
मोहाया[7] जन मधुरांगी[8] ती । देतो कोण तयां ॥ १ ॥
देती नानाविध[9] कुसुमांतें[10] ।
पाहुन हे तरु सुख जीवांतें ।
ऐशा अतुलों[11] ऐश्वर्यातें । देतो कोण तयां ॥ २ ॥
फांदीवरती पक्षी बसला ।
मारुत[12] झोंके देतो तिजला ।
वाटेना भय तच्चित्ताला[13] । रक्षी कोण तया ३ ॥
इच्छामात्रें सृष्टी रचितो ।
तीस युगेंच्या युगें राखितो ।
अदृश्य[14] राहुन कार्यें करितो । ह्मणती ईशें[15] तया ॥ ४ ॥

---

1 खांबासारखा. २ मळकट. ३ वस्त्रें. ४ दुःखाला. ५ ग्रंथ वाचणें. ६ झाडावर. ७ मोह घालण्याला ८ गोड वाणी. ९ नानाप्रकारच्या. १० फुलांना. ११ पुष्कळ. १२ वारा. १३ त्याच्या मनाला. १४ न दिसणारा. १५ देव.

घर–पद. (वारी संकट हरि दामा.)

कांता[१] निज[२]पतिच्या वचना मानी।
त्यातें सन्मानी[३] ॥
प्रेमें बोलुनियां अमृतवाणी[४]।
बोधी[५] निजतान्हीं[६] ॥
पान्हा हितवचनें[७] पतिला आणी।
सौख्यांची खाणी ॥
राहे पतिचरणीं[८] मानस जीचें।
कीं[९] वीज सुधेचें[१०] ॥ १ ॥
गृह[११] तें स्थान[१२] गमे संतोषाचें।
कीं मंदिर[११] श्रीचें[१३] ॥ ध्रुं० ॥
कांता[१४] निज[१५]कांता वाटे कैसी।
दुसरी लक्ष्मीशी ॥
न रुचे[१६] केव्हां दुर्वर्तन ज्यासीं।
पुण्याची राशी ॥
बोधी हितवचनीं स्वापत्यांसीं[१७]।
आवड बहु ऐसी ॥
वाटे केवळ जें गृह शांतीचें।
कीं सद्बुद्धीचें[१८] ॥ २ ॥ गृहतें स्थान.
बाळें भांडण केव्हां हि न करिती।

---

१ बायको. २ आपल्या नवऱ्याच्या. ३ मान देते. ४ अमृतासारखें गोड भाषण. ५ बोधिते–उपदेश करित. ६ आपलीं मुलें. ७ हितकारक भाषणानें. ८ नवऱ्याचे ठिकाणीं. ९ बीं. १० अमृताचें. ११ घर. १२ ठिकाण. १३ लक्ष्मीचें. १४ नवऱ्याला. १५ आपली बायको. १६ आवडत नाहीं. १७ आपल्या मुलांना. १८ चांगल्या बुद्धीचें.

आलस्य[1] न करिती ॥
चित्तीं मोदानें भरलीं दिसतीं ।
उद्योगी असती ॥
केव्हां अवलोकन पुस्तक करिती ।
आनंदें रमती[2] ॥
उठलें पितरांच्या[3] आचरणाचें[4] ।
प्रतिबिंबाचि[5] साचें ॥ ३ ॥ गृहतें स्थान. ॥

**मुंगी व टोळ यांचा संवाद.** ( गड्यांनो कृष्ण गडी. )

शलभ[6] बहु[7] शीतें कांकडला । वदतसे एका मुंगिला॥ध्रु ॥
होउन नम्र पहा वदतों । चरणीं नमन तुझ्या करितों ॥
क्षुधेनें[8] सत्य आज मरतों । करशिल साह्य मनीं धरितों ॥
गव्हांचा कण देई मजला। घडे उपकार थोर तुजला॥ १ ॥श.
गरज कां तुला पडे ऐसी । इंद्रियें उणा[9] न वा दिससी ॥
मागतां लाज मुळिं न धरिसी । दीनमुख[10] होउंनियां येसी ॥
उन्हाळा कैसा घालविला । सांग तें सर्व वृत्त[11] मजला ॥२॥
मिळे तें भक्ष्य सर्व खावें । मजेनें दिवसरात्र गावें ॥
वाटलें तेथ उडुन जावें । सुखानें आयुस[12] लोटावें[13] ॥
हिंवाळा मीं न[14] मनीं स्मरिला। पावलों ह्मणुन अशा गतिला ३
खरें हें जरी बोललास । ऐक तरी माझ्या वचनास ॥
उन्हाळा करून गायनास[15] । उद्यमाविणें लोटिलास ॥
मरण हें योग्य दिसे मजला । आळसें युक्त असे त्याला॥ ४ ॥

**संतोषी.** ( वा तुझा चालता काळ. )

संतोषी तोच जगांत । हें ज्याला झालें प्राप्त ॥ ध्रु० ॥

---

१ आळस. २ खेळतात. ३ आईबापांच्या. ४ वागणुकीचें. ५ ठसा. ६ टोळ. ७ थंडीनें ८ भुकेनें. ९ कमी. १० केंविलवाणें तोंड करून. ११ वर्तमान. १२ आयुष्याला. १३ घालवावें. १४ आठविला नाहीं. १५ गाण्याला.

ग्रंथ संग्रहालय

विद्या ज्यास जाहली पुरती । वागे चित्त जशी दे स्फूर्ती[1] ॥
सत्य जयाला अवडे चित्तीं । अवडेना खोटी मात[2] ॥१॥ सं-
इच्छा[3] ज्याप्रति आवरताती । मृत्यूला जो सिद्ध स्वचित्तीं ॥
गुंते चित्त न ऐहिक[4] वित्तीं[5] । अपमान न दुखवी चित्त ॥२॥ सं.
कोणाशीं जो स्पर्धा[6] न करी । निंदास्तुतिला[7] केंव्हां न वरी ॥
आनंदें सत्कृत्यास[8] करी । सद्वर्तनखड्ग[9] करांत[10] ॥ ३ ॥ सं.
स्वतंत्र[11] राहे जो संसारीं । हांजी हांजी केंव्हां न करी ॥
अध्ययनीं[12] वेळाची विकरी । करणें हें नित्य मनांत ॥४॥ सं.

## विपद्ग्रस्त[13]. ( लोक मला काय मुला सांग. )

ऐका हे विपद्ग्रस्त काय बोलती ॥ ध्रु० ॥
मी केवळ वृद्ध[14] असें । आंगावर वस्त्र नसे ॥
शीत बहुत बाधतसे[15] । ह्मणुन मजप्रती ॥ १ ॥ ऐका० ॥
ह्मातारा जनक[16] असे । दुःखानें कण्हत[17] वसे ॥
धाकुटी मी मागतसें । अन्न त्याप्रती ॥ २ ॥ ऐका० ॥
पति[18] माझा मृत[19] झाला । अन्न नसे पोटाला ॥
वेष्टाया[20] तोकाला[21] । वस्त्र तें किती! ॥ ३ ॥ ऐका० ॥
बाळांनों ऐशांतें । साह्य करावें हातें ॥
देवाला प्रिय[22] होतें । तें सदा अती ॥ ४ ॥ ऐका० ॥

## परमेश्वर आपणांस पाहतो—साक्या.

रजनीमाजी[23] काळोखामधिं कोण मला बघताहे ? ।

---

१ आठवण—हुकार. २ गोष्ट. ३ मनांतले हेतु. ४ येथल्या—या लोकच्या. ५ संपत्तींत. ६ भांडण. ७ निंदा आणि स्तुति करीत नाहीं. ८ चांगल्या कामांला. ९ चांगली वागणूक हीच तरवार. १० हातांत. ११ आपल्या बुद्धीवर भंवसा ठेवून वागतो. १२ अभ्यासांत. १३ दुःखानें व्यापिलेले. १४ ह्मातारा. १५ दुःख देतें. १६ बाप. १७ कुंथत. १८ नवरा. १९ मेला. २० गुंडाळण्याकरितां २१ लहान मुलाला. २२ आवडणारें. २३ रात्रीं.

तेज रवीला दे तो ईश्वर संतत[1] तुजला पाहे ॥ १ ॥
जीव सकलही निजले असतां पातक काय करावें ? ।
न करावें वा ईश[2] सदोदित पाहे त्यातें ध्यावें ॥ २ ॥
गुहे[3]मधीं मी गेलों जेथें गेलें नव्हतें कोणी ।
तरी नसें तेथें एकुलता[4] देव उभा त्या स्थानीं ॥ ३ ॥
त्याविण कोठें ठाव[5] रिकामा नाहीं चित्तीं ठेवा ।
त्याच्या चरणीं प्रीति धरुन तो संतत अंतरीं[6] गावा ॥ ४ ॥

### मृत्यु. ( सखया रामा विश्रांती तुझिये— )

आहे मृत्यू कधितरी या जीवाला ॥
जाणुन चित्तीं आचरा सत्कार्याला[7] ॥ ध्रु० ॥
दुष्टसाधू[8] सारखे यास दोन्ही ।
तरुणवृद्ध[9] हा मनीं एकचि मानी ॥
भीतधीट[10] सारखे होती[11] याला ॥ १ ॥ आहे० ॥
मायकन्या[12] सारखी वाटे यातें ।
रंकराजा[13] नेतसे एका हातें ।
कधीं नेणों[14] घेउन हा वाली वाला ॥ २ ॥ आहे० ॥
कधीं भीनों[15] सन्मार्गवर्ती[16] यास ।
दुर्मती[17] तो कांपतो पहार्यास[18] ।
देती चित्ता पातकें तीं असुखालों[19] ॥३॥ आहे.

### पद २ रें. ( साध्य नसे मुनिकन्या० )

कोठेंहि असतां जरी मृत्यू येतो ।
बाहेर फिरतां हा कां जीव भीतो[20] ॥ ध्रु० ॥

---

१ नेहमीं. २ ईश्वर. ३ पर्वताच्या मोठ्या फटींत. ४ एकटा. ५ ठिकाण. ६ मनांत. ७ चांगल्या कामाला. ८ दुष्ट आणि साधु. ९ तरणा व म्हातारा. १० भित्रा व शूर. ११ वाटतात १२ आई व मुलगा. १३ लहान व मोठा. १४ न जाणों. १५ भीत नाहीं. १६ चांगल्या मार्गानें वागणारा. १७ दुष्टबुद्धीचा. १८ बघण्याला. १९ दुःखाला २० भय पावतो.

मंदिरीं[1] पावे जन एक निधना[2] ।
सागरीं[3] कोणी वश[4] होई मरणा[2] ।
कोणी[5] विदेशीं मरतो ॥
चुकवूनि याप्रति[2] कोणी न चुकतो ॥ १ ॥ कोठें० ॥
आप्त[6] कुणाला थाटानें नेती ।
परके कुणाला निजस्कंदीं[7] घेती ।
कोणी जलामध्यीं[8] पडतो ।
वन्य[9] पशुंस कोणी अर्पण होतो[10] ॥ २ ॥ कोठें ॥
प्राण गेल्यावर शव[11] मागें राहे ।
मानापमानास[12] जीव न पाहे ।
इतर[13] जन[14] सुखदुःख[15] वरितो ।
जीव स्वदेहास[16] नेणता[17] होतो ॥ ३ ॥ कोठें. ॥
यश अपयश मात्र मागुती[18] राहे ।
देई जनांला स्मृति[19] नित्य पाहें ।
प्राणी प्रवास करी तो ।
पावुनियां सुख इतरांस देतो ॥ ४ ॥ कोठें. ॥

**मुंगी व सुरवंट यांचा संवाद.** ( ये धांवत कृष्णाबाई. )

सुरवंट आपुल्या मार्गी अडवा आला ।
बोलतसे मुंगी त्याला ॥
सोड माझा मार्ग तूं कां रे व्यर्थ अडवीला ।
देह तुझा कुसांनीं भरला ॥

---

१ घरांत. २ मरणाला. ३ समुद्रांत. ४ स्वाधीन होतो. ५ परदेशांत. ६ नातलग ७ आपल्या खांद्यावर. ८ पाण्यांत. ९ रानटी. १० मिळतो ( कोणाला पशू खातात. ) ११ प्रेत. १२ मान व अपमान यांना. १३ दुसरा. १४ लोक. १५ सुख आणि दुःख. १६ आपल्या शरीराला. १७ न जाणणारा. १८ मागें. १९ आठवण.

नसे तुला शक्ति तर कांहीं शीघ्र[1] पळण्याला ।
देह तुझा [2]शिथिल बहु झाला ॥
मी हवीतिकडे जातें । चाल.
[3]मानेल तर मागें येतें ।
वघ कैसी सुंदर दिसतें ।
उद्योगीं वेळ दवडितें, हौस मनाला ।
जाउं दे सोड मार्गाला ॥ १ ॥
रूपाच्या धरुनी मुंगी अभिमानाला ।
बोलतसे ऐसें त्याला ॥ ध्रु० ॥
सुरवंट खिन्न[4] होऊन बहुत चित्तांत ।
लपुनियां बसे स्वगृहांत[5] ॥
लोटले दिवस जों कांहीं दुरवस्थेंत[6] ।
[7]एकांतीं वहु चिंतेंत ॥
[8]नव रूप देतसे त्यास सु[9]कर अत्यंत ।
होउनी स[10]कृप भगवंत ॥
पंखावर नाना रंग । चाल.
पिंवळें सोन्यासम अंग ।
मन होई पहातां दंग ।
होउनियां रूपीं गुंग, जाय फिरण्याला ।
मुंगी तंव[11] भेटे त्याला ॥ २ ॥ रूपाच्या. ॥
पाहून फांकडें रूप चकित ते झाली ।
[12]सोशंक बघतसे खालीं ॥
चांगुलें[13] पांखरा ह्मणे कोण तुज व्याली[14] ।

ग्रंथ संग्रहालय
नं. ......
ता. ......

---

१ लौकर. २ ढिला—लुला. ३ वाटेल. ४ दुःखी. ५ आपल्या घरांत. ६ वाईट स्थितींत. ७ एकीकडे. ८ नवें. ९ चांगलें. १० दयाळू. ११ तों. १२ शंकायुक्त होऊन. १३ चांगल्या. १४ प्रसवली ( तुझी आई कोण ? )

सांग हें मला या काळीं ॥
ऐक गे मैत्रिणी ओळख काय तुजाली ।
ईश्वरें कृपा हे केली ॥
मी सुरवंट असें खास । चाल.
त्वां दिधला[1] ज्याला त्रास ।
बोललीस कटु[2] वचनास ।
उडतां ये परि 'शिथिलास' अंतराळालीं[3] ।
जें केवळ दुर्लभ[4] तुजला ॥ ३ ॥ रूपाच्या ॥
एकाहुन एक गुणानें असती थोर ।
धर चित्तीं हा सुविचार ॥
मी ज्ञानी, सुंदर रूपें आहें फार ।
हा नको व्यर्थ वडिवार[5] ॥
होउनियां निजचित्तीं तूं पूर्ण उदार ।
गरिबाला देईं थार[6] ॥
विद्येची एका भ्रांती । चाल.
रूपानें कोणी कमती ।
सर्व कुणा अवयव नसती ।
निंदावें[7] त्यास न, चित्तीं ठेवीं वाळा ।
हेंच रुचे परमेशाला[8] ॥ ४ ॥ रूपाच्या ॥

**योग्य विचार.** ( भजन तव गजवदना. )

सतत मनीं योग्य विचार करा ।
सौख्यदे[9] तोच खरा ॥ ध्रु० ॥
खावें प्यावें चैन करावी योग्य न हें सुनरा[10] ॥ १ ॥ सतत.

---

1 दिला. २ कडू. ३ आकाशांत. ४ कठीण. ५ गर्व, ६ आश्रय. ७ निंदा करूं नये. ८ ईश्वराला ९ सुख देणारा. १० श्रेष्ठ पुरुषाला.

विद्याव्यसनीं[1] वय दवडुनियां ज्ञानसुधेस[2] वरा ॥ २ ॥ सतत.
निज ज्ञानानें अन्य जनांच्या अज्ञानास हरा[3] ॥ ३ ॥ सतत.
वैभव ज्ञानाहून न वरवें[4] लोभ न फार वरा ॥ ४ ॥ सतत.

## सुविचार.---दिंड्या.

कसें शेजारी यास मी लुटावें ।
परद्रव्यातें[5] म्यां कसें हरावें ।
दिले देवें कर उद्यमार्थ[6] मातें ।
कसें त्यांनीं मी हरूं परधनातें[7] ॥ १ ॥

हरण केलें जें द्रव्य या पथें[8] तें ।
दुःख लज्जा भय मात्र नित्य देतें ॥
गुप्त[9] पातक तें सर्वदा[10] न राही ।
उघड होतां नरें[11] असुख मात्र घेई ॥ २ ॥

सत्य बोलाया जीभ दिली देवें ।
कलह[12] लावाया नित्य तिणें भ्यावें ॥
ज्ञान सांगो सर्वांस हितकथेला[13] ।
कर्ण[14] सादरें[15] ऐकोत परयशाला[16] ॥ ३ ॥

नेत्र[17] घेरत परसुखा[18] बघुन तृप्ती ।
मत्सराला या ठाव[19] नसो चित्तीं ॥
उणा येउं नये बोल या मुखानें ।
सदा खोल असो चित्त विचारानें ॥ ४ ॥

---

1 विद्येच्या नादांत. २ शहाणपण याच अमृताला. ३ नाहींसें करा. ४ चांगलें. ५ दुसऱ्याच्या पैशाला. ६ उद्योगाकरितां. ७ दुसऱ्याच्या द्रव्याला. ८ मार्गानें. ९ झांकलेलें. १० नेहमीं. ११ मनुष्य. १२ भांडण. १३ फायदा होणाऱ्या गोष्टीला. १४ कान. १५ प्रीतिपूर्वक. १६ दुसऱ्याच्या कीर्तीला. १७ डोळे. १८ दुसऱ्याच्या सुखाला. १९ ठिकाण.

## ईश्वर. ( सुंदरमुख तुंदिलतनु. )

गावें वा शुद्धमनें[१] दिवसयामिनी[२] ।
दुरितहरण[३] पतितकरुण[४] ईश्वरा मनीं ॥ ध्रु० ॥
नीतिपथें[५] वागतात त्यांस जो सखा ।
अनीतिचे[६] सखे त्यांस होय पारखा[७] ।
जीवकोटिवरी[८] करी लोभ सारखा ।
पाहें, साहें[९], आहें बालक मी । पतितें[१०] तमीं[११] ।
चरण नमीं । वदनिं बोलुनी ॥ १ ॥ गावें०
जीवांना योग्य होय कोणती स्थिती
साधनें सुखार्थ[१२] त्यांस लागती किती
जाणुन जो सिद्ध करी सर्व त्यांरिती[१३] ।
डोई[१४], पायीं, देई, तोचि तुला । सन्मतिला[१५] ।
देई मुला । नित्य सुखवुनी ॥ २ ॥ गावें० ॥

---

१ पवित्र मन करून. २ दिवसरात्र. ३ पाप हरण करणारा. ४ गरिबांविषयीं दयाळू. ५ न्यायाच्या मार्गानें. ६ नीतीनें न वागणारे. ७ पाठमोरा—मिळण्यास कठीण. ८ सर्व जीवांवर. ९ सहन कर. १० पडलेला. ११ अज्ञानांत १२ सुखासाठीं. १३ त्याप्रमाणें; १४ डोकें. १५ चांगल्या बुद्धीला.

**पुष्पगुच्छः**—"कविता चांगल्या आहेत. मुलांनीं वाचण्यास योग्य आहेत. रा. लोंढे हे अर्वाचीन कवींपैकीं एक आहेत."
**मनोरंजन निबंधचंद्रिका.**

**पुष्पमालाः**—"कविता साधी आणि हृदयंगम उतरली आहे. लोंढे यांनीं मुलांकरितां चांगला उपक्रम चालविला आहे."
**काव्यरत्नावली.**

**पुष्पावलीः**—"कविता सुबोध व मुलांची कल्पनाशक्ति वाढवणारी अशी झाली आहे."
**पुणेंवैभव.**

सर्व पुस्तकें खालीं लिहिलेल्या ठिकाणीं मिळतील.

मोरोगणेश लोंढे—हेड मास्तर—खालापुर तालुके कर्जत जिल्हा ठाणें.

वासुदेव मोरेश्वर पोतदार—कांदेवाडी—मुंबई.

विविधज्ञानविस्तारपुस्तकालय—मुंबई.

मराठी ग्रंथ संग्रह
नं.
ता.
ठाणे.



# उपदेशमाला.

( मुलांकरितां )

हें

पुस्तक

मोरो गणेश लोंढे,

खालापूर तालुके कर्जत जिल्हा ठाणें येथील

मराठी शाळेंतील शिक्षक.

यांनीं रचिलें.

आवृत्ति सहावी.

२,००० प्रती.

"निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.

सन १८९०.

किंमत दीड आणा.

[ सर्व हक्क पुस्तककर्त्यानें राखले आहेत. ]

## लोंढे यांनीं केलेलीं

# उपदेशपर पुस्तकें.

---

### प्रत्येकाची किंमत दीड आणा.

**बोधशतकः**–( तिसरी आवृत्ति ) श्लोकबद्ध. " हें पुस्तक प्रत्येक लहान मुलानें वाचल्याशिवाय व आंतील बोधपर कविता पाठ केल्याशिवाय राहूं नये अशी आमची त्यांना शिफारस आहे."

**केसरी.**

**संगीतसुधाः**–( तिसरी आवृत्ति ) साक्या, दिंड्या, पदें वगैरे कविता. " यांतील कविता सरळ, सोपी व मनावर ठसा उमटण्याजोगी साधली आहे." **सुबोधपत्रिका.**

**उपदेशमालाः**–( सहावी आवृत्ति ) श्लोकबद्ध. " लोंढे यांचा हा प्रयत्न त्यांच्या पूर्वींच्या प्रयत्नाप्रमाणेंच चांगला साधला आहे. कविता सोपी आहे." **विविधज्ञानविस्तार.**

**ऐतिहासिकसंगीतः**–( दुसरी आवृत्ति ) कविता, साक्या, दिंड्या, पदें वगैरे. " कविता सुबोध, सोपी व सहजरीतीनें केलेली आहे. इतिहासाचा नाद मुलांस लागण्यास हा चांगला मार्ग आहे." **ज्ञानचक्षु.**

**बोधामृतः**–श्लोकबद्ध. " पद्यें सुरस, आणि बोध फार चांगला आहे. मुलांनीं अवश्य वाचावें. **बालबोध.**

**बोधसुधाः**–( साक्या, दिंड्या, पदें वगैरे कविता. ) " मुलांस कवितेंत बोध केला आहे. चांगला व सोपा आहे."

**पुणेंवैभव.**

# उपदेशमाला.

( मुलांकरितां )

हें

पुस्तक

**मोरो गणेश लोंढे,**

खालापूर तालुके कर्जत जिल्हा ठाणें येथील

मराठी शाळेंतील शिक्षक.

**यांनीं रचिलें.**

आवृत्ति सहावी.

२,००० प्रती.

" निर्णयसागर " छापखान्यांत छापिलें.

सन १८९०.

**किंमत दीड आणा.**

[ सर्व हक्क पुस्तककर्त्यानें राखले आहेत. ]

# उपदेशमाला.

## श्लोक.

### स्वदेश[1]प्रीति. ( इंद्रवज्रा. )

देशीं मिळे ज्या जनु[2] आपणांस
राहून जेथें वैरितों[3] सुखास ।
आधार जो[4] केवळ आपणांला
त्याची कशी प्रीति नको तुह्मांला ॥ १ ॥
कोण्या उपायें हित होय त्याचें
लाधेल[5] कैसें सुख त्यास साचें ।
तो[6] इंदिरेचें[7] गृह[8] केविं होय
ती शोधणें मार्ग[9] तुह्मांस सोय ॥ २ ॥
लोकांमधीं नित्य सुनीति[10] वाढो
देशांतुनी पाय अधर्म[11] काढो ।
ऐक्यामुळें[12] वाढ उदीम[13] घेवो
यत्नार्थ[14] उत्साह[15] तुह्मांस येवो ॥ ३ ॥
संपन्न[16] आहे जरि अन्य[17] देश
त्यापासुनी लाभ तुह्मां न लेश[18] ।

---

१ आपल्या देशाविषयीं माया. २ जन्म. ३ घेतों, भोगितों. ४ जो देश. ५ मिळेल. ६ तो देश. ७ लक्ष्मीचें-संपत्तीचें. ८ घर, ठिकाण. ९ अगत्याचें आहे. १० चांगली नीति. ११ जो धर्म नव्हे तो. १२ एकीमुळें. १३ व्यापार. १४ यत्न करण्याला. १५ आनंद, हुरूप. १६ सुखी, श्रीमंत. १७ दुसरा. १८ थोडा देखील.

यत्नें करा देश सुखी स्वकीयें[1]
कर्तव्य[2] हें एक तुह्मांस होय ॥ ४ ॥

**संकोच[3]वृत्ति.** ( वसंततिलका. )

जो आपुल्या करितसे स्वमुखें[4] स्तुतीला
तो आवडे न वहुधा नर[5] या जनांला[6] ।
नम्रत्व[7] योग्य धरितां सुख आपुल्याला
जाई पुरांत तरु[8] तैं[9] न धका लव्हाला ॥ १ ॥

जाणून हें संतत[10] नम्रपणा धरावा
राहून शांत करितां स्तव[11] आयकावा ।
नम्रत्ववर्धन[12] सदा सगुणांसवें[13] हो
खालीं जसा फलभरें[14] तरु शीघ्र[15] ये हो ॥ २ ॥

ठाऊक जी निज[16]मनाप्रति गोष्ट नाहीं
सांगूं नये तरि उगाच तिची वढाई[17] ।
जें सत्य तें उघड होय सदा स्वभावें[18]
बोलूनियां नें[19] भलतें उपहासिं पावें[19] ॥ ३ ॥

मी काय तो कुशल[20] थोर[21] असें[22] जगांत
आणीं असें न विपरीत[23] कधीं मनांत ।

---

१ आपला. २ कर्तव्यकर्म-अवश्य करण्याजोगें काम. ३ भिडस्त स्वभाव. ४ आपल्या तोंडानें. ५ पुरुष, मनुष्य. ६ लोकांना. ७ नम्रपणा. ८ झाड. ९ त्यावेळीं. १० नेहमीं. ११ स्तुति. १२ नम्रपणा वाढो. १३ चांगल्या गुणांसह. १४ फळांच्या ओझ्यानें. १५ लौकर, लागलाच. १६ आपल्या मनाला. १७ डौल. १८ आपोआप. १९ थट्टा होऊं देऊं नको. २० शहाणा. २१ मोठा. २२ आहे. २३ उलटें.

माझेंच मात्र मत[1] योग्य वृथा[2] दुजाचें[3]
हेंही तसेंच अपकारक[4] जाण साचें[5] ॥ ४ ॥

**असत्याचीं कारणें.** ( स्वागता. )

दोष एक न शिवो[6] अपुल्याला
बोलती म्हणुनियां अनृताला[7] ।
रक्षणार्थ[8] वदतात असत्य
पाप त्यांस न चुके तरि सत्य ॥ १ ॥
काम संतत मिळो अपुल्याला
बोलती म्हणुनियां अनृताला ।
मोडिती करुनियां मुदतीस[9]
पाप सत्य न चुके तरि त्यांस ॥ २ ॥
स्वीय[10] बोल[10] सकलांस[11] रुचावा[12]
मोद[13] तन्मनि[14] अपार[15] वसावा ।
वृत्त[16] वाढवुनियां कथितात
पाप त्यांस न चुके तरि सत्य ॥ ३ ॥
मानसीं[17] असुन हेतु निराळा
दाविती उघड[18] अन्य[19] जनांला ।
योपरी[20] ठकविती सुजनांतें
पाप हें न चुकतें तरि त्यांतें ॥ ४ ॥

---

१ विचार. २ फुकट. ३ दुसऱ्याचा. ४ दुःख देणारें. ५ खरें, खरोखर. ६ लागू नये. ७ खोट्याला. ८ आपला बचाव व्हावा ह्मणून. ९ करारांला. १० आपलें बोलणें. ११ सगळ्या लोकांना. १२ गोड लागावें. १३ आनंद. १४ त्यांच्या मनांत. १५ फार. १६ वर्तमान-गोष्ट. इ. १७ मनांत. १८ बाहेर. १९ दुसरा हेतु. २० याप्रमाणें.

प्राप्त होय नवरी नवऱ्याला
बोलती ह्मणुनियां अनृताला ।
सांगती वय कमी बहु त्याचें
पाप होय न कमी अनृताचें ॥ ९ ॥

**शूर कोणाला ह्मणावें.** ( पंचचामर. )

धरून धीर संकटांत होय जो पुढें सदा
नसून लाभ धांवतो हरावया[1] परापदा[2] ।
स्वदेश शत्रुपासुनी लढून सोडवीतसे
तयास शूर नाम हें जगांत योग्य होतसे ॥ १ ॥
पडूनियां जलामधीं[3] बुडे अशास पाहुनी
तडीस लावितो तया उडी जलांत टाकुनी ।
गरीब गांजिलें[4] कुणी बघून सोडवीतसे
तयास शूर नाम हें जगांत योग्य होतसे ॥ २ ॥
कुणास चोर येउनी लुबाडितात[5] ऐकुनी
तयास सोडवीतसे समग्र[6] शक्ति वेंचुनी[7] ।
परार्थ[8] जो सुखें सदा अशा श्रमास घेतसे
तयास शूर नाम हें जगांत योग्य होतसे ॥ ३ ॥
उगीच अन्य देश जे स्वशक्तिनें[9] लुबाडिती[10]
मिळून लोक दांडगे लुटावयास पाहती ।
कळे न ज्यांस अन्यदुःख[11] अंतरीं[12] असे कसें
तयांस शूर नाम हें अयोग्य सर्वथा[13] असे ॥ ४ ॥

---

१ नाहींसें करण्याकरितां. २ दुसऱ्याचें दुःख. ३ पाण्यांत. ४ दुखविलें. ५ लुटतात. ६ सगळी. ७ खर्चून. ८ दुसऱ्याकरितां. ९ आपल्या बळानें. १० लुटतात. ११ दुसऱ्याचें दुःख. १२ मनांत. १३ अगदीं.

## हलके लोक. ( वसंततिलका. )

दोषांकडे बहुत लक्ष असे सदैव[1]
ठेवावया[2] न चुकती दुसऱ्यास नांवें ।
कालांतरें[3] विसरती उपकार सारा[4]
घेई मनांत अपकारें[5] सदैव थारा[6] ॥ १ ॥
ज्यांच्यावरी सदुपकार[7] करावयाला
जातां जरी बहु न त्यांस अपाय जाला ।
त्यांच्या मनांत तरि संतत राहतो तो
त्यांला तयावरुन राग अपार येतो ॥ २ ॥
उद्योग नित्य करिती नर जे झटून
वाखाणिती जन[8] जयांस 'बरे' ह्मणून ।
जे पावती फळ जगीं अपुल्या श्रमानें
त्यांचा सदैव बहु मत्सर यांस[9] मानें[10] ॥ ३ ॥
थोडा अपाय घडतां बहु वैर चित्तीं
साधे तरी उलट त्याप्रति दुःख देती ।
ही रीत त्याज्य[11] सकलां हलक्या जनांची
याहून रीत उलटी विलसे[12] भल्यांची ॥ ४ ॥

## भले लोक. ( वसंततिलका. )

दोषांस दाखवुनियां कथिती हितांला[13]
जे तोषती बघुनियां बरव्या गुणाला ।

---

१ नेहमीं. २ दोष लावण्याला. ३ कांहीं दिवस गेल्यावर. ४ सगळा. ५ इजा. ६ आश्रय. ७ चांगला उपकार. ८ लोक. ९ या हलक्या लोकांना. १० आवडतो. ११ टाकण्याला योग्य. १२ शोभते. १३ हितकारक गोष्टींना.

केला हि अल्प[1] उपकार मनांत राही
थारा मनीं न अपकारलवास[2] पाहीं ॥ १ ॥
पाही तयांस[3] अपकार करावयाला
देतात तोष[4] उपकार करून त्याला[5] ।
येई अकारणं[6] न राग जयांस पाहीं
ज्यांच्या मनोविधुस[7] वैरकलंक[8] नाहीं ॥ २ ॥
कोणास लाभ घडतां सुख त्यांस वाटे
ते लाविती रिपुंस[9] बोधुनि[10] चांग[11] वाटे[11] ।
होवो मदीय[12] न परी परकार्य[13] व्हावें
ज्यांनीं मनामधि सदैव असें धरावें ॥ ३ ॥
येवो सदैव बहु थोरपणा स्वतांला
ते इच्छिती न तरि नीचपणा[14] दुजाला ।
यत्नें स्वकीय वरितात महत्व[15] नित्य
हेवा मनीं न धरिती तरि अल्प सत्य ॥ ४ ॥
जें बोलती करुन दाखविती करानें[16]
वांचाळता[17] न करिती बहुधा मुखानें[18] ।
ते स्वाननें[19] न करिती अपुल्या स्तुतीस
होतां चुकी लपविती न कधीं तयेस[20] ॥ ५ ॥
प्रामाणिकास उलटा जरि काळ आला
देती तरी सतत ते बहु मान त्याला ।

---

१ थोडा. २ थोड्याही अपराधाला. ३ भल्यांना. ४ आनंद. ५ अपकार करणाऱ्याला. ६ कारणाशिवाय. ७ मन हाच चंद्र त्याला. ८ वैर हाच कलंक—डाग. ९ शत्रूला. १० उपदेश करून. ११ चांगल्या मार्गाला. १२ माझें. १३ दुसऱ्याचें काम. १४ हलकेपणा. १५ मोठेपणा. १६ हातानें. १७ बडबड. १८ तोंडानें. १९ आपल्या तोंडानें. २० त्या चुकीला.

सामर्थ्य होय तरि त्यास सहाय होती
वस्तूंतल्या अणुपरी हि गुणास घेती ॥ ६ ॥

**स्वतांवर विश्वास.** ( इंद्रवज्रा. )

होईल जें कार्य तुझ्या करानें
तें तूं करीं लौकर आदरानें ।
अन्यावरी टाकुन भार पाहीं
सिद्धीस जाईल न तें कधीं ही ॥ १ ॥
साधावया कार्य सदा झटावें
आलस्य तें या शरिरीं नसावें ।
संसार देईल सुखास सारा
दारिद्र्य पावेल किमर्थ थारा ! ॥ २ ॥
लाधावयाँ द्रव्य उपाय काय
व्यापार कैंचा तुज योग्य होय ।
याचा करावा स्वमनीं विचार
यत्नें यशाला मिळवीं अपार ॥ ३ ॥
उद्योग जो अल्प करी न कांहीं
तो खावयाला नर योग्य नाहीं ।
संपादिलें अन्यनरें सुवित्तं
भोगावया सिद्ध असो न चित्त ॥ ४ ॥
यत्नें स्वतांच्या धन मेळवीं तूं
खर्चीं सुकार्यीत धरून हेतू ।

---

१ थोडक्यासुद्धां. २ मनापासून. ३ आळस. ४ गरीबी. ५ कशाला. ६ मिळण्याला. ७ कोणत्या प्रकारचा. ८ मिळविलें. ९ दुसऱ्या मनुष्यानें. १० द्रव्य–पैसा. ११ उपभोग घेण्याला.

होईल हा जन्म तरीच धन्य
नाहींतरी तो न मनुष्य वन्यं[1] ॥ ९ ॥

### सभ्यपणा. ( वसंततिलका. )

जें आपलें वचन तापें[2] करी दुजातें
तें बोलणें उचित[3] होय न आपणातें ।
बोलूनियां बहुत दुःख दुजास द्यावें
त्याहून योग्य निजहेतुंस[4] आवरावें[5] ॥ १ ॥
पत्रीं लिहीं मधुरें[6] आणिक सभ्य भाषा
देईं वदून बहु गोड जनांस तोषीं[7] ।
शब्दें जनांप्रति न रासभ[8] आवडे कीं
शब्देंच कोकिल दिसे बहु मान्य लोकीं ॥ २ ॥
भेटें समस्त सुजनांप्रति आदरानें
वागें तयांजवळ संतत नम्रतेनें ।
जी जी करीं न सहसा तरि तूं कुणासीं
सभ्यत्व संतत रुचो[9] तव मानसासीं ॥ ३ ॥
संपेल सर्व परभाषण[10] तैं वदावें
इच्छा दिसेल तरि आत्मकथे[11] कथावें[12] ।
प्रौढी[13] न फार मिरवीं निजें[14] भाषणांत
अश्लील[15] शब्द न कधींहि वसो मुखांत ॥ ४ ॥

### मुलांशीं वागणूक. ( शालिनी. )

बाल्यत्वीं[16] जो मार्ग[17] लागे मुलांला

---

१ पशू. २ दुःख. ३ योग्य. ४ आपल्या हेतूला. ५ आटोपून धरावें. ६ गोड. ७ आनंदाला. ८ गाढव. ९ आवडो. १० दुसऱ्याचें बोलणें. ११ आपल्या हकीकतीला. १२ सांगावें. १३ डौल, प्रतिष्ठा. १४ आपला. १५ ग्राम्य—वाईट शब्द. १६ लहानपणीं. १७ रीत.

सोडीना तो[1] केधवां[2] ही तयाला ।
सन्मार्गाला[3] त्यांसी[4] लावावयाला
यत्नें सोपें होय मातापित्यांला ॥ १ ॥

प्रेमें त्यांला सर्वदा वागवावें
योग्यायोग्या[5] वर्तना[6] दाखवावें ।
[7]होवो त्यांची योग्य मार्गीं प्रवृत्ती
हें ठेवावें आपुल्या नित्य चित्तीं ॥ २ ॥

अन्यायाला योग्य शिक्षा करावी
[8]बोधें त्यांची चित्तचिंता[9] हरावी ।
अज्ञानानें[10] होय जो अल्प दोष
तो जाणावा पात्र[11] मोठ्या क्षमेस ॥ ३ ॥

आज्ञाभंगा[12] [13]तींच होतां तयार
दावावा तैं राग त्यांना अपार ।
प्रेमभावें[14] त्यांस लागेल जैसें
शिक्षेनेंही कार्य होई न तैसें ॥ ४ ॥

देतां शिक्षा नित्य होते निकामी[15]
वेळीं शिक्षा मार्गे लावील नामी ।
वेळोवेळीं बोधपीयूषपानें[16]
चित्ता त्यांच्या तोषवावें पित्यानें ॥ ५ ॥

**अपकार. ( मालिनी. )**

न करिति अपकारा जीव[17] ऐसे कितीक

---

१ ती रीत. २ केव्हां. ३ चांगल्या रीतीला. ४ मुलांना. ५ योग्य व अयोग्य अशा. ६ वागणुकीला. ७ आवड उत्पन्न होवो. ८ उपदेशानें. ९ मनांतलें दुःख. १० न समजून. ११ योग्य. १२ हुकूम मोडण्याला. १३ मुलें. १४ माया नाहीं असें दाखविल्यानें. १५ फुकट. १६ बोध हेंच अमृत त्याच्या प्राशनानें. १७ प्राणी.

असुन, कुमर[1] कोणी दुःख दे त्यांस एक ।
परि न बेर[2] मुला हें क्रूरता काय ऐसी
तुज सुखदं[3] नव्हे बा दुःख देणें दुजांसीं ॥ १ ॥
करुन बहुत माया राखिलेल्या जिवांला
सततं[4] सुखदं[3] व्हावें हें बरें आपुल्याला ।
मनुजें[5] असुखें[6] देतां काय त्यांनीं करावें
सुख असुख तयाला केविं त्यांनीं कथावें ॥ २ ॥
तरुणपणिं पशूंला लावितों नित्य कामा
बहुतकरुन त्यांला वेळ नाहीं रिकामा ।
जरठपण[7] तयांला प्राप्त होईल जेव्हां
बहु सुखकर[8] होणें योग्य आह्मांस तेव्हां ॥ ३ ॥

**अपकार.** ( भुजंगप्रयात. )

पथांतून[9] जातां बघूनी पशूस
उगा एक[10] पाषाण[11] मारी तयास ।
गरीबास देतां असें दुःख हातें
मुला कृत्य[12] हें नावडे ईश्वरातें ॥ १ ॥
कुणी पाहतां धाकट्या बालकाला
रडें आणिती वेडवूनी तयाला ।
कुणी बोलती शब्द वाईट त्यातें
मुला कृत्य हें नावडे ईश्वरातें ॥ २ ॥
पथांतून जातां कुलीना[13] नराला
बघूनी उगा हांसतो एक त्याला ।

---

१ मुलगा. २ चांगलें. ३ सुख देणारें. ४ नेहमीं. ५ मनुष्य. ६ दुःख. ७ ज्ञातारपण. ८ सुख देणारें. ९ रस्त्यांतून. १० एक मुलगा. ११ दगड. १२ काम. १३ सभ्य.

उणा[1] शब्दही बोलतो एक त्यातें
मुला कृत्य हें नावडे ईश्वरातें ॥ ३ ॥
पथीं वृद्ध[2] जातां हंसावें तयांला
कुणी वांकुल्या[3] दाखवाव्या स्त्रियांला ।
नसे रीत ही योग्य जो सभ्य त्यातें
मुला कृत्य हें नावडे ईश्वरातें ॥ ४ ॥
पुसे[4] वाट कोणी तयानें फसावें
ह्मणूनी मुला व्यर्थ खोटें वदावें ।
तरी पाप हें काय बाधे[5] न तूतें
मुला कृत्य हें नावडे ईश्वरातें ॥ ५ ॥
उगा एक मारी दुजा बालकाला
तसा एक लोटी करानें दुजाला ।
अशानें कसें दुःख वाटे न त्यातें
मुला कृत्य हें नावडे ईश्वरातें ॥ ६ ॥

## रागाचा परिणाम. ( इंद्रवज्रा. )

रागावुनी एक दुजास मारी
बोले मुखानें अपशब्द भारी ।
कोणी मुखानें पर[6]वर्म काढी
कोणी मनीं द्वेष[7] अखंड[8] जोडी[9] ॥ १ ॥
सुज्ञा[10]प्रती योग्य नसे परी हें
केव्हां न ऐसें करिं राग सोहें[11] ।

१ वाईट. २ म्हातारे. ३ वेडींवांकडीं तोंडें किंवा ह्यातवारे. ४ विचारतो. ५ बाधत नाहीं, दुःख देत नाहीं. ६ दुसऱ्याचें उणें. ७ भांडण. ८ नेहमींचें. ९ धरतो. १० शहाण्याला. ११ सहन कर.

दावीं तुझें हृद्गत[1] सौम्य[2] शब्दें
तेणें तुझें इच्छित[3] सत्य साधे ॥ २ ॥

कोणी उगा दीनें[4] जनास तोडी[5]
किंवा परस्त्रीस[6] उगाच पीडी[7] ।
अन्याय ऐसा बघुनी मनाला
ये राग हें योग्यचि सज्जनाला ॥ ३ ॥

योग्यस्थळीं राग जनांस दावीं
पापें न हस्तें[8] परि या घडावीं ।
रागामधीं काम करीं न कांहीं
तेव्हां सुचेना सुविचार[9] पाहीं ॥ ४ ॥

## बंधुप्रीति[10]. ( शार्दूलविक्रीडित. )

मातेच्या उदरीं समग्र असती एकाच जे जन्मले
तैसे बालपणांत एकवटुनी एके स्थळीं खेळले ।
वाढी मोदभरें[11] सदैव जननी तें अन्न जे जेवले
त्यांनीं तें विसरून वाद करितां कैसें दिसे चांगलें !! १ ॥

एकाला दिधला[12] जरी जननिनें[13] खाऊ कधीं थोडका
सर्वांना दिधल्याविणें तरि कुणी लावूं नये त्या धका ।
ज्यांनीं बाळपणीं असें जननिला स्वप्रेम तें दाविलें
त्यांनीं तें विसरून वाद करितां कैसें दिसे चांगलें ॥ २ ॥

माता आणि पिता समान ममता सर्वांवरी दाविती
पाहूनी स्वमनांत नित्य असती जे युक्त मोदें[14] अती ।

---

१ मनांतला हेतु. २ गोड-शांत. ३ इच्छिलेला हेतु. ४ गरीब. ५ मारतो. ६ दुसऱ्याचे बायकोला. ७ दुःख देतो. ८ हातानें. ९ चांगला विचार. १० भावावरचें प्रेम. ११ आनंदानें. १२ दिला. १३ आईनें. १४ आनंदानें भरलेले.

खेळीं एक पडे बघून सकळां पूर्वी असे लागलें
त्यांनीं तें विसरून वाद करितां कैसें दिसे चांगलें ॥ ३ ॥
झाला बाळपणीं जरी कलह[1] तो मोडीतसे माउली[2]
सर्वांला रुचली हि रीति कथिली जीजी तिणें चांगली ।
रक्षूनी सुपथास संतत तिनें ज्यांना असे लाविलें
त्यांनीं तें विसरून वाद करितां कैसें दिसे चांगलें ॥ ४ ॥

## लबाडी. ( शुद्ध कामदा. )

वजन ठेवितो थोडकें उणें
फसवुनी जनां धन्य मी ह्मणे ।
बहुत पातका शीघ्र तो वरी
समजुनी मुला हें न तूं करीं ॥ १ ॥
सतत धाकटें माप वापरी
भरुन एक वा दोन तो करी ।
जन न देव हें पाहतो तरी
समजुनी मुला हें न तूं करीं ॥ २ ॥
स्तुति करूनियां माल वोउगा[3]
भुलवुनि जनां दे करी दगा ।
मिळविलें ह्मणे पाप तें परी
समजुनी मुला हें न तूं करीं ॥ ३ ॥
प्रथम मोलें[4] घे मागुनी फिरे
लिहून ठेवितो अन्यथा[5] करें ।
सुख न त्याप्रती लाधतें तरी
समजुनी मुला हें न तूं करीं ॥ ४ ॥

---

१ भांडण. २ आई. ३ वाईट. ४ किंमत. ५ भलतें.

## लबाडी. ( इंद्रवंशा. )

मागूनियां अन्य[१]पदार्थ आणिती
कार्याप्रती स्वीये[२] समग्र साधिती ।
देती न तो मागितल्याविणें परी
सुज्ञास हे रीत नसे अशी बरी ॥ १ ॥
घेती दुजाचाहि पदार्थ लागतां
रागास येती परि तोच मागतां ।
वाटे तयांला[३] मग मागता[४] अरी[५]
सुज्ञास हे रीत नसे अशी बरी ॥ २ ॥
घेतां मना जिन्नस गोड वाटतें
देतां मना काय ह्मणून लागतें[६] ।
नोहे[७] स्वतांचा जरि ठेविला घरीं
सुज्ञास हे रीत नसे अशी बरी ॥ ३ ॥
जो घेतला अन्य[१]पदार्थ मागुनी
त्यातें जपा स्वीय मनांत मानुनी ।
द्यावा सुखें आपण तो न मागतां
द्यावा स्वतांचा दुसऱ्यास लागतां ॥ ४ ॥

## उद्योगाचें फल. ( शार्दूलविक्रीडित. )

बार्ष्प[८] स्वीयबळें[९] सुखें करुनियां नांवांस[१०] वाहातसे
सांगे वृत्त[११] पळांत वीज सगळें दीपांस[१२] लावीतसे ।
गोलांच्या[१३] गति चित्रें[१४] दुर्बिणें[१५] तुह्मां सर्वांस दावीतसे

---

१ दुसऱ्याची वस्तु. २ आपल्या. ३ त्यांना. ४ मागणारा. ५ शत्रु. ६ वाईट वाटतें. ७ होत नाहीं. ८ वाफ. ९ आपल्या शक्तीनें. १० गलबतांना. ११ वर्तमान. १२ दिव्यांला. १३ पृथ्वी, चंद्र, सूर्य, इ० यांच्या. १४ चमत्कारिक. १५ दूरचे पदार्थ पाहाण्याचें यंत्र.

उद्योगें नर या जगांत अतुला[1] भाग्यास[2] भोगीतसे ॥ १ ॥
आर्यावर्त[3] समग्र दुष्ट यवनीं[4] जेव्हां बळें व्यापिलें
कोणी साह्य महाबलाढ्य[5] नसतां राज्याप्रति स्थापिलें ।
संगें[6] घेउन मावळे नवशिके[7] तो[8] म्लेंच्छ जिंकीतसे
उद्योगें नर या जगांत अतुला भाग्यास भोगीतसे ॥ २ ॥
बालत्वीं धनिकाश्रयें[9] वसुन जो हातीं धुवी धोतरें
मर्जी पाहुन बोलणें जड पडे ज्या सांगतांना खरें ।
शास्त्री होउनियां सभेंत मिरवे न्यायासनीं[10] तो बसे
उद्योगें नर या जगांत अतुला भाग्यास भोगीतसे ॥ ३ ॥
हातीं घेउन लेखणीस बहुधा जो कारकूनी करी
चातुर्यास[11] बघून ज्याप्रति करीं प्रेमें **धनाजी** धरी ।
**शाहूच्या** सुमना पसंत पडुनी[12] तो पेशवा होतसे
उद्योगें नर या जगांत अतुला भाग्यास भोगीतसे ॥ ४ ॥

## आरोग्य. (वसंततिलका.)

आरोग्य देह वरितां सुख मानसास
आधार तेंच बहुधा सकला सुखास ।
त्यावीण हें जग दिसे मनुजास ओस
त्यावीण अर्थहि अनर्थ गमे मनास ॥ १ ॥
खातां पचेल जरि अन्न सदा सुखानें
वाहेल रक्त शरिरांतिल सद्गतीनें[13] ।
व्यापार सर्व करितां मन तें थकेना

---

१ फार. २ मोठेपणाला, ऐश्वर्याला. ३ हिंदुस्थान. ४ मुसलमानांनीं. ५ मोठा शक्तिवान्. ६ बरोबर. ७ अडाणी. ८ शिवाजी. ९ श्रीमंताच्या आश्रयानें. १० रामशास्त्री. ११ शहाणपणाला. १२ बाळाजी विश्वनाथ. १३ जसें वहावें तसें.

आरोग्य होय शरिरास तरीच जाणा ॥ २ ॥

आहार अल्प शरिराप्रति पुष्टि[1] देई
निश्चिंत[2] चित्त सुखदायक फार होई ।
व्यायाम[3] नित्य करितां बलवृद्धि होते[4]
ये तीव्रता[5] न धरितां व्यसनें[6] मतीतें ॥ ३ ॥

अन्नाशया[7] विघडवी अनिवार[8] भक्ष्यें[9]
देई अपाय हृदयास[10] सचिंत[11] लक्ष्य[12] ।
मंदत्व[13] मादक[14] पदार्थ मतीस देती
व्यायाम तो न करितां तनु[15] थोर[16] होती ॥ ४ ॥

सेवून[17] मादक पदार्थ न धुंद[18] व्हावें
जेवून फार, न बरें ह्मणवून घ्यावें ।
आहार नित्य करिं तूं मित[19] आणि साधा
तेणें वरील तुजला बहुधा न बाधा[20] ॥ ५ ॥

आंघोळ नित्य करुनी करिं देह पूत[21]
ठेवीं विचार करुनी निजचित्त शांत[22] ।
जा नित्य निर्मळ हवेंत फिरावयास
तेणें शिवे न बहुधा दुखणें तनूस ॥ ६ ॥

## लक्षपूर्वक पहाणें. ( पृथ्वी. )

कितीक जन वागती जणुं मिटून नेत्रांप्रती
बघून बहु वस्तुंला नवल मानिना तन्मती ।

---

१ लठ्ठपणा. २ काळजी नसलेलें. ३ नमस्कार, तालीम इ. ४ बळ वाढतें. ५ तिखटपणा. ६ दारू, भांग. इ. ७ अन्नाच्या ठिकाणाला. ८ फार. ९ खाणें. १० काळिजाला. ११ काळजीनेंयुक्त. १२ चित्त. १३ मंदपणा. १४ अंमल आणणारे. १५ शरीर. १६ स्थूल, वाढून मोठें. १७ खाऊन. १८ बेसावध. १९ बेताचा. २० दुःख. २१ पवित्र. २२ स्थिर.

तदीय[1] मग पावती कुठुन सार्थका[2] लोचनें[3]
सलक्ष[4] अवलोकनें[5] चतुरता[6] वरावी जनें ॥ १ ॥
पदार्थ निजदृष्टिला[7] सहज कोणताही पडो
तया स्वमन लावुनी निरखिणें[8] मना आवडो ।
च्यवून पडतां फळा नियम[9] काढिला **न्यूटनें**
सलक्ष अवलोकनें चतुरता वरावी जनें ॥ २ ॥
प्रसंग पडतांक्षणीं सुजन योजना जी करी
स्वसंकट हरावया सुलभ मार्ग जो स्वीकरी[10] ।
करा अवनें[11] संकटीं स्मरुन तीं मनीं साधनें[12]
सलक्ष अवलोकनें चतुरता वरावी जनें ॥ ३ ॥
करीन जरि कार्य हें तरि जनांस वाटे कसें
तसें न करितां मुळीं तरि जनांस कैसें दिसे ।
असा जनमनोदय[13] प्रथम आकळे[14] या गुणें
सलक्ष अवलोकनें चतुरता वरावी जनें ॥ ४ ॥

**सत्ता. ( शालिनी. )**

ज्याची सत्ता ज्यावरी[15] पूर्ण आहे
तो त्याचा हें मानणें योग्य पाहें ।
घेणें नाहीं योग्य तो आपणातें
त्याच्या आज्ञेवीण[16] बोधीं मनातें ॥ १ ॥
सत्तेची जी आपल्या वस्तु आहे
घेतां कोणी राग येईल पाहें ।

---

१ त्यांचे. २ योग्य उपयोगाला. ३ डोळे. ४ लक्षपूर्वक. ५ पाहण्यानें. ६ शहाणपण. ७ आपल्या नजरेला. ८ लक्षपूर्वक पहाणें. ९ गुरुत्वाकर्षणाचा नियम. १० स्वीकारितो–धरतो. ११ रक्षण. १२ युक्ति. १३ लोकांच्या मनांतील हेतु. १४ समजतो. १५ ज्या पदार्थावर. १६ हुकुमाशिवाय.

जैसा आह्मां तेंवि येई दुजाला
वेळोवेळीं हें कथावें मनाला ॥ २ ॥

**वचन.** ( पृथ्वी. )

विचार करुनी पुरा वचन दे मुला मागुनी
भलेपण वरीं जगीं वचन आपुलें राखुनी ।
न होय पुरतें कधीं वचन तूं न देई असें
कबूल करुनी कुणा फसविणें बरें वा नसे ॥ १ ॥
करील ममकार्य[1] हा खचित हें धरी जो मनीं
करीं न गतधैर्य[2] त्या वचन आपुलें मोडुनी ।
कधीं फुकट जातसे बहु तदीय[3] येणें[4] धनें
न होय हित आपुलें असुख पावतें तन्मन ॥ २ ॥

**लौकिक.** ( इंद्रवंशा. )

जो देतसे मान जनामधीं नरा
जो संकटीं होय तयास आसरा ।
मानावया शब्द जनांस लावितो
ऐसा जगीं लौकिक होय थोर तो ॥ १ ॥
यत्नें तुह्मी लौकिक मेळवा सदा
दुर्लौकिका[6] पात्र न व्हा तुह्मी कदा ।
अन्यास ही लौकिकलाभ लाभतां
चित्तामधीं मत्सर हो न वागता ॥ २ ॥
जाईल नाशाप्रति अन्यलौकिक
ऐसा कधीं शब्द वदो न हें मुख ।
सर्वांप्रति शब्द कळून तो उणा
त्याची करी केवळ मानखंडना[7] ॥ ३ ॥

---

१ माझें काम. २ गेला आहे धीर ज्याचा असा. ३ त्याचें. ४ या योगानें. ५ द्रव्य. ६ अपकीर्तीला. ७ अपमान.

### खोड्या. ( इंद्रवज्रा. )

पाहूनियां कुंपण तीच मोडी
भिंतीवरी रेघ उगीच ओढी ।
वाटे जरी हे बहु सान[1] खोडी
मोठा करी नाश असून थोडी ॥ १ ॥
पाहूनियां पादप[2] साल काढी
येतां करीं कागद पार फाडी ।
झाडावरी फूल बघून तोडी
काढी फळा जों न तयास गोडी ॥ २ ॥
आहेत खोडी असल्या अनेक
पाहूनियां ज्या हंसतात लोक ।
त्यांपासुनी दूर तुह्मीं असावें
सत्संगतीनें[3] बरवें शिकावें ॥ ३ ॥

### कवी. ( शार्दूलविक्रीडित. )

वागावें कवण्या पथें **मनु**[4] जनां हें जाहला दाविता
झाला **वाल्मिकि** आपणांस बरव्या **रामायणा**[5] सांगता ।
**व्यासानें** कथिलें भरे नवरसें[6] ऐशा **महाभारता**[7]
चित्तातें कवि **कालिदास**[8] रमवी पाजून बोधामृता[9] ॥ १ ॥
आधीं **रायमुकुंद**[10] मागुन कवि **ज्ञानेश**[11] **मुक्तेश्वर**[12]

---

१ लहान. २ झाड. ३ चांगल्यांच्या सोबतीनें. ४ याचा ग्रंथ मनुस्मृति. ५ ग्रं. नां. ( यांत रामाच्या कथा आहेत. ) ६ नऊ रसांनीं–( श्रृंगार वीर इ. ) ७ ग्रंथाचें नांव–( यांत पांडवांच्या कथा आहेत. ) ८ याचे ग्रंथ–( शाकुंतल. रघुवंश इ. ) ९ बोधरूपी अमृताला. १० याचे ग्रंथ–विवेकसिंधु इ. ११ याचा ग्रं. ज्ञानेश्वरी. १२ याचा ग्रं. भारताचीं कांहीं पर्वें.

**मोरोपंत**[1] **अनंत**[2] **वामन**[3] तसे **तात्या**[4] कवि **श्रीधर**[5] ।
शोभे तो **अमृताख्य**[6] **दास**[7] बरवा **नामा**[8] **तुका**[9] भाविकें[10]
भाषा प्राकृत[11] शोभवून सुगुणें[12] केलें जनां लोलुपें[13] ॥ २ ॥

**राजकारणी पुरुष.** ( शार्दूलविक्रीडित. )

स्थापी राज्य नवीन या महिवरी[14] शौर्यें **शिवाजी** कृती[15]
**संभाजी** नृप दाखवी निजगुणें धर्माभिमानांप्रती[16] ।
**राजाराम** जनांकडून वदवी दातृत्वयोगें[17] भला
**शाहू** वैभव थोर पावुन जगीं मोठ्या यशा लाभला ॥ १ ॥
**बाळाजी** मिळवी नृपाजवळुनी[18] [19]तैं पेशवा हें पद
**बाजीराव** पराक्रमें हरितसे साऱ्या रिपूंचा मद ।
**नाना**[20] चालवुनी स्वकार्य[21] बरवें राहे सुखें [22] मंदिरीं
**भाऊ**[23] **पानपतीं**[24] पडे रगडुनी म्लेच्छांप्रती संगरीं[25] ॥ २ ॥
**राघोबा**[26] बहु शूर हो युवतिच्या[27] नादें परी डागला[28]
**अप्पा**[29] गाजुन थोर वीर जगतीं[30] स्वर्गाप्रती पावला ।

---

१ या. ग्रं. भारत इ.—यांवर आर्या. २ या. ग्रं. सीतास्वयंवर इ. ३ या. ग्रं. वनसुधा इ. ४ या. ग्रं. उपदेशपर लावण्या. ५ या. ग्रं. पांडवप्रताप इ. ६ या. ग्रं. अनेक कटाव. ७ या. ग्रं. दासबोध. ८ या. ग्रं. अभंग. ९ या. ग्रं. अभंग. १० भक्त. ११ मराठी. १२ चांगल्या गुणानें. १३ लुब्ध. १४ पृथ्वीवर. १५ शहाणा. १६ धर्माविषयीं अभिमानाला. १७ उदारपणानें. १८ शाहूपासून. १९ इ. स. ( १७१४ ) २० नानासाहेब. २१ पेशवाईचें काम. २२ घरीं. २३ भाऊसाहेब. २४ पानपतच्या लढाईंत. २५ लढाईंत. २६ रघुनाथराव. २७ बायकोच्या. २८ कलंकयुक्त झाला. २० चिमणाजी अप्पा. ३० पृथ्वीवर.

न्यायें **माधव**[1] वागला बुधजनीं ख्यातीस पावे अती
**श्रीमन्माधव** सद्गुणांत रमुनी दावी सवाई कृती[2] ॥ ३ ॥
**बापू**[3] फारचि शाहणा ह्मणवुनी सन्मान्य विद्वज्जनीं
न्यायाधीशपदीं सुकीर्ति मिळवी तो **रामशास्त्री** गुणी ।
राष्ट्राची सगळ्या भुजांवर धरी **नाना**[4] सुखानें धुरा[5]
**शिंदे होळकर** प्रसिद्ध करिती युद्धीं रिपूंचा चुरा ॥ ४ ॥

---

१ थोरले माधवराव. २ शहाणपण. ३ सखाराम बापू. ४ नाना फडणवीस. ५ भार.

पुष्पगुच्छः–"कविता चांगल्या आहेत. मुलांनीं वाचण्यास योग्य आहेत. रा. लोंढे हे अर्वाचीन कवींपैकीं एक आहेत."

**मनोरंजन निबंधचंद्रिका.**

पुष्पमालाः–"कविता साधी आणि हृदयंगम उतरली आहे. लोंढे यांनीं मुलांकरितां चांगला उपक्रम चालविला आहे."

**काव्यरत्नावली.**

पुष्पावलीः–( श्लोकबद्ध ) "कविता सुबोध व मुलांची कल्पनाशक्ति वाढविणारी अशी झाली आहे."

**पुणेंवैभव.**

बोधशतक, संगीतसुधा, उपदेशमाला, ऐतिहासिक संगीत, बोधामृत, बोधसुधा, पुष्पगुच्छ इ० हीं खालीं लिहिलेल्या ठिकाणीं मिळतील.

मुंबईः–विविधज्ञानविस्तार पुस्तकालय.

पुणेंः–पुणेंवैभव व न्यू बुकडीपो.

पेणः–नारायण गणेश मंडलीक.

खालापुर–मोरो गणेश लोंढे.

पळस्पेंः–गणेश विष्णु टिळक.

टपालखर्चः–६ प्र. प. ६ पै. व १३ प्र. प. १ आ.

कमिशन १० प्रतींस १ प्रत.



# ऐतिहासिक संगीत.

( मुलांकरितां )

हें पुस्तक

**मोरो गणेश लोंढे,**

दहिवली ता. कर्जत जिल्हा ठाणे येथील

मराठी शाळेंतील शिक्षक

यांनीं रचिलें.

आवृत्ति दुसरी.--१००० प्रती.

मुंबई :

' सुबोधप्रकाश ' छापखान्यांत छापिलें.

१८९१.

किंमत दीड आणा.

( सर्व हक्क पुस्तककर्त्यांनें राखिले आहेत. )

# ऐतिहासिक संगीत.

( मुलांकरितां )

हें पुस्तक

मोरो गणेश लोंढे,

दहिवली ता. कर्जत जिल्हा ठाणे येथील

मराठी शाळेंतील शिक्षक

यांनीं रचिलें.

आवृत्ति दुसरी.—१००० प्रती.

मुंबई:

' सुबोधप्रकाश ' छापखान्यांत छापिलें.

१८९१.

किंमत दीड आणा.

( सर्व हक्क पुस्तककर्त्यानें राखिले आहेत. )

## लोंढे यांनीं केलेलीं

# उपदेशपर पुस्तकें.

### प्रत्येकाची किंमत दीड आणा.

**बोधशतकः**–( तिसरी आवृत्ति ) श्लोकबद्ध. "हें पुस्तक प्रत्येक लहान मुलानें वाचल्याशिवाय व आंतील बोधपर कविता पाठ केल्याशिवाय राहूं नये अशी आमची त्यांना शिफारस आहे." **केसरी.**

**संगीतसुधाः**–(तिसरी आवृत्ति) साक्या, दिंड्या, पदें वगैरे कविता. "यांतील कविता सरळ, सोपी व मनावर ठसा उमटण्याजोगी साधली आहे." **सुबोधपत्रिका.**

**उपदेशमालाः**–(सहावी आवृत्ति) श्लोकबद्ध. "लोंढे यांचा हा प्रयत्न त्यांच्या पूर्वींच्या प्रयत्नांप्रमाणेंच चांगला साधला आहे. कविता सोपी आहे." **विविधज्ञानविस्तार.**

**ऐतिहासिकसंगीतः**–( दुसरी आवृत्ति ) कविता–साक्या, दिंड्या, पदें वगैरे. "कविता सुबोध, सोपी व सहजरीतीनें केलेली आहे. इतिहासाचा नाद मुलांस लागण्यास हा चांगला मार्ग आहे." **ज्ञानचक्षु.**

**बोधामृतः**–श्लोकबद्ध. "पद्यें सुरस, आणि बोध फार चांगला आहे. मुलांनीं अवश्य वाचावें." **बालबोध.**

**बोधसुधाः** ( दुसरी आवृत्ति ) साक्या, दिंड्या, पदें, वगैरे कविता. "मुलांस कवितेंत बोध केला आहे. चांगला व सोपा आहे." **पुणेंवैभव.**

**पुष्पगुच्छः**–"कविता चांगल्या आहेत. मुलांनीं वाचण्यास योग्य आहेत. रा. लोंढे हे अर्वाचीन कवींपैकीं एक आहेत." **मनोरंजन निबंधचंद्रिका.**

# ऐतिहासिक संगीत.

शिवाजी शालिवाहन शके १६०० व ख्रिस्ती

## श्रीशिवाजी महाराज छत्रपति.



| जन्म—शक. | राज्याभिषेक—शक. |
| --- | --- |
| १५४९ | १५९६ |

मृत्यु—शक.
१६०२

तो तोषवी मिळवुनी यश या जनांस ।
ज्ञानेश वामन तुका अवघ्या विभूती
लोकीं परोपकृतिनें बहु धन्य होती ॥ १२५ ॥
होते कृतार्थ तरि ते दुसऱ्यास बोध
सांगावयास असती न थकून सिद्ध ।
तैसा परोपकृतिमाजि तुह्मांस लागो
हा छंद अक्षय कधीं मन तें न भागो ॥ १२६ ॥
दृष्टांत येथ लिहुनी उपदेश केला
हा सज्जनांप्रति रुचो नवनीतभेला ।
मंथूनें रम्य इतिहास तयार केला
मोरेश्वरें बुधपदीं धरुनी रतीला ॥ १२७ ॥

**समाप्त.**



आहेत

# ऐतिहासिक संगीत.

शिवाजी शालिवाहन शके १५४९ त शिवनेरी[1] किल्ल्यांत जन्मला. या महापुरुषानें मराठी राज्याचा पाया घातला. शके १५६८ पासून यानें आपल्या महत्कृत्यांस आरंभ केला. शके १५९६ त याला राज्याभिषेक झाला. शके १६०२ त हा स्वर्गवासी झाला. या महापुरुषाचें पुढील पद्यांत थोडें वर्णन आहे.

पद–( सुंदरमुख तुंदिलतनु. )

शिवनृप[2] करि ख्याति महाराष्ट्रीं जन्मुनी ।
निजसुयशें[3] शुभ्र करी सकल मेदिनी[4] ॥ ध्रु० ॥
केवळ जे नग्न[5] फिरति क्षुद्र[6] मावळे ।
ज्यांचें शिवचरण[7] त्यजुन चित्त नाढळे ।
हा गुण बहु चांग[8] शिवाजीस जैं कळे ।
नाथें । त्यांतें । हातें निज धरिलें, यश वारिलें,
सुख दिधलें, अरिसें[9] जिंकुनी ॥ १ ॥ शिव० ॥
येसाजीकंक जसा[10] भीम[10] तत्सखा[11] ।
बाजीच्या[12] मनिं नव्हती शत्रुची वखा[13] ।
तान्होजी[14] अरिस कधीं सोडिना सुखा[15] ।
[16]अंगें । [17]रंगें । [18]संगें । घेउन गडी, सिंहगडीं[19],
घालि उडी, वीर बहु गुणी ॥ २ ॥ शिव० ॥

---

१ जुन्नर तालुक्यांत आहे. २ शिवाजी राजा. ३ आपल्या चांगल्या यशानें. ४ पृथ्वी. ५ नागवे उघडे. ६ हलके. ७ शिवाजीचे पाय. ८ चांगला. ९ शत्रूंला. १० भीमासारखा पराक्रमी. ११ त्याचा सोबती. १२ 'बाजी फसलकर' याच्या. १३ पर्वा, भीति. १४ तान्हाजी मालुसरा. १५ शिक्षा केल्याशिवाय. १६ स्वतां. १७ आनंदानें. १८ बरोबर. १९ सिंहगडावर (शके १५९२) हा किल्ला हवेली तालुक्यांत आहे.

अफझुल्खानासें[2] जिवालागीं मुकाविलें ।
शिद्दी जोहार[1] तया फार ठकाविलें ।
मोहोबतखानास[4] वळें पार हटविलें ।
केला । हल्ला । भाला । घेउन करिं, मेदिनीवरि,
केवळ हरि, जाय होउनी ॥ ३ ॥ शिव० ॥

शिद्दी जोहारानें शके १५८२ त पन्हाळ्यास वेढा घातला. रात्रीं शिवाजी सैन्यासह बाहेर पडून रांगणें किल्याशीं पोंचला, मागून शिद्दी जोहाराचें सैन्य लगट करीत आलें. किल्यावर नीट व्यवस्था करतां यावी, ह्मणून शिवाजीनें बाजीपरभास शिद्दीशीं लढण्यास ठेविलें; व किल्यावर तोफांचे आवाज होत तोंपर्यंत त्यास अडवून धरण्यास सांगितलें. बाजीनें तसें केलें. जखम लागून तो पडला, इतक्यांत किल्यावरून तोफांचे आवाज ऐकूं आले, त्यावेळेस तो आनंदानें ह्मणाला:—

पद. ( दुधबेचन मैना. )

आज मज सहज वरी उल्हासें[9] ।
मरण सुखद रणीं[10] गमे या मनास ॥ ध्रु० ॥
नृपकारणिं हे खरचुन निज वपु[11] ।
सुखविन मी शिवनृपास ॥ १ ॥ आज० ॥
सिद्दीला मी बहुत झोडिलें ।
जेविं चुरी[12] पवि[13] वर नगास[14] ॥ २ ॥ आज० ॥

---

१ विजापूरकरांकडले सरदार. २ शके १५८१ त. ३ शके १५८२ त. ४ अवरंगजेबाकडील सरदार. ५ अगदीं. ६ शके १५९४ त. ७ सिंह (पराक्रमानें). ८ हे किल्ले कोल्हापूर प्रांतांत आहेत. ९ आनंद. १० लढाईंत. ११ शरीर. १२ फोडून टाकतो. १३ वज्र. १४ पर्वताला.

ठेविन हा मी देह सुखानें ।
चिंतुन शिवनृपशिवास[1] ॥ ३ ॥ आज. ॥

---

शिवाजीचा परम मित्र तान्हाजी मालुसरा. यानें शके १५९२ त सिंहगड[2] किल्ला घेतला. तेंव्हां मावळे तटास शिडी लावून मोठ्या युक्तीनें वर चढले. लढाईंत तान्हाजी पडला, मावळे मागें हटण्याच्या बेतांत होते, इतक्यांत तान्हाजीचा भाऊ सूर्याजी यानें हें भाषण केलें.

पद. ( थाकदरनादीं. )

आतां जाल कुठे पळून पळपुटे हा ! ।
दंड ठोकूनियां तुह्मी लढत रहा ॥ ध्रु. ॥
शिडी तोडुन टाकुन आलों तुह्मांजवळी परतून ।
तुटून पडून काढा रिपु[3] कापून पहा ॥ १ ॥ आतां. ॥
पाय मागें घ्याल तरि हाल होतील फार ।
तुमचें साल केवळ काळ शत्रु काढील अहा ॥ २ ॥ आ.
कुलशील वडिलांची रीत आठवा ।
पूर्वी नाहीं काय शत्रु कुटिले दहा ॥ ३ ॥[4] आतां. ॥

---

संभाजी हा शिवाजीचा मुलगा शके १६०२ त गादीवर बसला. हा बापाप्रमाणें शूर व धीट होता, पण दुर्व्यसनी होता. तो नेहमीं कलुशा नांवाच्या कनोजी ब्राह्मणाच्या तंत्रानें वागत असे. संगमेश्वरीं शिकार करीत असतां तकरीबखानानें त्याला धरिलें, व अवरंगजेबाच्या स्वाधिन केलें. त्या वेळेस अवरंगजेबाचें व संभाजीचें असें भाषण झालें:—

---

१ शिवाजी राजाच्या कल्याणाला. २ पुणें जिल्ह्यांत हवेली तालुक्यांत आहे. ३ शत्रु. ४ शके १६११ त.

## दिंड्या.

अवरंगजेबः—कोण देइल तुज मोकळीक आतां
कोण राखिल मी जीव तुझा घेतां ।
ममाज्ञेनें[1] तूं सोडिसी स्वधर्मा[2]
मत्कृपेनें[3] तरि पावसील शर्मा[4] ॥ १ ॥

संभाजीः— जगालागीं व्यापून देव राहे
अनाथाची काळजी सदां वाहे[5] ।
होय त्याचा मजवरी कोप[6] राया
तुला बळ कैंचें त्याप्रती हराया[7] ॥ २ ॥
क्षत्रियांना जीवित[8] न गोड वाटे
जरी त्यांचें कुलकीर्तिनीर[9] आटे[10] ।
मृत्यु येई जरि आज वा युगान्तीं[11]
सत्पथाला[12] त्यजुनी न भले जाती ॥ ३ ॥
जगीं परधर्मा[13] वरुन दुष्ट वांचे
निंद्य[14] भक्ष्यानें श्वान[15] जसें नाचे ।
व्यर्थ या लोकीं जिणें[16] होय त्याचें
वांझपण दे मायेस तो फुकाचें ! ॥ ४ ॥
अमर आत्मा हा असे पापराशी
कोपतां तूं देहास दुःख देशी ।
काय आत्म्याला करी तुझी सत्ता
सोड ऐसा हा दुष्ट हेतु मत्ता[17] ! ॥ ५ ॥

---

१ माझ्या हुकुमानें. २ आपल्या धर्माला. ३ माझ्या कृपेनें. ४ कल्याणाला. ५ बाळगतो. ६ राग. ७ नाहींसा करण्याला ८ जगणें. ९ कुळाची कीर्ति हेंच पाणी. १० आटलें. ११ युगाच्या शेवटीं. १२ चांगल्या मार्गाला. १३ दुसऱ्या धर्माला १४ वाईट. १५ कुत्रें. १६ जगणें. १७ हे दांडग्या अवरंगजेबा!

तुझा पैगंबेर थोर तुला आहे
तसा माझा मज ईश² थोर पाहें ।
नको दुर्बुद्दे वदूं अशी वाणी
जगीं मेळविलें अमरपण न कोणी ॥ ६ ॥
तुझी कन्या मजलागिं दे वराया
निंद्य ऐशा मग सांग या उपाया ।
करीं नातरि जें योग्य तुला वाटे
तुझ्या धाकें मद्धैर्यपट न फाटे ॥ ७ ॥

---

संभाजी फार अनीतिनें वागत आहे, त्याची कानउघाडणी करावी, या हेतूनें रघुनाथ नारायण हणमंते कर्नाटकांतून निघून संभाजीस भेटण्याकरितां रायगडास आला. संभाजीनें सन्मानपूर्वक त्याची भेट घेतली. तेव्हां इतर प्रधानांप्रमाणें आपल्या भावास ( जनार्दपंतास—हा शिवाजीचा सुमंत प्रधान —) ही संभाजीनें कैदेंत टाकिलें आहे, असें ठाऊक असतां, भरदवारांत निस्पृहपणानें त्यानें पुढील भाषण केलें:—

पद. ( साध्य नसे मुनि. )
सांगतसें हितगोष्ट तुह्मां ही ।
लाभ अशा गुणें होय न कांहीं ॥ ध्रु. ॥
अष्ट प्रधानां तुह्मि दूर केलें ।
कलुशाच्या करीं सर्व राज्यास दिधलें ।

---

१ महंमद पैगंबर. २ देव. ३ हे दुष्टबुद्धीच्या अवरंगजेबा. ४ नाहीं तर. ५ माझा धीर हेंच वस्त्र. ६ शिवाजीनें कर्नाटकांत नेमलेला अधिकारी. ७ शके १६०२ त. ८ फायद्याची गोष्ट. ९ दिलें.

इष्ट तुह्मां हें न होई ।
राज्य समग्र[1] लयाप्रति[2] जाई ॥ १ ॥ सां. ॥
राज्यास मंत्री हे स्तंभचि[3] असतीं ।
भूपांस[4] केवळ ते हित कथिती ।
अरिसम त्यांस जो पाही ।
योग्य धराधिप[5] केंवि तो होई ॥ २ ॥ सां. ॥
राज्य कराया शक्त[6] न राय ।
मंत्री न उत्तम जरि प्राप्त होय ।
मंत्री हे नृपनेत्र पाहीं ।
दाखविती नृपतिस योग्य सोई ॥ ३ ॥ सां. ॥

---

[" मोंगलांनीं पन्हाळा व मिरज हे किल्ले शके १६१२त घेतले. तेव्हां मराठ्यांनीं असें ठरविलें कीं राजारामानें जिंजीस जावें. मग संताजी घोरपडे, खंडेराव दाभाडे, इत्यादि विश्वासू लोकांसह वाण्याच्या वेषानें राजाराम जिंजीस जावयास निघाला. अवरंगजेवानें राजारामास धरण्याबद्दल चोहोंकडे हुकूम पाठविले. राजाराम बंगलोराजवळ[7] उतरला होता, त्याचे पाय हुजऱ्या धूत होता, तें एका धूर्त मनुष्यानें पाहून तेथील मोंगल अधिकाऱ्यास वर्दी दिली. खंडो बल्लाळ चिटनीस यानें तें पाहून, संताजी घोरपडे वगैरे सरदारांस बरोबर देऊन, राजारामाची पुढें रवानगी केली. आपण मंडळीसह तेथें राहिला, नंतर बाकीच्या मंडळीजवळ त्यानें असें भाषण केलें:—

---

१ सगळें. २ नाश पावेल. ३ खांब. ४ राजाला. ५ राजा. ६ समर्थ. ७ कर्नाटकांत शहर आहे.

पद. ( संतत यत्नाचीग. )

चिंता तुमच्या देहाची । स्वमनीं आणूं नका ॥ ध्रु० ॥
वृत्त समजलें म्लेंच्छांला[1] । येतिल नृपतिस धरण्याला ।
पाहुन येथ न भूपाला । अपुल्याला न धरिति का ॥ १ ॥ चिं. ॥
बहु ते दुःख तुह्मां देती । वार्ता सत्य वदा कथिती ।
होतां प्राणहानि[2] परि ती । बोलूं नका हेंचि शिका ॥ २ ॥ चिं. ॥
स्वामी कार्यांत मरावें । चित्तीं हेंच असों द्यावें ।
नृपतिस वंचुनें[3] पावावें । नाकपथा[4] केविं फुका ॥ ३ ॥ चिं. ॥
प्राणाविण हें वपु[5] जैसें । सतिजीवित[6] पतिविण जैसें ।
जीवित स्वीय[7] विफल[8] तैसें । जरि लागे प्रभुस धक्का ॥ ४ ॥ चिं.
होतां हालहि सहन करा । पारि अपकीर्ति[9] न अल्प[10] वरा ।
भीति न दे यम शूर नरा । भूपहितीं[11] प्राण विका ॥ ५ ॥ चिं.

---

धनाजी जाधवाचें बहुतेक काम त्याच्यामागें बाळाजी विश्वनाथ पहात असे. त्याच्यावर शाहूचा फार लोभ होता. धनाजीचा मुलगा चंद्रसेन बाळाजीचा द्वेष करीत असे. मोंगलाकडील चौथाई वगैरे हक्क वसूल करण्याकरितां शाहूनें उभयतांस पाठविलें. * तेव्हां चंद्रसेनानें कांहीं कुरापत काढून आपले स्वार बाळाजीच्या पाठीस लाविले. बाळाजी जिवाच्या भयानें पांवगडाकडे पळाला. त्याच्याजवळ पिलाजी जाधव व नाथाजी धुमाळ हे इमानी सेवक होते. त्यांचें सांगणें ऐकावें ह्मणून बाजीराव असें ह्मणाला:—

---

१ मुसलमानांला. २ प्राणाचा नाश. ३ ठकवून. ४ स्वर्गाला. ५ शरीर. ६ पतिव्रतेचें जिणें. ७ आपलें. ८ निर्फळ. ९ अपयश. १० थोडें. ११ राजाचें हित करण्यांत. *शके १६३०.

पद. (प्रदोपसमयीं. )

राहुन ऐशा दुस्तर[1] विपिनीं[2] ।
काय पडावें श्वापदवदनीं[3] ।
पहावें चित्तीं विचार करुनी ।
हे विनती पायीं ॥ जनका० ॥ १ ॥
मान्य तिला होई ।
युक्त[4] पिलाजी युक्ति कथितसे ॥ ध्रु० ॥
येवो मृत्यु हि समर करूनी ।
शूराला प्रिय प्राणाहूनी ।
नातरि न चुके तो चुकवूनी ।
आणिक वदुं काई ॥ जनका ० ॥ २ ॥ मा० ॥
जय लाधे[5] जरि ईशकृपेनें[6] ।
छत्रपतीला[7] तो वहु माने ।
थोपटील तो पाठ करानें ।
होतिल वहु सोयी ॥ जनका० ॥ ३ ॥ मा० ॥

---

बाजीराव हा बाळाजी विश्वनाथाचा मुलगा. याचा जन्म शके १६१७ त झाला. याला शके १६४२ त पेशवाईचें काम मिळालें. यानें मराठ्यांचें नांव गाजविलें. पेशव्यांच्या कुळाची भरभराट केली. हा अनेक पराक्रम करून शके १६६२ त स्वर्गस्थ झाला. निजाम याचा शत्रु होता, तरी तो 'एक बाजी और सब पाजी' असें याचें वर्णन करित असे. या थोर पुरुषाचें पुढील पद्यांत वर्णन आहे:—

---

१ बिकट. २ रानांत. ३ वनपशूंच्या तोंडांत. ४ योग्य. ५ मिळेल. ६ देवाच्या दयेनें. ७ शाहूला.

पद. ( केशवकरणी. )

बाजीसा[1]रा वीर न जाला द्विज[2]जातीमाध्यें दुजा ।
वाटते चरित ऐकतां मजा ॥ ध्रु० ॥
अपयश ज्याला कधीं न ठावें नित्य रणीं जो पुढें ।
विलासीं रमणें ज्या नावडे ॥
ज्याचा घोडा दवडत गेला अटके[3]स न जो अडे ।
रणकं[4]था ऐकुन ज्या बळ चढे ॥
चतुरसाल बुंदेलाधिपं[5] जैं मोठ्या संकटिं पडे ।
ऐकतां अंत[6]रिं जो धडपडे ॥
बंगशा[7]स जो क्षणांत पळवी हरि जैसा कीं गजा[8] ।
वाटते चरित ऐकतां मजा ॥ १ ॥ बाजी. ॥
दाभाड्या[9]ला रणीं पाडिलें [10]शिद्दीशीं जो लढे ।
घुस[11]ळिलीं निजामां[12]चीं [11]हेडें ॥
दिल्लीपतिला[13] पराभवुन जो गेला दिल्लीपुढें ।
वारिलें [14]आंग्र्यचें सांकडें ॥
फिरंगी[15] जरी सिद्ध होउनी उभे राहिले खडे ।
जिंकिले त्यास न तें जड पडे ॥
जणूं तयाच्या अरि जिंकाया कीं अवतरल्या भुजा ।
वाटते चरित ऐकतां मजा ॥ २ ॥ बाजी ॥

---

१ बाजीरावासारखा. २ ब्राह्मणांत. ३ अटक नदीला. ४ लढाईची गोट. ५ बुंदेलखंडाचा राजा (शके १६५५). ६ म-नांत. ७ बंगशखानाला. ८ हत्तीला. ९ त्रिंबकराव दाभाड्याला (१६५३). १० शिद्दी याकुटाचे मुलाशीं. (१६५७). ११ बेजार केलें. १२ निजामउल्मुलुखाचीं ( १६५० व ६० ). १३ दि-ल्लीचा बादशहा महमदशहा याला ( १६५८ ). १४ मानाजी आंग्र्याचें (१६५९). १५ कोंकणांतले पोर्तुगीज ( १६६१ ).

माळव्यांतल्या पहिल्या स्वारिंत मल्हारजी गाजला ।
बाजिनें उच्चपदा[2] चढविला ॥
राणोजीनें[3] थोर पराक्रम या स्वारिंत साधिला ।
बाजी दौलत दे त्याजला ॥
पवार उदाजी[4] अरीच यवनां पाहुन मनिं तोपला ।
बाजिनें मान्यतेस[5] आणिला ॥
देह नर्मदातीरिं[6] ठेविला अक्षय[7] कीर्तिध्वजा[8] ।
वाटते चरित ऐकतां मजा ॥ ३ ॥ बाजी० ॥

---

शके १६५०[1] त शाहूच्या आज्ञेनें बाजीरावानें निजामावर स्वारी करून त्याचा धुव्वा उडवला. उभयतांचा तह झाला. निजामानें बाजीरावास फळफळावळीची मेजवानी दिली. त्यावेळेस खुबसुरत बाजीरावास पाहून निजामाच्या जनानखान्यांतली सुंदर स्त्री मस्तानी मोहित झाली. ती मर्दानी पोषाक करून घोडयावर स्वार होऊन बाजीरावाच्या डेऱ्यांत रात्रीं आली. बाजीरावानें हा कोणी सरदार आहे, असें समजून तिचा अंगीकार केला. तेव्हां तिनें आपलें खरें स्वरूप प्रकट करून हें भाषण केलें.:—

पद.

चरणांची दासी नृपाळा । रे ।
द्यावें अभय कृपाळा ॥ ध्रु० ॥
ऐकुनियां गुणकीर्तीस तव मी, आलें शरण वेल्हाळा ॥ १ ॥

---

१ (१६४८). २ मोठया पदवीला. ३ राणोजी शिंद्यानें. ४ धारच्या संस्थानिकाचा मुलगा ५ मोठेपणाला. ६ नर्मदेच्या कांठीं. ७ नेहमीं टिकणारें. ८ कीर्ति हेंच निशाण.

अवलोकुन तुज काल सभेमधीं, मानस[1]भृंग निवाला ॥ २ ॥
मन गुंतुन हें तव पदीं गेलें, वाहिला देह तुह्मांला ॥ ३ ॥

बुंदेलखंडचा राजा चतुरसाल, यांजवर दिल्लीचे बादशहाचा सरदार बंगषखान यानें शके १६५९ त स्वारी केली. त्या वेळेस त्यापासून आपला बचाव होणें कठीण असें समजून चतुरसालानें बाजीरावास मदतीस येण्या करितां पुढील पत्र लिहिलें:-

पद. ( सतत मनीं. )

समय[2] बहु अवघड हा वीतला[3] ।
बाजी राख मला ॥ ध्रु० ॥

बंगष हा गज[4] मत्तांचि[5] केवळ मजवरती उठला ॥ १ ॥ स०
नक्र[6] गजेंद्रा दुःख दे जैसा, तेविं छळी मजला ॥ २ ॥ स०
तुजविण मजला साह्य न कोणी, यावी दया तुजला ॥ ३ ॥ स०

---

निजामास दिल्लीच्या बादशहानें मराठ्यांचा मोड करण्याविषयीं हुकुम दिला. त्यानें मोठें सैन्य जमविलें. बाजीरावानेंही निजामाच्या फौजेशीं तोंड देण्याकरितां तसेंच मोठें सैन्य जमविलें. निजाम भोपाळ येथें राहिला होता. बाजीरावानें त्यास शके १६६० त वेढा घातला. दाणापाणी मिळेनासें केलें. त्यावेळच्या लढाईचें वर्णन पुढील पद्यांत आहे:-

पद. (काय बेटया. )

चला पिलाजी[7] उठा सयाजी[8] करा त्वरें हल्ला । गड्यानों ।

---

१ मन हाच भुंगा. २ प्रसंग. ३ गुजरला. ४ हत्ती. ५ माजलेला. ६ मगर ( पुराणांतील कथेवर लक्ष आहे. ) ७ पिलाजीराव जाधव. ८ सयाजीराव गुजर.

मराठी ग्रंथ संग्रहालय नं.

निजामावरी राणोजीराव[1] उठा करा गिल्ला[2] ॥ ध्रु० ॥
तिघांवरी करी निजाम वेगें तोफांचा मार ।
जयसिंगात्मज[3] ससैन्य[4] धांवे [5]त्वेषें अनिवार ॥
शूर वीर रजपूत तयांना जीव नसे प्यार[7] ।
चवताळुनियां व्याघ्रांसारे चमू[8] करिती ठार ।
पिलाजीरणीं तोंच गाजवी शौर्ये तरवार ।
घुसूनियां सैन्यांत रजपुतां केलें बेजार ।
सयाजिराव तुडवीत चालला अरिचमु जणुं गल्ला[9] ।
राणोजीचा मार न सोसे मत्त अशा मल्ला ॥ १ ॥ च० ॥
अबदुल्ल मनसुरखान[10] पळाया बाजूनें वळला ।
इतक्यामाधिं तो भट्टभूषणा[11] बाजीला कळला ॥
शूर वीर हो! चला, होळकरपंवारांस[12] वदला ।
डोळा चुकवुन चोर टाकुनी पळती समराला[13] ॥
उठा दाखवा वाहूबळाला योग्य काळ आला ।
पवारहोळकर[12] मेघें[15] शत्रुवर कोपुनि कोसळला ॥
गहजब[16] झाला शत्रु पळाला काढितसे पल्ला ।
यवन बोलती लाया[17] कैसा बखेत[18] खुदा[19] अल्ला ॥ २ ॥ च० ॥

बाजीराव शके १६६२त नर्मदेच्या तीरीं परलोकवासी झाला. त्या वेळेस होळकर, शिंदे, वगैरे सरदार बरोबर

---

१ राणोजी शिंदा. २ गर्दी. ३ जयसिंगाचा मुलगा. ४ सैन्यासुद्धां. ५ रागानें. ६ फार. ७ आवडता. ८ सैन्य. ९ धान्य. १० निजामाकडील सरदार. ११ भट्टांचें भूषण अशाला. १२ मल्हारराव होळकर व यशवंतराव पवार यांना. १३ लढाई सोडून. १४ पराक्रमाला. १५ पर्जन्य. १६ गर्दी. १७ आणला. १८ प्रसंग. १९ हे ईश्वरा.

होते. त्यांना प्रत्यक्ष आपला प्राणच गेला कीं काय असें वाटून त्यांनीं पुढील शोक केला:-

---

पद. ( उद्धवा शांतवन. )

बाजिराव प्राणाचे अमुचा यम घेउन कैसा गेला ॥ ध्रु० ॥

पत्नी तव काशीबाई, ऐकुनि हें टाकिल प्राण ।
मस्तानी जिवलग तिजला, समजाविल आतां कोण
हें वृत्त नव्हे तनयांच्या, हृदयीं हा खोंचेल बाण ॥ चाल.
तुजवांचुन [1]मंदिर शून्य । वाटेल जणुं जीर्ण अरण्य ॥
किंवा तनु[3] गतचैतन्य[4] । हा सकळांवरती घाला ॥ १ ॥ बा. ॥

ऐकुनियां रिपुचें नांव, त्वां घ्यावी धांव पुढारां[5] ।
जो उठला तो न रणाला, साधावा तों तूं मारा ।
चमकावा अश्व तुझा बा, रणिं केवळ जैसा वारा । चाल.
तूं अमुचा पाठीराखा । तुज ऐसा वीर न वांका ।
हिंमत त्वां द्यावी लोकां । वरिमणी कोत्रें निमाला[6] ॥ २ ॥ बा.

जिंकावें रिपुला आह्मी, अवघी हे कीं तव लीला[7] ।
थोपटुनी आमुच्या पाठी, वारावें सर्वहि भीला[8] [9] ।
मल्हारजी उजवा हात । राणोजी वीर दहांत ।
अनिवार[10] उदाजी वीत । तो प्रेमा काय लपाला ॥ ३ ॥ बा.

त्वां निजामउल्मुल्खाची मोडिली समूळचि खोडी ।
बुंदेलाधिप तव शौर्या पाहुनियां स्नेहा जोडी ।
त्वां केली रिपुंना तेजें पळण्याला जागा थोडी । चाल.
कां आह्मां सोडुन जासी । अपराध न अमुचा काथिसी ।

---

१ वाडा. २ औलाद. ३ शरीर. ४ निर्जीव. ५ पुढें. ६ मेला. ७ खेळ. ८ धीर देऊन. ९ भयाला. १० निवारण्यास कठीण असा. ११ वारा ( मोठ्या वाघासारखा पराक्रमी ).

टाकुन तुज कोठें गृहासी । जावें हें सांग कृपाळा ॥४॥ बा०

---

शकें १६६० व ६१ त मराठ्यांनीं पोर्तुगीज लोकांशीं लढाया केल्या. सर्व सैन्याचा मुख्य चिमणाजी आप्पा बाजी रावाचा भाऊ होता. त्या लढायांचें पुढील पद्यांत वर्णन आहे:—

पद. ( अमोल काया. )

जमूनियां सरदार मराठे एके जागीं अनिवार ।
फिरंग्यांवरी स्वारी करूनी केलें त्यांना बेजार ॥ ध्रु० ॥
त्र्यंकटराव घोरपडे घेउनी सेना गोंव्यावर गेला ।
फिरंग्यांप्रती वाटे जणुं काय वणवा अपुल्यावर आला ॥
[1]खंडोजी रणशूर शिपाई उत्तरहद्दीवर गेला ॥
किल्यामागुन किल्ला तेणें हल्ला करुनी सर केला ॥
राणोजी माहीम वेढुनी चमुसह तारापुरिं ठेला ।
सुरुंग मोठे चार उडवुनी भोंक पाडिलें किल्याला ॥
शौर्यानें तो चढे तटावर शीघ्र गाजवुन तरवार ।
ह्मणे "गड्यांनो भिऊं नका या कापूं शत्रूंप्रतिपार!"॥ १ ॥
शंकराजी [2]नारायण वाली खुष्कीनें वसइस वेढा ।
पाण्यातुन शत्रूप्रति वेढी मानाजी आंग्र्या गाढा ॥
सुरुंग लावुन पाडुनियां तट केला तेथें जणुं खाडा ।
हर हर गर्जुन वीर धांउनी शिरती घेउनियां ओढा ॥
शेष राहिला सुरुंग पेटे काळ पातला काय तेढा ।
दुर्दैवानें वीर निमाले ह्मणतां शत्रूंप्रति झोडा ! ॥
तीन मास वेढुनियां वसती बंदोबस्तें हि अपार
किल्ला देती तयीं फिरंगी पावुनियां दुःखा फार ॥ २ ॥

---

१ खंडोजी माणकर. २ चिमणाजी अप्पाच्या सैन्याचा ब्रिनीवाला.

बाजीरावाचा मुलगा रघुनाथराव शके १६४५ त जन्मला. हा शूर पण बाईलबुद्ध्या होता. यानें १६७७ त गुजराथेंत व १६८० त हिंदुस्थानांत स्वारी केली. ह्या स्वाऱ्यांचें वर्णन पुढील पद्यांत आहे.

पद. ( निबिड सघन हे. )

करुन समर बहु विजय मिळवुनी शुद्धकीर्ति मिळविली ।
निजजनकामागुन रघुनाथें तीच रीत धरिली ।। ध्रु० ।।
सेना घेउन गुजराथेमाधिं होय बळें शिरता ।
दुःसह सकळ नृपांना जाला जेविं तमा[1] सविता ।।
घालुन वेढा शीघ्र अहमदाबाद करीं घेतां ।
शौर्यें ठोकुन भुजा लढाई होय बळें करिता ।। चाल ।।
शूर हो न घ्यावा पाय तुह्मी मागें ।
काय भ्यावें समरीं वायुस हे मागें[2] !
घ्या किल्ला करितों साह्य तुह्मां अंगें ।
असें वदुनियां निजचमुमानींचीं भयें सर्व हरिलीं ।।
बहुत झटुनियां अरिचमुसगळी शूरवरें वधिली।। १ ।।क०।।
स्वजनकसम " रघुनाथ भरारी" दवडित घोड्याला ।
पवनसम[3] चमुस घेउन हिंदुस्थानामाधिं गेला ।
यवन[4] सकलही नांव ऐकतां लागति भ्यायाला ।
नारसिंह भूतांस तसा तो पळवी सकळांला ।। चाल ।।
बसविला दरारा अपुला रघुनाथें ।
रोंविला बावटा हिंदूंचा तेथें ।
निवाटिले[5] सर्वही शत्रू निजहस्तें ।
विजयश्री जणुं मूर्त तयाला संतत अनुसरली ।
भुजबळ अतुळ विलोकुनि त्याच्या काय गळां पडली ।। २ ।।

---

१ काळोखाला. २ मरेपवतानें. ३ वाऱ्यासारख्या. ४ मुसलमान ५ मारले

नारायणरावानें रघुनाथरावास बंदोवस्तांत ठेविलें, यामुळें आनंदीबाईस राग आला. तिनें नारायणरावास ठार मारण्याचा निश्चय केला. सर्व सिद्धता झाल्यावर ती आपल्याशीं ह्मणतेः— ( शके १६९५. )

पद. ( इंद्रजीत रक्तवस्त्र. )

नारायण कोण तुला आज राखितें
काळाच्या वदनीं तुला साच घालितें ॥ ध्रु० ॥
युक्तिनें समेरासिंग वचनिं बांधिला ।
पतिपासुन[1] धरावया लेख आणिला ।
आज गमे हेतु मला पूर्ण जाहला ।
पतिसह मी राज्य आतां शीघ्र पावतें॥ १ ॥ना०॥
ध चा मा पहा कसा नीट जाहला ।
चतुराच्या खोड नये येथ दृष्टिला ।
गार्दी तर मूर्ख न संदेह[2] त्यांजला ।
बेत करुन खास आज पार[3] पाडितें॥ २ ॥ना०॥

आनंदीबाईचे सांगण्यावरून व रघुनाथरावाचे हुकुमावरून, सुमेरसिंग गारदी लोकांसह नारायणरावास ठार मारण्याकरितां शनवारच्या वाड्यांत शिरला. सुमेरसिंग व नारायणराव यांची गांठ पडली. त्यावेळेस नारायणराव सुमेरसिंगास ह्मणतोः— ( शके १६९५. )

पद. ( श्रीरंग गोपिकोत्संग. )

निर्दया वदसी कासया न पावुन भया पळे हा प्राणी ॥
हा धांवुन वेगें धरिल यमाचा पाणी[4] ॥
हे चार सोड बडिवार कापितों पार खड्ग मज आणीं ।

१ राघोबादादापासून. २ भ्रांति. ३ सिद्धीस नेतें. ४ हात.

मग शूरत्वाचें तुला दावितों पाणी ॥
असिहीन बघुनियां दीन तयास वधीन भेंकुडा वाणी ।
ही दुष्टबुद्धि तुजप्रती शिकविली कोणी ॥ चाल ॥
स्वस्वामिभक्ति या कृत्यें—बुडविसी ।
ही चांडाळाची करणी—योजिसी ।
तव शुद्ध कीर्तिला वणवा—लाविसी ।
जरि वीर होसि तूं थोर धरुनियां धीर लढें मजपासीं ।
जो खरा वीर तो भि[1]ना कल्पांतासीं ॥ १ ॥
गांठून मधिंच दा[2]टून टावु[3] कापून मानसीं धरिसी ।
ही रीति धरुनियां दुस्तर नरकीं पडसी ॥ ध्रु० ॥

---

नारायणरावास गारद्यांनीं ठार मारलें. त्यावेळेस नारायणरावाची बायको तेथें नव्हती, माहेरीं होती. तिणें केलेला शोक पुढील पद्यांत वर्णिला आहे. ( शके १६९५.)

**पद** (उद्धवा शांतवन. )

हा प्राणविसांव्या मजला, टाकुनियां कैसे गेलां ॥ ध्रु.॥
कधीं नाहीं दुखविलें मातें, किती गोड बोलणें होतें ।
प्रेमानें धरावें हातें, गुंज गोष्ट कथावी मातें ।
माझें ऊर भरुनियां येतें, कोवि आतां सौख्य मिळे तें ॥
तुजाविण मी दीनचि झाल्यें । चाल.
अद्यापि कशी तरि जगल्यें ।
शोकानें कां न निमा[4]ल्यें
आग लागो या देहाला ॥ १ ॥ हा प्राण० ॥
हाय हाय सुमेरसिंगानें दुष्टानें तोडिलें कैसें ।
असतें जरि पायांजवळी होऊं न मी देतें ऐसें ।

---

१ तरवारी शिवाय. २ मुद्दाम. ३ गुन. ४ मेल्यें.

वांचवितें प्राण कृपाळा करुनियां जैसें तैसें । चाल.
नातरि मी संगें मरतें । पायांसह स्वर्गीं जातें ।
सोसाया विरह न जगतें । दुर्दैवें हा जन फसला ॥२॥हा०
२ नारोबा जिवलग स्नेही जाहला न विरह तयातें ।
३ चांपाजी थोर मनाचा अर्पिला प्राण स्वामीतें ।
मी चरणाजवळी असतें तरि संगें काय न येतें । चाल.
पापी मी अंतर्वैरी । जगल्यें तरि कसी आजवेरीं ।
यमराया दूतां प्रेरीं । या न्यायास अभागीला ॥ ३ ॥ हा. ।

---

शके १६९४ त थोरले माधवरावसाहेब यांस थेऊर येथें देवाज्ञा झाली. त्यावेळेस नारायणरावाचें संरक्षण रघुनाथरावानें करावें, ह्मणून माधवरावानें हें भाषण केलें:—

पद ( किती तरी पाहांटची. )

नारायण, बालक हें, अज्ञानी, अर्पिलें तुह्मांसी ॥ ध्रु. ॥
धरुन करीं यास तुह्मी, रक्षावें दिवसनिशीं ।
बोधामृत प्रेमानें; पाजित जा यासीं ॥ १ ॥ नारा० ॥
दुःख दिलें मी तुह्मास, आणुं नका तें स्वमनीं ।
वैर निजगृहांतलेंचि, नाशितें कुळासीं ॥ २ ॥ नारा० ॥
पितयानें करिं तुमच्या, निधनसमयिं मज दिधलें ।
तेवीं करीं तुमच्या मी ओपितसें यासी ॥ ३ ॥ ना० ।

---

भाऊसाहेब हा चिमणाजी अप्पाचा मुलगा. यानें नानासाहेबास राजकीय कामांत पुष्कळ मदत केली. शके १६८२ त निजामाचा पराभव केला. शके १६८३ त हिंदुस्थानांत

---

१ हवें तें. २ नारोबा फाटक. ३ चांपाजी टिळेकर. ४ दुर्दैव जी मी तिला. ५ पुणें जिल्ह्यांत हवेली तालुक्यांत. ६ अहोरात्र

स्वारी केली. पानपतच्या प्रसिद्ध रणकंदनांत मोठा पराक्रम करून देह ठेविला*. त्यावेळचें वर्णन पुढील पद्यांत आहे.

पद ( अष्टमूर्ति परमेश. )

पानपतींच्या रणीं पहुडला शूरवीर भाऊ ।
वीरशद्ब ऐकुनियां ज्याचे फुरफुरती बाहू ॥ ध्रु० ॥
समरंगणीं अरिदळीं मराठे शिरले ते जेव्हां ।
कापा ! तोडा ! बोलत धांवे भाउ पुढें तेव्हां ।
वाटे त्याला अबदालीला[1] मारिन मी केव्हां ।
वाटे चित्तीं जया न कैसा शत्रुदळीं जाऊं ॥ १ ॥ पानप. ॥
जखमेनें व्याकुळ बहु जाला अंतरिं विश्वास[2] ।
होळकर मागें काढी पद जरि टाकुन समरास ।
भीत्यास्पद[3] हें अल्पहि न गमे तरि तच्चित्तास ।
छाती ठोकुन ह्मणे देह हा रणयज्ञा[4] वाहूं ॥ २ ॥ पानप. ॥
चहूंकडे अफगाण[5] धांवती घेउन शस्त्रांस ।
करुन लढाई शौर्यें तेव्हां पुरुन उरे त्यांस ।
भाला मारुन खालीं[6] पाडी करुनी जखमांस ।
येना चित्तीं ज्याच्या संकट हें कैसें साहूं ॥ ३ ॥ पानप. ॥
एक्या वीरें अफगाणांना केलें बेजार ।
सर्व मिळुन ते एकावरती करिती बहु मार ।
भाऊनें बहु धीर मारिले त्यांचे तायें ठार ।
गेला मोहरा यमालयीं यश त्याचें किति गाऊं ॥ ४ ॥ पा. ॥

---

नारायणरावास ठार मारविण्यांत रघुनाथरावाचें आंग

---

१ अहमद अबदाली याला. २ विश्वासराव. ३ भयकारक. ४ लढाई हाच यज्ञ त्याला. ५ आफगाणिस्थानांतले लोक. ६ घोड्यावरून खालीं. * शके १६८३.

आहे, असा पुरा तपास केल्यावर रघुनाथरावास रामशास्त्री ह्मणतात*.——

पद ( पंचतुंड नररुंड० )

योग्य तुह्मीं देहांतशासना[1] स्पष्ट तुह्मांला हें कथितों ।
ब्रह्महनन[2] करणारा नर या जगीं कधिं न पावन होतो ॥ ध्रु. ॥
कुटुंबकलहें[3] नाश कुलाचा तुह्मीं स्वकरानें केला ।
शूर असुनियां नीचपणानें तुह्मीं मिळविलें राज्याला ॥ १ ॥
केला कैसा शपथ घेउनी घात तयाचा अनयानें[4] ।
संपादावें राज्य न शूरें ऐशा अधमा[5] रीतीनें ॥ २ ॥
थोर काळिमा[6] कुळा लावुनी लोपविलें[7] कीं सुयशाला ।
आजपासुनी तुह्मी द्विजांच्या अयोग्य जालां नमनाला ॥ ३ ॥

---

पद. (घनःश्यामसुंदरा० )

गेले ते भूपती करुनी भूषित[8] देशाला ।
अतुल भुजबळा दावुन केलें विस्मित[9] लोकांला ॥ ध्रु. ॥
प्रथम शिवाजी राज्यपदाच्या पायाला घाली ।
पराक्रमें त्याच्या ऊर्जित स्थिति राज्याला आली ।
येसाजी तान्हाजी बाजी आणिक सुखशाली ।
रणशूरांनीं साह्य तयाला केलें त्या काळीं ॥
संभाजीच्या अभिमानाला पाहुन मति धाली ।
कलुशाकेतु स्वमुखीं त्याच्या यशोरविस घाली ॥
पावले मराठे ते यापुढें थोरवीला ।
जिंकिले थोर राजे मुलुखही मेळविला ।

---

१ मरणाच्या शिक्षेला. २ ब्राह्मणाचा नाश. ३ गृहकलहानें. ४ अन्यायानें. ५ हलक्या. ६ डाग. ७ नाहींसें केलें. ८ शोभिवंत. ९ आश्चर्यानें युक्त. *शके १६९५.

कीर्तिचा यशोवात चहुंकडे पसरवीला ।
राजाराम दयादातृत्वें प्रिय लोकां जाला ।
मागुन जाला शाहु नृपती भीती अरि ज्याला ॥१॥ गे. ॥
बाळाजी विश्वनाथ मिळवी ' पेशवा, सुपदवी ॥
बाजिराय निजशौर्यें लोकांकडुन ' भला ' वदवी ।
नानासाहेब भावांपासुन सर्व कार्य करवी ।
भाऊ साहेब आयुष्याला पानपतीं सरवी ॥
माधव शौर्ये ' हैदर ' याची रग सारी जिरवी ।
न्यायें वागुन निजराज्यामधिं दुःखलेश नुरवी ॥ चाल ॥
नारायण प्रभु पावे, रघुनाथगुणें निधना ।
माधवहि सवाई तो, करी स्वीयजीवहनना ।
बाजिराय मग दुसरा पेटवी करें सदना ! ।
थोर काळिमा बळें जोडिला दवडुन राज्याला ।
अनिष्ट येतां काळ होतसे मति तशि मनुजाला ॥ २ ॥

१ पेशवाईचें काम. २ मुद्दाम ३ बुद्धि.

---


**पुष्पमाला:**—" कविता साधी आणि हृदयंगम उतरली आहे. लोंढे यांनीं मुलांकारितां चांगला उपक्रम चालविला आहे. **काव्यरत्नावली.**

**पुष्पावली:**– " कविता सुबोध व मुलांची कल्पना-शक्ति वाढवणारी अशी झाली आहे." **पुणेंवैभव.**

सर्व पुस्तकें खालीं लिहिलेल्या ठिकाणीं मिळतील.

**मोरो गणेश लोंढे**—हेडमास्तर—दहिवली तालुके कर्जत जिल्हा ठाणे.

वासुदेव मोरेश्वर पोतदार—कांदेवाडी—मुंबई.



# बोधामृत.

(मुलांकरितां)

हें

पुस्तक,

## मोरो गणेश लोंढे

कल्याण येथील मराठी शाळेंतील उपशिक्षक

यांनीं केलें.

आवृत्ति पहिली.

१००० प्रति.

मुंबईमध्यें,

"निर्णयसागर" छापखानें

संग्रहालय

जा॰ प... ...चार वेडे ॥ १ ॥
...विंचे ...र्च असतांत तेढे ।
...विना मग काम कांहीं
...रीं अन्न जरी न पाहीं ॥ २ ॥

...न २ बाजारांत. ४ निरुपयोगी. ५ उलटे, वांकडे.

# उपदेशपर पुस्तकें.

( प्रत्येकाची किंमत ८–॥ ट. ह. ०॥ ).

**वोधशतक.**–"प्रत्येकें लहान मुलानें वाचावें." **केसरी.**

**संगीतसुधा.**–"कविता मनावर ठसा उमटण्याजोगी साधली आहे." **सुवोधपत्रिका.**

**उपदेशमाला.**–"मुलांनीं अवश्य वाचावी." **विविधज्ञानविस्तार.**

**ऐतिहासिक संगीत.**– "कविता सुबोध व सोपी आहे." **ज्ञानचक्षु.**

**भूगोलपत्रक.**–( आशिआखंडाचें )

किंमत ०॥। ट. ह. ०॥.

---

पांचव्या व सहाव्या इयत्तेकरितां.

आशिआखंड. थोडक्यांत तयार करतां येतें. एक रुपयास प्रति २९ शेंकडा रुपये ३०८.

सर्व पुस्तकें ... खालीं लिहिलेल्या ठिकाणीं मिळतील.

...गेश लोंढे.

गणेश विष्णु टिळक.

स ८–.

# बोधामृत.

## श्लोक.

### स्थियंतर.

इं०व० लागे तुझा बाळपणा सराया
तारुण्य देहाप्रति शोभवाया ।
तेणें तुझी चंचळ होय वृत्ती
येती नवे नित्य विचार चित्तीं ॥ १ ॥

पोषाख वाटे बरवा असावा
जो पाहतां मोदं जनांस व्हावा ।
चौघांमधीं मान 'मला' मिळावा
ऐशा मनीं नित्य अनेक हांवा ॥ २ ॥

विद्वान मी थोर बलाढ्य मीच
चित्तांत राहे सुविचार साच ।
झालों, नसे संशय, आज मोठा
यत्नें जगीं या मज काय कामा ।
होइ माझ्या अयोग्य कामा ।
वाटे तुझ्या हें बरवें मनातें
देई पुढें त्रास अपार तूतें ॥ १ ॥

उ०जा० करी रिकामें मन चार वेडे
विचार त्याचे असतात तेढे[5] ।
त्याला सुचेना मग काम कांहीं
खाया घरीं अन्न जरी न पाहीं ॥ २ ॥

---

१ कर्ज. २ दुःख. ३ बाजारांत. ४ निरुपयोगी. ५ उलटे, वांकडे.

तेणें कधीं संकट मात्र येई
सारा कधीं जन्म धुळींत जाई ॥ ५ ॥
आहे परी हे भयदा अवस्था
देते विपत्ती करितां अनास्था ।
वागें सदा तूं ह्मणुनी जपून
चित्तांत गोष्टी पुढल्या धरून ॥ ६ ॥

## चैन.

इं०व० वाटे तुला चैन जरी करावी
चित्तीं स्वतांची स्थिति आठवावी ।
शोभेल जें जें तुझिया कुळाला
तें तें कराया वळवीं मनाला ॥ १ ॥
इच्छा तुझ्या तृप्त कधीं न होती
त्या वाढुनी दुःखं अपार देती ।
यत्नें शिकें त्यांप्रति आवरोंया
तेणें सुखें शेंकडा अखंड काया ॥ २ ॥

उ०जा० उत... खवाया
हो तर्कें ... गीं लिहिलेल्या ... ताल.
...गेश लोंढे.
गणेश विष्णु टिळक.

किंवा मनाला ऋणं[1] तापं[2] देतें ॥ ४ ॥
तूं जागशी फार जरी उगाच
होईल देहास अपार जाच ।
उद्योग तूतें न सुचे दिसाचा
तूं मित्र होसी मग आळसाचा ॥ ५ ॥
येती नव्या वस्तु सदा हॅटांत[3]
येईल 'घ्याव्या' तुझिया मनांत ।
जी जी तुला भाग पडेल घ्याया
ती मात्र घ्याया वळवीं मना या ॥ ६ ॥
उ०जा० खर्चूं नको द्रव्य उगें कधींही
प्राप्तीकडे लक्ष सदैव देई ।
प्राप्ती न वाढे परि खर्च वाढे
न ठेवितां लक्ष विपत्ति जोडे ॥ ७ ॥

## रिकामपण.

इं०व० हिंडावयाला शिकशी रिकामा
होई तुझें त्विन्न अयोग्यं[4] कामा ।
वाटे तुझ्या हें बरवें मनातें
देई पुढें त्रास अपार तूतें ॥ १ ॥
उ०जा० करी रिकामें मन चार वेडे
विचार त्याचे असतात तेढे[5] ।
त्याला सुचेना मग काम कांहीं
खाया घरीं अन्न जरी न पाहीं ॥ २ ॥

---

१ कर्ज. २ दुःख. ३ बाजारांत. ४ निरुपयोगी. ५ उलटे, वांकडे.

वाटे तया द्रव्य फुका[1] मिळावें
न पेरितां धान्य कुठून घ्यावें ! ।
श्रमाविणें लाभ घडे न कोणा
दिसे प्रभूचाहि असाच बाणा[2] ॥ ३ ॥

इं० व० कामाविणें दाम[3] मिळे न तूतें
दामाविणें काम कुठून होतें ! ।
कामावरी लक्ष सदैव ठेवीं
वा आळसालागिं कधीं न सेवीं[4] ॥ ४ ॥

उ० जा० तूं सांठवीसी जरि दाम दाम
भरून जाईल धनें सुधाम[5] ।
सांचे तळें थेंब जमून थोर
ठेवीं मनीं हाच विचार सार[6] ॥ ५ ॥
क्रमें क्रमें सौख्य मिळेल तूतें
घाईमुळें संकट मात्र येतें ।
चित्तीं करीं [illegible] काया ॥ २
तो [illegible] देईल [illegible]

## संगति.

[illegible]० बोलेल जो गोड [illegible]मेल गोड
त्याची परी संगति शीघ्र सोड ।
जें झांकलें भोंक असे तृणें तें
मोडावया कारण पाय होतें ! ॥ १ ॥

उ० जा० जमावया स्नेह न वेळ कांहीं

1 उगीच, फुकट. 2 बेत, ठराव. 3 पैसा. 4 स्वीकारूं नक[illegible] 5 घर. 6 श्रेष्ठ. 7 चांगला. 8 गवतानें.

मोडावया ही न उशीर पाहीं ।
स्नेही असा तो व्यसनांत लोटी
कैसा तया मानिसि मित्र पोटीं ! ॥ २ ॥
इं० व० द्रव्यार्थ कोणी तुजला भजाया
येतील ते दाखवितील माया ।
जातां परि द्रव्य समग्र जाती
ते संकटालागिं धनी न होती ॥ ३ ॥
कोणी करी आग्रह भांग प्याया
लागे करीं एक विडीच द्याया ।
हातावरीं एक तमाखु ठेवी
नाकास कोणी तपकील लावी ॥ ४ ॥
स्नेही नको तूं समजूं अशांला
आमीष घाली गळ कीं झषांला ।
आयुष्य जाईल सुखांत जेणें
त्या त्यां उपायावर लक्ष देणें ॥ ५ ॥
उ० जा० अडे न ज्या वांचुन केंधवां ही
त्याचें न तूं लावुन वेड घेई ।
मोहीं तयाच्या पडुनी उगाच
खर्चूं नको द्रव्य हि वेळ साच ॥ ६ ॥
इं० व० सांगे तुला जो बरवा उपाय
तो मित्र त्याचे धर घट्ट पाय ।
स्नेही करीं माणुस पारखून

१ संकटांत. २ पैशाकरितां ३ सेवा करण्यास. ४ सगळे. ५ गळाला लावलेला मासाचा कण. ६ गळ टोंचतो. ७ माशांला. ८ केव्हां.

तेणें तुला न्यून[1] जगीं न जाण ॥ ७ ॥

## पुस्तकें.

वंशस्थ. दिसे तुला सुंदरवस्तु या क्षणीं
न चांग वाटे बहुधा परीक्षणीं[2] ।
दिसे तुला जें पिवळें हि गोजिरें[3]
नसे परी कांचन[4] सर्व तें खरें ॥ १ ॥
असार[5] गोष्टी भरल्या जयामधीं
करांत घेतां बहु लुब्ध[6] होय धी[7] ।
नफा नसे पुस्तक वाचितां असें
करांत घेऊन तया न तूं फसें ॥ २ ॥
न सुंदरालाभ[8] घडेल चिंतनें[9]
मनोरथें[10] पातक लागतें दुणें[11] ।
अयत्न[12] तो आचरितां[13] अकीर्तिला[14]
करील कीं पात्र[15] धरीं मनीं मुला ॥ ३ ॥
न लाधतें[16] द्रव्य कधीं श्रमाविणें
शिकून जादू कारितां नये दुणें ।
कुणास हांडे मिळती न अंजनें[17]
न गुंतवा यामधिं आपुलीं मनें ॥ ४ ॥
असार गोष्टी घडती न ज्या परी
वृथा[18] श्रमावें परिसूनि कां तरी ? ।

---

१ कमी. २ अनुभव घेतल्यावर. ३ सुरेख. ४ सोनें. ५ वाईट. ६ गुंतते. ७ बुद्धि. ८ सुंदर वस्तूचा लाभ. ९ मनांत आणून. १० हेतु धरून. ११ दुप्पट. १२ वाईट यत्न. १३ केला तर. १४ अप्रतिष्ठेला. १५ योग्य. १६ मिळत नाहीं. १७ डोळ्यांत औषध घातल्यानें. १८ फुकट.

सुजन्म हा या व्यसनीं न घालवीं
भलेपणें धन्यपणास मेळवीं ॥ ५ ॥
न काव्य जें पुष्ट[1] करी कुवासना[2]
कुमार्ग दावी उघडूनियां मना ।
दिसे जरी तें बरवें हि मोहितें[3]
असे तरी घातक[4] टाक टाक तें ॥ ६ ॥
करांत घेतां मति चंचळा करी
रमे जरी चित्त कुबुद्धिला वरी ।
असा करीं ग्रंथ धरीं न वा कधीं
अकार्य[5] हें बुद्धि न[6] वेंच[6] यामधीं ॥ ७ ॥
सुबुद्धि सांगे विपदेंत[7] धैर्य दे
सुबोध सांगून सदा हिता वदे[8] ।
अखंड सन्मार्ग मनास दाखवी
असा करीं ग्रंथ सदैव वागवीं ॥ ८ ॥

## वेश्या.

उ० जा० तुझ्यावरी घालिल मोहपाशें[9]
करील अंतीं तुजला निराश ।
भुलूं नको यास्तव कामिनीला[10]
कोण्याहि तूं पाहुन सुंदरीला ॥ १ ॥
इं० व० वेश्या वरी ह्या दिसतात गोजिऱ्या[11]
स्वर्गांतल्या केवळ काय अप्सरा ।

---

१ वाढवतें. २ वाईट इच्छा. ३ वेडें करतें. ४ नाश करणारें. ५ वाईट काम. ६ खर्चूं नको. ७ दुःखाच्या वेळीं. ८ फायद्याची गोष्ट सांगतो. ९ मोहाचें जाळें. १० स्त्रीला. ११ सुंदर.

ह्या वा तरी दुर्गतिच्या महादऱ्या
नाडावया नित्य जनांस घातऱ्या ॥ २ ॥

उ० जा० ह्या मारिती नेत्रकटाक्ष फार
पाहूनियां चित्त हि होय गार ।
परी विषयुक्त कटाक्ष त्यांचे
घेती जिवांला विषयीजनांचे ॥ ३ ॥

अनेक रोगें भरल्या असूनी
ह्या दाविती सुंदरता वरूनी ।
भस्मीं निखारा वरती दिसेना
भाजावया पाय कमी करीना ! ॥ ४ ॥

इं० व० द्रव्यार्थ ह्या दाखवितील माया
अर्पावयाला निघतील काया ।
जातां परी तें बघतील खाया
सिंधूंतल्या वा मगरी तशा या ॥ ५ ॥

श[illegible] नी. संगें यांच्या भोगिती दुःख कोणी
[illegible] होती होउनी वित्तहानी ।
शि[illegible] कोणा लाजवी मानहानी
कुणास ह[illegible]र व्हावें भल्यांनीं ॥ ६ ॥

न [illegible]ल्वा या[illegible] **नाटकें.**

व० ति० हीं न[illegible]री [illegible]उनी करितात बोध
दुर्वासनां खुंटविती करुनी निरोध ।

---

१ वाईट परिणामाच्या. २ मोठाल्या दऱ्या. ३ डोळे घालतात. ४ त्यांना लुब्ध होणाऱ्या. दाखवितात. ६ समुद्रांतल्या. ७ सुसरी. ८ द्रव्याचा नाश. ९ अपमान. १० वाईट इच्छा. ११ नाहींशी करितात. १२ अडथळा.

विद्वज्जनांस मत मान्य असे जरी हें
होतात काय परिणाम जगांत पाहें ॥ १ ॥
कोणास नाद बहु नाटक पाहण्याचा
तो नाश त्यांतचि करीं अपुल्या धनाचा ।
कोणी फिदा बहुत होय नटावरीच
सत्कारितो बहु तया न[1] गणून नीच[2] ॥ २
तेनाटकांतिल विलास[3] बघून फार
कोणास चंचलपणा दुखवी अपार ।
तें पाहुनी क्षणिक[4] वैभव[5] त्या नटाचें
इच्छी कुणी सतत संगतिसौख्य[6] त्याचें ॥ ३ ॥
बाळें बघून अतिसुंदर आणि गोरीं
त्यांना कथून निज[7] नाटककार[8] थोरी ।
देऊं करून धन वस्त्र तयांस घोरीं[9]
ते पाडितात, फसतात मुलें बिचारीं ॥ ४ ॥
विद्या न ये वय वृथा[10] मग जाय त्यांचें
मोठेपणीं उचित[11] काम हि पाणक्यांचें ।
तैसीं अनेक जडती व्यसनें तयांतें
ऐसीं कितीक मुकतात मुलें सुखातें ॥ ५ ॥
होई तयांस अनुताप[12] वृथा परी तो
गेला निघून मग काळ कुठून येतो ।
[13]लोभं[13] नये कधिंहि अल्प सुखांत लक्ष

१ न मानून. २ हलका. ३ क्रीडा, हाव भाव. ४ क्षणभर असणारें. ५ ऐश्वर्य. ६ सोबतीचें सुख. ७ आपला मोठेपणा. ८ नाटक करणारे. ९ संकटांत. १० फुकट. ११ योग्य. १२ पश्चात्ताप. १३ गुंतूं नये.

ठेवून दूर निजदृष्टिस होईं दक्ष[1] ॥ ६ ॥
पाहीं क्वचित् जरि तुझें मन तें न राही
तूं नाटकास, परि लुब्ध न त्यांत होई ।
गोडी असे समज तूं मनि थोडक्यांत
बाळा मिळेल न खरें सुख नाटकांत ॥ ७ ॥

## तमाशा.

स्वा० पाहुनी मन रमेल तमाशा
तो करील परि वा धननाशा[2] ।
चित्त चंचळ करील पळांत
सद्विचार[3] न उरेल मनांत ॥ १ ॥
जो असून नर हो युवतीचें[4]
सोंग घे, बघुनि त्या, तरुणांचें ।
चित्त होय बहु तन्मय[5] पाहा
हें नसे नवल काय अहाहा ॥ २ ॥
पाहुनी विपुल[6] भाव[7] तयाचे
मोद घे बहुत चित्त युवांचें[8] ।
काढिती बहु खिशांतुन पैसे
अर्पिती नवल मूर्त पिसेसे[10] ॥ ३ ॥
बोलतां नट हि 'दौलतजादा'
मानितें तरुणचित्त[11] विनोदा[12] ।
काढुनी मग भराभर पैसे

---

१ हुशार. २ द्रव्याचा नाश. ३ चांगला विचार. ४ तरुण स्त्रीचें. ५ लुब्ध. ६ पुष्कळ. ७ हाव भाव. ८ तरुण मनुष्यांचें. ९ केवळ. १० वेड्यासारखे. ११ तरुण मनुष्यांचें मन. १२ गमतीला.

व्यर्थ ते उडविती बहुल ! ।
भांडती कधिं उगे अपुल्य।
वेंचिती[1] धन निरर्थक[2] त्यांत । ४ ॥
भाषणें बहु अमंगल[3] ऐशीं
ऐकतां नटमुखें[4] सुख त्यांसीं ॥ ५ ॥
स्वस्थिती[5] विसरती कलहानें
पेटती मग वृथा अभिमानें[6] ।
राहिना जवळ एक हि पैसा
भोंवतो नट तयांप्रति ऐसा ! ॥ ६ ॥
लावण्या बहु अमंगळ गाणीं
मूर्त निंद्यगतिची[7] नट खाणी[8] ।
तो पडूं न कधिं द्या डफ कानीं
गोष्ट संतत धरा निज[9] ध्यानीं ॥ ७ ॥

## सुधारणा.

इं० व०. वाटे तुला सर्व जुनें त्यजावें
प्रेमें मनीं[10] नित्य नवें धरावें ।
होऊं नको सिद्ध तसें कराया
दुःखास तूं पात्र उगाच व्हाया ॥ १ ॥
उ० जा० उन्हांत जातां तुज पाहवेना
येतां उन्हांतून मुळीं दिसेना ।
तैसें 'अवस्थांतर[11]' होय तूतें.

---

१ खर्चितात. २ उगीच. ३ घाणेरडीं. ४ स्त्रीवेष घेणाराचे तोंडून. ५ आपली अवस्था. ६ गर्वानें. ७ वाईट परिणामाची. ८ खाण, ठेव. ९ आपल्या. १० मनांत. ११ स्थितींत होणारें अंतर.

ठेवून दूर निजबरवें दिसे तें ॥ २ ॥
पाहीं कश्मिळे चांगें तुला जुन्यांत
तूं नाहीं भिळे तेंवि बरें नव्यांत ।
जें चांगलें तें निवडून घ्यावें
वाईट तें दूर सुखें त्यजावें ॥ ३ ॥
उ० जा० कोणी स्वधर्मास मुळीं न मानी
या सोंवळ्याला विटतो हि कोणी ॥
जाई कुणी दुर्व्यसनीं गढून
'सुधारणा मी करितों' ह्मणून ॥ ४ ॥
विचारशक्तीस पुढें करून
वाईट वा चांग मनां पुसून ।
करीं सुकार्यास मुला जपून ।
नाहींतरी जाशिल तूं फसून ॥ ५ ॥

## स्वतंत्रता.

उ० जा० बोले मुखानें अपशब्द एक
स्वतंत्रतेचा मिरवून झोंक ! ।
आज्ञा न ऐके इतरा जनांची
स्वतंत्रता हेच तयास साची ! ॥ १ ॥
वृद्धांस युक्ती न कधीं विचारी
स्वबुद्धिनें कार्य समग्र सारी ।
अपाय येतां पडतो विचारीं
स्वतंत्रता त्या छळिते बिचारी ! ॥ २ ॥
सोडी धवाला युवती खुशाल

१ चांगलें. २ आपल्या धर्माला. ३ ढोंल. ४ दुसऱ्या. ५ सगळें. ६ करतो. ७ विघ्न. ८ पतीला. ९ स्त्री.

स्वतंत्रतेचा मनिं थोर डौल ! ।
दुःखीं पडे शेवट हो असार
होतां तिला आठवती विचार ! ॥ ३ ॥
भाऊ पुसेना निज बांधवाला
न पुत्र तोही पुसतो पित्याला ।
बहीण भावास मुळीं न मानी
स्वतंत्रता काय अनर्थ आणी ! ॥ ४ ॥
नारी पतीच्या जवळी न राही
वेश्योगृहीं वास करी पतीही ! ।
कुटुंबसौख्या मुकतात सारे
स्वतंत्रतेचें शरिरांत वारें ! ॥ ५ ॥
स्वतंत्रता शब्द असून गोड
तो आमुचें पूर्ण करी न कोड ।
कांढूनियां यांप्रति चांग तोड
जोडा मुलांनो मनिं सौख्यजोड ॥ ६ ॥
करूनियां योग्य विचार चित्तीं
स्वतंत्रतेला जरि घ्याल हातीं ।
तुह्मांस लाभप्रद तीच होय
हा थोडका यास असे उपाय ॥ ७ ॥
उ० व० ह्मणेल कोणी वरें एक काम
तरी भिडे तूं मत तेंच ठाम
पुढें मन चारें जरि चांग वाटे
रीं तें सुख होय मोठें ॥ ८ ॥

१ चांगली
ळणारें. ४ व् २ वेश्येच्या घरीं. ३ रहातो. ४ नवरा. ५ कुटुंबसुखा-
ईट काम. ७ चांगली. ८ फायदा करणारी. ९ चांगलें. १० कायम.

## सभ्यपणा.

इं० व० मी थोर ऐसा अभिमान तूतें
तेणें तुला दुःख अपार होतें ।
मानीं मनीं सान स्वतांस आधीं
होईल तेणें तव तुष्ट बुद्धी ॥ १ ॥
पाणी स्वतां सानपणा धरून
घाली तळीं वस्तु, वरी वसून ।
ताब्यामुळें झाड पुरांत जाई
सोडी लव्हाळा न ठिकाण पाहीं ! ॥ २ ॥
येईल जो जो तुझिया गृहास
तो तो तुझ्या योग्यचि आदरास ।
दारिद्र्य, अज्ञान, न दोष जाण
या कालचक्रीं चुरडे न कोण ! ॥ ३ ॥
उ०जा० वृद्धांस दे मान वया बघून
स्त्रियांस अज्ञान मनीं स्मरून ।
बाळांस लोभें, तरुणांस मोदें,
मानीं मनीं हें तुझिया असों दे ॥ ४ ॥
एकाहुनी एक गुणी जगांत
वृथाभिमानां भुलती न संत ।
आहे तुझें हें वपु नाशवंत
जोडीं यशाला न जयास अंत ॥ ५ ॥

## बुद्धि.

वंशस्थ. तुला मुला मानवजन्म लाधलो ! ॥ २ ॥

१ लहान. २ सुखी. ३ मान देण्याला. ४ काळ हे तडाक्यांत. ५ आनंदानें. ६ रिकाम्या गर्वाला. ७ शरीर. ८ सगळे. ९ मनुष्यजन्म. १० मिळाला.

सुबुद्धि[1] ठेवा हि तसाच चांगला ।
विचारशक्ती[2] तुज साह्य देतसे
अलभ्य[3] हें अन्य जिवांप्रती असे ॥ १ ॥
करीं विचारास सदैव तूं मनीं
असे बरें काय तसें नसे जनीं ।
तुझी न लावीं मति[4] निंद्य[5] कारणीं
न घालवीं व्यर्थ अलभ्य लाभुनी ॥ २ ॥
जरी तिला मार्ग मिळेल चांगला
सदैव ती सौख्यद होय बा तुला ।
तिला मिळेना जरि चांगला पंथ[6]
तरी तुला देईल दुःख संतत ॥ ३ ॥
अयोग्य कामीं वळतां हि एकदा
तसें तिला आवडतें पुढें सदा ।
जपें तिला यास्तव लक्ष देउनी
सुजन्म हा घालविं सौख्य भोगुनी ॥ ४ ॥
ह्मणें न, जालें जरि एकवेळ तें
चुकून, चित्ता तरि काय बांधतें[7] ।
चुकून घेशी जरि कोळसा करीं
करी करा श्यामल[8] हें मनीं धरीं ॥ ५ ॥
अकार्य[9] हस्तें चुकुनी जरी घडे
तरी भिडेनें न सुटे तुला पुढें ।
पुढें मनाला बर तेंच वाटतें

---

१ चांगली बुद्धि हीच ठेव. २ विचार करण्याची शक्ति. ३ न मिळणारें. ४ बुद्धि. ५ वाईट. ६ मार्ग. ७ दुःख देतें. ८ काळा. ९ वाईट काम.

संग्रहाल

करीं न आधीं असलें अकार्य तें ॥ ६ ॥
पडे कुमार्गीं जरि एकदा पद
सदैव चित्ताप्रति होय दुःखद[1] ।
उणेपणा आणितसे सुकीर्तिला
मनास टोंची बहु तें सदा मुला ! ॥ ७ ॥

## खरी प्रतिष्ठा.

वंशस्थ. मिळे प्रतिष्ठा मनुजास सद्गुणें
तशी न लाधे कधिं त्यास भूषणें ।
जरी मिळे मान धनाढ्यें[2] मानवा
मिळे न तो त्या मुकतांच वैभवा ॥ १ ॥
गुणी मनुष्यास गुणेंच वैभव
मिळे गुणें मान सदा तसा नव ।
धनामुळें मान धनाढ्य मेळवी
धनासवें मान धुळींत घालवी ॥ २ ॥
करील तो खर्च वरा, तरी कवी
तदर्थ[3] काव्यें रचिती नवीं नवीं ।
तसा न वागे तरि त्या न वर्णिती.
गुणी मनुष्यास अखंड सेविंती ॥ ३ ॥
उ०जा० नृपाप्रती मान मिळे स्वदेशीं
मानी न कोणी तरि त्या विदेशीं[4] ।
कोठें हि जातां जन मानिताती
गुणी मनुष्यास नृपाळ गाती ॥ ४ ॥

---

१ दुःख देणारें. २ श्रीमंत. ३ त्याच्या करितां. ४ देशाच्या बाहेर गेल्यावर.

## सदाचरणाचें धैर्य.

स्वागता.

धैर्य दाखविं सदाचरणांत
सोस होय जरि बा तव अंतें[2] ।
योग्य मृत्यु हि सदाचरणांत
व्यर्थ निंद्य[3] जंगणें जगतांत ॥ १ ॥

जें खरें गमतसे स्वमनाला
काय भी[4] तरि 'खरें' ह्मणण्याला ।
बोलवे न, तरि भाषण टाळीं
व्यर्थ जीभ अनृतें न विटाळीं ॥ २ ॥

देश लोक ह्मणतात सुधारा
या गुणा न करिती परि थारा ।
वाढतां रीति सदाचरणाची
संकटें निरसतील जनांचीं ॥ ३ ॥

होय कोण सकळांस पुढारी
वाटतें भय जयाप्रति भारी ।
ज्या खरें न वदवे वदनानें
'होय होय' करणें बहु माने ॥ ४ ॥

जोंवरी वितथ[9] तें न सुटेल
जोंवरी नं[10], वर तें, करवेलं ।
जों वरी न मनिं धैर्य वसेल
कोठुनी सुख खरें गवसेल ॥ ॥

---

१ चांगलें काम करण्याचें. २ शेवट. ३ [illegible] तो येत नाहीं असें.
५ खोटें बोलण्यानें. ६ आश्रय. ७ आवड [illegible] ९ कर्ज.
असत्य. १० करवणार नाहीं.

जों न आवड सदाचरणाची
जों न होय रति[1] निस्पृहतेची[2] ।
होय केंवि सुख या जगतीला[3]
यत्न एक हि न जाय तडीला ॥ ६ ॥
बोलती जरि सभेंत मुखानें
कार्य अल्प हि घडे न करानें ।
धैर्यलेशें[4] अगदींच न ज्यांना
काय कार्य करवेल अशांना ॥ ७ ॥

## उद्योग.

इ० व० लागे तुला काम सदा करावें
तें तें करीं तूं परि एकभावें ।
त्यावीण लाभप्रद[6] तें न होय.
न स्थैर्य[7] चित्ता तरि दे अपाय[8] ॥ १ ॥
देऊन दैवावरती हवाला
राहूं नको स्वस्थ कधींहि बाळा ।
उद्योग त्याचे करें आणि पाय
ठेवीं मनीं हें न घडे अपाय ॥ २ ॥
ग० तूं मेळवीं ज्ञान नवीन नित्य
पूर्णत्वें[10] लाभप्रद होय सत्य ।
उ०जा० नृ अज्ञान दारिद्र्य घरास आणी
मान धालेंयीं[11] सिद्धि[12] भरील[13] पाणी ॥ ३ ॥
कोठें ।

---

स्पष्ट बोलण्याच्या गुणांची. ३ पृथ्वीला, हिंदुस्था-
गुणी मनु गील धैर्य. ५ मनापासून. ६ फायदा करणारें.

---

१ दुःख देणारें. २ ९ हात. १० पुरेपणा. ११ शहाण्याच्या घरीं.
हेर गेल्यावर. नाहीं.

ठेवीं मनीं नित्य नवी उमेद
न लाभ होतां हि वरीं न खेद ।
जाईल हा काळ पहा नवीन
येईल देईल सुखास जाण ॥ ४ ॥

आयुष्य कीं अल्प असे तुझें हें
भिऊं नको तूं पारि याच मोहें ! ।
यत्नें झटें संतत चांग कामीं
लावीं मनाला प्रभुच्या[1] लगामीं ॥ ५ ॥

दिसे जरीं सर्व पळांत जाई
तरी न चित्तांत उदास होईं ।
मृत्यू न सोडी जरि आळशाला
हा वेळ वांयां[2] दवडा[3] कशाला ! ॥ ६ ॥

इं० व० आयुष्य हें थोर अमोल[3] साचें
सद्वर्तनें[4] सार्थक होय याचें ।
होईं सदा तूं दिससी तसाच
राखीं जगीं कीर्ति अखंड साच ॥ ७ ॥

## शिल्लक.

स्वा० लागतें धन सदैव ह्मणून
ठेव नित्य जवळी वगळून ।
लागतां गरज तें गवसेना[5]
मागतां निजजनीं हि मिळेना ॥ १ ॥

खर्च आज ह्मणुनी ऋण[6] काढूं
मेळवून धन तें मग फेडूं

---

१ ईश्वराकडे. २ व्यर्थ. ३ किंमत करतां येत नाहीं असें. ४ चांगल्या वागणुकीनें. ५ मिळत नाहीं. ६ कर्ज.

मानसीं न धरिं हा अविचार
नागवील[1] तुजलागिं अपार ॥ २ ॥
खर्च फार करितां स्तविताती
ते तुझीच करितील फजीती ।
त्या उपाय नं दिसे मग कांहीं
आज तूं ह्मणुन सावध होईं ॥ ३ ॥
जें असेल जवळी धन कांहीं
तें तुला बहुत सौख्यद होई ।
ये जरी अतुल[2] संकट टाळी
ये जरा[3] तरि तुला परिपाळी[4] ॥ ४ ॥
मानिती तुज धनें जन सर्व
कामिनी[5] तुज तरी[6] सुखपर्व[7]
पुत्र मित्र जन आर्त[8] समस्त
मानिती ह्मणुन वाळग अर्थ[9] ॥ ५ ॥

## स्वधर्म[10].

इं० व० श्रद्धा[11] स्वधर्मावर नित्य ठेव
तो आसरा[12] होय तुला सदैव ।
कोण्या हि मार्गें प्रभुलागिं गातां
तें आवडे प्रेमभरें[13] अनंता[14] ॥ १ ॥
लाभे[15] जरी ईश्वर हा स्वधर्में


---

१ फसवील. २ फार. ३ ह्मातारपण. ४ रक्षण करील. ५ स्त्री. ६ द्रव्य असेल तर. ७ सुखाचें स्थान. ८ नातलग. ९ पैसा. १० आपला धर्म. ११ दृढ भक्ति. १२ आश्रय. १३ दृढ भक्तीनें. १४ ईश्वराला. १५ मिळतो.

ध्यावीं कशाला मग अन्यकर्में ।
गोठ्यामधीं कामदुघा असून
शोधा कशाला मग अन्यधाम ॥ २ ॥
जो आपुला कीं 'अपुला' खरा तो
वा संकटीं साह्य हि तोच देतो ।
अन्यावरी ठेवुन भार सर्व
झाला कितींचा हत मानगर्व ॥ ३ ॥
**ज्ञानेश्वर श्रीधर रामदास**
गेले स्वधर्में प्रभुच्या पदास ।
राज्यास जोडी **शिवराज** येणें
वा कोणतें कार्य न होय तेणें ॥ ४ ॥
पाखंडवादीं न शिरें कदाही
त्यापासुनी लाभ न होय कांहीं ।
ज्याणें कृपेनें रचिलें जगास
तो योग्य कैसा न नमावयांस ॥ ५ ॥
उ० जा० एके ठिकाणीं करुं साप मोर
मोडून टाकूं परिपूर्ण वैर ।
जे इच्छिती ते फसती अपार
बलिष्ठे तो मोडिल कीं करारें ! ॥ ६ ॥

---

१ दुसऱ्याच्या धर्मांत सांगितलेलीं कृत्यें. २ पुष्कळ दूध देणारी गाय, कामधेनु. ३ दुसऱ्याचें घर. ४ ओझें. ५ नाहींसा. ६ प्रतिष्ठा व अभिमान. ७ शिवाजी. ८ धर्मविरुद्ध वाद ळ्या सोडीत नाकेलें. १० नमन करण्याला. ११ सगळें. १२
१३ अटी.



फ

६ द्रव्य ३.

१० आपला

१४ ईश्वराला. १५ ।न.

## नाश.

### अंजनीगीत.

नाश कुणाचा अज्ञानानें ।
होय कुणाचा अल्प चुकीनें ।
कोणी बुडतो ज्ञानमदानें[1] । ठेवा हें चित्तीं ॥ १ ॥
जाळ्यामध्यें खगें[2] सांपडती ।
* नलिकेवैरती[3] शुकं[4] आडकती ।
मोठे हत्ती पंकीं[5] रुतैती[6] । पडताती व्यसैनीं[7] ॥ २ ॥
मांसकणाला खावें ह्मणुनी ।
मत्स्य घेतसे गळीं टोंचुनी ।
पतंग दीपीं झेंप घालुनी । [8]वेंची प्राणांला ॥ ३ ॥
कलुशालागीं मंत्री केलें ।
निजमंत्र्यांना अवमानीलें[9] ।
स्वतांस म्लेच्छांच्या करिं[10] दिधलें[11] । संभाजीरायें॥४॥
सुमेरसिंगें वचनीं गुंतुनी ।
आनंदीची आज्ञा ह्मणुनी ।
नारायणरावाला वधुनी[12] । पातक बहु केलें ॥ ५ ॥

---

१ शहाणपणाच्या गर्वानें. २ पक्षी. ३ नळीवर. ४ पोपट. ५ चिखलांत. ६ अडकतात. ७ संकटांत. ८ खर्चितो. ९ अपमान केला. १० हातांत. ११ दिलें. १२ मारून.

* दोन झाडांना किंवा खांबांना दोरी बांधतात. त्या दोरींत लहान लहान नळ्या अडकवतात. त्यांवर पोपट बसले ह्मणजे या नळ्या उलट्या होऊन डोलूं लागतात. पोपट मोकळे असतात. पण 'आपण पडूं' या भीतीनें ते नळ्या सोडीत नाहींत, यामुळें पारध्यांस सहज सांपडतात.

मी शहाणा हा गर्व धरूनी ।
*मषीर[1] नानाशीं[2] झगडूनी[3] ।
हातीं त्याच्या लागे कंदनीं[4] । सोसी अपमाना ॥६॥
अज्ञानाचा नाश करावा ।
अल्प[5] दोष कळतां निरसावा[6] ।
ज्ञानाचा मद[7] टाकुन द्यावा । ठेवा हें चित्तीं ॥७॥

**सुखाचें साधन. पद.** (झाली ज्याची उपवर.)

संतोषामृत[8] प्राशनें[9] करितां,
दुःख न होई तुमच्या चित्ता ॥ ध्रु० ॥
वनगज[10] होती तृप्त[11] तृणानें[12],
तुष्ट[13] मुनी फलकंद[14] भक्षितां ॥ १ ॥ सं० ॥
श्रीमंताला जें सुख न मिळे,
उपभोगी दारिद्र्य मिरवितां[15] ॥ २ ॥ सं० ॥
लोभी इच्छी नित्य धन तया,
जाळी धनप्राप्तीची चिंता ॥ ३ ॥ सं० ॥
ज्यास मिळेना वसन धड कधीं,
होय तोष त्या भलतें मिळतां ॥ ४ ॥ सं० ॥

---

१ मषीर उल्मुलुक. २ नाना फडणविसाशीं. ३ भांडून. ४ लढाईत. ५ थोडा. ६ नाहींसा करावा. ७ गर्व. ८ संतोष हेंच अमृत. ९ प्याल्यावर. १० रानांतले हत्ती. ११ संतोषी. १२ गवत खाऊन. १३ सुखी. १४ फळें आणि कांदे. १५ भोगणारा.

* हा निजामाचा वजीर, हिशोबांत कांहीं भानगड पडली, ती नानानें स्वतां काढावी असें तो ह्मणाला, हें लढाईचें कारण. लढाईत निजामाचा पराभव झाला, व त्याणें मषीरउल्मुलुकास ओलीस दिलें. इ. स. १७९५.

नेसे वर[1] वसनाला त्यातें,
होय दुःख त्याहुन वर बघतां ॥ ९ ॥

**आशा. पद.** ( वारी संकट हरि दामाजी. )

आशा दे लघुता[2] नित्य नराला । मोठ्या असुखाला[3] ॥ध्रु०॥
आशापाशामधिं[4] जो नर गवसे[5] । [6]अपमानें न रुसे ॥
हस्ता पसराया[7] [8]भी न धरितसे । लज्जा त्यागितसे ॥
मिळतां धन मोठें कष्ट करितसे । मानाला न पुसे ॥
आशा वामनत्व[9] दे विष्णूला । कां न मग नराला ॥१॥आ०
मिळतां वाढे ती फार सदाही । तीस न मिति[10] पाहीं ॥
धांवा चित्ताच्या पुढती घेई । कुंठित[11] न[11] चि होई[11] ॥
ऐशी होय अनावर[12] मग त्रा ही । तापें[13] मना देई ॥
ठेवीं आधीं तूं परिमित[14] तिजला । सौख्यद[15] हें तुजला ॥२॥आ०
लोभे भृंग[16] प्रथम त्या मोगरिला । आनंदें रमला ॥
आशा उडवी परि तेथुनि त्याला । ने मलयगिरीला[17] ॥
सोडी त्या स्थाना बघुन जुईला । तेथें बहु रमला ॥
उडुनी तेथुनि ही कमलीं बसला । रात्रीं आडकला ॥३॥आ०

**सज्जनांचा मार्ग धरावा. पद.** संतत यत्नावीण तुला
धरिं तूं सन्मार्गास[18] मुला । होइल सुख तुजशीं ॥ ध्रु० ॥
वाटे जड जरि पहिल्यानें । परिणामावर मन देणें ॥
होइल सुलभ[19] हि संवयीनें । तेंच [20]रुचे चित्तासीं ॥१॥ध्रु०॥

---

१ चांगलें. २ लहानपणा. ३ दुःखाला. ४ आशेच्या फांसांत. ५ सांपडतो. ६ अप्रतिष्ठा झाली तरी. ७ पसरण्याला. ८ भय. ९ लहानपणा. १० सीमा, हद्द. ११ बंद होत नाहीं. १२ न आवरणारी. १३ दुःख. १४ बेताची. १५ सुख देणारें. १६ भुंगा. १७ मलय पर्वतावर. १८ चांगल्या मार्गाला. १९ सोपें. २० आवडतें.

बरवें[1] कौंडळ वर दिसतें । अंतरिं[2] फार कडू असतें ॥
दुर्वर्तनिं[3] जरि मन रमतें । सौख्य न दे मनुजांसीं[4] ॥ २ ॥
इक्षु[5] फोडितां रदनांतें[6] । दुःख जरी बा बहु होतें ॥
गोडी सुखवी जिव्हेतें । सन्मार्गीं[7] गोडी तशी ॥ ३ ॥

**वारंवार पहा. पद.**—( संत दयाळ कसे )

कार्य कसें करितों । पहावें त्यांत किती चुकतों ॥ ध्रु० ॥
निजधन लोभी अल्प न वेंची ॥
जाय मरूनी ठेवून तसेंची ॥ १ ॥ का० ॥
फलभारानें[8] आम्र[9] हि लवला ।
होय हीनफल[10] देतां सकलां ॥ २ ॥ का० ॥
अज्ञानानें पशु हि न व्हावें ।
मध्यम स्थितिनें नित्य असावें ॥ ३ ॥ का० ॥

**आधीं जपावें. पद.**—( ऐकें मम वचना )

बाळा जप आधीं जप आधीं । पावेल नाश सुबुद्धी ॥ध्रु०॥
बाळपणीं विद्येला । साधीं येई न पुढें तुजला ॥ १ ॥बा०
ज्ञानाविण चालेना । तें परि विद्येविण गंवसेना[11] ॥२॥ बा०
जग केवळ पैशाचें । तोही ज्ञानावीण न सांचे ॥ ३॥ बा०
तरुणपणीं संसारीं । दक्ष[12] राहुनी कार्यें[13] सारीं ॥ ४ ॥ बा०
होउनियां जें जातें । करितां शोक न हातीं येतें॥५॥बा०
वृद्धपणीं बा तुजला । शक्ति न राही श्रम करण्याला॥६॥बा०
पश्चात्तापीं पडसी । अन्तीं जरि तूं आज न जपसी॥७॥बा०

---

१ चांगलें. २ आंत. ३ वाईट वागणुकींत. ४ मनुष्याला. ५ ऊंस. ६ दांतांला. ७ चांगल्या वागणुकींत. ८ फळाच्या ओझ्यानें. ९ आंबा. १० फळरहीत. ११ मिळत नाहीं. १२ हुशार. १३ कर.

## सज्जन. साक्या.

सज्जन तो चित्तीं । जाणें ज्याची हे[1] वृत्ती ॥ ध्रु० ॥
गरीब अथवा श्रीमंतासीं जो समचित्तें[2] वागे ।
दोघांच्याही करां फुलांचा वास जसा सम[3] लागे ॥१॥ स०
लागेना ज्या दुर्गुण कधिंही संगति असुन खळाची[4] ।
चंदन विषयमय[5] होय न देहीं वसति असून अहीची[6]॥२॥स०
वपु[7] ज्याचें आनंदें अक्षय[8] परकार्यीत[9] झिजावें ।
ताप[10] हरायां[11] सर्व जनांचा व्यंजनें[12] जेविं फिरावें. ॥ ३॥ स०
मुद्रा[13] दिसते क्रूर जयाची तरवारीची धारा ।
हृदयीं मधुर दयारस[14] विलसे[15] कीं द्राक्षारस[16] दुसरा ॥४॥स०
देतां कोणीं दुःख जयानें द्यावें सौख्य तयाला ।
कुऱ्हाड तोडी चंदनतरुतें[17] लागे वास मुखाला ॥ ५ ॥ स०
परनिंदा[18] करण्याहुन वाटे गोड जयास न वदणें[19] ।
दृष्टि न ज्याची अन्यकलत्रीं[20] न रुचे परधन हरणें[21]॥६॥स०

## आयुष्य क्षणभंगुर. पद. (रतहरिपद कमल कंज.)

क्षणभंगुर[22] आयु[23] ह्मणून भुलूं नको मोहें ॥ ध्रु० ॥
वरकार्यीं[24] धरुन प्रीति गुतुनि त्यांत राहें ।
आनंदें वय जाउन कीर्ति मिळे पाहें ॥ १ ॥ क्षण० ॥

---

१ स्वभाव. २ सारख्या मनानें. ३ सारखा. ४ दुष्टाची. ५ विषासारखा. ६ सर्पाची. ७ शरीर. ८ नेहमीं. ९ दुसऱ्याच्या कामांत. १० दुःख. ११ नाहींसें करण्याला. १२ पंख्यानें. १३ चेहरा. १४ दया हाच रस. १५ शोभतो. १६ द्राक्षांचा रस. १७ चंदनाच्या झाडाला. १८ दुसऱ्याची निंदा. १९ न बोलणें. २० दुसऱ्याच्या स्त्रीवर. २१ घेणें. २२ क्षणांत नाश पावणारें. २३ आयुष्य. २४ चांगल्या कामांत.

काय होय माझ्यानें आणीं न मनीं हें ।
दगड होय देव जरी घाय[1] बहुत सोहे[2] ॥ २ ॥ क्षण० ॥
सुमनाचें[3] आयु किती ठाउक तुज आहे ।
वास सुटे सुजनांतें ध्याया करिं[4] बाहे[5] ॥ ३ ॥ क्षण० ॥
सुजन करीं तें शोभे कंठीं डुलताहे ।
युवतींच्या[6] शिरीं कुठें पाहें रमताहे ॥ ४ ॥ क्षण० ॥

## आपलें तें खरें ! पद. ( मधमाशीला गांधिल. )

उगवे चंद्र नभीं । कशास्तव सांगावें मजला ॥ ध्रु० ॥
बुलबुल बोले कीं मी गावें । चांदण्यामध्यें स्वेच्छ उडावें ॥
मंजुळ शब्दानें रमवावें । साऱ्या लोकांला ॥ १ ॥ कशा०
कमळ ह्मणे मी शीघ्र फुलावें। किरणांनीं मम रूप खुलावें[7]॥
किरणांला मी आश्रय व्हावें।द्यावें सुख विधुला[8]॥२॥कशा०
ह्मणे ससा दंव फार पडावें । प्रातःकाळीं सुखें उडावें ॥
मन माझें सुप्रसन्न व्हावें । यास्तव विधु आला ॥३॥कशा०
श्वानें[9] ह्मणे कीं चोर न यावे । येतां मजला सहज कळावे ॥
धन्यास जागृत[10] सहज करावें । लागुन भुंकाला ॥४॥कशा०
खोंकड[11] बोले मार्ग दिसावा । कुंकुट मजला सहज मिळावा ॥
तदनुग्रहें[12] मजवरिच असावा । वाटे चित्ताला ॥५॥ कशा०
सोनकिडा बोले रागानें । स्पर्धा[13] मजसीं करी बळानें ॥
झांकी मजला निजतेजांनें[14] । न बरें थोराला ॥६ ॥ कशा०
जो तो अपुलें खरें मानितो । अभिमानानें व्यर्थ नाडतो ॥
सारासारविचार[15] करी तो । नर मज वर गमला ॥७॥ कशा०

---

१ घाव, टोले. २ सहन करतो. ३ फुलाचें. ४. हातांत. ५ हाक मारतें. ६ तरुण स्त्रियांच्या. ७ शोभावें. ८ चंद्राला. ९ कुत्रें. १० जागें. ११ कोंबडा. १२ त्याची कृपा. १३ भांडण. १४ आपल्या प्रकाशानें. १५ चांगल्या वाईटाचा विचार.

## चांगला मुलगा.

**पद.** ( समय बहु अवघड. )

वरा सुत[1] एक हि तो गमला[2] । शोभवी जो सुकुला ॥ध्रु०॥
एक्या विधुनें शोभा येते । अप्रतिमा[3] निशिला[4] ॥ १ ॥व०॥
सिंह बलानें एक करींप्रती । जिंकितसे विपुला[5] ॥ २ ॥व०॥
दीप[6] सुशोभित मंदिरँ[7] करितो । हरुनी तमा[8] सकला॥ ३ ॥व०॥
सुकुसुम[9] एक हि वासितँ[10] करितें । सर्व वनास मुला॥४॥व०॥

**याञ्चा[11]..पद.** ( कृपावना तुज कां नये. )

लज्जा वाटो वदन[12] पसरितां ।
दीन होऊनी याञ्चा करितां ॥ ध्रु० ॥
अवयव असुनी सकल चांगले ।
निरामयपणा[13] शरिरीं वसतां ॥ १ ॥ ल० ॥
उद्योगामधिं कधिं न रंबुनी[14] ।
नित्य घरोघर भीक मागतां ॥ २ ॥ ल० ॥
जगण्याहुन या मरणें बरवें ।
मन फिरवीं या कार्यी वळतां ॥ ३ ॥ ल० ॥
आलस्याला[15] सोडुन देईं ।
ईशँ[16] दे तुज सुकार्यी रमतां ॥ ४ ॥ ल० ॥

**उपयोगानें किंमत येते, पद.** (लोक मला काय मुला.)

उपयोगें वस्तु जगीं मोलँ[17] पावती ॥ ध्रु० ॥

---

१ मुलगा. २ वाटला. ३ फार. ४ रात्रीला. ५ फार. ६ दिवा. ७ घर. ८ काळोखाला. ९ चांगलें फूल. १० सुवासानें. युक्त. ११ मागणें. १२ तोंड. १३ निरोगीपणा. १४ न गुंतून. १५ आळसाला. १६ ईश्वर. १७ किंमत येते. थोरपणा मिळतो.

भूवरि[1] जरि पुष्प पडे । पादतळीं[2] ही चुरडे ।
युवतिकरीं[3] पडतां शिरीं शोभतें अती ॥ उ० ॥ १ ॥
पुसती जन न जडाला[4] । दगड धरेवर पडला ।
मूर्तिकार[5] दे तयास वंद्य[6] आकृती ॥ उ० ॥ २ ॥
मारी सोमल हि जनां । बनवुन परि रसायणा ।
वैद्य दे अनामयत्व[7] रोगियांप्रती[8] ॥ ३ ॥ उ० ॥
स्वेच्छेनें जो वागे । धरितां भरतो रागें ।
दळवी त्यापासुन[9] परि धान्य सत्कृती[10] ॥ ४ ॥ उ० ॥
आकाशीं मात्र जाय । जीस न कीं हातपाय ।
कौशल्यें[11] तीच* किती माल वाहती ॥ ५ ॥ उ० ॥
चमके जी वीज नभीं[12] । मन वरितें[13] पाहुन भी[14] ।
कर जोडुन तीच उभी वृत्त[15] सांगती ॥ ६ ॥ उ० ॥

## जीभ आटोप. साक्या.

असत्यें[16] गोष्टी सांगुन कोणी मागे रुकार तुजसीं ।
भीड धरुन ही असत्य वदणें नावडतें देवासीं ॥ १ ॥
जिव्हा आटोपीं । तेव्हां हेच युक्ति सोपी ॥ ध्रु० ॥
मूढमती[17] जन करिती बडबड अर्थ असेना कांहीं ।
खरें बोलतां उमज न पडुनी ते रुसती लवलाहीं[18] ॥२॥ जि०
परक्याची निंदा करण्याला सांगे तुजला कोणी ।
रागांत हि अपशब्द बोलणें पाप असूं दे ध्यानीं[19] ॥३॥ जि०

---

१ पृथ्वीवर. २ पायांच्या खालीं. ३ तरुण स्त्रीच्या हातांत. ४ हालत नाहीं, बोलत नाहीं, अशाला. ५ मूर्ति करणारा. ६ पूजा करण्यास योग्य. ७ निरोगीपणा. ८ रोग्यांला. ९ वाऱ्यापासून. १० कुशल मनुष्य. ११ कुशलपणानें. १२ आकाशांत. १३ घेतें. १४ भय. १५ वर्तमान. १६ खोट्या. १७ मूर्ख लोक. १८ लागलेंच. १९ लक्ष्यांत. * वाफ.

## चांगलें काम कर. पद. ( राधाधरमधुमिलिंद. )

आचर[1] प्रेमें भल्या[2] । सततें[3] तूं वर कार्याप्रति मुला ॥ ध्रु ॥
कार्य न करितां बरें । तयाचें फळ येई कटु[4] तुला ॥ १ ॥ आ०
रति[5] न अकार्यी[6] धरीं । धरुनियां नाश करिसि आपुला ॥ २ ॥
परिणामीं[7] जो बरा । धरीं तो मार्ग नित्य चांगला ॥ ३ ॥ आ० ॥
होय दुःख पतकरीं । खऱ्याला ईश्वर दे मदतिला ॥ ४ ॥ आ० ॥

## गुण घ्या. पद. ( घनःश्याम सुंदरा. )

अवलोकुन[8] दुनियेंतिल वस्तू गुण निवडून घ्यावे ।
दोष मात्र सर्व ही त्यागुनी स्वमन तोषवावें ॥ ध्रु० ॥
सूप जसें धान्यास घेउनि टाकितसे कोंडा ॥
मूर्तिकार निवडून घेतसे योग्य असा धोंडा ॥
रत्नपारखी[9] निवडुन घेतो खरीं मात्र रत्नें ।
दोष टाकुनी सद्गुण[10] घ्यावे आपण ही यत्नें ॥
गुणदोषांचें मिश्रण जिकडे तिकडे आढळतें ॥
गुण निवडुन घेणें हें संततें सज्जनांस रुचतें । ॥ चाल. ॥
गुणसमूह[11] वस्त्राला—मान्यतेलागिं[12] चढवी[13] ।
शीतलत्व[14] गंगेला—शिवशिरीं[15] पहा वसवी ।
गुणसमूह मनुजाला—कीर्तिला पात्र[16] करवी ।
कायेवांचुन[17] वांचुन[18] लोकीं अमर[19] गुणें व्हावें ॥ १ ॥ अ० ॥

---

१ कर. २ चांगल्या. ( मुला ). ३ नेहमीं. ४ कडू. ५ प्रेम. ६ वाईट कामावर. ७ शेवटीं. ८ पाहून. ९ रत्नांची परीक्षा करणारा. १० चांगले गुण ११ गुणांचा समुदाय, दोऱ्यांचा समुदाय. १२ मोठेपणाला. १३ नेतो. १४ गारपणा. १५ शंकराच्या मस्तकावर. १६ योग्य. १७ शरीरावांचून. १८ जगून. १९ नेहमीं राहणारें.

आरंभुनि कार्यास तडीला न्यावें धैर्यानें ।
मदोन्मत्त हत्तीस धरावें जैसें सिंहानें ॥
गडबड टाकुन कार्य करावें गंभीर मनानें ।
ध्यान धरुनियां मत्स्य धरावे जैसे बगळ्यानें ॥
मिळतां खावें फार परंतु अल्प हि भक्ष्यानें ।
तुष्ट असावें सावध तैसें जैसें श्वानानें ॥चाल.॥
सोसुनियां शीतोष्णा–न थकावें कामानें ।
रासभाजवळुनी हा–गुण घेई सन्मानें ।
केधवां उठावें हें–चरणायुध मनि जाणें ।
स्त्रीजनलज्जा रक्षायाला तो कैसा धांवे ॥ २ ॥ अव० ॥

**वाईट. मुलगा. पद.** ( त्याचा संग नको. )

लावी डाग कुपुत्र कुळाला ।
नित्य देतसे बहु असुखाला ॥ ध्रु० ॥
जळता पादप अखिल वनातें ।
जाळितसे हें विदित जनातें ॥ १ ॥ लावी० ॥
तक्र नाशी सर्व पयातें ।
कज्जल श्यामल करि सुकरातें ॥ २ ॥ लावी० ॥
शेळीचे स्तन भार गळ्याला ।
शोभा देती न पय तान्हुल्याला ॥ ३ ॥ लावी० ॥

---

१ शेवटाला. २ मदानें माजलेल्या. ३ खोल. ४ मासे. ५ सुखी. ६ थंडी व ऊन ७ गाढवाच्या जवळून. ८ केव्हां. ९ कोंबडा १० बायकांची अबरू. ११ वाईट मुलगा. १२ दुःखाला. १३ जळणारा. १४ वृक्ष-झाड. १५ सगळ्या. १६ ठाऊक. १७ ताक. १८ दुधाला. १९ काजळ. २० काळें. २१ चांगल्या हाताला. २२ तिच्या लहान मुलांला.

**उत्साह. पद.** ( राधाधरमधुमिलिंद. )

उत्साहें श्रम करीं । शेवटीं फळ लाधे[1] तुज तरी ॥ ध्रु० ॥
अभ्यासीं गुंतुनी । परीक्षा यश देईना[2] जरी ॥ १ ॥ उ०॥
उद्योगीं गुंतुनी । जरी ती लक्ष्मी ने तुला वैरी ॥२॥उ०॥
मारुत[3] जरि भेडवी । तडीला नेतो नाविकें[4] तरी[5] ॥३॥उ०॥

**जिव्हा. पद.** ( वैशाखमास वासंतिक. )

हे रसने[6] तुज परमेशें[7] देणगी दिली ।
उपयोगीं योग्य अशा लावितां भली ॥ ध्रु० ॥
ज्ञात्याच्या[8] वाढविते लौकिकाप्रती ।
इष्ट[9] कार्य सिद्ध करी हितें[10] वदून ती ॥
माधुर्यें[11] मोहितसे जनमना अती ।
ईशगुणीं[12] रमतां ते फार शोभली ॥ १ ॥ हे० ॥
मूर्खाला हीच परी त्रास दे सदा ।
अपशब्दां वदुन वरी थोर आपदा[13] ।
चुगलीच्या सख्यत्वें[14] होय दुःखदा ।
चुकतां पंथ[15] तीच जनीं उभविते कली[16] ॥ २ ॥ हे०॥

**स्थानमाहात्म्य[17] पद.** ( निजरूपीं जगदाकृति भासा. )

थोरत्वा[18] अथवा लघुतेला[19] ।
स्थान देतसे कधिं वस्तूला ॥ ध्रु० ॥

---

१ मिळेल. २ मिळणार नाहीं. ३ वारा. ४ नावाडी ५ होडी. ६ जीभ. ७ ईश्वरानें. ८ शहाण्याच्या. ९ इच्छिलेलें. १० हितकारक गोष्टी. ११ गोडीनें. १२ ईश्वराच्या गुणांत. १३ दुःख. १४ सोबतीनें. १५ मार्ग. १६ भांडण. १७ ठिकाणाचें मोठेपण. १८ मोठेपणाला. १९ लहानपणाला.

काळें अंजन[1] परि नयनीं[2] तें ।
पावतसे परमा[3] शोभेला ॥ १ ॥ थो० ॥
अब्धिशुक्तिमधिं[4] जलें[5] पडतां तें ।
पावतसे मौक्तिकरूपाला[6] ॥ २ ॥ थो० ॥
उदकीं[7] नक्र[8] गजेंद्रा[9] ओढी ।
श्वान महिवरी[10] भिववी त्याला ॥ ३ ॥ थो० ॥
स्वस्थानीं[11] रवि[12] कमलां सुख दे ।
तेथुन गळतां दे असुखाला ॥ ४ ॥ थो० ॥

## विनय[13]. पद.

विद्या दे जरि मानाला ।
विनय करी द्विगुणित[14] तरि त्याला ॥ ध्रु० ॥
रत्न शोभतें निजतेजानें ।
कांचनें[15] तें ही निजवर्णानें[16] ।
वळयीं[17] शोभा दोघांला ॥ १ ॥ विनय० ॥
साखरेप्रती मुळची गोडी ।
पय करितें जिव्हेला वेडी ।
मिश्रण सुखवी लोकांला ॥ २ ॥ विनय० ॥
सुंदरता[18] कुसुमांची[19] नयनां ।
सुखवी[20] परिमळ[21] तैसा घ्राणां[22] ।
संगम[23] सुखवी चित्ताला ॥ ३ ॥ विनय० ॥

---

१ काजळ. २ डोळ्यांत. ३ फार. ४ समुद्रांतील शिंपल्यांत. ५ पाणी. ६ मोत्यांच्या रूपाला. ७ पाण्यांत. ८ सुसर. ९ मोठ्या हत्तीला. १० पृथ्वीवर. ११ आपल्या ठिकाणीं असल्यावर. १२ सूर्य. १३ नम्रता. १४ दुप्पट. १५ सोनें. १६ आपल्या रंगानें. १७ आंगठींत १८ सुरेखपण. १९ फुलाची २० सुख देते. २१ वास. २२ नाकाला. २३ मिलाफ.

पुष्पफळेंयुत[1] वृक्ष विलसती[2] ।
पक्षी फिरतां उत्तम दिसती ॥
दोघांनीं श्री[3] बागेला ॥ ४ ॥ विनय० ॥

## दिवस आणि रात्र. दिंड्या.

सूर्य आला उदयाद्रिवरी[4] पाहें ।
ऊठ लागें कामास सौख्य लेहें[5] ।
दिवस आलासे काम करायाला ।
रात्र येते विश्रांति[6] द्यावयाला ॥ १ ॥
कसे पक्षी रजनीस घरीं येती ।
पडुनि घरट्यांमधिं सुखें नीज घेती ।
दिवस येतां वर चरायास जाती ।
दिशा दाही भैक्ष्यार्थ[7] हिंडताती ॥ २ ॥
पशू रानीं धांवती बत्र सकाळीं ।
घरीं येती बुडतांच अंशुमाळी[8] ।
दिवस घालविती काम करुन सारा[9] ।
स्वस्थ रात्रीं घेतात गृहीं थारा[10] ॥ ३ ॥
पळ हि कामाविण घालवीं न वांयां[11] ।
हौस चित्तीं धर काम बहु कराया ।
काम करितां तुज लाभ होय मोठा ।
अन्न वस्त्राला नये कधीं तोटा ॥ ४ ॥
काम करवेना सर्वदा तुझ्यानें ।
करवतें तों तें करीं आदरानें[12] ।

---

१ फुलें व फळें यांणीं युक्त. २ शोभतात. ३ शोभा. ४ उदयाचळावर. सूर्य उगवतो त्या ठिकाणीं. ५ घे. ६ विसांवा. ७ खाणें मिळवण्याकरितां. ८ सूर्य. ९ सगळा. १० आश्रय. ११ व्यर्थ. १२ मनापासून.

रात्र येते विश्रांति द्यावयाला ।
ह्मणुन सत्कार्यीं[1] घालवीं दिसाला ॥ ५ ॥
इच्छिशी जें सत्कार्य करायाला ।
तरुण असतां तें जातसे तडीला[2] ।
तरुणपण हा जों दिवस उगवलासे ।
रात्र[3] कार्यी तों मनीं धरुन ऐसें ॥ ६ ॥
वृद्धपणं[4] रंजनी[5] मजसि मुला वाटे ।
इंद्रियांची तेधवां[6] शक्ति आटे[7] ।
तर्यीं विश्रांती भाग पडे घ्याया ।
ह्मणुन तरुणत्वा वेंचुं[8] नको वांया[9] ॥ ७ ॥
जसा रात्रीं अंधार पडतसे तो ।
तसा वृद्धत्वीं[10] भ्रम[11] हि तोप[12] देतो ।
स्पष्ट वस्तू कळती न लोचनांला[13] ।
चांचपडणें चालतां भाग त्याला ॥ ८ ॥
दिवस लोटी जो काम करुन पाहीं ।
स्वस्थ चित्तें रात्रीस झोंप घेई ।
दिनीं[14] दुसऱ्या तो कष्ट करायाला ।
होय ताजा मागुता[15] जाण बाळा ॥ ९ ॥
तरुणपण जो लोटील उद्यमांत[16] ।
वृद्ध होतां न पडेल अडचणींत ।
घालविल जो वार्धक्य उद्यमांत ।
रमा[17] मोदें[18] नांदेल[19] तद्गृहांत[20] ॥ १० ॥

---

१ चांगल्या कामांत. २ शेवटाला. ३ गुंतून रहा. ४ ह्मातारपण. ५ रात्र. ६ तेव्हां. ७ नाहींशी होते. ८ खर्चूं नको. ९ व्यर्थ. १० ह्मातारपणांत. ११ विसर. १२ दुःख. १३ डोळ्यांला. १४ दिवशीं. १५ मागून, फिरून. १६ उद्योगांत. १७ लक्ष्मी. १८ आनंदानें. १९ राहील. २० त्याच्या घरांत.

## अवयव. पद. ( सुविहित जहालें. )

अवयव दिधले[1] वहुत बरे ।
थोर ईश्वरें तुज सुखकरसे[2] ॥ ध्रु० ॥
रसना[3] परिमित[4] गोड वदो हे ।
न वदो शब्दहि उरगगरलसे[5] ॥ १ ॥ अ० ॥
नयन बघोत हि सुखद सृष्टिला ।
दुष्ट पदार्थी न कधिं परितसे ॥ २ ॥ अ० ॥
श्रवण[6] सुखें परिसोत[7] सत्कथा[8] ।
निंदा शब्द हि त्यजुन[9] भलतसे[10] ॥ ३ ॥ अ० ॥
विविध[11] कलांत असोत करे[12] पटु[13] ।
अपकृति[14] इतरां[15] न करुन अरिसे[16] ॥ ४ ॥ अ० ॥
मन चंचल जणुं मत्त[17] गजापरि[18] ।
करीं अकार्यी[19] रति[20] धरि न असें ॥ ५ ॥ अ० ॥

## कुळाची शोभा चांगला मुलगा.

### अंजनीगीत.

उदकें[21] शोभतें कमलपंक्तिनें[22] ।
रात्रि शोभते पूर्णशशीनें[23] ॥
शोभे सत्कुल[24] सत्पुत्रानें[25] । या लोकीं तैसें ॥ १ ॥

---

१ दिले. २ सुख देणारे असे. ३ जीभ. ४ थोडें ५ सर्पाच्या विषासारखे. ६ कान. ७ ऐकोत. ८ साधूंच्या गोष्टी. ९ टाकून. १० वेडेवांकडे. ११ अनेक. १२ हात. १३ कुशळ. १४ अपाय. १५ दुसऱ्यांना. १६ शत्रुप्रमाणें. १७ माजलेल्या. १८ हत्तीप्रमाणें. १९ वाईट कामांत. २० गोडी. २१ पाणी. २२ कमळांच्या ओळीनें. २३ पूर्ण चंद्रानें, पौर्णिमेच्या चंद्रानें. २४ चांगलें कुळ. २५ चांगल्या मुलानें.

शोभे दंती[१] दानपंक्तिनें[२] ।
अश्व[३] शोभतो निजवेगानें[४] ।
शोभे सत्कुल सत्पुत्रानें । या लोकीं तैसें ॥ २ ॥

वाणी शोभे व्याकरणानें ।
कांता[५] शोभे पतिप्रेमानें ।
शोभे सत्कुल सत्पुत्रानें । या लोकीं तैसें ॥ ३ ॥

जलाशया[६] जल[७] शोभा देतें ।
वल्ली[८] कुसुमें[९] सुंदर दिसते ।
सत्कुल सत्पुत्रानें वरितें । अप्रतिम[१०] शोभा ॥ ४ ॥

## हितवादी[११] (पद.)

कथितात[१२] मुला हें जाणते[१३] ॥ ध्रु० ॥
मनाप्रमाणें बोल बोलती । हितवादी असती न ते ॥ १ ॥ क० ॥
हितवाद्यांना मनासारखें । बोलायास न साधतें ॥ २ ॥ क० ॥
मधुर[१४] असून ही हितकर[१५] औषध मिळणें दुर्लभ[१६] वाटतें ॥ ३ ॥

## माझा जन्म. (पद.)

माझा जन्म न माझ्याच करितां ।
कर चित्तीं विचार हा पुरता ॥ ध्रु० ॥

बहु श्रमुनी तूं जोडिशी[१७] पैसा ।
परकार्यीं न वेंचिशी[१८] पैसा[१९] ॥ १ ॥ मा० ॥

---

१ हत्ती. २ मदाच्या ओळीनें. ३ घोडा. ४ आपल्या चालण्याच्या वेगानें. ५ बायको. ६ पाण्याच्या ठिकाणाला विहिरी तळीं यांना. ७ पाणी ८ वेल. ९ फुलानें. १० फार. ११ हिताच्या गोष्टी सांगणारे. १२ सांगतात. १३ शहाणे. १४ गोड १५ हितकरणारें. १६ फार कठीण. १७ मिळवितोस. १८ खर्च करितोस. १९ सहा.

पुष्पगुच्छ:—" कविता चांगल्या आहेत. मुलांनीं वाचण्यास योग्य आहेत. रा. लोंढे हे अर्वाचीन कवींपैकीं एक आहेत.

मनोरंजन निबंधचन्द्रिका.

पुष्पमाला:—" कविता साधी आणि हृदयंगम उतरली आहे. लोंढे यांनीं मुलांकरितां चांगला उपक्रम चालविला आहे. "

काव्यरत्नावली.

पुष्पावली:—" कविता सुबोध व मुलांची कल्पनाशक्ति वाढवणारी अशी झाली आहे. " पुणेवभव.

सर्व पुस्तकें खालीं लिहिलेल्या ठिकाणीं मिळतील.

**मोरो गणेश लोंढे.**—हेडमास्तर—दहिवली तालुके कर्जत जिल्हा ठाणें.

**वासुदेव मोरेश्वर पोतदार.**—कांदेवाडी मुंबई.

संग्रहालय



# पुष्पगुच्छ.

(मुलांकरितां)

हें पुस्तक,

## मोरो गणेश लोंढे,

नागोठणे, तालुके पेण, जिल्हा कुलावा येथील मराठी शाळेंतील शिक्षक यांनीं रचिलें.

आवृत्ति तिसरीः १००० प्रति.

मुंबईत,

"निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.

१९०४.

किंमत दीड आणा.

(सर्व हक्क पुस्तककर्त्यानें राखिले आहेत.)

# लोंढे यांनीं केलेलीं

## उपदेशपर पुस्तकें.

१ बोधशतक. २ संगीतसुधा. ३ उपदेशमाला. ४ ऐतिहासिक संगीत. ५ बोधामृत. ६ बोधसुधा. ७ पुष्पगुच्छ. ८ पुष्पमाला. ९ पुष्पावली. १० बोधमाला. ११ दृष्टांतमाला. १२ कुसुममाला. १३ यमुना. १४ शतकत्रय. १५ मुलांचें प्राथमिक शिक्षण. १६ नशीब आणि उद्योग. १७ गोदावरीनाटक. १८ चारुचर्या. १९ संसार. २० उद्योग कोणता करावा व कसा करावा ?

---

मे० **डायरेक्टरसाहेब बहादूर** इलाखा मुंबई—यांनीं बक्षिसांकरितां व लायब्रऱ्यांकरितां नं० १।२।३।७।१६।१८ हीं मंजूर केलीं आहेत. बक्षिसांकरितां नं० १० हें मंजूर केलें आहे. लायब्रऱ्यांकरितां नं० ६ हें मंजूर केलें आहे.

---

**दक्षिणाप्राइझकमिटीनें** नंबर १।६।७।११।१२।१३।१४। १६।१८।१९।२० यांस बक्षिसें दिलीं आहेत.

पुस्तकें, त्यांच्या किंमती व अभिप्राय.

१ **बोधशतकः**—(आवृत्ति चौथी) किंमत दीड आणा. श्लोकबद्ध. **अभिप्रायः**—"हें पुस्तक प्रत्येक लहान मुलानें वाचल्याशिवाय व आंतील बोधपर कविता पाठ केल्याशिवाय राहूं नये अशी आमची त्यांना शिफारस आहे." **केसरी.**

२ **संगीतसुधाः**—(आवृत्ति चौथी) किंमत दीड आणा. साक्या, दिंड्या, पदें, वगैरे कविता—**अभिप्रायः**— "यांतील कविता सरळ, सोपी व मनावर ठसा उमटण्याजोगी साधली आहे."

**सुबोधपत्रिका.**

# पुष्पगुच्छ

(मुलांकरितां)

हें पुस्तक,

## मोरो गणेश लोंढे,

नागोठणे, तालुके पेण, जिल्हा कुलावा येथील
मराठी शाळेंतील शिक्षक यांनीं रचिलें.

---

आवृत्ति तिसरीः १००० प्रति.

---

मुंबईत,

"निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.

---

१९०४.

---

किंमत दीड आणा.

---

(सर्व हक्क पुस्तककर्त्यानें राखिले आहेत.)

# पुष्पगुच्छ.

## (मुलांकरितां)

### आनंद.

झाडें किती हीं रुजलीं नवीन
झालें पहा हें हिरवेंच रान ।
आली नवश्री[1] सगळ्या वनाला
अपार आनंद तयास जाला ॥ १ ॥
हारांपरी निर्झरें[2] वाहताती
छत्रें वरी पादप[3] शोभताती ।
आनंदले हे नगराज[4] चित्तीं
मोदें[5] वनश्रीप्रति पाहताती ॥ २ ॥
ओढा तसा धांवतसे सुखानें
भरूनियां स्वच्छ अशा जलानें ।
आनंदुनी काय कड्यावरून
मारी उडी तो लवणांत जाण ॥ ३ ॥
आनंद झाला बहु मारुतातें[6]
तेणें धरी मंद अशा गतीतें ।
वेगें तरूंला[7] न करी अपाय[8]
रमे[9] वनश्रीस बघून काय ॥ ४ ॥

---

१ नवीन शोभा. २ झरे. ३ झाडें. ४ पर्वत. ५ आनंदानें. ६ वाऱ्याला. ७ झाडांना. ८ इजा. ९ आनंद पावला.

आनंद झाला बहु भास्कराला
सृष्टीस आलिंगन द्यावयाला ।
इच्छूनियां तो पसरी करांला[1]
तेणें नवश्री अवघ्या वनाला ॥ ५ ॥
आनंदुनी अंबर[2] सर्व गेलें
चोहींकडे निर्मळ[3] फार झालें ।
वाटे करी[4] सृष्टिनिरीक्षणातें
तटस्थ[5] होऊन मनामधीं तें ॥ ६ ॥
आनंदली फार मनांत भूमी
पाहूनियां हें वर छत्र नामी ।
आलें तिला वैभव जें अपूर्व
दावी जनां घेउन दीप[6] पूर्व[7] ॥ ७ ॥
वाढे तृणाचा कुरणांत भार
तेणें तया मोद गमे[8] अपार ।
पाचूपरी रंग तयास आला
बाहे पशूंलागिं चरावयाला ! ॥ ८ ॥
गाई ह्मशी या चरतात आंत
आनंद मोठा धरुनी मनांत ।
यथेच्छ खाती हिरव्या तृणाला[9]
पिती पहा निर्झरिंच्या जलाला[10] ॥ ९ ॥
बघून मायेप्रति वांसरें हीं

---

१ किरणांला. २ आकाश. ३ स्वच्छ. ४ सृष्टीकडे वारीक दृष्टीनें पहात आहे. ५ आश्चर्ययुक्त. ६ दिवा. ७ पूर्वदिशा. ८ वाटला. ९ गवताला. १० पाण्याला.

ग्रंथ संग्रह नं.

मधून वेगें पळतात पाहीं ।
प्याया मुखानें धरिती स्तनाला
आनंद त्यांच्या मनिं फार जाला ॥ १० ॥

मेघोदकें[1] स्वच्छ अपाप[2] जाले
जणूं तयांना नवे[3] रंग आले ।
ते पंख पक्षी हलवून जाती
नभोमधीं[4] मोद धरून चित्तीं ॥ ११ ॥

तुडुंब जाल्या सरिता[5] जलानें
भरून, वाहे जल दो[6] थडींनें[7] ।
आनंदुनी अंतरिं[8] धांव[9] घेती
त्या सागरालागिं मिळून जाती ॥ १२ ॥


शेतांत धान्यें बहु वृद्धि घेती
आनंदले शेतकरी स्वचित्तीं[10] ।
आलें श्रमाचें फळ आज हातीं
ऐसें मनीं ते निज मानिताती ॥ १३ ॥

होतां[12] मही[11]च्या वरती सुवृष्टी[12]
आनंदली हे सगळीच सृष्टी ।
आलें तिला सुंदर चांग[13] रूप
पाहून कोणा न[14] वरी[14] हुरूप[15] ॥ १४ ॥

आनंद जो दे असला जगाला
आनंद देऊन [16]वरी सुखाला ।

---

१ पावसाच्या पाण्यानें. २ सहज. ३ नवे. ४ आकाशांत. ५ नद्या. ६ दोन्ही. ७ बाजूनें, कांठानें. ८ मनांत. ९ वाढ. १० आपल्या मनांत. ११ पृथ्वीच्या. १२ चांगला पाऊस पडल्यावर. १३ चांगलें. १४ येत नाहीं. १५ उमेद. १६ घेतो.



आनंदसंभ्रांत[1] निर्वास[2] ज्याला
गा अंतरीं त्या परमेश्वराला ॥ १५ ॥

---

## वेळ.

पळे पळ जेवें[3] पहा निघुन चांग गेली घडी
घडी पळतसे दुजी[4] बघुन तास मारी दडी! ।
न तास उरतां असे दिवस चालला हा पहा
निशा[5] जवळ पातली[6] सतत काळ जाई अहा ॥ १ ।
असे दिवस लोटतां[7] निघुन मास[8] ही जातसे
सरे ऋतु[9] हि मागुनी सकल वर्ष जाई असें ।
कुमारपण संपुनी तरुणता सुखा देतसे
मनुष्य जरठत्वं[10] तों वरुन चालता होतसे ॥ २ ॥
नका पळ हि घालवूं फुकट बालकांनो तुह्मी
करा सतत उद्यमा[11] तरि न होय कांहीं कमी ।
सुविद्य[12] बरवे जगीं मिरवुनी यशातें वरा
विशुद्ध[13] मनिं आपल्या सतत ईश्वरातें स्मरा ॥ ३ ॥
कुमारपण तों करा न लिहिणें तुह्मां ये पुढें
मिळेल धन मानही सुख न होय कीं बापुडें[14] ।
कराल न जरी असें तरि तुह्मां वरी आपदा[15]
पशूंसम तुह्मां भले समजतील चित्तीं[16] सदा ॥ ४ ॥
उमेद धरुनी करा सतत यत्न कामास ये
पळा न दवडा वृथा[17] गत[18] फिरून मागें नये ।

---

१ आनंदरूप वरांत. २ राहणें. ३ वेगानें. ४ दुसरी. ५ रात्र. ६ आली. ७ गेल्यावर. ८ महिना. ९ दोन महिने. १० ज्ञातारपण. ११ उद्योगाला. १२ विद्वान्. १३ पवित्र. १४ दीन, केविलवाणें. १५ गरीबी. १६ मनांत. १७ फुकट. १८ गेलेला (वेळ).

तरी सफल जन्म हा सुजन[1] बोलताती भला
पुसे न बुध[2] ज्या कधीं तरि कशास तो जन्मला ॥ ५ ॥

---

## ईश्वर.

सांगे खगाला[3] घरटें कराया
घालावया लेंकर ऊब याया ।
मऊ तृणा घालुनियां विणाया
ऐशी करी त्यावर कोण माया ॥ १ ॥

माशीस सांगे बरवें उडाया
पाहूनियां गोड फुलांत जाया ।
करून भारी मध सांठवाया
ऐशी करी तीवर कोण माया ॥ २ ॥

मुंगीस सांगे सदनें[4] कराया
दावीतसे मार्ग फटींत जाया ।
करून धान्यास गृहीं भराया
ऐशी करी तीवर कोण माया ॥ ३ ॥

दे पांखरां पंख उडावयास
सोई जशा योग्य करावयास ।
चातुर्य त्यांच्या पुरतेंच देतो
रक्षून सर्वां सुख कोण दे तो ॥ ४ ॥

तो देव जाणा मनिं बालकांनो
गावें तया नित्य तुह्मांस मानो ।
वारील[5] कीं संकट सर्वकाळ
प्रेमें तुह्मां रक्षिल तो कृपाळ ॥ ५ ॥

---

१ शहाणे. २ शहाणा. ३ पक्ष्याला. ४ घरें. ५ नाहींसें करील.

# तारा.

चमक चमक ताऱ्या धाकट्या पूर्ण थाटें
बघुन तुज मनाला माझिया सौख्य मोठें ।
गगनिं[१] हिरकणीच्या सारखा वाटतोसी
नकळुन अससी तूं कोण हें मोद देसी ॥ १ ॥
दिनमणि[२] बहु तेजें युक्त अस्तास जाये[३]
नभें[४] अतुल[५] तमानें[६] सर्वही व्याप्त होये[७] ।
उघड करिसि तेव्हां अल्प[८] कांतीस[९] साच
चमक चमक संपे रात्र तों तूं असाच ॥ २ ॥
गमन करितसे[१०] जो पांथ[११] काळोख होतां
तुजसिं बहुत मानी मार्ग तूं दाखवीतां ।
जरि न चमकसी तूं अल्प तेजें स्वकीय
न कळुन पथें[१२] त्यातें फार वा त्रास होय ॥ ३ ॥
चकचकित तुझी ही थोडकी लाल कांती
पथिकजनसमूहा[१३] दाविते[१४] वाट रातीं ।
जरि मज न कळे वा कोण आहेस तूं हें
चमक चमक ताऱ्या धाकट्या मोद लाहें[१५] ॥ ४ ॥
बघुन चमक होतें साह्य त्या नाविकाला[१६]
निज तरणिस[१७] हांकी इच्छिलेल्या दिशेला ।

---

१ आकाशांत. २ सूर्य. ३ मावळतो. ४ आकाश. ५ फार. ६ काळोखानें. ७ भरून जातें. ८ थोड्या. ९ तेजाला. १० जातो. ११ प्रवासी. १२ रस्ता. १३ प्रवाशांच्या मेळ्याला. १४ दाखविते. १५ पाव. १६ नावाड्याला. १७ नौकेला.

दिवसभर तयाला सूर्य दे साह्य, रातीं
तव चमक पथाला चांगल्या दाखवीती ॥ ५ ॥

---

## आंधळा मुलगा.

असे कसा तो रविचा प्रकाश
मला न ठाऊक तदीय लेश ।
दे कोणत्या दृष्टि[1] तरी सुखातें
कथा तुह्मी हें मज आंधळयातें ॥ १ ॥

ज्या पाहतां वस्तु नवीन पाहीं
त्या वानितां[2] फार तुह्मी सदाही ।
हातांत घेतां कळतात मातें[3]
परी न तद्रूप[4] कळे मनातें ॥ २ ॥

किती रवीचा खुलतो प्रकाश
हें बोलती लोक परी न यास ।
मुळीं कळे तो रवि कीं प्रकाश
तत्ताप[5] माझ्या कळतो तनूस[6] ॥ ३ ॥

कैसी करी रात्र कसा दिनास[7]
करीतसे हें न कळे मनास ।
समान वाटे दिनरात्र मातें
कथा कुणी अंतर आंधळयातें ! ॥ ४ ॥

जन्मांध[8] हा दुःख कितीक यातें
ईशें[9] न द्यावी स्थिति हे कुणातें ।

---

१ नजर. २ वर्णन करितां. ३ मला. ४ त्यांचें स्वरूप. ५ त्यापासून होणारा ताप. ६ शरीराला. ७ दिवसाला. ८ जन्मापासून आंधळा. ९ देवानें.

असून सारें जग यास नाहीं
जें बोलती लोक कळे मला ही ॥ ५ ॥
उपाय यालागिं नसे कुणाचा
ही ऐकतों मी तुमचीच वांचा[1] ।
दृक्सौख्य[2] मातें न मिळे जरी तें
मी दुःख देऊं तरि कां मनातें ॥ ६ ॥
देईल जी दुःख मदीय[3] चित्ता
आतांच मी ती विसरेन वार्ता[4] ।
जरी असें केवळ आंधळा मी
गणीन मी सौख्य गुतून कामीं ॥ ७ ॥
करीतसें कीं दिन आपला मी
करीं तशी रात्र मदीय नामी[5] ।
मी शक्त[6] माझा दिन वाढवाया
किंवा असें शक्त उणा[7] कराया ! ॥ ८ ॥
राबेन कामीं जरि मी सदाही
होईल माझा दिन सर्व पाहीं ।
लोटीन खेळामधिं आळसांत
जो वेळ ती मात्र मदीय रात ॥ ९ ॥
करून ऐसा सुविचार काळ
लोटीन मी शांत[8] मनें[9] कृपाळ[10] ।
देईल तेणें मजलागिं हात
उणें न कांहीं मजला जगांत ॥ १० ॥

---

१ वाणी. २ दृष्टीचें सुख. ३ माझ्या. ४ गोष्ट. ५ मानीन. ६ समर्थ. ७ कमी. ८ स्थिर. ९ मनानें. १० दयाळु ईश्वर.

## कोकिळ.

बहुत मधुर[१] ऐशा काढिशी तूं रवाला[२]
परिसुनि[३] बहु लागे नाद माझ्या मनाला ।
टकमक बघतों मी कोठ कांहीं दिसेना
मधुर कुठुन येई शब्द हेंही कळेना ॥ १ ॥
तरुवर[४] दिससी ना पर्वतीं ही न पाहीं
अवनितल[५] रिकामा कल्पना होत नाहीं ।
झुडुप हलत नाहीं थोर आश्चर्य आहे
खग[६] न मजसिं वाटे शब्द हा धांवताहे ॥ २ ॥
जवळ रव निघावा तोंच तो लांब जावा
परिसुनि मग कां हा जीव ना गोंधळावा ।
अवनितुनि[७] निघे हा कीं दरींतून येई
समजत मज नाहीं कीं नभीं[८] जन्म घेई ! ॥ ३ ॥
फिरुन फिरुन येई शब्द ऐकावयाला
बहुत रिझवितो[९] तो माझिया बा मनाला ।
जलद जलद चालें रूप पाहावयासी
त्वरित पळुन तूंही फार तों दूर जासी ॥ ४ ॥
बघुन परि तुला मी पावलों फार तोष
लवकर पळसी तूं कोकिळा हा न दोष ।
बसुन परि कुठेंही गोड वाणीस काढीं
परिसुनि रव माझें चित्त घेईल गोडी ॥ ५ ॥

---

१ गोड. २ शब्दाला. ३ ऐकून. ४ झाडावर. ५ पृथ्वीचा पृष्ठभाग. ६ पक्षी. ७ पृथ्वींतून. ८ आकाशांत. ९ आनंद देतो.

हरित[1] बहुत ऐसे शोभती पंख ज्याला
सुबक[2] अमल[3] चंचू लाजवी पोंवळयाला[4] ।
मधुर वदुन शब्दां तोषवी मानवांला
धरुन जन अशाही कोंडिती कीं शुकांला ॥ ६ ॥

ह्मणवुन तुजलागीं धाक वाटे जनांचा
पळुन करिसि वाटे आसरा[5] काननांचा[6] ।
परि न समचि[7] मानीं कोकिळा सर्व लोक
धरुन तुजसिं द्याया इच्छितों मी न शोक[8] ॥ ७ ॥

तरुवर[9] सुफलांनीं युक्त झाले कितीक
कुसुमित[10] दिसताती हे किती येथ देख ।
झुळ झुळ झुळ आहे मंद वाहात वात[11]
निज किलकिल शब्दें पांखरें बोलतात ॥ ८ ॥

सुरुचिर[12] वनशोभा[13] सोडुनी पिंजऱ्यांत ।
रुचि[14] न तव मनाला राहणें दे निवांत[15] ।
मम[16] मन न कधीं वा इच्छितें जें अनिष्ट[17]
तुज बहु गमतें तें हो स्वचित्तांत[18] तुष्ट[19] ॥ ९ ॥

परि न सकळ माझ्यासारखे लोक पाहें
ह्मणवुन पिकराया[20] दूर तूं दूर राहें ॥ ।

---

१ हिरवे. २ चांगली. ३ स्वच्छ. ४ पोपटाला. ५ आश्रय. ६ रानाचा. ७ सारखे. ८ दुःख. ९ मोठालीं झाडें. १० फुललेले. ११ वारा. १२ अत्यंत सुंदर. १३ रानांतली शोभा. १४ गोडी. १५ स्वस्थ. १६ माझें. १७ न आवडणारें. १८ आपल्या मनांत. १९ सुखी. २० हे कोकिळा.

बसुन वरि तरूच्या गोड वाणी वदें तूं
पुरविन मनिंचा मी येथ येऊन हेतू! ॥ १० ॥

---

## पश्चात्ताप.

जो घालवी बाळपणांत वेळ
करूनियां व्यर्थ उगाच खेळ।
होई तयालागिं अपार[1] तापें[2]
तारुण्य येतां मग तो अपायें! ॥ १ ॥
केली न विद्या न दिली परीक्षा
मिळे न उद्योग रुचे न भिक्षा।
स्वतंत्र उद्योग करावयाला
असे मुळीं ज्ञान न अल्पें त्याला ॥ २ ॥
ह्मणे उगे मीं बहु खेळ केले
वृथा कुमारत्व लयास नेलें।
विद्या कधीं मीं अगदीं न केली
तेणें मला दुर्गति हे मिळाली ॥ ३ ॥
निर्वाह होईल कसा मदीय
लागेल कैसी मजलागिं सोय।
दावील कोणी जरि वाट चांग
फेडीन त्याचे उपकार सांग ॥ ४ ॥
येती जरी मी शिकतोंच आतां
विद्या, परी दुर्लभ[11] हे सुवार्ता[12]।

---

१ फार. २ दुःख. ३ सहज. ४ आवडत नाहीं. ५ थोडें. ६ फुकट. ७ बाळपण. ८ फुकट घालविलें. ९ वाईट स्थिति. १० सगळे. ११ कठीण. १२ चांगली गोष्ट.

गेली घडी ते न फिरून येते
हें तत्व[1] तेव्हां कळलें न मातें ॥ ५ ॥
तारुण्य जो योग्यपथें[2] न वेंची[3]
ऐसी गती होय पुढें तयाची ।
वृद्धत्व[4] येतां बहु दीन[5] होय
शोकीं पडे काय तया उपाय ! ॥ ६ ॥
जरी बहू मीं धन[6] [7]जोडियेलें
लागून नादीं बहु खर्च केलें ।
आतां नसे कीं कवडीहि खाया
गेलों वृथा[10] मी उपजून[9] वांयां[8] ! ॥ ७ ॥
केला न कांहीं उपकार हातें
आतां मला कोण सहाय होतें ।
गेलें वृथा[10] कीं तरुणत्व माझें
पाहून हें चित्त मदीय लाजे ! ॥ ८ ॥
म्यां पाहिला धर्म अधर्म नाहीं
केलें मना जें रुचलें[11] सदाही ।
कधीं न देवाप्रति [12]चिंतियेलें
कुणा न दुःखांतुन सोडवीलें ॥ ९ ॥
न वागलों मी नियमें कदाही
तेणें न आतां मज शक्ति राही ।

१ खरी गोष्ट. २ योग्य मार्गानें. ३ खर्चित नाहीं. ४ ज्ञातारपण. ५ गरीब. ६ द्रव्य. ७ मिळविलें. ८ फुकट. ९ जन्मून. १० व्यर्थ. ११ गोड वाटलें. १२ आठविलें.

राहील तारुण्य सदा असेंच
मानून ऐसें फसलों उगाच ॥ १० ॥
वृद्धत्व[1] मार्गांत बऱ्या नें वेंची[2]
जगांत निंदा बहु होय त्याची ! ।
वाटे तयाला भय सर्वदाही
येईल मृत्यू ह्मणवून पाहीं ॥ ११ ॥
पापें तयाला दिसती समोर
तीं लाविती फार मनांत घोर[3] ! ।
सुचे न त्याला सुविचार कांहीं
वाटे तया मी नरकास जाई ! ॥ १२ ॥
वाटे तया व्यर्थ सुजन्म गेला
येईल आतां यम न्यावयाला ।
पुढें मदीया गति[4] काय होई
विवंचना[5] हे हृदयास[6] दाही[7] ! ॥ १३ ॥
बाल्यांत[8] ऐसें कर कृत्य हातें
तारुण्य येतां सुख दे मनातें ।
मोठेपणीं तूं न करींच पाप
वृद्धत्व तूतें न करील ताप ॥ १४ ॥
विद्या करीं बाळपणांत सारी
तारुण्य येतां व्यसनां निवारीं[9] ।
वृद्धत्व येतां भज ईश्वरातें
वाटे तुझी भीति तरी यमातें ॥ १५ ॥

---

१ ज्ञातारपण. २ खर्चित नाहीं. ३ दुःख. ४ परिणाम. ५ काळजी. ६ मनाला. ७ भाजते. ८ बाळपणांत. ९ दूर कर.

जो जन्मला तो मरणार जीव
त्याची न भीती हृदयांत ठेव ।
आयुष्य वेंचीं[1] अवघें सुखानें
तूं सत्कृतीच्यामधिं[2] आदरानें ॥ १६ ॥

---

## कावळ्याची कुरकूर.

वाणी रसाळ[3] न मदीय पिकासमान
तैसे शुकासम न पंख मदीय छान! ।
चंचू नसे मजसिं किंशुकपुष्पवर्ण[4]
केलें कशास मजला विधिनें[5] अपूर्ण ॥ १ ॥
काळेच पंख मम चंचुपुटें[6] हि काळीं
पाहून खिन्न[7] मनिं मी बहु अश्रु[8] ढाळीं[9] ।
कोठें दिसे न वरं[10] वर्ण दुजा[11] शरीरीं
कां ईश्वरें मजसिं जन्म दिलें भिकारी! ॥ २ ॥
जातां जनांजवळ लांब पिटाळिताती
त्यांना चुकून शिवतां वरितात खंती[12] ।
शांती[13] गृहांत शिरतां करितात कोणी
सोसे न ही मम मनाप्रति मानहानी[14]! ॥ ३ ॥
ऐकावयास झटती रव त्या पिकांचे
अत्यंत लाड करिती सदनीं[15] शुकांचे ।

---

१ घालव. २ चांगल्या कामांत. ३ गोड. ४ पळसाच्या फुलासारखी लाल. ५ ब्रह्मदेवानें. ६ चोंचीचीं टोंकें. ७ दुःखी. ८ आंसवें. ९ गाळतों. (रडतों) १० चांगला. ११ दुसरा. १२ दुःखी होतात. १३ शांत (एक विधि). १४ अपमान. १५ घरांत.

त्यां ठेविती जपुन सुंदर पिंजऱ्यांस
खायास त्यांस अगदींच नसे ददात[1] ! ॥ ४ ॥
कोणी करांवर[2] तयांप्रति नाचवीतो
कोणी तयांस शिकवून सुखास घेतो ! ।
ऐके कुणी सतत तत्कृत[3] शब्द मोदें
नाहीं असें सुख मला बहु आधि[4] हें दे ॥ ५ ॥

देता जरी विधि[5] मला वरव्या रवातें
देता सुरेख असल्या अथवा वपूतें[6] ।
हें सौख्य सर्व मिळतें मजला न काय ?
कैसी करी अवकृपा जगदीश[7] हाय ! ॥ ६ ॥

ऐकून कार्ककृत[8] ही कुरकूर ऐसी
बोले तयास शुक पंजरिं[9] वास ज्यासी ।
केला विचार न तुंवां[10] मनिं कार्कराया[11]
तूं निंदिसी विधिस दुःख करून वायां[12] ॥ ७ ॥

वाणी पिकासम तुझी जरि गोड नाहीं
माझ्यासमान नसती तुज पंख पाहीं ।
चंचू नसे जरि तुझी दिसण्यांत लाल
कैसा अपूर्ण अससी परि तूंच बोल ! ॥ ८ ॥

येई तुला बहुत उंच उडावयाला
येती पदार्थ तुज टोंचुन खावयाला ।

---

१ कमीपणा, काळजी. २ हातावर. ३ त्यांनीं केलेले. ४ दुःख. ५ ब्रह्मदेव. ६ शरीराला. ७ ईश्वर. ८ कावळ्यानें केलेली. ९ पिंजऱ्यांत. १० तूं. ११ हे कावळ्या. १२ व्यर्थ.

तूं दक्ष[1] तेविं अससी निजरक्षणाला[2]
रंगामुळें वैरिसि[3] काय उणेपणाला[4] ? ॥ ९ ॥
बोले रसाळ ह्मणुनी पिक बंदिमाजी
तो सांपडे, गति तशी बघ सत्य माझी ।
वाटे तुला बहुत सौख्य असे अह्मांला
कोंडून येथ बसणें न रुचे मनाला ! १० ॥
वाटेल तेथ करिसी[5] गमना वनांत
आह्मी इथेंच बसतों नसतां मनांत ! ।
वाटेल तें फळ मिळे तुज खावयाला
देई कुणी तरि मिळे परि तें अह्मांला ॥ ११ ॥
तूं स्वच्छ निर्झर[6]जलास पिसी खुशाल
देतां मिळे परि कधीं बहु[7]साल हाल ! ।
हा पिंजरा जरि दिसे तुजला सुखाचा
बाहेर मार्ग न दिसे मग जावयाचा ! ॥ १२ ॥
आह्मांस हे पढविती[8] जरि लोक सर्व
आह्मांवरी करिति लोभ जरी अपूर्व[9] ! ।
स्वातंत्र्यसौख्य[10] अमुचें हिसकून घेती
वाटे मनीं ह्मणुन नित्य अह्मांस खंती[11] ! ॥ १३ ॥
हे इच्छिती न तव[12] संगति[13] लोक कोणी
मोठी कृपा तुजवरी प्रभुचीच मानीं ! ।

---

१ हुशार. २ आपलें रक्षण करण्याला. ३ घेतोस. ४ कमीपणाला. ५ जातोस. ६ झऱ्यांतील पाण्याला. ७ फार. ८ शिकवितात. ९ फार, विशेष. १० स्वतंत्रपणापासून होणारें सुख. ११ दुःख. १२ तुझी. १३ सोवत.

यांचा अभ्यास फळला[1] बघुनी प्रसाद[2]
हा मी तुला करितसें परिसें[3] सुबोधें[4] ॥ १४ ॥
जी जी जयास असते स्थिति योग्य ती ती
त्यातें दिली प्रभुवरें[5] विसरें न चित्तीं ।
निंदूं नको उगिच तूं प्रभुच्या कृतीतें
हा आवडो सदुपदेश[6] तुझ्या मनातें ॥ १५ ॥

---

## खेळ.

झाला रवीचा बहु ताप दूर
वाहे पहा मंद[7] कसा समीर[8] ।
मोदें दिशा या भरल्याच जाणों
खेळावयालागिं चला मुलांनो ॥ १ ॥
पळा पळा ! कोण पुढें पळे तो
पाहूं बरें कोण थकून जातो !
थारा न द्यावा मनिं आळसाला
तो आवडावा न कधीं बुधांला[9] ॥ २ ॥
हें सृष्टिसौंदर्य[10] खुलें तुह्मांला
ठेवीतसे देव पहावयाला ।
घ्यावा सुखानें उपभोग याचा
आतां करा निश्चय खेळण्याचा ॥ ३ ॥

---

१ उपयोगीं पडला. (त्रासदायक झाला) २ कृपा. ३ ऐक. ४ चांगला उपदेश. ५ देवानें. ६ चांगला उपदेश. ७ हळू हळू. ८ वारा. ९ शहाण्याला. १० सृष्टींतील सुंदरपणा.

केला रवीनें[1] निज ताप दूर
वाहे हराया श्रम हा समीर ।
घेऊन माथां[2] फळपुष्पभार[3]
द्याया तुह्मां तोष तरू तयार ! ॥ ४ ॥

आहेत सर्वांप्रति हातपाय
करा तयांचा उपयोग, काय ।
वदूं, नको येथ तयार चेंडू
नको वघायास तुह्मांस दांडू ! ॥ ५ ॥

खेळूं नका केवळ गंजिफांचे
ते खेळ गादीवर बैसण्याचे ।
त्या सोंगट्या भांडण लाविताती
होई न तत्संगति[4] सौख्यदा[5] ती ॥ ६ ॥

उगें फिरावें न दिसे बरें तें
गप्पांमधीं लाभ नसे मनातें ।
व्यायाम खेळाविण होत नाहीं
खेळा मुलांनो ह्मणवून पाहीं ॥ ७ ॥

सदैव अभ्यास करावयाला
वसूनियां त्रास घडे मनाला ।
करून अभ्यास अशा सुवेळीं
द्या तोष[6] चित्ता रमवून खेळीं ॥ ८ ॥

पाट्या करा खेळ सुरेख मांडा
कोंडीमध्यें शीघ्र गड्यांस कोंडा ।

---

१ सूर्यानें. २ डोक्यावर. ३ फळें व फुलें यांचें ओझें. ४ त्यांची सोबत. ५ सुख देणारी. ६ आनंद.

गडी धरावा अपुला गड्यानें
जाऊं न द्यावा सहसा चुकीनें ॥ ९ ॥
खेळामधीं खेळ सुरेख पाट्या
व्यायाम द्यायास तयार मोठ्या ।
साऱ्या गड्यांना श्रम सारखाच
ह्मणून खेळामधिं खेळ हाच ! ॥ १० ॥

## सार्थ आयुष्य.

त्याहून काय सुख आणिकं[1] राजयाला[2]
जो आवरूनं[3] धरितो निज आवडीला ।
रानीं वसेहि न कधीं करि काळजीला
आनंदवृत्ति[4] धरुनी दवडी दिसांला ॥ १ ॥
ज्याच्या मनाप्रति न चाड[5] असे धनाची
जें थोडकें जवळ तेंच जपून वेंची ।
ज्याच्या मनास असती न अपार हांवा
मारावयास पडती न तयास धांवा ॥ १ ॥
पाळी सदैव दिवसा कळपांस रानीं
होतां दिनान्त[6] सकळांस घरास आणी ।
जेवी मुलांसह सुखें अपुल्या घरांत
निःकाळजी करितसे[7] शयना निवांत[8] ॥ २ ॥
जी घोंगडीवर मिळे बहु नीज याला
गाद्यांवरी नरमशा न मिळे नृपाला ! ।

---

१ आणखी. २ राजाला. ३ आटोपून. ४ आनंदी स्वभाव. ५ गरज. ६ रात्र. ७ निजतो. ८ स्वस्थ.

घेऊन नौसें[१] निघतो सफरी कराया
त्याला हि झोंप असली कुठली मिळाया ॥ ४ ॥
ज्याला कधीं न दिसला अशनांत[२] दोष
साधें असें वसन[३] दे बहु ज्यास तोष ।
आनंद ज्यास असल्यां[४] स्थितिमाजि होतो
जाणा मनीं जरि गरीब तरी सुखी तो ॥ ५ ॥

---

## ईश्वराला तोषव.

प्रकाश देई अवघ्या जगाला
आनंदवी देउन उष्णतेला ।
करूनियां सूर्य सदा दिनाला[५]
संतोषवी संतत[६] ईश्वराला! ॥ १ ॥
नभांत[७] जो मेघ जमून राहे
पृथ्वीवरी त्याप्रति पाडिताहे ।
देऊनियां तोष सदा जिवांस
संतोषवी मारुत ईश्वरास! ॥ २ ॥
सांठून राहे जल सागरांत
नेऊन तें खारट अंबरांत ।
देऊन गोडें करुनी महीला[८]
संतोषवी अंबुद[९] ईश्वराला! ॥ ३ ॥
मेघांतुनी नीरें[१०] पडे अपार
तें ठेविती सांठवुनी उदार ।

---

१ नौकेला. २ जेवणांत. ३ वस्त्र. ४ असलेल्या. ५ दिवसाला. ६ नेहमीं. ७ आकाशांत. ८ पृथ्वीला. ९ मेघ. १० पाणी.

देऊन लोकांप्रति प्यावयाला
संतोषवीती नदे[1] ईश्वराला ॥ ४ ॥
आह्मांप्रती मानवजन्म[2] आला
हा तत्कृपेनें[3] बहु लाभ झाला ।
करून कांहीं बरव्या कृतीला[4]
संतोषवावें परमेश्वराला ॥ ५ ॥

---

१ नद्या. २ मनुष्याचा जन्म. ३ त्याच्या दयेनें. ४ कामाला.

३ **उपदेशमालाः**—(आवृत्ति सातवी) श्लोकबद्ध. किंमत दीड आणा. **अभिप्रायः**—"लोंढे यांचा हा प्रयत्न त्यांच्या पूर्वींच्या प्रयत्नांप्रमाणेंच चांगला साधला आहे."

**विविधज्ञानविस्तार.**

४ **ऐतिहासिक संगीतः**—(आवृत्ति दुसरी) किंमत दीड आणा. साक्या, दिंड्या, पदें वगैरे कविता. **अभिप्रायः**—"यांतील कविता सरळ, सोपी व सहज रीतीनें केलेली आहे. इतिहासाचा नाद मुलांस लागण्यास हा चांगला मार्ग आहे."

**ज्ञानचक्षु.**

५ **बोधामृतः**—श्लोकबद्ध. किंमत दीड आणा. **अभिप्रायः**—"पद्यें सुरस, आणि बोध फार चांगला आहे. मुलांनीं अवश्य वाचावें." **बालबोध.**

६ **बोधसुधाः**—(आवृत्ति दुसरी) किंमत दीड आणा. साक्या, दिंड्या, पदें वगैरे कविता. **अभिप्रायः**—"मुलांस कवितेंत बोध केला आहे. चांगला व सोपा आहे." **पुणेंवैभव.**

७ **पुष्पगुच्छः**—(आवृत्ति तिसरी) किंमत दीड आणा. श्लोकबद्ध. **अभिप्रायः**—"कविता चांगल्या आहेत. रा. लोंढे हे अर्वाचीन कवींपैकीं एक आहेत."

**मनोरंजन व निबंधचंद्रिका.**

८ **पुष्पमालाः**—श्लोकबद्ध. किंमत दीड आणा. **अभिप्रायः**—"कविता साधी आणि हृदयंगम उतरली आहे. लोंढे यांणीं मुलांकरितां चांगला उपक्रम चालविला आहे."

**काव्यरत्नावली.**

९ **पुष्पावलीः**—श्लोकबद्ध. किंमत दीड आणा. अभिप्रायः—"सोप्या लहान कविता आहेत. एकंदरींत पुस्तक चांगल्यांपैकीं आहे." **केसरी.**

१० **बोधमालाः**—श्लोकबद्ध. किंमत दीड आणा. अभिप्रायः—"रा. लोंढे यांस कविता रचण्याची हातोटी चांगली साधली आहे. कित्येक ठिकाणीं बोध चांगला साधला आहे." **इस्राएली धर्मदीप.**

११ **दृष्टांतमालाः**—श्लोकबद्ध. किंमत दोन आणे. अभिप्रायः—"प्रस्तुत लहानशा पुस्तकांत अनेक स्फुट विषयांवर कविता असून नांवाप्रमाणें प्रत्येक विषयावर ऐतिहासिक दृष्टांत कवितेंत गोंविले आहेत. प्रयत्न फार चांगला असून पुस्तक बोधपर व संग्राह्य आहे." **सयाजीविजय.**

१२ **कुसुममालाः**—श्लोकबद्ध. किंमत दोन आणे. अभिप्रायः—"पुस्तक संग्राह्य आहे." **बालांकुर.**

१३ **यमुनाः**—श्लोकबद्ध. किंमत दीड आणा. अभिप्रायः—"१०४ श्लोक आहेत. छान आहे." **बालबोध.**

१४ **शतकत्रयः**—श्लोकबद्ध. किंमत पांच आणे. अभिप्रायः—"शतकत्रयांतील कविता गोड आहेत. शब्दरचना सुंदर आहे." **मासिक मनोरंजन.**

१५ **मुलांचें प्राथमिक शिक्षणः**—किंमत साडेपांच आणे. अभिप्रायः—"यांत लहान मुलांस प्रत्येक विषयांत प्राथमिक शिक्षण कसें द्यावें, हें सांगितलें आहे. हें पुस्तक सर्वप्रकारें संग्रहणीय आहे." **शाळापत्रक.**

१६ **नशीब आणि उद्योगः**—किंमत साडेपांच आणे.

**अभिप्रायः**—"रा. लोंढे यांची भाषा निसर्गतः सुबोध, गोड आणि साधी असून विषयवर्णन सप्रमाण व सयुक्तिक आहे. विषयविवेचन मुद्देसूद आणि मनोहर असल्यामुळें निबंध वाचनीय झाला आहे. तरुण जनांनीं अवश्य वाचावा."

**काव्यसंग्रह.**

**१७ गोदावरी नाटकः**—किंमत बारा आणे. **अभिप्रायः**—"ह्या लहानशा नाटकांत ग्रंथकारानें सासवेचें दुःशीलत्व व सुनेचें सुशीलत्व ह्यांचें चित्र फार नामी काढलें आहे. हें नाटक लोकाश्रयास पात्र अतएव सर्वांना संग्रहणीय आहे."

**जनार्दन बाळाजी मोडक,**
हेडमास्तर, हायस्कूल ठाणें.

**१८ चारुचर्याः**—किंमत दीड आणा. श्लोकबद्ध. **अभिप्रायः**—"यांत व्यवहारनीतीचीं तत्वें सोदाहरण सांगितलीं आहेत. हें छोटेखानी काव्य मुलांच्या हातांत देण्यास योग्य आहे."

**विविधज्ञानविस्तार.**

**१९ संसारः**—किंमत दीड आणा. श्लोकबद्ध. **अभिप्रायः**—"रसाळ व बोधप्रद ११० श्लोकांत 'संसार' याचें चित्र रेखिलें आहे."

**सयाजीविजय.**

**२० उद्योग कसा करावा व कोणता करावाः**—किंमत अडीच आणे. **अभिप्रायः**—"प्रस्तुत पुस्तकांत प्रतिपादिलेलीं तत्वें तरुण पिढीच्या मनांत बिंबल्यास फायदा होण्याचा संभव आहे."

**विविधज्ञानविस्तार.**

---

## न छापलेलीं पुस्तकें.

२१ ध्रुवचरित्र. २२ दुष्काळवर्णन.
२३ दामाजीचें चरित्र. २४ बाजी परभू. २५ तरवार.

# पुष्पमाला.

( मुलांकरितां )

हें पुस्तक,

## मोरो गणेश लोंढे.

**खालापूर तालुके कर्जत जिल्हा ठाणें**

येथील मराठी शाळेंतील शिक्षक

यांनीं रचिलें.

आवृत्ति पहिली १,००० प्रति.

**मुंबईत,**

" निर्णयसागर " छापखान्यांत छापिलें.

१८८९.

किंमत दीड आणा.

( सर्व हक्क पुस्तककर्त्यानें राखिले आहेत.)

# लोंढे यांनीं केलेलीं
## उपदेशपर पुस्तकें.

---

प्रत्येकाची किंमत ८=॥ ट. ह. ६ प्रतींपर्यंत ८८६.

**बोधशतकः**–(आवृत्ति तिसरी) "हें पुस्तक प्रत्येक लहान मुलानें वाचल्याशिवाय व आंतील बोधपर कविता पाठ केल्याशिवाय राहूं नये अशी आमची त्यांस शिफारस आहे."

केसरी.

**संगीतसुधाः**–(आवृत्ति दुसरी) "यांतील कविता सरळ, सोपी व मनावर ठसा उमटण्याजोगी साधली आहे."

सुबोधपत्रिका.

**उपदेशमालाः**–(आवृत्ति चौथी) "लोंढे यांचा हा प्रयत्न त्यांच्या पूर्वीच्या प्रयत्नांप्रमाणेंच चांगला साधला आहे."

विविधज्ञानविस्तार.

**ऐतिहासिक संगीतः**–"कविता सुबोध, सोपी व सहज रीतीनें केलेली आहे."

ज्ञानचक्षु.

**बोधामृतः**–"पद्यें सुरस, आणि बोध फार चांगला आहे. मुलांनीं अवश्य वाचावें."

बालबोध.

**बोधसुधाः**–"मुलांना कवितेंत उपदेश केला आहे. चांगला व सोपा आहे."

पुणेंवैभव.

# पुष्पमाला.

( मुलांकरितां. )

ग्रंथ संग्रहालय

हें पुस्तक,

**मोरो गणेश लोंढे.**

खालापूर तालुके कर्जत जिल्हा ठाणें येथील

मराठी शाळेंतील शिक्षक

यांनीं रचिलें.

---

आवृत्ति पहिली १,००० प्रति.

---

मुंबईंत,

" निर्णयसागर " छापखान्यांत छापिलें.

---

१८८९.

---

किंमत दीड आणा.

---

( सर्व हक्क पुस्तककर्त्यानें राखिले आहेत. )

# पुष्पमाला.

## श्लोक.

### तारुण्यांतील उमेद.

चल झडकर जाऊं कीर्तिशैलीं[1] चढून
सतत नियम ज्याचा काय त्याला कठीण ।
चिरसमय[2] रहावें आपलें नांव लोकीं
सकल बुधजनांतें[3] हें मनीं आवडे कीं ॥ १ ॥
जनपदहित[4] साधी मेळवी जो जयाला
स्वजनहित[5] करूनी त्या सुकार्यीं निमाला[6] ।
जनपदहितकर्ता[7] नांव हें त्यास लाधे
सकल जन तयाला नित्य गातात मोदें ॥ २ ॥
लवकर उतरूनी ज्ञानसिंधूंत[8] यत्नें
निवडुक वर काढूं सर्व चातुर्यरत्नें ।
सविभव[9] मिळवूं या ज्ञानरूपी निधानें[10]
अधिक अवनिमाजी[11] जीं हिऱ्याहून मानें ॥ ३ ॥
गमन करुं पुढें या पाय मागें न घेऊं
सुमति[12] करिं धरूनी सत्पथांतून[13] जाऊं ।

---

१ कीर्तिरूप पर्वतावर. २ फार काळपर्यंत. ३ शहाण्या लोकांना. ४ देशाचें हित. ५ आपल्या लोकांचा फायदा. ६ मेला. ७ देशाचें हित करणारा. ८ ज्ञानरूप समुद्रांत. ९ वैभवासह. १० ठेवे. ११ पृथ्वींत. १२ चांगली बुद्धि. १३ चांगल्या मार्गातून.

निजगुण निजकीर्ती वाढवूं नित्य नित्य
सुगुणचि सुख लोकीं कीर्ति सौंदर्य[1] सत्य ॥ ४ ॥
वचन वदुं मुखानें आचरूं[2] तेवि[3] हातें
करुन वर[4] कृतीला[5] मार्ग दावूं दुजांतें ।
सुमन गुतवुनी हें आपलें सत्कृतींत[6]
जनपद बनवूं हा स्वर्ग यत्नें खचीत ॥ ५ ॥

---

## मधमाशी.

जाशी तूं मेळवाया मध सतत सखे गे सकाळीं उठूनी
गेल्या नाहींत रानीं अजुन निजगृहालागिं[7] धेनू त्यजूनी ।
या पुष्पांच्यावरी तों तुज निरखुनियां मोद झाला मनासीं
उद्योगें आपल्या तूं वर[8] पथें[9] सगळ्या मानवां दाखवीसी १
गेले आहेत झोंपीं अमित[10] जन पहा आळसें या सुवेळीं
उद्योगीं राबतेसी लघुतनु असुनी नित्य तूं गे सकाळीं ।
मोठ्या यत्नें मधाचे विपिनें[11] फिरुनियां बिंदु तूं मेळवीसी
त्याचीं पोळीं करूनी बहुत जपुनियां मानवांलागिं देसी॥ २॥
आधीं कामास येसी तरि न परतसी लौकरी तूं घराला
पक्षी कोट्यांत जाती दिनमणि[12] निघुनी जाय देशांतराला[13] ।
गाई गोठ्यांत जाती तरि तव दिसतें काम तें चाललेलें
उद्योगें आपल्या तूं खचित मज गमे मानवां लाजवीलें॥ ३
नेमानें मक्षिके[14] तूं खटपट करुनी सांठवीसी मधाला

---

१ सुंदरपणा. २ करूं. ३ त्याप्रमाणें. ४ चांगल्या. ५ कामाला. ६ चांगल्या कामांत. ७ आपल्या घराला. ८ चांगला. ९ मार्ग. १० पुष्कळ. ११ रान. १२ सूर्य. १३ इतर ठिकाणीं. १४ हे माशे

खासीना एक विंदू चव हि न बघसी काय वाटे मनाला ।
नाहीं कार्पण्य[1] हें गे सुखकर तुजला सत्य वाटेल अन्तीं[2]
नेतां पोळें लुटूनी तुज दुखवुनियां पावसी खेद चित्तीं॥४॥
उद्योगें मेळवावें मधु बहु इतकें ठावकें मात्र तूतें
भोगावें त्यास कैसें विदित[3] न तुजला यामुळें दुःख होतें ।
चित्तीं कांहीं विचाराप्रति करिं सखये गेलिया प्राण काय
सांठा मोठा मधाचा जवळ असुनियां तो तुला व्यर्थ होय॥५

---

## हंगाम.

शेतें तयार सगळीं असती पिकून
गेलीं शिरीं धरुन धान्यभरा लवून ।
तीं स्वर्णवर्ण[4] दिसती निरखा[5] दुरून
कोणास तोष न गमेल तयां बघून ॥ १ ॥
गर्दी उडून मग जाय कृषीवलांची[6]
कापून तीं निजगृहाप्रति आणण्याची ।
जे चार मास खपुनी बहु कष्ट केले
त्याचें तयांस फळ आज असे मिळालें ॥ २ ॥
आला अजून उदयास न अंशुमाळी[7]
तों भोजनें उरकलीं अगदीं सकाळीं ।
सारून सर्व गृहकृत्य[8] करून घाई
कांता[9] निघून पतिला मिळण्यास जाई ॥ ३ ॥

---

१ कृपणपणा, चिकटपणा. २ शेवटीं. ३ ठाऊक. ४ सोन्याचे रंगाचीं. ५ पहा. ६ शेतकऱ्यांची. ७ सूर्य. ८ घरांतलें काम. ९ बायको.

कोणी कृषिवल करीं धरितो शिदोरी
येईल भोजन ह्मणे दुसरा दुपारीं ।
येईन मी निजगृहा तंव एक बोले
कोणी मुळीं न वदतां निजमार्ग[1] चाले ॥ ४ ॥
सोडून सर्व हि कृषीवल पंथे[2] मोठा
ते लागलेच धरिती मग आडवाटा ।
शेतीं शिरून सगळे गुततात कामीं
गप्पांत ते दवडिती न घडी रिकामी ॥ ५ ॥
औतांप्रती धरुनियां अपुल्या करांत
बाप्ये स्त्रिया जरठ[3] ही बहु राबतात[4] ।
हीं बालकें मधुनही करिती श्रमाला
कामाविणें न दुसरें सुचतें तयांला ॥ ६ ॥
भाजीतसे जरि तयांस वरून ऊन
कीं त्रास घर्म[5] बहु दे वपुला[6] निघून ।
कोणी वदे न तरि शब्द मुळीं चकार
कापीतसे परि झराझर धान्यभार[7] ॥ ७ ॥
कोणी कृषीवल[8] मधींच लकेर ओढी
वेणूरवापरिस[9] गोड सुरांस[10] काढी ।
त्याच्या करांतिल[11] तरी हि न काम राही
कामांत गर्क[12] सगळें मन होय पाहीं ॥ ८ ॥

---

१ आपला रस्ता. २ रस्ता. ३ म्हातारे. ४ काम करतात. ५ घाम. ६ शरीराला. ७ धान्याचे भारे. ८ शेतकरी. ९ मुरलीच्या आवाजापेक्षां. १० अवाजाला. ११ हातांतील. १२ गुंतलेलें.

जेवावयास बसतात कितीक तेथें
हंगाम हेंच नव[1] पर्व गमे तयांतें ।
सारून[2] भोजन पुन्हा गुततात कामीं
याया[3] दिनान्तसमयीं[4] निघतात धामीं[5] ॥ ९ ॥

घेऊन भार मग ते निघतात माथां[6]
जाती थकून बहुधा स्वगृहास[7] येतां ।
घेती कितीक बसुनी सुपथीं[8] विसांवा
येती कितीक सदनास[9] तसेच तेव्हां ॥ १० ॥

हंगाम आज बहुधा सगळ्या पिकाचा
मेळा करी ह्मणुन काम कृषीवलांचा ।
पाहून हें निजमनामधिं बोध घ्यावा
हंगाम केवळ सुकाळ चुकूं न द्यावा ॥ ११ ॥

खेळाकडे जरि असे कल या मनाचा
हंगाम तोच परि होय शिकावयाचा ।
जाणून हें फुकट बाळपणा न वेंचीं[10]
सौख्यास वीण[11] तुजला मग होय कैंची[12] ॥ १२ ॥

तारुण्य ये तुज सुचे न बरा विचार
चित्तास मोह करिती व्यसनें अपार ।
हंगाम तो परि सुवर्तन[13] तें धराया
बाळा ह्मणून न शिरें व्यसनांत वांयां[14] ॥ १३ ॥

---

१ नवें. २ आटोपून. ३ यावयाला. ४ सूर्य मावळण्याच्या वेळीं. ५ घरीं. ६ डोकीवर. ७ आपल्या घराला. ८ चांगल्या मार्गांत. ९ घरीं. १० घालवूं नको. ११ तोटा. १२ कोठून. १३ चांगली वागणूक. १४ व्यर्थ.

हंगामशीर जपतां सुख होय फार
हंगाम तो दवडितां असुखा[1] न पार[2] ।
हंगाम तूं न चुकवीं ह्मणुनी कशाचा
हा बोध बाळग मनांत तुझ्या हिता[3]चा ॥ १४ ॥

---

## आयुष्य.

तारा तुटे जो गगनीं चकाके
चोहींकडे तेज तदीयें[4] फांके ।
क्षणांत जाई परि तो लयाला[5]
आयुष्य त्याच्यासम जाण बाळा ॥ १ ॥
पाण्यावरी बुद्बुद[6] जो उठे तो
पाहूनियां मानव[7] तोष घेतो ।
क्षणांत जातो परि तो लयाला
आयुष्य त्याच्यासम जाण बाळा ॥ २ ॥
जो थेंब पानावरतीं दंवाचा
शोभेस घेई नव मौक्तिकाच्या ।
क्षणांत जाई परि तो लयाला
आयुष्य त्याच्यासम जाण बाळा ॥ ३ ॥
वेगें सुटे जो गगनीं समीर[8]
मेघांस [9]नेई विलयास पार ।
क्षणांत जाई परि तो लयाला
आयुष्य त्याच्यासम जाण बाळा ॥ ४ ॥

---

१ दुःखाला. २ मर्यादा, हद्द. ३ फायद्याचा. ४ त्याचें. ५ नाश पावतो. ६ बुडबुडा. ७ मनुष्य. ८ वारा. ९ नाहींसें करतो.

तारा तुटे बुद्बुद लीन[1] होय
सुकून जणों हिमबिंदु[2] जाय ।
जाई दिगंतास[3] निघून वारा
मनुष्य ही हें विसरे विचारा ॥ ४ ॥

---

## बगळा व बेडूक.

पडेल आतां बहु तीव्र[4] ऊन
जाईल तेणें जल हें सुकून ।
नको कराया श्रम फार मातें
अनेक मीनांस[5] धरावयातें ! ॥ १ ॥
आतां किती मी बसतों जपून
ध्यानस्थ[6], तेणें मज होय शीण[7] ।
चोंचींत एकास जपून घेतों
निघून तों अन्य तळास जातो ॥ २ ॥
केव्हां पडावा मजला उपास
केव्हां घडावी पुरती न आस[8] ।
एकें मुखांतून सुटून जावें
तेणें बहू चित्त उदास व्हावें ॥ ३ ॥
तो वेळ जाईल निघून आतां
मीनांस कोणी न मिळेल पाता ।
होईल माझी अनिवार[10] चैन
धरून खाईन यथेच्छ मीन ॥ ४ ॥

---

१ नाहींसा होतो. २ दंवाचा बिंदु. ३ लांब. ४ कडक. ५ माशांला.
६ ध्यान धरून. ७ कष्ट. ८ इच्छा. ९ रक्षण करणारा. १० फार.

ऐकून हें भाषण त्या बकाचें
बोले तया भेक[1] बका न नाचें ।
राहीं सुखानें मिळतें तयांत
होईल वा लाभ तुला न यांत ॥ ५ ॥
तूं आपल्या मात्र हिता[2] पहासी
अन्यांकडे[3] लक्ष मुळीं न देसी ।
नसे तुझा हा बरवा[4] विचार
कळून आलें तुजला न सार[5] ॥ ६ ॥
गेलें जरी वा जल[6] हें सुकून
जाती किती जीव उगे मरून ।
मीनांस[7] तूं मात्र जपून खाशी
कां चिंतिसी मृत्यु तरी दुजांसीं[8] ॥ ७ ॥
जाईल सारें जल हें सुकून
जातील मासे उघडे पडून ।
तूं एकदां मीन अपार[9] खासी
पुढें परी तूं मरसी उपासीं ॥ ८ ॥
जाशील कोठें उदरार्थ[10] नित्य
याचा करीं नीट विचार सत्य ।
तूं इच्छिसी मीन अपार[11] खाया
परी बकां[12] तूं फसशील वायां[13] ॥ ९ ॥
जातां तळाला जल हें सुकून

१ बेडूक. २ फायद्याला. ३ दुसऱ्याकडे. ४ चांगला. ५ तात्पर्य.
६ पाणी. ७ माशांला. ८ दुसऱ्यांला. ९ फार. १० पोटासाठीं
११ फार. १२ हे बगळ्या. १३ व्यर्थ.

येतील येथें जन[1] ते जमून ।
घालून जाळी बहु आंत जाण
नेतील मासे सगळे धरून ॥ १० ॥
देतील ते एक तुला न खाया
वेड्या उपाशीं मरशील वांयां ।
तोंडाकडे मात्र उगा पहाशी
कां चिंतिसी[3] संकट आपणाशीं ॥ ११ ॥
टाकून दे हा अनिर्वार लोभ
होई न यापासुन अल्प लाभ ।
देई तुला जें दररोज देव
तें घे मनीं तृप्ति[6] सदैव[7] ठेव ॥ १२ ॥

---

## कुलीनपणा.

त्याचें वर्वे मी न कसें घराणें
पुसें न मी नांव जरी न नेणें ।
परी असे मर्दपणा जयाला
ह्मणेन मी थोर कुलीन त्याला ॥ १ ॥
पंकांत[8] झालें वसतें[9] तयांत
वाढे जरी केवळ दर्दुरांत[10] ।
श्रीनें[11] असे युक्त जरी स्वतां तें
थोरत्व[12] ये केविं[13] न पंकजातें[14] ॥ २ ॥

---

१ लोक. २ खाण्याकरितां. ३ चिंतितोस. ४ फार. ५ थोडा. ६ तृप्तपणा. ७ नेहमीं. ८ चिखलांत. ९ रहातें. १० बेडकांत. ११ शोभेनें. १२ मोठेपणा. १३ कसें. १४ कमळाला.

थोडें असे द्रव्य मुळीं न साचें
नसो बिचारें मज काय त्याचें ।
सुदुःखिता[1] पाहुन दुःख ज्याला
ह्मणेन मी थोर कुलीन त्याला ॥ ३ ॥

जरी नसे सुंदर पुष्प त्याला
न माधुरी[2] अल्प हि तत्फळाला[3] ।
सुखी जरी पांथे[4] तळीं[5] बसून
तया वटा[6] थोर ह्मणे न कोण ! ॥ ४ ॥

कोठील देशांतुन येथ आला
वाढून कोठें वहु थोर झाला ।
पाहें न, वागे जरि थोर चित्तें
ह्मणेन मी थोर कुलीन त्यातें ॥ ५ ॥

असे जरी केवळ शुद्ध[7] नीरें[8]
प्राशूनियां[9] मानवं[10] होय गारें[11] ।
कोठून ही वाहुन ये जरी तें
पवित्र तें केविं[12] अशुद्ध[13] होतें ॥ ६ ॥

वाडा असो खोंपट कीं असो तें
जाली तया प्राप्त[14] सुजन्म[15] जेथें ।
त्याला जरी आवडतें इमान
ह्मणेन मी थोर तया कुलीन ॥ ७ ॥

---

१ अत्यंत दुःखिताला. २ गोडी. ३ त्याच्या फळाला. ४ प्रवाशी. ५ तळाशीं-सावलींत. ६ वडाला. ७ स्वच्छ. ८ पाणी. ९ पिऊन. १० मनुष्य. ११ शांत. १२ कसें. १३ अस्वच्छ. १४ मिळाला. १५ चांगला जन्म.

वाढे जरी केवळ कंटकांत[1]
अही[2] शरीरीं जरि राहतात ।
सुवास वेधी[3] अवघ्या[4] जगाला
कसें न थोरत्व[5] सुकेतकीला[6] ॥ ८ ॥

---

## प्रार्थना.

आयुष्यमार्गाप्रति[7] आक्रमीं[8] मी
मला कळेना परि पंथ[9] नामी ।
पाहून वाटा बहु, जीव भ्याला
देवा मला लाव बऱ्या पथाला[10] ॥ १ ॥
कोण्या पथें मी तरि सांग जाऊं
कृतार्थ[11] कैसा जगतांत होऊं ।
निर्विघ्न[12] आहे पथ सांग कोठें
वाटे मनाला भय येथ मोठें ॥ २ ॥
मी ईश्वरा फार अशक्त मूल
पाहून वाटा बहु, होय भूल ।
झाडी दिसे दाट उजेड ही न
यांतून मी पार कसा पडेन ॥ ३ ॥
येथें दिसे एक अरुंद[13] गल्ली
पाहून माझी मति[14] फार भ्याली ।

---

१ कांट्यांत. २ सर्प. ३ नाद लावतो. ४ सगळ्या. ५ थोरपणा. ६ उत्तम केवड्याला—सोनकेवड्याला. ७ आयुष्याच्या मार्गाला. ८ आक्रमितों, धरतों. ९ रस्ता. १० रस्त्याला. ११ धन्य. १२ विघ्नरहित-संकटांशिवाय. १३ रुंद नाहीं अशी. १४ बुद्धि.

काळोख आहे पुढती अपार
यांतून देवा करिं तूंच पार ॥ ४ ॥
डोंकावती शत्रु मधून कोठें
पाहून पावे भय चित्त मोठें ।
पदोपदीं[1] भिन्न[2] कितीक मार्ग
जाऊं कसा मी मज तूंच सांग ॥ ५ ॥
फळें फुलें हीं दिसती विषारी
खांचा तसे फांस हि विघ्नकारी[3] ।
मी चालतां फार थकून गेलों
देवा तुला काकुळतीस आलों ॥ ६ ॥
कांटे किती हे पडले सरांटे
पाहून मातें भय फार वाटे ।
कोठें खडे हे रुतती[4] पदाला
देवा मला लाव बऱ्या पथाला ॥ ७ ॥
दिसे पुढें मार्ग बहू भयाण
चालावया शक्ति मला न जाण ।
गेलों असें केवळ गोंधळून
मार्गास लावीं बरव्या ह्मणून ॥ ८ ॥
चातुर्यरूपी पथ दाव मातें
तीं सौख्यशांती वसतात जेथें
कामादिकांची[5] जिरवून[6] खोडी
मार्गीं बऱ्या तूं मजलागिं सोडीं ॥ ९ ॥

---

१ पावलोपावलीं. २ निरनिराळे. ३ विघ्न करणारे. ४ रुपतात.
५ कामक्रोध इ. सहा शत्रूंची. ६ मोडून.

जो चांगला पंथ गेम मनातें
तेथें हि विघ्नें दिसतात मातें ।
माझा बहु गोंधळ होय तेणें
देवा मला तूं तव साह्य[1] देणें ॥ १० ॥
मार्गांतुनी या पडतांच पार
होईल माझा बहु जीव गार ।
गाईन तूतें वदनें[2] सदाही
सोडून तो मार्ग कधीं न जाई ॥ ११ ॥

---

## किडे.

करीं तुझा लौकर दूर पाय
त्या कीटकाला[3] न करीं अपाय ।
तेणें न कांहीं अपराध केला
कां पाहसी त्या चुरडावयाला ॥ १ ॥
निर्मितसे जो प्रभुराय तूतें
जीवित्व देई प्रभु तोच त्यातें ।
असे तुझी आवड त्यास जैसी
तैसाच तो आवडतो तयासी ॥ २ ॥
केलें तयानें सगळ्या जिवांला
सृष्टी दिली त्यांस फिरावयाला ।
कोणास कोणीहि न ताप द्यावा
चित्तांत हा बोध सदा असावा ॥ ३ ॥

---

१ मदत. २ तोंडानें. ३ किड्याला. ४ उत्पन्न करतो. ५ दुःख.

तूतें विनाकारण ताप देई
त्याचा तुला राग न काय येई ।
होसी कसा तूं तरि सांग बाळा
तयार त्याला चुरडावयाला ॥ ४ ॥
त्या ईश्वराचा समजून हेतू
आयुष्य त्याचें न करीं उणें तूं ।
सर्वांस हीं दुःख समान होतें
देई न पीडा ह्मणुनी कुणातें ॥ ५ ॥

## ओढा.

मी येतसें उंच कड्यावरून
आहें स्वतां मी बहु वेगवान ।
माझ्या मना भी न मुळीं शिवेल
दरींत मारीन उडी पहाल ॥ १ ॥
कितीक टाकून हि टेंकड्यांला
जाईन मी एकसरें तळाला ।
किंवा तयांच्या मधुनी शिरेन
हळू हळू मी तळ आक्रमीन ॥ २ ॥
जाईन खेड्यांवरुनी कितीक
ओलांडुनीयां शहरें अनेक ।
जाईन मी धांवत भेटण्याला
जी पूर्ण तोयें असल्या नदीला ॥ ३ ॥

---

१ कारणाशिवाय. २ कमी. ३ सारखें. ४ दुःख. ५ भय. ६ एकदम. ७ तळाला जाईन. ८ टाकून. ९ भरलेली. १० पाण्यानें.

जाईन जेव्हां दगडाळ मार्गीं
होतील तेथें [1]ध्वनि जागजागीं ।
[2]खर्जास मागें ध्वनि एक [3]सारी
[4]दुजा ध्वनी [5]पंचम [6]अंगिकारी ॥ ४ ॥
वाटेंत गोटे मिळतील जेथें
मी बोबडे शब्द [7]वदेन तेथें
होतील माझ्यामधिं भोंवरे ते
तरंग मोठे उठतील तेथें ॥ ५ ॥
वाटेंत शेतें दिसतील कोठें
लागेल कोठें [8]वन दाट मोठें ।
गेले [9]तृणानें अगदीं भरून
प्रदेश पाहीन [10]सुखेंकरून ॥ ६ ॥
कोठें लव्हाळ्यांतुन मी शिरेन
घेईन [11]पृष्ठावरि जीव [12]दीन ।
गोष्टी कुठे मी बहु चालवीन
एका हि शब्दा [13]न कुठे वदेन[13] ॥ ७ ॥
कोठें [14]रवीचीं किरणें [15]सुतेजें
तीं शोभवीतील [16]सुरूप माझें ।
जैसें हिऱ्याचें [17]नवें तेज फांके
तैसेंच [18]तेणें जलही चकाके ॥ ८ ॥

---

१ अवाज. २ सात सुरांतील एक सूर त्याला. ३ सारतो. ४ दुसरा. ५ सात सुरांतील एक सूर. ६ स्वीकारतो. ७ बोलेन. ८ रान. ९ गवतानें. १० सुखानें. ११ पाठीवर. १२ गरीब. १३ बोलणार नाहीं. १४ सूर्याचीं. १५ चांगल्या तेजानें. १६ चांगलें रूप. १७ नव्या. १८ त्याच्या योगानें.

शिरेन झाडींतुन एकदा[1] मी
निघेन कोठें गवतांत नामी ।
जाईन मी पाणथळी मधून
सुशीघ्रे[2] कीं मंदगती[3] धरून ॥ ९ ॥
धरीन कोठें मग पंथ नीट
रुचेल[4] कोठें मज आडवाट ।
जाईन कोठें वळणांतुनी ही
कोठें न मातें[5] अटकाव होई ॥ १० ॥
असेल कोठें बहु खोल पाणी
असेल थोडें दुसऱ्या ठिकाणीं ।
कोठें न वाटे भय मानवांला
कोठें न सोसे बहु ओढ त्यांला ॥ ११ ॥
ओलांडुनी लोक कितीक जाती
एका थडीहून[6] दुजीस येती ।
थांबें न मी ते जरि थांबताती
धांवावयाची मज आवडी ती ॥ १२ ॥
मनाप्रमाणें करुनी विहार[7]
भोगूनियां वैभव फार फार ।
जाईन धांऊन मिळावयाला
संपूर्ण[8] तोयें असल्या नदीला ॥ १३ ॥

---

१ एक वेळ. २ फार लौकर. ३ मंद-सावकाश चाल. ४ गोड वाटेल. ५ मला. ६ कांठावरून. ७ क्रीडा. ८ अत्यंत भरलेली.

## आधीं.

करूं सुकार्यास[1] अशी सुबुद्धी
झाली तरी तें कर कार्य आधीं ।
क्षणें जरी बुद्धि तुझी फिरेल
तरी न सत्कार्य[2] करें घडेल ॥ १ ॥
जरी असे वाक्य खरें, हिताचें
आलें तुझ्या तें मनिं बोलण्याचें ।
आधीं वदें तूं न धरींच शंका
तें एरवीं केविं कळेल लोकां ॥ २ ॥
कोणास द्यावी जरि एक वस्तू
वाटेल आधीं तरि दे स्वतां तूं ।
तत्प्रेम[3] तूतें बदला मिळेल
आनंद चित्ता बहु तोषवील ॥ ३ ॥
जगाप्रती पूज्य असूनियां ही
येई तुला संशय त्यांत कांहीं ।
दावीं तुझा संशय सुज्ञ लोकां
आधीं करीं दूर समस्त[4] शंका[5] ॥ ४ ॥

---

## उंदीर व त्याची आई.

आई उदार बहु मालक या घराचा
झाला असा ग्रह खरोखर या मनाचा ।

---

१ चांगल्या कामाला. २ चांगलें काम. ३ त्याचा लोभ. ४ सगळ्या. ५ संशय.

बांधून दे मज सुरेख नवीन गेह[1]
पाहून तें बहु खुशाल मदीय[2] देह[3] ॥ १ ॥
तारा सुरेख बसवून दिल्या तयाला
नाहीं कुठे अटक[4] वायुस खेळण्याला ।
जागा असे सुबक[5] आंत बहू रिकामी
जायास दार उघडें टुमदार नामी ॥ २ ॥
खायास आंत न दिसे अगदींच तोटा
फोडून नारळ दिला पसरून मोठा ।
लागे तहान तरि तेथ असेल सोय
सोई करी बहुत तो विसरेल काय ॥ ३ ॥
जागा कशी बहुत छान निजावयाला
ठेवावयास नलगे मनिं काळजीला ।
तें द्वाड मांजर कधीं न शिरेल तेथें
होईल फार जननी सुख आपणांतें ॥ ४ ॥
येशील तूं चल तरी गृह[6] तें पहाया
जाऊं निघून मग तेथ सुखें रहाया ।
होईल पाहुन तुला सुख जेविं मातें[7]
वाटेल गोड वसणें[8] तुजलाहि तेथें ॥ ५ ॥
आई वदे अजुन तूं अससी लहान
वाईट तेविं बरवें तुजला कळे न ।
गेलास तूं न परि आंत बरेंच केलें
देवें दया करुनियां तुज रक्षियेलें[9] ॥ ६ ॥

१ घर. २ माझें. ३ शरीर. ४ हरकत. ५ चांगली. ६ घर
७ मला. ८ राहणें. ९ राखिलें.

ऐकें मुला गृह न तें तुजला धराया
तो सांपळा करविला भुलवास वांयां ।
जाणून सत्य न शिरें सहसा तयांत
गेल्यावरी न सुटसी बहुधा जिवंत ॥ ७ ॥
तें खोबरें पसरिलें तुज मोहवाया[1]
जाऊं नको परि भुलून तयास खाया[2] ।
तें दार आंत शिरण्यास्तव मात्र पाहीं
जातांच आंत मग बंद अपाप होई ॥ ८ ॥
केले जरी बहुत कष्ट न मोकळें तें
होई, धन्यास कळतां बडवील तूतें ।
ऐसा असे बहुत दुष्ट तदीय[3] हेतू
जाणून हें त्यज[4] मनोगत[5] आपलें तूं ॥ ९ ॥
ही मोकळीक बरवी दिधली[6] प्रभूनें
भोगूं सुखें, न दवडूं अपुल्या करानें ।
खाऊं मिळेल जरि अल्प तरी सुखानें
गाऊं मुखें सतत ईश्वर आदरानें ॥ १० ॥

---

## ईश्वरावर भरंवसा ठेव.

भुला करीं नित्य सदुद्यमाला[7]
थारा न देई मनिं आळसाला ।
जरी न कांहीं फळ आज आलें
देवावरी भाव धरून चालें ॥ १ ॥

---

१ भुलवण्याकरितां. २ खाण्याला. ३ त्याचा. ४ टाक. ५ इच्छा. ६ दिली. ७ चांगल्या उद्योगाला.

टाळावया संकट तूं झटावें
येतां परी त्यास कधीं न भ्यावें ।
देवावरी भाव धरून पाहीं
सोसावया त्यास तयार होईं ॥ २ ॥
देईल तूतें बरव्या यशाला
बा काळजी सत्य असे तयाला ।
लोटील कोणाप्रति तो न दूर
जाणून चित्तीं धर मात्र धीर ॥ ३ ॥
सोसावया भ्यांड[1] नसे तयार
ह्मणून वाटे बहु त्यास भार ।
दुःखामुळें तो दडपून जातो
स्वकीय[2] दुःखास दुणें करी तो ॥ ४ ॥
संसारजाळें बघ संकटांचें
सोपें नसे पार पडावयाचें ।
जो भीतसे यामधिं आडके तो
जो धीट तो मात्र सुटून जातो ॥ ५ ॥
येणार विघ्नें अनिवार[3] नित्य
सोसावया सिद्ध करीं स्वचित्तें ।
तरी तुला तीं करिती न बाधा
सुटावया ह्राच उपाय साधा ॥ ६ ॥
वृथा न चित्तीं करिं काळजीला
होणार होई, न चुके कुणाला ।

---

१ भित्रा. २ आपल्या. ३ फार. ४ आपलें मन. ५ दुःख. ६ ढगीच.

सन्मार्ग[1] तो मात्र सदा धरावा
देवावरी भाव पुरा असावा ॥ ७ ॥
तेणें तुला सौख्य सदा मिळेल
तो योग्य मार्गाप्रति दाखवील ।
जो चालवी संतत[2] या जगाला
आहे तरी दुर्घट[3] काय त्याला ॥ ८ ॥
पाण्यांत सौख्यें वसतात मासे
भूमींतही जीव अनेक तैसे ।
त्यांणीं हवा सर्व भरून गेली
सर्वांप्रती तोच सदैव[4] पाळी ॥ ९ ॥
मुंगीस तैसा करितो करीला[5]
माशीस तैसा जपतो हरीला[6] ।
नाशी बुधाला[7] अबुधास[8] तेवीं
तयावरी भाव सदैव ठेवीं ॥ १० ॥

---

१ चांगली रीत. २ नेहमी. ३ कठिण. ४ नेहमीं. ५ हत्तीला. ६ सिंहाला. ७ शहाण्याला. ८ मूर्खाला.

पुष्पगुच्छ:—"कविता चांगल्या आहेत. मुलांनीं वाचण्यास योग्य आहेत. रा. लोंढे हे अर्वाचीन कवींपैकीं एक आहेत."

मनोरंजन निबंधचंद्रिका.

भूगोलपत्रक (आशियाखंडाचें) किंमत पाऊण आणा. पांचव्या व सहाव्या इयत्तेकरितां. आशियाखंड थोडक्यांत तयार करितां येतें. एक रुपयास २५ प्रति, शेंकडा ३।८.

सर्व पुस्तकें खालीं लिहिलेल्या ठिकाणीं मिळतील.

मोरो गणेश लोंढे—स्कूलमास्तर.

खालापूर ता० कर्जत जि० ठाणें.

वासुदेव मोरेश्वर पोतदार—स्कूलमास्तर,

गिरगांव प्रा० मुंबई.

---

# उपदेशपर पुस्तकें.

प्रत्येकाची किंमत ४–॥ ट. ह. ६ प्रतींस ८८६.

बोधशतकः–( आवृत्ति तिसरी ) "हें पुस्तक प्रत्येक लहान मुलानें वाचल्याशिवाय व आंतील बोधपर कविता पाठ केल्या-शिवाय राहूं नये अशी आमची त्यांना शिफारस आहे."

केसरी.

संगीतसुधाः–( आवृत्ति दुसरी ) "यांतील कविता सरळ, सोपी व मनावर ठसा उमटण्याजोगी साधली आहे."

सुबोधपत्रिका.

उपदेशमालाः–( आवृत्ति चौथी ) "लोंढे यांचा हा प्रयत्न त्यांच्या पूर्वीच्या प्रयत्नांप्रमाणेंच चांगला साधला आहे."

विविधज्ञानविस्तार.

ऐतिहासिक संगीतः–"कविता सुबोध, सोपी व सहज-रीतीनें केलेली आहे." ज्ञानचक्षु.

बोधामृतः–"पद्यें सुरस, आणि बोध फार चांगला आहे. मुलांनीं अवश्य वाचावें." बालबोध.

बोधसुधाः–"मुलांना कवितेंत उपदेश केला आहे."

पुणेंवैभव.

पुष्पगुच्छः–"कविता चांगल्या आहेत. मुलांनीं वाचण्यास योग्य आहेत. रा. लोंढे हे अर्वाचीन कवींपैकीं एक आहेत."

मनोरंजननिबंधचंद्रिका.

# पुष्पावली.

( मुलांकरितां )

हें

पुस्तक,

मोरो गणेश लोंढे,

खालापूर, तालुके कर्जत, जिल्हा ठाणें येथील

मराठी शाळेंतील शिक्षक

यांणीं रचिलें.

आवृत्ति पहिली—१,००० प्रति.

मुंबईंत,

"निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.

१८९०.

किंमत दीड आणा.

( सर्व हक्क पुस्तककर्त्यांनें राखिले आहेत. )

# उपदेशपर पुस्तकें.

प्रत्येकाची किंमत ८-॥ ट. ह. ६ प्रतीस ८८६.

**बोधशतक:**-( आवृत्ति तिसरी ) "हें पुस्तक प्रत्येक लहान मुलानें वाचल्याशिवाय व आंतील बोधपर कविता पाठ केल्याशिवाय राहूं नये अशी आमची त्यांना शिफारस आहे."

**केसरी.**

**संगीतसुधा:**-( आवृत्ति दुसरी ) "यांतील कविता सरळ, सोपी व मनावर ठसा उमटण्याजोगी साधली आहे."

**सुबोधपत्रिका.**

**उपदेशमाला:**-( आवृत्ति चौथी ) "लोंढे यांचा हा प्रयत्न त्यांच्या पूर्वीच्या प्रयत्नांप्रमाणेंच चांगला साधला आहे."

**विविधज्ञानविस्तार.**

**ऐतिहासिक संगीत:**-"कविता सुबोध, सोपी व सहजरीतीनें केलेली आहे."

**ज्ञानचक्षु.**

**बोधामृत:**-"पद्यें सुरस, आणि बोध फार चांगला आहे. मुलांनीं अवश्य वाचावें."

**बालबोध.**

**बोधसुधा:**-"मुलांना कवितेंत उपदेश केला आहे."

**पुणेंवैभव.**

**पुष्पगुच्छ:**-"कविता चांगल्या आहेत. मुलांनीं वाचण्यास योग्य आहेत. रा. लोंढे हे अर्वाचीन कवींपैकीं एक आहेत."

**मनोरंजननिबंधचंद्रिका.**

# पुष्पावली.

( मुलांकरितां )

हें

पुस्तक,


**मोरो गणेश लोंढे,**

खालापूर, तालुके कर्जत, जिल्हा ठाणें येथील

मराठी शाळेंतील शिक्षक


यांणीं रचिलें.


आवृत्ति पहिली—१,००० प्रति.

---

**मुंबईंत,**

"निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.

---

१८९०.

---

**किंमत दीड आणा.**


---


( सर्व हक्क पुस्तककर्त्यानें राखिले आहेत. )

# पुष्पावली.

## ( मुलांकरितां )

### श्लोक.

### पुष्प.

जन्मास येई कुसुमा[1] सुखानें
वृक्षास[2] शोभा बरवी तुझ्यानें ।
तुझ्या सुजन्मा[3] नयनीं[4] बघून
मी स्वीयँ[5] चित्ताप्रति तोषवीन ॥ १ ॥
नाजूक पुष्पा स्वसुखें फुलावें
सुमंद[6] वातें[7] तुज हालवावें ।
वा रात्रिनें लाड तुझे करावे
दंवें तुला वर्षुन[8] तोषवावें ॥ २ ॥
मिटीं फुला तूं तव पांकळ्यांस
जाईल आतां रवि[9] ही घरास ।
तूं व्यंक्त[10] सौंदर्य जगास केलें
विश्रांतिला[11] चित्त तुझें भुकेलें ॥ ३ ॥
सुकून जाई कुसुमा उदारा
उन्हामधीं या रविच्या अपारा[12] ।

---

१ हे फुला. २ झाडाला. ३ चांगल्या जन्माला. ४ डोळ्यांनीं. ५ आपल्या. ६ फार हळू. ७ वाऱ्यानें. ८ पडून. ९ सूर्य १० उघड. ११ विसांवा घेण्याला. १२ फार.

कर्तव्य तूं स्वीयं[1] पुरें करून
जोडून झालेंस यशास[2] धन्य[3] ॥ ४ ॥
सुवास [4]वेधी अवघ्या जनांला
आनंदवी रूप तुझें मनाला ।
सत्कीर्ति[5] झाली अचला[6] जगांत
कांहीं न चिंता जरि होय अंत[7] ॥ ५ ॥
शोभा हि जाली[8] गत पादपांची[9]
आतां न शोभा उरली दिनांची[10] ।
आयुष्य थोडें न करीं तयाची
[11]खंती फुला हीच गती नरांची[12] ! ॥ ६ ॥

---

## भरभराटीचीं चिन्हें.

चढून जाई कुदळ्यांस तेज
न काम खड्गांप्रति[13] खाय गंज ।
तुरुंग जातात रिते[14] पडून
कोठ्या सुधान्यें अगदीं भरून ॥ १ ॥
[15]कृषीवलांची [16]रंव फार शेतीं
शेतांतले मार्ग मळून जाती ।
न्यायाधिशांच्या बहुधा कचेऱ्या
ओसाड जेथें दिसतात साऱ्या ॥ २ ॥

---

१ आपलें. २ कीर्तीला. ३ श्रेष्ठ. ४ मोह घालतो, नाद लावतो. ५ चांगली कीर्ति. ६ टिकणारी. ७ शेवट. ८ निघून गेली. ९ वृक्षाची. १० दिवसाची. ११ दुःख. १२ पुरुषाची. १३ तरवारींना. १४ रिकामे. १५ शेतकऱ्यांची. १६ रांग, दाटी.

चाले पदीं वैद्य म्हणून लाजे
अश्वावरी शेतकरी विराजे ।
आयुष्य जेथें न दिसे अपूर्ण
तारुण्य राहे बहुकाळ जाण ॥ ३ ॥
जे आणिती मार्ज पदार्थ लोकां
कोठें न ते आढळती विलोका ।
व्यापार सारा सुरळीत चाले
असत्य कोणी सहसा न बोले ॥ ४ ॥
चिन्हें अशीं हीं दिसतील जेथें
सुखी प्रजा खास असेल तेथें ।
सुधारले लोक तयां म्हणावें
सुराज्य तें राज्य असें गणावें ॥ ५ ॥

---

## जग.

हें चांगलें जग, असें म्हणती कितीक
वाईट हें जग, किती म्हणतात लोक ।
हा दोष कीं गुण मुळीं जगतीं न राहे
हें मानण्यावर असे बहुतेक पाहें ॥ १ ॥
कज्जांत कीं धुसफुसीमधिं वेळ जाय
येथें तरी न मनुजांप्रति सौख्य होय ।
सत्संगतींत सुविचार सहाय होतां
वाईट तें न मनुजांस दिसे पहातां ॥ २ ॥

---

१ पायांनीं. २ शोभतो. ३ शंभरवर्षांहून कमी. ४ अंमल. ५ सर्व. ६ लोक. ७ त्यांला. ८ चांगलें राज्य. ९ जगांत. १० मनुष्याला. ११ चांगल्या मनुष्यांच्या सोबतींत. १२ चांगला विचार. १३ मदतकरणारा.

जें काम ज्यास करणें पडतें सदा[1] ही
तो सौख्य त्यांत गणितां[2] कमती[3] न कांहीं ।
हातीं करी परि मनामधिं खेद वाहे[4]
लोकांत या तरि तयाप्रति सौख्य नोहे[5] ॥ ३ ॥
ठेवून ऐक्य[6] जन हे जरि वागतील
निर्दोष[7] लोभ सकळांवर ठेवतील ।
संतोष नित्य असल्यामधिं मानतील
अत्यंत[8] रम्य[9] जग त्यांस तरी दिसेल ॥ ४ ॥
स्वर्गापरी जग दिसे मग हें तयांला
होईल फार सुखदायक[10] तन्मनाला[11] ।
जातील विघ्नसमुदाय[12] तयां लयाला[13]
कंटाळतील मग लोक न या जगाला ॥ ५ ॥
प्रेमांकुरास[14] निज चित्त ठिकाण होवो
ऐक्यत्व हें सुजल[15] त्याप्रति पुष्टि[16] देवो ।
येवोत शान्तिकुसुमें[17] वर रम्य ऐसीं
दे स्वर्गसौख्य[18] अवनी[19] मग हे जनांसीं ॥ ६ ॥

---

**मग.**

करीन कार्या[20] **मग** मी करानें[21]
जाईन तेथें **मग** आदरानें ।

---

१ नेहमीं. २ मानील तर. ३ कमी. ४ धरतो. ५ होत नाहीं. ६ एकी. ७ दोषरहित. ८ फार. ९ सुंदर. १० सुख देणारें. ११ त्यांच्या मनाला. १२ विघ्नांचे समुदाय. १३ नाशाला. १४ प्रेमाच्या अंकुराला. १५ चांगलें पाणी. १६ वाढ. १७ शान्तिरूप फुलें. १८ स्वर्गांतलें सुख. १९ पृथ्वी. २० कामाला. २१ हातानें.

करीन याचा **मग** मी विचार
पाहीन याचें **मग** काय सार[1] ॥ १ ॥

चित्तीं मुला सावध नित्य राहें
वरा नसे हा **मग** शब्द पाहें ।
हें आळशाचें बरवें निशाण
भुले न याला अगदीं सुजाण[2] ॥ २ ॥

जो लागलासे **मग** हें वदाया[3]
न वेळ त्या काम कधीं कराया ।
विद्या तयाला मिळणें कठीण
आशा यशाची **मग** त्याजला न ॥ ३ ॥

वाटे मनाला **मग** शब्द गोड
वाटे जिवाचें पुरवील कोडें[4] ।
परी बरी हे न दिसेच खोड
आधीं मुला ईस ह्मणून सोड ॥ ४ ॥

घालील मोहीं **मग** शत्रु तूतें
फसून जाशील भुलून यातें ।
[5]संगें न याच्या सुख होउनीयां
[6]सुवेळ जाईल निघून वायां[7] ॥ ५ ॥

आलें लिहावें वरवें मनांत
राही उभा तों **मग** शब्द तेथ ।

---

१ तात्पर्य. २ शहाणा. ३ बोलण्याला. ४ हौस. ५ सोबतीनें. ६ चांगला काळ. ७ व्यर्थ.

होतां तयाला वशं चित्त साच
राहून जाई लिहिणें तसेंच ॥ ६ ॥
विंध्याद्रिच्या मी शिखरीं चढून
जाईन यत्नास करीं धरून ।
येई मनीं तों **मग** ये पुढें तो
चित्तास मार्गामधिं गुंतवीतो ! ॥ ७ ॥
लागेल त्याच्या परि जो लगामीं
होऊन जाईल पळें निकामी ।
राहील मार्गामधिं गोंधळून
जाईल कैसा शिखरीं चढून ॥ ८ ॥
वाचूं असें आणितसे मनांत
राही उभा तों **मग** शब्द तेथ ।
राहील तें काम तसेंच पाहीं
पुरें कराया प्रति वेळ नाहीं ॥ ९ ॥
मनांतले बेत मनीं रहाती
निघूनियां मात्र सुवेळ जाती ।
आलस्य पीडा करितें मनाला
ह्मणूनि टाकीं **मग** शब्द बाळा ॥ १० ॥

---

## ईश्वर.

वेंहू कडकडे नभीं चमकते सुखड्गापरी
क्षणीं चमक दावुनी विलयें ही क्षणीं जी वरी ।

---

१ स्वाधीन. २ विंध्यारूपी पर्वताच्या. ३ शिखरावर-माथ्यावर. ४ हातांत. ५ रस्त्यांत. ६ नादीं. ७ निरुपयोगी. ८ आळस. ९ दुःख. १० फार. ११ आकाशांत. १२ चांगल्या तरवारीप्रमाणें. १३ दाखवून. १४ नाश.

दुर्भंग पडतां करी क्षितिसि[1] जीव[2] ही संहरी[3]
करी अतुल[4] शक्तिला[5] समज ईश[6] तो अंतरीं[7] ॥ १ ॥
भयंकर निघे ध्वनी[8] थरथरां धरी[21] कांपते
पदार्थ पडती पहा घडघडूनियां पालथे ।
महीतल[9]हि भंगतो मधुन अग्नि येई वरी
करी अतुल[4] शक्तिला[5] समज ईश[6] तो अंतरीं ॥ २ ॥
समीरण[10] सुटे बळें सकल[11] पादपां[12] हालवी
कितीक तरणी[13]प्रती जलधिच्या[14] तळीं[15] घालवी ।
समूळ[16] उपडी[17] किती तरुंस[18] मोडुनीयां चिरी
करी अतुल[4] शक्तिला[5] समज ईश[6] तो अंतरीं ॥ ३ ॥
सरींवर सरी बहू पडति अंतराळां[19]तुनी
पथीं बहुत चाललें उदक[20] वेढुनी मेदिनी[21] ।
पळांत जळ वाढुनी मनुज[22]जीव वेडा करी
करी अतुल[4] शक्तिला[5] समज ईश[6] तो अंतरीं ॥ ४ ॥

---

## झरा.

जेव्हां रवी[23] हा उदयास येई
भरून तेजें तव[24] नीर[25] जाई ।
वाहे अहा जें झुळझूळ पाणी
तें रौप्यराशीस[26] उणीव[27] आणी ॥ १ ॥

---

१ पृथ्वीला. २ प्राणी. ३ ठार मारते. ४ तुलना नाहीं अशी. ५ सामर्थ्याला. ६ ईश्वर. ७ मनांत. ८ आवाज. ९ पृथ्वीचा पृष्ठभाग. १० वारा. ११ सगळ्या. १२ झाडांना. १३ होड्यांला. १४ समुद्राच्या. १५ पोटांत. १६ मुळासकट. १७ उपटून टाकतो. १८ झाडांना. १९ आकाशांतून. २० पाणी. २१ जमीन, भूमी. २२ माणसांचा प्राण. २३ सूर्य. २४ तुझें. २५ पाणी. २६ रुप्याच्या राशीला. २७ उणेपणा.

मुक्ताफळांची[1] नव[2] माळ कीं हे
रत्नावली[3] केवळ शोभताहे ।
सुनेत्रें[4] होऊन पळांत हंस
सेवून[5] देती सुख अंतरास[6] ॥ २ ॥
सूर्योदयांपासुन[7] सांजवेरी[8]
शोभूनियां तें चमके सुवारी[9] ।
आनंद झाला किरणें बघून
तो तें जनां दाखवितें हंसून ॥ ३ ॥
मारी उड्या धांवतसे सुखानें
विचित्र[10] लीला[11] करितें क्रमानें[12] ।
तुझ्या जलाची[13] रविच्या[14] करांची[15]
मैत्री असे काय झऱ्या जिवाची ॥ ४ ॥
चंद्रप्रकाशामधिं वाटतें हें
बर्फाहुनी शुभ्र विशेष आहे ।
सुमंदसा[16] वायु जरी वहातो
पुष्पापरी[17] त्याप्रति हालवी तो ॥ ५ ॥
मंद[18] प्रकाशामधिं मंदमंद[19]
खेळे तुझें नीर[20] धरून छंद ।

---

१ मोत्यांची. २ नवी. ३ रत्नांची माळ. ४ चांगले डोळे. ५ पाहून. ६ मनाला. ७ सूर्य उगवल्यापासून. ८ संध्याकाळपर्यंत. ९ चांगलें पाणी. १० चमत्कारिक. ११ खेळ. १२ ओळीनें. १३ पाण्याची. १४ सूर्याच्या. १५ किरणांची. १६ अत्यंत हळू असा. १७ फुलाप्रमाणें. १८ थोड्या. १९ हळू हळू. २० पाणी.

ती स्वच्छ धारा तुझिया जलाची[1]
पाहून वृत्ती[2] निवते जनांची ॥ ६ ॥
वा तारकांचा[3] पडतां प्रकाश
रम्यत्व[4] नीराप्रति[5] ये विशेष।
पोषाख वाटे करुनी जरीचा
तें पांगे[6] फेडी अपुल्या जिवाचा ॥ ७ ॥

मध्यान्हवेळीं[7] अथवा प्रभातीं[8]
सूर्यास्तवेळीं[9] अथवा निशीथीं[10]।
तें चालवी नित्य समान लीला
पाहून संतोष मनास जाला ॥ ८ ॥

लागे तयाला न कधीं विसांवा
श्रमी[11] जनांलागिं दिसे न केव्हां।
थांबे न चाले सुपथा[12] बघून
ठेवून हेतू गमनांत[13] जाण ॥ ९ ॥

वा निर्झरीं[14] चित्त असेंच होवो
तुझ्या जलाचें[15] वर[16] साम्य[17] घेवो।
दुःखें सुखें अल्प[18] न भेद पावो
सदा सुकार्यीत[19] गढून[20] जावो ॥ १० ॥

---

१ पाण्याची. २ मन—स्वभाव. ३ ताऱ्यांचा. ४ सुरेखपणा. ५ पाण्याला. ६ हौस. ७ दुपारीं ८. पहांटेस. ९ संध्याकाळीं. १० मध्यरात्रीं. ११ दुःखी. १२ चांगल्या रस्त्याला. १३ जाण्यांत. १४ झऱ्या. १५ पाण्याचें. १६ श्रेष्ठ. १७ सारखेपणा. १८ थोडा. १९ चांगल्या कामांत. २० गुंतून.

अनेक विघ्नें असतां तयार
खचो तयाचा अगदीं न धीर ।
क्रमो सुखानें निज सत्पथाला[1]
वाटो सदा यामधिं मोद[2] त्याला ॥ ११ ॥

## कुरकुऱ्या.

ज्याचा स्वभाव अगदींच विचित्र आहे
जो सर्वदा कुरकुरे स्वमनांत पाहें ।
ज्याचें सहास्य[3] मुखपंकज[4] तें दिसेना
आश्चर्य पाहुन तया न गमेलें[5] कोणा ! ॥ १ ॥
मुद्रा सदैव दिसते कुरठी तयाची
शक्ती तयार दणका करण्यांत ज्याची ।
आंठ्या कितीक पडल्या दिसतात भाळीं[6]
रात्रीं तसा कुरकुरे अगदीं सकाळीं ॥ २ ॥
गाईवरी चडफडे कुतऱ्यास झोडी
मार्जारही[7] बघुन राग तया न सोडी ! ।
त्याच्या मनास दिसतें बरवें[8] न कांहीं
आनंद काय कुरकूर तयास पाहीं ॥ ३ ॥
तो स्त्रीवरी चडफडे मग त्यावरी ती
त्याच्या मनाप्रति मिळे बहुधा न शांती ।
त्याचीं मुलेंहि दिसतात किती उदास
स्वप्नांत दुर्मिळ[9] तयांस कुटुंबसौख्य[10] ॥ ४ ॥

१ चांगल्या मार्गाला. २ आनंद. ३ हांसण्यानें युक्त. ४ तोंड हेंच कमळ. ५ वाटणार नाहीं. ६ कपाळावर. ७ मांजर. ८ चांगलें. ९ दुर्लभ. १० कुटुंबांतलें सुख.

पाऊस ये तरि करी कुरकूर पाहीं
तो थांबतांहि न पुरी कुरकूर होई ।
थंडी पडोहि न पडो तरि सारखीच
त्याची सदैव दिसते कुरकूर साच ! ॥ ५ ॥
हें काय हो उकडतें बरवें न वाटे
वारा मुळींच न सुटे बहु घर्म[1] दाटे ।
हा हुश्श हुश्श करितां दिने[2] सर्व जातो
धंदा मनाप्रति न एक पहा सुचे तो ॥ ६ ॥
या काय होय न कळे तरि पावसाला
हा कोसळून भरितो अवघ्या पथांला[3] ।
भोंकेंच काय पडलीं असती नभाला[4]
त्रासें मदीय[5] बहु जीव थकून गेला ॥ ७ ॥
जाती भिजून कपडे अगदीं जलांत[6]
थंडीमुळें हुडहुडी भरते क्षणांत[7] ।
पंकांत[8] पाय भरतां बहु ताप[9] होतो
धंदा मनाप्रति न एक पहा सुचे तो ॥ ८ ॥
थंडी किती पडतसे शरिरास खाई
हें दूर वस्त्र करितां सहसा न येई ।
घेऊन काम करितां श्रम फार होतो
धंदा मनाप्रति न एक पहा सुचे तो ॥ ९ ॥
झाले लबाड दुनियेंतिल सर्व लोक
जो तो मला ठकवितो न करी विवेकें[10] ।

१ घाम. २ दिवस. ३ रस्त्यांला. ४ आकाशाला. ५ माझा. ६ पाण्यांत. ७ पळांत. ८ चिखलांत. ९ दुःख. १० विचार.

सर्वांस भांडण कसें प्रिय आज झालें
ऐसा मनांत कुरकूर करून बोले ॥ १० ॥
त्यालागिं भोजनें[1] कधीं बरवें न लागे
खोड्यांस काढुन मनामधिं फार भागे ।
हा भात काय अगदींच मऊ जहाला
किंवा ह्मणे फडफडीत निवून गेला ! ॥ ११ ॥
हें फार आंबट कितीतरि दाट ताक
वाईट तूप ह्मणतो मुरडून नाक ।
भाजीस या तिखट फार कसें कळेना
ऐसा सदा चडफडे सुख त्या मिळेना ॥ १२ ॥
आहे सदैव वसणें जरि या जगांत
कंटाळुनी तरि कसें करणार येथ ।
सारे क्रमें ऋतु पहा बदलून जाती
त्याची उगाच करणें बरवें न खंती[2] ॥ १३ ॥
जैसें असेल निज वर्तन[3] तें दुज्यासीं
तैसेंच वर्तन दुजा करि आपल्याशीं ।
हा निश्चितार्थ[4] असुनी दुसऱ्यास बोल
लावून खेद करणें अगदींच फोल[5] ॥ १४ ॥
ज्या त्यावरून रुसणें बरवें दिसेना
दोषांकडेच बघतां गुण आढळेना ।
दुःखाविणें सुख तसें मिळणार नाहीं
दोषांतुनी गुण सदा निवडून घेई ॥ १५ ॥

---

१ जेवण. २ दुःख. ३ वागणें. ४ निश्चय. ५ व्यर्थ.

आनंद नित्य असल्यामधिं जो गणील[1]
ज्ञानें स्वकीय मन विस्तृत[2] जो करील ।
तैसा वृथा[3] कुरकुरीप्रति जो त्यजील
त्याला खरें सुख, जगामधिं या मिळेल ॥ १६ ॥

---

## कुलीनपणा.

वरीतसे[4] सुंदर वैभवास
किताब[5] मोठे असती तयास ।
परोपकारीं न रुची[6] मनाला
पुरें तरी हें न कुलीनतेला ॥ १ ॥
सदा मुखानें बहु गोड बोले
कथा बुधांच्या[7] परिसून[8] डोले ।
परोकारीं न रुची मनाला
पुरें तरी हें न कुलीनतेला ॥ २ ॥
वक्ता[9] असे पंडितही असे तो
विद्वज्जनीं[10] मान अपार[11] घेतो ।
परोपकारीं न दिसे भुकेला
पुरें तरी हें न कुलीनतेला ॥ ३ ॥
मनुष्यमात्रीं[12] करितो दयेला
करावया साह्य तयां उदेलों[13] ।

---

१ मानील. २ मोठें. ३ फुकट. ४ घेतो. ५ पदव्या. ६ गोडी. ७ शहाण्यांच्या. ८ ऐकून. ९ बोलका. १० शहाण्या लोकांत. ११ फार. १२ प्रत्येक मनुष्याच्या ठिकाणीं. १३ तयार झाला.

जरी नसे एक किताब त्याला
पुरें तरी हेंहि कुलीनतेला ॥ ४ ॥

चित्तोन्नती[1] हो सकलां जनांची
ह्मणून यत्ना करि बुद्धि ज्याची ।
नसे जरी वैभव अल्प[2] त्याला
पुरें तरी हेंहि कुलीनतेला ॥ ५ ॥

मनुष्यजातीस सुखें वरावें
ह्मणून ज्यानें बहुधा झटावें ।
परोपकारार्थ[3] सुजन्म ज्याला
पुरें तरी हेंहि कुलीनतेला ॥ ६ ॥

जो वैभवानें न भुले स्वकीय
सन्मार्ग[4] सोडून कधीं न जाय ।
जरी सुमार्गाप्रति ने दुजाला
पुरें तरी हेंहि कुलीनतेला ॥ ७ ॥

---

## जीभ.

जरी इला हाड मुळींच नाहीं
असे जरी सान[5] अशक्त पाहीं ।
तरी करी ही मनुजास ठार
ते ग्रीक ऐसा वदती विचार ॥ १ ॥

---

१ मनाचा प्रशस्तपणा. २ थोडें. ३ दुसऱ्यावर उपकार करण्याकरितां. ४ चांगला रस्ता. ५ लहान.

खड्गाहुनी[1] जीभ असे विषारी
त्याहूनही जीव विशेष मारी ।
**तुर्कांमधीं** जे असती विचारी
ऐसी जिभेची कथिती हुषारी ॥ २ ॥

बोले **इराणी** तंवे[2] आदरानें
उतावळी जीभ लयाप्रती ने[3] ।
बरें करानें खुडणें शिराला[4]
न सोडणें स्वैरें[5] बरें जिभेला ॥ ३ ॥

**चिनी** वदे तों परिसा[6] समस्त
जिव्हा वदे शब्द सदा अनेक
वाटे त्वरा[7] कीं मजला तयांची
अश्वाहुनी[8] होय विशेष साची ॥ ४ ॥

तों दाखवी **आरब** हा विचार
ठेवा मनीं नित्य गणून सार ।
कोठार हृद्देश[9] असे जिभेचें
विचार संभाळुन ठेवण्याचें ॥ ५ ॥

तों **इंग्रजां**तील सुजाण[10] एक
बोले मुला काय सलक्ष[11] ऐक ।
संभाळितो जो रसनेस[12] पाहीं
आत्म्यास त्याच्या भय अल्प नाहीं ॥ ६ ॥

---

१ तरवारीपेक्षां. २ तों. ३ शेवट—नाश करते. ४ मस्तकाला. ५ स्वेच्छाचारी.—स्वतंत्र. ६ ऐका. ७ घाई. ८ घोड्यापेक्षां. ९ हृदय, मन. १० शहाणा. ११ लक्षपूर्वक. १२ जिभेला.

हिंदूंतला एक वदे सुजाण
थोर[1]त्व जिव्हे तेंव[2] बोलवे न ।
पीयूष[3] तूं गे वर[4]संगतीनें
विषाहुनी क्रूर कुसंगतीनें[5] ॥ ७ ॥

---

## सुंदर काय ?

वर्णं[6] असो गौर[7] नसो तसेंही
त्याचें न वाटे मजलागिं कांहीं ।
प्रामाणिकत्व[8] प्रतिबिंब घेतें[9]
ज्या आननीं[10] सुंदर वाटतें तें ॥ १ ॥
पदार्थ भूमीवरती असे तो
भिंगांतुनी स्पष्ट दिसून येतो ।
विचार चित्तांतिल दावितात
तीं लोचनें[11] सुंदर वाटतात ॥ २ ॥
मनास जे जे प्रिय[12] वाटताती
बाहेर ते शब्दच मात्र येती ।
ज्यांपासुनी पूर्ण विचारयुक्त
ते ओंठ कीं सुंदर वाटतात ॥ ३ ॥
जें चांगलें आणिक सत्य काम
तें आचरायास[13] धरून नेम ।

---

१ मोठेपण. २ तुझें. ३ अमृत. ४ चांगल्या. ५ वाईट सोबतीनें ६ रंगानें. ७ गोरें. ८ प्रामाणिकपणा. ९ स्पष्ट दिसतें. १० तोंडावर. ११ डोळे. १२ चांगले. १३ करावयाला.

जे त्यामधीं संतत गुंततात
ते वाटती सुंदर मात्र हात ॥ ४ ॥

परोपकारार्थ[1] झटावयाला
जे जाहले सिद्ध फिरावयाला ।
जातात मोदें[2] नगरीं[3] वनांतें[4]
ते पाय कीं सुंदर वाटतात ॥ ५ ॥

जीं संकटें संतत वेढिताती
त्यांची नसे ज्या अगदींच खंती[5] ।
त्यांचा परी भार[6] सुखें वहाती[7]
खांदे मला सुंदर वाटताती ॥ ६ ॥

विपत्तिनें[8] ग्रासुन[9] एक गेला
जो शोक त्यानें अनिवार[10] केला ।
ऐकून तो जे कथिती[11] मनातें
ते वाटती सुंदर कान मातें ॥ ७ ॥

जें अन्यदुःखें[12] असुखास[13] पावे
जें अन्यसौख्यें बहुधा सुखावे ।
परोपकारीं सुरुची[14] जयातें
तें वाटतें सुंदर चित्त मातें ॥ ८ ॥

---

१ परोपकार करण्याकरितां. २ आनंदानें. ३ शहरांत. ४ रानांत. ५ दुःख. ६ ओझें. ७ धारण करतात. ८ गरीबीनें. ९ वेढून. १० फार. ११ सांगतात. १२ दुसऱ्याच्या दुःखानें. १३ दुःखाला. १४ फार गोडी.

## तीन गोष्टी परत येत नाहींत.

दरींतुनी बर्फ निघून जातें
प्रफुल्ल[१] पुष्पें[२] त्यजिती[३] तरूतें[४] ।
सुकून जाई तृण[५] आतपें[६] तें
पाणी नदींतील अदृश्य होतें[७] ॥ १ ॥
अरण्य[८] शैलावरचें[९] मरे तें
तेथें न थारा[१०] मिळतो पिकातें[११] ।
रवीहि अस्ताचलें[१२] आक्रमून[१२]
जाई उरे तैं दिन तो कुठून ॥ २ ॥
थंडींत तें बर्फ फिरून होतें
येती वसंतीं[१३] कुसुमें[१४] तरूतें ।
वर्षामधीं[१५] भू[१६] भरते तृणानें
सुपूर्ण[१७] होई सरिता[१८] जलानें ॥ ३ ॥
काळें तसा शैल भरे वनानें
रवें[१९] पिकांच्या सहजीं दणाणे ।
रवी उमाळ्यावर दृश्य होतो
नवें दिनाला मग रूप दे तो ॥ ४ ॥
काळें असे जें विलयास गेलें[२०]
भरूनियां वैभव सर्व आलें ।

---

१ फुललेलीं. २ फुलें. ३ टाकतात. ४ झाडाला. ५ गवत. ६ उन्हानें. ७ सुकून जातें. ८ रान. ९ पर्वतावरचें. १० आश्रय. ११ कोकिळाला. १२ मावळतो. १३ वसंतऋतूंत. १४ फुलें. १५ वर्षाऋतूंत. १६ जमीन. १७ भरून जाते. १८ नदी. १९ शब्दानें. २० नाहींसें झालें.

गेल्यावरी वस्तु परी निघून
येती न मागें श्रमतां हि तीन ! ॥ ५ ॥

आकर्ण[1] ओढून धनूस[2] त्याला
लावूनियां जो शर[3] सोडियेला ।
फिरून मागें सहसा न येई
शोकें जरी चित्त विदीर्ण होई[4] ॥ ६ ॥

सुटे धनूपासुन एकदा तो
पदार्थ लक्षून निघून जातो ।
होईल शोकें हृदयास घाय
तरी न गेल्यावर त्या उपाय ॥ ७ ॥

वेगें विदारी[5] हृदया विषारी
असो रिपू[6] मित्र तयास मारी ।
तर्यी तयाला मग कोण वारी[7]
तो एकदा मात्र करी हुषारी ॥ ८ ॥

सोडूं नको त्यास करून घाई
विचार चित्तांत करून पाहीं ।
तो एकदा जाय जरी निघून
तरी न मागें मग ये फिरून ! ॥ ९ ॥

जो एकदा वेळ निघून जाई
फिरून मागें मग तो न येई ।

---

१ कानापर्यंत. २. धनुष्याला. ३ बाण. ४ फाटून गेलें. ५ फोडतो. ६ शत्रू. ७ निवारण करतो.

नवा नवा वेळ जरी दिसेल
तरी नवा तो न जुना मिळेल ॥ १० ॥

असो तुझ्या तो अगदीं सुखाचा
किंवा तुझ्या वांचविता[1] जिवाचा ।
दाता[2] जरी केवळ वैभवाचा
गेल्यावरी तो न मिळावयाचा ! ॥ ११ ॥

शोधावयाला झटलास फार
समस्त उर्वी[3] उदधी[4] अपार[5] ।
शोकें जरी जीव निघून जाई
जो वेळ गेला फिरुनी न येई ! ॥ १२ ॥

कधीं न तो व्यर्थ सुवेळ जावा
ह्मणूनियां यत्न तुझा असावा ।
तो एकदा जाय जरी निघून
तरी न मागें मग ये फिरून ॥ १३ ॥

जो एकदा शब्द मुखें निघाला
निघूनियां सत्वर पार गेला ।
किती जरी शोक मनास होई
तो शब्द मागें न फिरून येई ! ॥ १४ ॥

पाडील तो भोंक जरी उराला
घालील चित्तावरतीहि घाला ।

१ वांचविणारा. २ देणारा. ३ पृथ्वी. ४ समुद्र. ५ मोठा, ज्याचा अंत नाहीं असा.

नाशील जीवास जरी स्ववेगें[1]
येईल गेल्यावरती न मागें ॥ १५ ॥

केला जरी उद्यम[2] झांकण्याचा
होईल तो व्यर्थ तरीहि साचा ।
स्तुती थके काय करील माया
आधीं जपें मागुन यत्न वायां[3] ॥ १६ ॥

आधीं करीं तूं पुरता विचार
उतावळीही अगदीं असारें[4] ।
बोलें जयानें बहु सौख्य होई
जो शब्द गेला न फिरून येई ॥ १७ ॥

शरासनींचा[5] शर[6] वेगवान
सुकाळ तो, आणिक शब्द जाण ।
गेल्यावरी वस्तु निघून तीन
येती न मागें श्रमतां फिरून ॥ १८ ॥

---

## अनाथाचा मित्र.

अजा[7] कळप सोडुनी भ्रमतसे[8] सडी[9] काननीं[10]
क्षुधा[11] बहुत लागली मतिस[12] भेडवी यामिनी[13] ।
नसे परत यावया बळ ह्मणून रानीं पळे
तुझ्याविण न ईश्वरा इतर तीस पाता[14] मिळे ॥ १ ॥

---

१ आपल्या वेगानें. २ उद्योग. ३ व्यर्थ. ४ वाईट. ५ धनुष्याव-रचा. ६ बाण. ७ शेळी. ८ फिरते. ९ एकटी. १० रानांत. ११ भूक. १२ बुद्धीला. १३ रात्र. १४ रक्षण करणारा.

खगां[1] जखम लागली ह्मणुन अंतरीं[2] घाबरे
गळ्यांतुन जळापरी[3] रुधिर[4] सारखें पाझरे[5] ।
उडून घरटें बघे जणुं मरेल वाटे पळें
तुझ्याविण न ईश्वरा इतर त्यास पाता[6] मिळे ॥ २ ॥
त्यजी[7] जनक[8] आपला जननिलाहि[9] सोडीतसे
पळून बहु लांबतो तनय[10] एकला जातसे ।
पथांत[11] दुखणेकरी पडुन मानसीं[12] तो गळे[13]
तुझ्याविण न ईश्वरा इतर त्यास पाता[6] मिळे ॥ ३ ॥
जरा[14] वैरितसे[15] सुखें पदहि चालवेना मुळीं
दिसे न नयनीं मिळे न कधि भाकरीही शिळी ।
दुरी स्वजन[16] टाकिती गणितसे[17] घडी कीं पळें
तुझ्याविण न ईश्वरा इतर त्यास पाता[6] मिळे ॥ ४ ॥
बुडे सुतरि[18] सागरीं[19] सकळ जीव जाती तळीं
तयांत नर[20] एक तो तरतसे धरूनी फळी ।
समीर[21] बहु कांपवी बुडवि लाट वाटे पळें
तुझ्याविण न ईश्वरा इतर त्यास पाता[6] मिळे ॥ ५ ॥
जयास जननी नसे निज[22] कटीवरी[23] घ्यावया
नसे जनक[8] त्याप्रती वरें[24] विचार सांगावया ।
पडून धरणीवरी कळवळे रडे तान्हुलें
तुझ्याविण न ईश्वरा इतर त्यास पाता[6] मिळे ॥ ६ ॥

---


१ पक्ष्याला. २ मनांत. ३ पाण्याप्रमाणें. ४ रक्त. ५ गळतें. ६ रक्षण करणारा. ७ टाकतो. ८ बाप. ९ आईला. १० मुलगा. ११ रस्त्यांत. १२ मनांत. १३ गळून जातो—कासावीस होतो. १४ म्हातारपण. १५ येतें. १६ आपले नातलग. १७ मोजतो. १८ होडी. १९ समुद्रांत. २० मनुष्य. २१ वारा. २२ आपल्या. २३ कडेवर. २४ चांगले.

पुष्पमालाः—"कविता साधी आणि हृदयंगम उतरली आहे. लोंढे यांणीं मुलांकरितां चांगला उपक्रम चालविला आहे." काव्यरत्नावली.

भूगोलपत्रकः—( आशिआखंडाचें ) किंमत पाऊण आणा. पांचव्या व सहाव्या इयत्तेकरितां. आशिआखंड थोडक्यांत तयार करितां येतें. एक रुपयास २५ प्रति. शेंकडा ३८.

सर्व पुस्तकें खालीं लिहिलेल्या ठिकाणीं मिळतील.

मोरो गणेश लोंढे—हेडमास्तर—खालापूर ता. कर्जत जि. ठाणें.
वासुदेव मोरेश्वर पोतदार—हेडमास्तर—गिरगांव प्रा.स्कू.—मुंबई.
विविधज्ञानविस्तार आफीस—काळबादेवी रोड—मुंबई.



II

दक्षिणाप्राइझ कमिटीनें बक्षीस दिलेलें.

# दृष्टांतमाला.

हें पुस्तक

मोरो गणेश लोंढे

पनवेल, जि० कुलाबा येथील मराठी शाळेंतील

मुख्य शिक्षक

यांनीं लिहिलें.

आवृत्ति पहिली—१००० प्रति.

मुंबईंत "निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.

सन १८९९.

किंमत २ आणे.

सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें राखिले आहेत.

## लोंढे यांनीं केलेलीं उपदेशपर पुस्तकें.

### अवश्य वाचून पहा !

**दक्षिणाप्राइझ कमिटीनें बक्षीस दिलेलीं पुस्तकें.**

बोधशतक, बोधसुधा, पुष्पगुच्छ, नशीब आणि उद्योग, शतकत्रय, यमुना, दृष्टांतमाला.

---

**मे. डायरेक्टर साहेब बहादूर, इलाखा मुंबई, यांनीं बक्षिसांकरितां पसंत केलेलीं पुस्तकें.**

बोधशतक, संगीतसुधा, उपदेशमाला, बोधसुधा, पुष्पगुच्छ, बोधमाला, नशीब आणि उद्योग.

---

**मे. डायरेक्टर साहेब बहादूर, प्रांत वऱ्हाड, यांनीं बक्षिसांकरितां पसंत केलेलीं पुस्तकें.**

बोधशतक, संगीतसुधा, उपदेशमाला, ऐतिहासिक संगीत, बोधामृत, बोधसुधा, पुष्पगुच्छ, पुष्पमाला, पुष्पावली, बोधमाला, मुलांचें प्राथमिक शिक्षण, नशीब आणि उद्योग.

---

**पुस्तकें, त्यांच्या किंमती व अभिप्राय.**

**बोधशतकः—** ( आवृत्ति चौथी. ) किंमत दीड आणा. श्लोकबद्ध. **अभिप्रायः—** " हें पुस्तक प्रत्येक लहान मुलानें वाचल्याशिवाय व त्यांतील बोधपर कविता पाठ केल्याशिवाय राहूं नये अशी आमची त्यांना शिफारस आहे. " **केसरी.**

**संगीतसुधाः—** ( आवृत्ति तिसरी. ) किंमत दीड आणा. साक्या, दिंड्या, पदें, वगैरे कविता. **अभिप्रायः—** " यांतील कविता सरळ, सोपी व मनावर ठसा उमटण्याजोगी साधली आहे. "

**सुबोधपत्रिका.**

**उपदेशमालाः—** ( आवृत्ति सातवी. ) किंमत दीड आणा. श्लोकबद्ध. **अभिप्रायः—** " लोंढे यांचा हा प्रयत्न त्यांच्या पूर्वीच्या प्रयत्नांप्रमाणेंच चांगला साधला आहे. "

**विविधज्ञानविस्तार.**

# दृष्टांतमाला

ग्रंथ संग्रहालय
नं. ......
ता.
ठाणे.

श्लोक ( वसंततिलका. )

## ईश्वरभक्ति.

गावें सदा प्रभुचिया[1] पदपंकजाला[2]
गाऊन कोण नर धन्य जगीं न झाला ।
प्रेमा धरून तरले बहु थोर थोर
ज्ञानेश[3] वामन[4] तसे तुकया[5] कबीर[6] ॥ १ ॥

## दारिद्र्यमित्र.

दारिद्र्य पाहुन धरीं न मनांत भीती
दारिद्र्य दोष अपुला समजें न चित्तीं ।
दारिद्र्य उद्यमं[7] तुला करण्यास सांगे
सन्मित्र यास समजें, न भरून रागें ॥ २ ॥
दारिद्र्य सोस मनिं धैर्य धरून फार
धैर्यें प्रयत्न करुनी मग त्या निवार[8] ।
दारिद्र्य जाय जरि सोडिशि आळसाला
दारिद्र्य जाय धरितां करिं उद्यमाला ॥ ३ ॥
दारिद्र्य उद्यम करून समग्र टाळीं
यत्नाप्रती सुफल येइल योग्य काळीं ।
जे जे भले नर जगीं उदयास आले

---

१ ईश्वराच्या. २ चरणकमलाला. ३ ज्ञानेश्वर. ४ वामन पंडित
५ तुकाराम. ६ एक भगवद्भक्त. ७ उद्योग. ८ नाहींसें कर.

होते गरीब तरि ते न मनांत भ्याले ॥ ४ ॥
शिद्दी जयीं बहुत ताप कुळास देई
बाळाजि सोडुन गृहा परदेशि जाई ।
दारिद्र्य मूर्त[1] जरि त्यासह धांव घेई
सोसून, धैर्य धरुनी उदयास येई ॥ ५ ॥

## अकार्यसंग.[2]

द्रव्यार्थ यत्न करणें वर मान चित्तीं
द्रव्यार्थ वा परि अकार्य धरीं न हातीं ।
दारिद्र्य नाशिल कधीं न तुझ्या यशाला
लावील दूषण अकार्य तुझ्या कुळाला ॥ ६ ॥
जाऊन वैभव उरे अपकीर्ति मागें
एकामुळें निज कुलास कलंक लागे ।
मागेंहि शब्द पडला जरि पेशवाई
आनंदि[3] नाम थरकांप मनास देई ॥ ७ ॥
नारायणास[4] वधिलें धरुनी दुराशा[5]
नेलें स्वकीय कुल राज्य समूळ नाशा ।
नाहीं तिला सुख तरी अणुमात्र[6] झालें
आयुष्य सर्व विपदेंत[7] खपून गेलें । ॥ ८ ॥
द्रव्यार्थ तीस वश होय सुमेरसिंग
मानी प्रमोद[8] करुनी हि अकार्यसंग ।

---

केवळ. २ वाईट कामाची संगती. ३ राघोबादादाची बायको आनंदीबाई, ४ नारायणराव पेशव्यास. ५ वाईट आशा—राज्य मिळविण्याची. ६ थोडें देखील. ७ विपत्तींत—संकटांत. ८ मोठा आनंद.

## जन्म व्यर्थ ! ( दिंड्या. )

ात्य सोशी अपमान जगामाजी
करायाला ही निंद्य[1] कर्म राजी ।
ादरपूर्तीची[2] मुख्य आसें[3] ज्याला
ारी प्राणी जन्मास वृथा[4] आला ॥ १ ॥

ासे विद्या अल्पही प्राप्त केली
गुणां मिळवाया श्रांत[5] तनु[6] न झाली ।
अर्थसंचय[7] सद्गुणें[8] नसे केला
तरी प्राणी जन्मास वृथा आला ॥ २ ॥

जयापासुन मायेस[9] सुख न जालें
जया बघतां जनकास[10] रडूं आलें ।
बंधुवर्गही[11] मुरडितो नाक[12] ज्याला
तरी प्राणी जन्मास वृथा आला ॥ ३ ॥

आप्त ज्याला आपुला ह्मणविण्याला
लाजताती तरि लाज नसे ज्याला ।
भेट होतां टाळिती बुध जयाला
तरी प्राणी जन्मास वृथा आला ॥ ४ ॥

कधीं नाहीं चिंतिलें ईश्वरातें
कृपेनें ज्यानें निर्मिलें जगातें ।
जसा आला तैसाच मरुन गेला
तरी प्राणी जन्मास वृथा आला ॥ ५ ॥

---

ाईट. २ पोट भरण्याची. ३ आशा. ४ फुकट. ५ थक-
. शरीर. ७ पैशाचा सांठा. ८ चांगल्या गुणाच्या योगानें.
ाा. १० बापाला. ११ भाऊबंद. १२ वाईट ह्मणतो.

# बोधसुधा.

नं.

## गुणांची आवड. (साक्या.)

ठेवीं चित्तीं हें । लोकां गुण रुचती[1] पाहें ॥ ध्रु० ॥

पुष्पसुवासासह[2] जो शीतल[3] झुळझुळ वारा वाहे ।
अनुभवुनी त्या संतुष्टमनें[4] सज्जन डोलत राहे ॥ १ ॥ ठे०

सुंदर गायन कर्णीं[5] पडतां पन्नग[6] वेडा होतो ।
काय नवल मग सुजन परिसुनी[7] तल्लीनत्वा[8] घेतो॥ ।२॥ठे०

गुणवंताच्या[9] संगसुखानें[10] खल[11] मान्यत्वा[12] पावे ।
माळेसाठीं काय बुधानें[13] दोर गळां बांधावे ॥ ३ ॥ ठे०

कमल असे जरि मोठें तरि तें टाकुन हस्तीं घेई ।
नर जाईचें सुमन सुखानें लघु जें सुगंध देई ॥ ४ ॥ ठे०

कंटकयुक्त असून हि इच्छी नर केतकीस घ्याया ।
कीटजें[14] परि रेशमी वसन त्या आवडतें बहु ल्याया[15]॥५॥ठे०

गोड बोलतो ह्मणुन शुकाची रुचते संगति त्याला ।
बहुत गोजिरीं हरिणबालकें आवडती बघण्याला ॥ ६ ॥ठे०

अल्प नसे गुण ज्यामधिं कोणा न रुचे संगति त्याची ।
अशा नराहुन ह्मणती बरवी संगति नित्य पशूची ॥७॥ठे०

तरी नरानें नित्य झटावें बरवे गुण मिळवाया ।
सोसावें मौक्तिकास लागे छिद्र[16] गळां शोभाया ॥८॥ ठे०

---

१ आवडतात. २ फुलांच्या वासासह. ३ गार. ४ आनंदी मनानें. ५ कानांत. ६ साप. ७ ऐकून. ८ लुब्ध होतो. ९ गुणी मनुष्याच्या. १० सहवासानें. ११ दुष्ट. १२ मोठेपणाला. १३ शहाण्यानें. १४ किड्यांपासून झालेलें. १५ नेसण्याला. १६ भोंक.

झाला न लाभ तरि लेशहि कीं तयाला
लाजूनियां पळतसे त्यजुनी पुण्याला ॥ ९ ॥
कीर्ती करी जरी रणीं **रघुनाथ** फार
शत्रूस जर्जर करी समरीं अपार ।
**आनंदि**ला परि अकार्य करावयाला
देऊन साह्य मळवी बरव्या यशाला ॥ १० ॥
ऐसें अकार्य करितां जनिं नाश थोर
टाका तयास ह्मणुनी करुनी विचार ।
दारिद्र्य जाइल जरी दृढ उद्यमानें
लोपेल डाग परि हा न पुढें श्रमानें ॥ ११ ॥
वाटे जरी प्रथम चांग अकार्य चित्तीं
तेणें कधीं न फळ ये बरवें स्वहस्तीं ।
मारूं **शिवा**[1]जिस धरी **अफजुल्**[2] मनांत
तेणें जिवास मुकला अपुल्या क्षणांत ॥ १२ ॥

## द्रव्यलाभ.

न द्रव्यलाभ वर लाभ गणीं मनांत
न्यायें न तें मिळवितां दुखवील चित्त ।
पापें समोर दिसती बहु अंत[3]काळीं
हें नीच कृत्य समजून समूळ टाळीं ॥ १३ ॥
होतें जरी जवळ वित्तें[4] अपार पाहें
**औरंगजेबा**[5] मरतां बहु शोक वाहे ।

---

१ शिवाजी राजाला. ( १६५९ ). २ अफजुलखान, विजापूरकरांचा सरदार. ३ मरतांना. ४ पैसा. ५ दिल्लीचा बादशाह (१७०७).

मानी तुका[1] जरि धना वमनासमान[2]
त्याला न दुःख अगदीं तरि होय जाण ॥ १४ ॥
वा सत्पथें झटुनियां मिळवीं धनाला
कार्यी बऱ्या सतत तूं करिं तद्व्ययाला[3] ।
त्याचा जरी न उपयोग दुजास झाला
जोडावया नर उगा श्रमला तयाला ! ॥ १५ ॥

## वस्तूचा उपयोग.

तें द्रव्य जें समयिं[4] दे दुबळ्यांस[5] खाया
ती शक्ति जी करी अशक्त जनांस साह्या ।
तें ज्ञान जें अबुध[6] त्यांप्रति बोध देतें
ऐसें नसे तरि तयां विफलत्व[7] येतें ॥ १६ ॥
दामाजिनें[8] समयिं[4] धान्य दिलें द्विजांतें
अद्याप नाम निघतें सकळां मुखीं तें ।
भूमींत वित्त[9] पुरुनी जरि ठेवियेलें
कामा नये तरि कशास्तव जोडियेलें ! ॥ १७ ॥
होती उदारचरिता[10] दयिता[11] अहल्या[11]
गेली निघून, कृति[12] चांग तिच्या न गेल्या ।
सत्रें[13] तिचीं मिरवती बहु जागजागीं

---

१ तुकाराम ( शके १५७१). २ ओकारीसारखें. ३ त्याच्या खर्चाला. ४ वेळेवर. ५ गरिबांना. ६ अविद्वान्. ७ निरुपयोगीपणा. ८ दामाजी, हा ब्राह्मण बेदर येथील बादशाहाच्या तर्फेनें मंगळवेढ्याचा किल्लेदार होता, त्यानें. ९ पैसा. १० उदारपणाचीं कृत्यें करणारी. ११ स्त्री, अहल्याबाई होळकरीण ( शके १७०७). १२ कामें. १३ अन्नछत्रें.

देवालयें विलसतीहि पवित्रभागीं[1] ॥ १८ ॥
गेली[2] समूळ विलयाप्रति पेशवाई
ग्रंथांत शब्द उरला, हृदयास खाई ।
सर्वांस गोष्ट तरि विश्रुत[3] दक्षिणेची[4]
अद्याप तृप्ति करिते किति याचकांची[5] ॥ १९ ॥
जेव्हां पडे चतुरसाल[6] हि संकटांत
बाजी तया त्वरित धांउन देइ हात ।
त्याला करून भयमुक्त[7] विशेष शोभे
तेव्हां स्वपुत्र[8] समजे नृप[9] त्यास लोभें ॥ २० ॥
स्थापी स्वराज्य बहु कष्टुनियां शिवाजी
गाजी स्वतांस ह्मणवी सुजनांस राजी— ।
राखीतसे, स्वबळें[10] खर्च करी अशांत
तेणें तयास बहु मान मिळे दहांत[11] ॥ २१ ॥
जें ज्ञान नित्य शिकवी स्वमना विचार
सर्वांस तें सुगम हो ह्मणुनी अपार[12]— ।

---

१ तीर्थांच्या ठिकाणीं. २ नाश पावली. ३ प्रख्यात. ४ पेशवाईंत विद्वान् ब्राह्मणांस दक्षिणा वांटीत असत, तिची. ('दक्षिणा प्राइझ कमिटी' ही मंडळी त्याच दक्षिणेच्या रकमेंतून उत्पन्न झाली आहे व ही ग्रंथकर्त्यांस बक्षिसें देते. या पुस्तकासही तिच्याकडून बक्षीस मिळालें आहे.) ५ भिक्षुकांची—हल्लीं बक्षिसाकरितां ग्रंथ पाठविणारांची. ६ बुंदेलखंडचा राजा. यावर बंगषखान यानें शके १६५५ त स्वारी केली, तेव्हां त्यानें बाजीरावाजवळ मदत मागितली. बाजीरावानें बंगषाचा पराभव केला. ७ भयापासून मोकळा. ८ आपला मुलगा. ९ चतुरसाल. १० आपलें सामर्थ्य. ११ सर्व लोकांत. १२ पुष्कळ.

ग्रंथां लिहून बुध[1] ठेविति आदरानें
**ज्ञानेश वामन मयूरकवि** श्रमानें ॥ २२ ॥
**ज्ञानेश्वरी**[2] जनमना परमार्थ सांगे
गीतार्थ[3] वामन करी उघडा हि आंगें ।
सांगे **मयूर** वर[4] **भारत** या जनांस
बोधीतसे जनमनाप्रति **रामदास** ॥ २३ ॥

## यश.

जोडीं सदां श्रमुनियां बरव्या यशाला
देईल मान तुज तेविं तुझ्या कुळाला ।
ऐकून नांव तुकवील[5] अभिज्ञ[6] मान
ऐसें सुकार्य करतां तरला न कोण ॥ २४ ॥
होती उदार[7]चरिता दयिता[8] **अहल्या**[9]
वाटे बुधां निजमनांत सुधाल्प[10]कुल्या ।
घेतां बुधां कुतुक[11] नाम मुखें **शिवाजी**
त्यांना बहु स्फुरण ये ह्मणतांच **बाजी** ॥ २५ ॥
**भाऊ**[12] तयांस पळ **पानपतास**[13] नेई
**बाजीसवें** न **अटके**[14] अटकाव होई ! ।

---

१ शहाणे. २ ज्ञानेश्वरानें केलेली गीतेवरील टीका. ३ गीतेचा अर्थ—वामन पंडितांनीं यथार्थदीपिका या नांवाची गीतेवर विस्तृत टीका केली आहे. ४ श्रेष्ठ. ५ डोलवील. ६ शहाणा. ७ उदार स्वभावाची. ८ स्त्री. ९ अहल्याबाई होळकरीण. १० अमृताची लहान नदी. ११ कौतुक. १२ सदाशिवरावभाऊ. १३ पानपत येथें ( लढाईच्या ठिकाणीं ). १४ अटक नदीवर.

त्यां न्याय[1]मूर्ति बहु माधव[2] तोष देई
दावी तयांस निज थोर मना सवाई[3] ॥ २६ ॥
भाऊ शिरून समरीं करें[4] चालवीतो
पाहून दंग अफगाण मनांत होतो
एकावरी बहु जरी रिपु[5] धांव घेती
तो शौर्यसागर मनांत धरी न भीती ॥ २७ ॥
मारा मुखें वदतसे करि कत्तलीला
पाहून दंग रिपुहि मनिं युद्धलीला ।
गेला जरी त्यजुनियां अवनीतळाला[6]
तें शौर्य नित्य रमवी विबुधांतराला[7] ॥ २८ ॥
बाजी स्वकीय चमु घेउन शूर संगें
हल्ला करी रिपुवरी घसरून रागें ।
शौर्यें[8] लढे निरखुनी सरदार अंगें
सारी चमू लढतसे अनिवार रंगें[9] ॥ २९ ॥
जातील[10] वेढुन तरू पळुनी मराठे
आख्यायिका त्रिभुवनांत भरून दाटे
ते वीर टाकुन[11] पहा अटकेस[11] जाती[11]
कैसें न चित्र[12] कुतुकें बुध वृत्त[13] गाती ॥ ३० ॥
वेठीस दीन धरणें न रुचे मनाला

---

१ न्यायाची केवळ मूर्ति असा. २ थोरले माधवराव. ३ सवाईमाधवराव. ४ हात. ५ शत्रू. ६ पृथ्वीला. ७ शहाण्यांच्या मनाला. ८ फार. ९ आनंदानें. १० मराठ्यांस झाडांस बांधून ठेविले तरी ते पळून जातील अशी आख्यायिका आहे. भाऊसाहेबाची बखर पृष्ठ १२ पहा. ११ अटकेच्या पलीकडे गेले. १२ चमत्कारिक ( हें वृत्ताचें विशेषण ). १३ वर्तमान.

तैसा प्रसिद्ध—मुलुखांत—हुकूम केला।
**लेले विसाजि**[1] परि या हुकुमास तोडी
शिक्षा तया करुन **माधव** खोड मोडी ॥ ३१ ॥
घेऊनियां निज चमूस **निजाम** येई
गर्वे करूं ह्मणतसे बरवी लढाई।
वेढून त्यास बसती अवघें मराठे
तेव्हां तदीय बलसिंधु[2] अपाप आटे! ॥ ३२ ॥
रात्रीं कुणी शिरतसे अरिच्या दळांत
हल्ला ह्मणून पडले रिपु गोंधळांत।
वेगें भिऊन पळती, बघतां मराठे
तैं पाठलाग करिती, रिपुसैन्य[3] फाटे[4] ॥ ३३ ॥
बोले **निजाम**[5] तव शीघ्र करा तहाला
**नाना**[6] मनांत परिसून बहू निवाला।
केला पराक्रम भला ह्मणती मराठे
तें **माधवास**[7] ह्मणणें बरवें न वाटे ॥ ३४ ॥
" वेडा **निजाम** भिउनी करितो तहाला
मोठा पराक्रम तुह्मीं तरि काय केला।
गर्वें कशास फुगतां " ह्मणतो **सवाई**
हा योग्य बोल कवणास न सौख्य देई! ॥ ३५ ॥
" भ्याले रिपू बहुत गोंधळ त्यांत झाला
हा आयता जय तुह्मांस असे मिळाला।

---

१ विसाजीपंत लेले, वसईचा सुभेदार. २ बळ हाच समुद्र. ३ शत्रूची फौज. ४ पळाली. ५ (शके १७१७). ६ नानाफडणवीस. ७ सवाईमाधवरावास.

शूरास गर्व असल्या समयीं नसावा"
ऐकून बोल मनिं गर्व कसा वसावा! ॥ ३६ ॥

अद्याप मान मिळतो **पटवर्धनांला**
फांटा मिळेल न कधीं वर **गोखल्याला** ।
ऐकून **होळकर** नांव तसेच **शिंदे**
[1]ओशाळतील मनिं जे असतील मिंधे ॥ ३७ ॥

देहास [2]अंत, न परी सुयशास अंत
जाणून तें मिळवितात सदैव[3] संत ।
घेती कितीक नर जन्म मरून जाती
जे युक्त मात्र सुयशें जन त्यांस गाती ॥ ३८ ॥

**तान्हाजि**[4] तो लढुन **सिंहगडीं**[5] निमाला[6]
**बाजी**[7] लढून समरांत पडून गेला ।
थारा जयांस **शिवराजमनीं**[8] मिळाला
ज्ञाते[9] कसे विसरतील तरी तयांला ॥ ३९ ॥

## यत्न.

दैवें घडे सकलही जगतांत कार्य
ऐसें ह्मणून बसती न उगाच आर्य ।
यत्नें नराप्रति उणें जगतांत नाहीं
ऐसें ह्मणून करिती बहु यत्न पाहीं ॥ ४० ॥

यत्नेंच सागर तरून अफाट जाती

---

१ ओशाळे. २ शेवट. ३ नेहमीं. ४ तान्हाजी मालुसरा. ५ सिंहगडावर (शके १५९२). ६ मरण पावला. ७ बाजी फसलकर. ८ शिवाजीच्या मनांत. ९ शहाणे.

यत्नेंच नित्य नव भूपति देश घेती।
यत्नेंच सर्व कळतात जनांस तत्वें
यत्नें कला शिकुनि शोभति ते पटुत्वें[१] ॥ ४१ ॥
होते कुठे कुशल सैनिक[२] साह्यकर्ते
होतें कुठें जवळ वित्तहि, मावळे ते ।
कीं रानटी, परि करीं धरुनी तयांतें
यत्नें शिवें मिळविलें नव राज्य येथें[३] ! ॥ ४२ ॥
राखेंत अग्नि असतो बहुकाळ गुप्त
किंवा गुहेंत असतो मृगरॉज[४] सुप्त[५] ।
त्याचा पराक्रम तयीं न कळेचि कोणा
यत्नाविणें विफल[६] विक्रम[७] तेविं जाणा ॥ ४३ ॥
राखेस वायु उडवी तयिं तेज फांके
सिंहास जार्गृति[८] मिळे तरि शत्रु कांपे ।
यत्नें शिवें मिळवितां नव राज्य थोर
दे तत्पराक्रम पहा सकळांस जोर ! ॥ ४४ ॥
**बाळाजि** यत्न करिता न मुळींच कांहीं
कैसी तयास मिळती तरि **पेशवाई** ।
**श्रीवर्धनास** पुसतें तरि कोण बोला
यत्नाविणें हिरकणी हि चढे न मोला ! ॥ ४५ ।

**गुण..**

आहे जगामधिं गुणास अपार मोल

---

१ कुशलपणानें. २ लढवय्ये. ३ या देशांत, महाराष्ट्रांत. ४ सिंह. ५ निजलेला. ६ व्यर्थ. ७ पराक्रम. ८ जागेपणा.

पुष्पीं अली बुध तसाच गुणांत लोले[१]।
जोडावयास गुण यत्न सदा करावे
द्रव्यादि वैभव गुणांस मिळे स्वभावें ॥ ४६ ॥
बाळाजि लेखक बरा करि तोडजोड
**शाहूस** वीर गमला ह्मणवून गोड।
तेणें तयास दिधली तैं[३]यिं पेशवाई
आंगांतला गुण वृथा[४] न कधींहि होई! ॥ ४७ ॥
**बाजी** रणांत मिरवे बरवा शिपाई
**शाहू** तयास ह्मणुनी बहु मान देई।
चोंहोकडे बसविला स्वगुणें दरारा
कोठें न अल्प उरला रिपुलागिं थारा! ॥ ४८ ॥
**मल्हारिचा** गुण बघे तैं[६]यिं **बाजिराय**
घे सैनिकांत अपुल्या, झिजवून काय[७]।
**मल्हार** तो धनगरीं जनुर्ला[८] वरूनें[९]
झाला नृपाल निज थोर गुणें करून ॥ ४९ ॥

सद्गुरु.

बोधी मनास करि उन्नत सद्गुणानें
लोकांत थोर करवी बहु मान्यतेनें।
शिष्यांवरी अमित लोभ सदा जयाचा
ऐसा न होय गुरु मान्य कुणास साचा ॥ ५० ॥

---

१ भुंगा. २ लुब्ध. ३ त्या वेळीं (सन १७१४). ४ फुकट. ५ बाजीराव. ६ त्या वेळीं (सन १७२४). ७ शरीर. ८ जन्माला. ९ घेऊन. १० विशाळ.

लोहांस[1] दे परिस शीघ्र सुवर्णतेला[2]
तें लोह दे न कनकत्व[3] तरी दुजाला ।
शिष्यास दे गुरु गुरुत्व हि तें न ऐसें
क्षीरांत[4] नीर[5] मिळतां समरूप[6] तैसें ॥ ९१ ॥
बोधी **शिवाप्रति** सदा गुरु **रामदास**
होऊं न दे कधिं तयास मनीं उदास ।
यत्नें करी **शिव** नवीन तयार वीर
जे सोडिती न समरीं अणुमात्र[7] धीर ॥ ९२ ॥
जे डोंगरांत असती गवतें वहाती
काबाड कष्ट करुनी दिन[8] लोटिताती ।
त्यांना हुशार समरांत करी शिपाई
हें सान काय जगतांत गुरुत्व होई ! ॥ ९३ ॥
**हंबीरराव**, समरीं लढणार **बाजी**[9],
**येसाजि**, वृत्तकथनीं[10] बरवा **बहिर्जी** ।
**नेटाजि**, **सूर्य**[11], रिपुरूपतमींच[12] सूर्य
**तान्हाजि**, केवळ कृतार्थ[13] करून कार्य[14] ! ॥ ९४ ॥

## मित्र.

यत्नें श्रमून जगतामधिं मित्र जोडीं
त्याचें न चित्त सहसा समजून मोडीं ।

---

१ लोखंडाला. २ सोनेंपणाला. ३ सोनेंपण. ४ दुधांत. ५ पाणी. ६ एकरूप. ७ थोडा देखील. ८ दिवस—काळ. ९ बाजी परभू. १० शत्रू-कडील-वातमी सांगण्यांत. ११ सूर्याजी. १२ शत्रुरूप काळोखाच्या ठिकाणीं. १३ धन्य. १४ काम—सिंहगड घेण्याचें काम.

दुःखांत आप्त सगळे जरि दूर जाती
साह्यार्थ मित्र बरवे तरि सिद्ध होती ॥ ९५ ॥
राजा **शिवावर** जयीं **जयसिंग**[1] आला
मैत्रींत बद्ध **शिव** त्या करिता जहाला ।
**औरंगजेब**[2] अटकाव करी **शिवाला**
त्याचा तया अवसरीं उपयोग झाला ॥ ९६ ॥
**दिल्लींतुनी** निघुन जाय जयीं **शिवाजी**
कामास ये तयिं तयास बहू **हिरोजी**—।
**फर्जंद**, धीर धरुनी सदनीं निजून—
राही, **शिवास** सुटण्यास मिळो ह्मणून! ॥ ९७ ॥
स्नेही तिथे न जरि साह्य **शिवास** देते
कैसें तयास नृप हें पद भूषवीतें ।
कैसे पराक्रमपटू[3] ठरते मराठे
कोठून वैभव तयां मिळतेंहि मोठें! ॥ ९८ ॥

## आई.

जी जन्म दे श्रमतसे बहु वाढवीतां
जीचा कधीं न उपकार फिटे पहातां ।
माता सुतास बरवें शिकवील कांहीं
येईल तें सहज त्यास अचूक पाहीं ॥ ९९ ॥
प्रेमा असा न दुसऱ्याजवळी असेल
विश्वास ही न असला इतरीं दिसेल ।
कोठून शिक्षक असा दुसरा मिळेल

---

१ सन. १६६५. २ सन. १६६६. ३ मोठे पराक्रमी.

बोधून सत्पथ सुताप्रति दाखवील ॥ ६० ॥
मोठा **शिवाजिस** करी जननीं **जिजाई**
त्याच्या गुणांस जपुनी बहु वाढ देई ।
त्याच्या मनीं जपुन सद्गुणबीज[1] लावी
तें वाढतां **शिव** नृपाळ पदास सेवी ॥ ६१ ॥
आईसवें परिसतां **शिव भारता**[2]ला
निष्णा[3]त तो बहु पुराणकथांत झाला।
ऐकून सत्पुरुषवृत्त[4] बऱ्या गुणांला
घे भृंग[5] सेवुन[6]—जसा मधु[7]—पंकजांला[8] ॥ ६२ ॥
ऐकून सादर पराक्रम **अर्जुनाचा**
त्याच्या मनामधिं ठसा उठला तयाचा ।
सत्कीर्ति थोर जगतांत अखंड राही
ऐकून **पांडवकथा** मनिं बोध होई! ६३ ॥
वंशांत जन्म बरव्या हि जरी मिळेना
जो तो पराक्रमगुणें रुचतो बुधांना ।
**राधेय[9] कर्ण** तरि थोर पराक्रमानें
चित्तांत पूर्ण धरिलें मत हें **शिवानें** ॥ ६४ ॥
मी थोर, वंश मम थोर, न यांत सार[10]
व्हावें पराक्रमगुणें जगतांत थोर ।
कार्यांत आवड धरून बऱ्या रमावें
तेणें भलेपण जगामधिं मेळवावें ॥ ६५ ॥

---

१ चांगल्या गुणाचें बीं. २ भारत नांवाच्या ग्रंथाला. ३ तयार. ४ चांगल्या पुरुषांचें चरित्र. ५ भुंगा. ६ स्वीकार—आश्रय—करून. ७ मध. ८ कमळांला. ९ राधेचा मुलगा—कर्ण. १० तात्पर्य.

भीष्मास सर्व ह्मणतात दृढप्रतिज्ञ[1]
दुर्योधनास कलहप्रिय[2] आणि अज्ञ[3] ।
धर्मास सर्व ह्मणतात यथार्थवक्ता[4]
कर्णासमान ह्मणती न मिळेल दाता[5] ॥ ६६ ॥
ऐशा कथा निशिदिनीं मनिं घोळताती
त्याला सुकृत्य करण्यास्तव सांगताती ।
हस्तें करूं सुकृतिला[6] मिळवूं सुकीर्ती
ऐसा करी शिव तयीं दृढ वेत चित्तीं ॥ ६७ ॥
वर्ते धरून वर हेतु असा शिवाजी
तेणें तयास ह्मणती बुध नित्य गाजी ।
तो सद्गुणें करितसे सकलांस धन्य
यत्नें पहा बनविले सरदार वन्य[7] ॥ ६८ ॥

## पितृभक्ति.

माया पित्यावर करी शिवराज फार
केव्हां पित्यास दुखवी न, करी विचार ।
आज्ञा प्रमाण गणुनी करि सिद्ध त्याची
दावी जनांस पितृभक्ति करून साची ॥ ६९ ॥
राज्यांत फार करितो शिव दांडगाई
किल्ले करी सर तया भय अल्प नाहीं ।
त्याला सहाय नकळे करितो शहाजी
ऐशा विजापुरपती धरि संशया[8] जी ॥ ७० ॥

---

१ आपली प्रतिज्ञा पाळणारा. २ भांडखोर. ३ अडाणी. ४ खरें बोलणारा. ५ देणारा. ६ चांगल्या कामाला. ७ रानटी. ८ अशा संशयाला.

कैदी करूं पकडुनी ह्मणुनी तयाला
पावेल पुत्र ह्मणजे सहजीं भयाला ।
ऐसा विचार करुनी अपुल्या मनांत
बाजीस सर्व कळवी नृपराय[1] बेत ॥ ७१ ॥
बाजी[2] हि नाम कुळ घोरपडा जयाचें
राज्यांत थोर सरदार विजापुरींचे ।
मानी शहाजिस, तरी कुमती तयाला
ग्रासी, हि कैद करण्यास तयार झाला! ॥ ७२ ॥
अत्यंत दाखवुनियां हित[3]भाव त्याला ।
आणीतसे निजगृहामधिं भोजनाला ।
कैदी करून मग नेइ विजापुराला
पाहून विस्मितें[4] मनांत शहाजि जाला! ॥ ७३ ॥
तों बादशाह मनिं फार खुशाल होई
बोले "तुझा सुत मला बहु ताप देई[5] ।
कोंडून ठेवुन पुढें तुजला वधीन
नाहीं तरी तव सुतास हुजूर आण" ॥ ७४ ॥
आश्चर्य थोर मनिं पावतसे शहाजी
बोले "जुलूम तुमचा मजलागिं गांजी ।
निष्ठा धरून करितों तव चाकरीला
त्याचा असा कटु कसा परिणाम झाला" ॥ ७५ ॥
"माझा असे सुत जरी शिव, होय मानी

---

१ विजापूरचा बादशाह. २ बाजी घोरपडा (सन १६४९). ३ स्नेहभाव. ४ आश्चर्ययुक्त. ५ त्रास देतो.

माझें असें विषम[1] शासन[2] तो न मानी ।
तो आपल्या कृतिस होय जबाबदार
स्वामी समर्थ करण्यास पुरा विचार" ॥ ७६ ॥
"वाटेल तें करुन त्यास तुह्मीं धरावें
वाटेल तें सबळ शासन त्या करावें ।
विश्वासुनी न मजला असुखासि द्यावें
याचा विचार बरवा करुनी पहावें" ॥ ७७ ॥
रायें विचार न मुळींच मनांत केला
द्यायास ताप बहु त्या दिसला भुकेला ।
कैदेंत ठेवुन तयास विशेष गांजी
बोले तयास "सुटशी जरि ये **शिवाजी**" ॥ ७८ ॥
ऐकून हें चडफडे स्वमनीं **शिवाजी**
माझ्यामुळें स्वजनकांस[3] कुबुद्धि गांजी ।
**दिल्लीपतीस** विनवून हुकूम घेई ।
बापास मुक्त करुनी मनिं धन्य होई ! ॥ ७९ ॥
"**बाजीस** मी न दुखवीन कधींहि हातें"
घेऊनियां वचन सोडितसे तयातें ।
तेव्हां **विजापुरपती**, स्वमनीं **शहाजी**
पोळे, तयास अपमान विशेष गांजी ॥ ८० ॥
**बाजी** करी उगिच त्या अनिवार[4] पीडा[5]
फेडावयास उसनें बहु त्यास ओढा ।
तो गुंतला नृपतिच्या वचनीं ह्मणून

---

१ भलतें. २ आज्ञा. ३ आपल्या बापाला. ४ फार. ५ दुःख.

जाई गिळून अवघा अपमान जाण ॥ ८१ ॥
"मत्पुत्र तूं तरि खळां[1] समजीव[2] आजी"
ऐसें **शिवास** सुचवी मग तो **शहाजी**।
"मी गुंतलों नृपतिच्या वचनांत आहें
सत्पुत्र तूं तरि उगा सहसा न राहें" ॥ ८२ ॥
आज्ञा अशी परिसतां अपुल्या पित्याची
हल्ला करून रग[3] मोडितसे तयाची।
दावून दुर्धर[4] असा परिणाम त्याला
तो तोषवून जनका[5] स्वमनीं निवाला[6] ॥ ८३ ॥

**व्यसन.**

नाहीं बरें व्यसन अल्पहि मानवाला
जाणून हें न **शिवराय** शिवे तयाला।
तन्मित्र ते व्यसनपंकिं[7] न लुब्ध होती
तेणें जगांत वर कीर्ति करून जाती ॥ ८४ ॥
**संभाजि** तो व्यसनपंकिं निमग्न झाला
**औरंगजेब** तंव शीघ्र धरी तयाला।
होता पराक्रमगुणें जरि तो वरिष्ठ
पावे दशा व्यसनमग्न[8] पहा कनिष्ठ! ॥ ८५ ॥
कैदेंत जाय अरिच्या, मरणास पावे
पाहून हें बुधजनें व्यसना त्यजावें।

१ दुष्टाला—बाजी घोरपड्याला. २ शिक्षा कर. ३ गर्व—खोड. ४ भयंकर. ५ बापाला—संभाजीला. ६ आनंद पावला. ७ व्यसन हाच चिखल—त्यांत. ८ व्यसनांत गुंतलेला.

कैसें मिळे फळ नरा व्यसनें तयाचें
होई उदाहरण थोर शिवात्मजांचें[1] ॥ ८६ ॥

## राग.

रागावणें न बरवें, स्वमनीं असावें,
रागें करें निज अकार्य[2] घडूं न द्यावें ।
मागून ताप जरि फार मनास होई
मागें फिरून गत[3] गोष्ट कधीं न येई ! ॥ ८७ ॥

संभाजिला बहुत राग करी विकार
मारी—विचार न करी—सरदार थोर ।
मातेसमान असतां बहु आपदेला[4]—
देऊन मारित असे मग सोयरेला[5] ! ॥ ८८ ॥

यावीं फळें मधुर आणिक चांगलीं तीं
लावाल सत्तरु[6] जरी तरि मात्र येती ।
दुर्वर्तनें न परिणाम सुरेख होतो
संभाजि हें त्रिजगतांप्रति[7] दाखवी तो ॥ ८९ ॥

## गर्व.

दिल्लीस जाय समरार्थ निघून भाऊ
चित्तीं ह्मणे निजपराक्रम तेथ दावूं ।
गर्वें फुगून करि उद्धत[8] वर्तनाला
त्याचें मिळे फळ न लागुन वेळ त्याला ॥ ९० ॥

---

१ शिवाजीच्या मुलाचें—संभाजीचें. २ वाईट काम. ३ गेलेली. ४ दुःखाला. ५ सोयराबाईला. ६ चांगलें झाड. ७ सगळ्या जगाला. ८ दांडगें.

**विश्वासराय** समरांत[1] पहां निमाला[2]
**भाऊ** लढून बहु शर्थ करून गेला ।
गेले[3] क्षणांत बहु वीरमणी लयाला[3]
येई प्रसंग न असे तुलना[4] तयाला ॥ ९१ ॥

जाला पराजय यशा **अफगाण** घेती
**हिंदूं**तलें सकळ वीर्य हिरून नेती ।
खालावली हळुहळू मग पेशवाई
कालांतरें[5] विसकटून लयास जाई! ॥ ९२ ॥

## स्त्रियेची बुद्धि.

स्त्रीबुद्धि लाभ घडवील कधीं न कोणा
ऐसा विचार बहुधा रुचतो जनांना ।
सांगे विचार बरवा दयिता[6] **सई** तो
ऐकूनियां **शिव** परी मनिं मोद घेतो ॥ ९३ ॥

जेव्हां **विजापुरपती** धरि तत्पित्याला
भेटावयास **शिव** तत्पर जावयाला ।
सांगे **सई** तयिं तयास उपाय नामी
तेव्हां पडे नृपतिच्या बहु तोच कामीं ॥ ९४ ॥

"जावें **विजापुरपतीस** न भेटण्याला
तो आपल्यास न चुकेल धरावयाला ।
जोडूनियां त्वरित आश्रय **मोंगलां**चा
घ्यावा रुकारें[7] गमतें मज सोडण्याचा" ॥ ९५ ॥

---

१ लढाईत. २ मेला. ३ नाश पावले. ४ बरोबरी. ५ कांहीं वेळानें. ६ आवडती स्त्री. ७ कबूली.

जाला विचार बहु हा **नृपतीस** मान्य
साधून कार्य **नृप** होय मनांत धन्य ।
चातुर्य पूज्यं, जरि तें दयितेंत राही
तें तोष कां **नृपतिच्या** न मनास देई ! ॥ ९६ ॥
स्त्रीचा विचार ह्मणुनीच न तो त्यजावा
तो चांगला तरि खुशाल मनीं धरावा ।
जें चांगलें निवडुनी बहु आदरानें
घ्यावें स्त्रियेजवळुनीहि सदा नरानें ॥ ९७ ॥

## गोड भाषण.

तो गोड गोड वचनें वदुनी **शिवाजी**
ठेवी स्वतांस सरदार समस्त राजी ।
वागे तयांजवळ संतत आदरानें
होते तयास वशें ते ह्मणुनी मनानें ॥ ९८ ॥
हें गोड गोड वचनें वश विश्व होय
सिद्धीस हेतु हृदयांतिल सर्व जाय ।
मोहीतसे मधुर बोलुन या जनांला
पाळावयास झटती ह्मणुनी शुकाला ॥ ९९ ॥
**दिल्लीपती**कडुन ये **शिव** जें सुटून
ठेवी सुतास **मथुरे**मधि तें सुजाण ।
त्या विप्र बाळगितसे बहु आदरानें
झालें पुरें सकळ गोडच भाषणानें ॥ १०० ॥

---

१ शहाणपण. २ मान्य. ३ आवडत्या स्त्रियेंत. ४ अनुकूळ.
५ पोपटाला.

बाजीस होळकर तो निज मित्र वाटे
शिंदा तयार करण्यास्तव कार्य मोठें ।
दोघे तयास गमती निज हस्त अन्यें[1]
सन्मित्र सेवक तसे सरदार मान्यें[2] ॥ १०१ ॥

## कर्ज.

बाजीस कर्ज जरि दे अनिवार[3] पीडा
होऊन जाय रणशूर पळांत वेडा ।
कैसें करील तरि तें सुख आपल्याला
तें दुःखदायक ह्मणून सदैव टाळा ॥ १०२ ॥

## प्रेम.

सावत्र[4]बंधुवरि ही शिव लोभ ठेवी
पाहून हें विबुध[5] तोष वरी न केंवी! ।
झाला विरक्त कळतांक्षणिं पत्र धाडी
त्याची—लिहून बरवें—समजूत काढी ॥१०३॥
बाजी[6] तसाच निज[7]बंधुस मान देई
दोघे झटून अरिसीं करिती लढाई ।
नाना[8] स्वबंधुंस तसा बहुसाल मानी
कार्यी[9] तयांस गुतवून विशेष वानी ॥ १०४ ॥
भाऊ[10] तमाम मुलखांतिल काम पाही
युद्धास देह अपुला रघुनाथें[11] वाही ।

---

१ दुसरे. २ श्रेष्ठ. ३ फार. ४ व्यंकोजीवर. ५ शहाणा. ६ बाजीराव —पहिला. ७ चिमणाजी अप्पास. ८ नानासाहेब पेशवा. ९ राजकारणांत. १० सदाशिवरावभाऊ. ११ रघुनाथराव दादासाहेब.

प्रेमें तिघे विचरती तयिं राज्य वाढे
सर्वास[1] कीर्ति बरवी जगतांत जोडे ॥ १०५ ॥

## कलह.

जेव्हां शिरे कलह तो सदनांत भारी
भाऊस शत्रु रघुनाथ–दिसे–भरारी[1]।
भाऊ हटें[2] समरिं पानपतांत जाई
त्याचा परीं न परिणाम सुरेख होई! ॥ १०६ ॥
भाऊ जरी समरिं शौर्य अपार दावी
शत्रूस कांच[3]–लढुनी–अनिवार लावी।
त्याचा रणीं झगडतां तरि अंतें[4] होई
विश्वास त्यासह रणीं विलयास[5] जाई ॥ १०७ ॥
नाना करून बहु शोक पुढें निमाला[6]
त्या माधवावर करी यमराज हल्ला।
नारायणास अनयें[7] रघुनाथ मारी
सर्वास शत्रुसम तैं दिसला भरारी! ॥१०८॥
ऐसा अनर्थ कलहें घडतो ह्मणून
सोडा तयास, सदुपाय दुजे करून।
झाला न लाभ तरि ही कलहा न जोडा
तोटा घडेल कलहाहुन त्यांत थोडा ॥ १०९ ॥
भाऊ न राग धरिता समरा न जाता
ऐसा तरी अतुल[8] घात कधीं न होता।

---

१ 'भरारी' हा रघुनाथरावास किताब होता. २ हट्टानें-आग्रहानें. ३ काळजी. ४ शेवट. ५ नाश पावला. ६ मेला. ७ अन्यायानें. ८ तुलना नाहीं असा.

होता न लौकिक उणा कधिं **पेशव्यांचा**
द्वेषाग्नि[1] नाश करिता न कधीं कुलाचा ॥११०॥
**नाना** जिवास मुकता न अपार शोकें
**नारायणें** न दिसतें वर हर्म्ये[2] ओकें[3]।
जाती कधीं न विलयाप्रति **पेशवाई**।
वाढूनियां कलह केवळ नाश होई! ॥ १११ ॥

## संकोचवृत्ति.

होतांच–**माधव** वरी–जनु[4] **पेशवाई**
विख्यात त्यास अभिधान[5] मिळे **सवाई**।
कैदेंत वास **रघुनाथ**सुतास झाला
तें अंतरांत दुखवी बहु **माधवाळा**[6] ॥ ११२ ॥
दुःखें झुरे निजमनांत उदारधी[7] तो
युक्ती दुजी न सुचुनी मनिं खिन्न होतो
"कैदेंत दुःख वरितो जरि **बाजिराय**
देईल सौख्य तरि हें मज राज्य काय?" ॥११३॥
ऐसा विचार मनिं खिन्न करी तयाला
**बाजीस** मुक्त करण्यास न धीर झाला।
**नानांस**[8] गोड न गमेल असा विचार
बोलावयास न तयाप्रति होय धीर ॥ ११४ ॥
**बाजीस**[9] दुःख बहु हें हृदयास जाचे

---

१ द्वेषरूप अग्नि. २ वाडा. ३ रिकामा. ४ जन्म. ५ नांव. ६ सवाईमाधवरावाला. ७ उदार बुद्धीचा. ८ नानाफडणवीस यास. ९ दुसऱ्या बाजीरावास.

**नानास** अप्रिय असें वद्वे न वाचे ।
माडीवरून बुधमान्य[1] उडीस टाकी
बोले मुखेंकरुन '**वाजिस** राज्य हांकीं' ॥११५॥
संकोचवृत्ति[2] बहु **माधवरावजीची**
बोलूं न दे उघड गोष्ट तया मनींची ।
केला उगा अहह नाश पहा जिवाचा!
जाला अपाय सगळ्याहि कुळास साचा ॥११६॥

## अन्याय.

**बाजी** कलीच मग तक्तनशीन[3] होई[3] !
ती कारकीर्द वदनीं वदतां न येई ।
अन्यायकर्म सगळें बढतीस पावे
कोठून तें विमल[4] मान्य जनांस भावे[5]! ॥ ११७ ॥
जे शूर ते थकुनियां बसले घरांत
जे भ्याड खड्ग धरिती अपुल्या करांत ।
साध्वी स्त्रिया लपुनियां बसल्या घरांत
वेश्या सुखें नटुनियां फिरती पथांत[6]! ॥ ११८ ॥
न्यायास मान न मिळे न दिसे विचार
कर्तव्य काय न कळेच कुणास सार ।
कोणी कुकर्मरत केवळ नीच झाले
नादांत मात्र भलत्याच भरून गेले! ॥ ११९ ॥
शूरत्व तें न चमके न दिसे कुठेंही

---

१ शहाण्यांस मान्य. २ भिडस्तवृत्ती. ३ गादीवर बसला. ४ शुद्ध. ५ आवडेल. ६ रस्त्यांत.

चैनींत धन्य[1] गणिती बडिवार पाहीं ।
राष्ट्रांत दीप्त[2] सगळ्या कलहाग्नि होई
लागून कीड सरली तर्यि पेशवाई ॥ १२० ॥
तेव्हां मनांत अपुल्या वर बोध ध्यावा
अन्यायमार्ग सहसा न कधीं धरावा ।
जें चांगलें सतत तें स्वमनीं धरावें
वृन्दावनास[3] फळ गोड कुठून यावें! ॥१२१॥

## सामान्य.

सत्संग जोडुन तुह्मी कलहास सोडा
घेऊं नका निजपदीं बसवून खोडा
ऐक्यास संतत धरा निजहृत्प्रदेशीं[4]
तेणें अखंडित मिळे सुख तें तुह्मांशीं ॥ १२२ ॥
धैर्यादि सद्गुण झटून सदैव जोडा
हा वैमनस्यरिपु[5] दुस्तर[6] यास झोडा ।
अज्ञानपाश[7] हृदयांतिल सर्व तोडा
आलस्य थोर रिपु यास मुळींच सोडा ॥ १२३ ॥
व्हावें परोपकृतिला[8] अगदीं तयार
याहून अन्य जगतामधिं या न सार ।
होतो परोपकृतिपासुन लाभ थोर
व्यासें जनांस कथिलें तरि हेंच सार ॥ १२४ ॥
सांगे शिवास हितगोष्टिस रामदास

---

१ श्रेष्ठ लोक. २ पेटलेला. ३ कंवडळाला. ४ आपल्या अंतःकरणांत. ५ भांडण हाच शत्रु. ६ कठीण. ७ अज्ञान हाच फांस. ८ परोपकाराला.

डे. व्ह. ट्रा. सोसायटीनें बक्षीस दिलेली.

# संसार.

ही

लहानशी कविता,

## मोरो गणेश लोंढे,

हेडमास्तर, नागोठणें ता. पेण,

यांनीं लिहिली.

आवृत्ति पहिली—प्रती १०००.

मुंबईंत "निर्णयसागर" छापखान्यांत छापिली.

सन १९०१.

किंमत दीड आणा.

(सर्व हक्क राखिले आहेत.)

# लोंढे यांनीं केलेलीं उपदेशपर पुस्तकें.

१ बोधशतक. २ संगीतसुधा. ३ उपदेशमाला. ४ ऐतिहासिक संगीत. ५ बोधामृत. ६ बोधसुधा. ७ पुष्पगुच्छ. ८ पुष्पमाला. ९ पुष्पावली. १० बोधमाला. ११ दृष्टांतमाला. १२ कुसुममाला. १३ यमुना. १४ शतकत्रय. १५ मुलांचें प्राथमिक शिक्षण. १६ नशीब आणि उद्योग. १७ गोदावरी नाटक. १८ चारुचर्या. १९ संसार.

मे. डायरेक्टर साहेब बहादूर इलाखा **मुंबई** यांनीं बक्षिसांकरितां व लायब्ऱ्यांकरितां नं. १।२।३।७।१६ हीं मंजूर केलीं आहेत. बक्षिसांकरितां नं. १० हें मंजूर केलें आहे. लायब्ऱ्यांकरितां नं. ६ हें मंजूर केलें आहे.

दक्षिणाप्राइझ कमिटीनें नं. १।६।७।११।१२।१३।१४।१६।१८।१९ यांस बक्षिसें दिलीं आहेत.

---

## पुस्तकें, त्यांच्या किंमती व अभिप्राय.

१ **बोधशतकः**— ( आवृत्ति चौथी. ) किंमत दीड आणा. श्लोकबद्ध. **अभिप्रायः**— " हें पुस्तक प्रत्येक लहान मुलानें वाचल्याशिवाय व त्यांतील बोधपर कविता पाठ केल्याशिवाय राहूं नये, अशी आमची त्यांना शिफारस आहे." **केसरी.**

२ **संगीतसुधाः**— ( आवृत्ति तिसरी. ) किंमत दीड आणा. साक्या, दिंड्या, पदें, वगैरे कविता. **अभिप्रायः**— " यांतील कविता सरळ, सोपी व मनावर ठसा उमटण्याजोगी साधली आहे." **सुबोधपत्रिका.**

३ **उपदेशमालाः**—(आवृत्ति सातवी.) किंमत दीड आणा. श्लोकबद्ध. **अभिप्रायः**— "लोंढे यांचा हा प्रयत्न त्यांच्या पूर्वीच्या प्रयत्नांप्रमाणेंच चांगला साधला आहे." **विविधज्ञानविस्तार.**

४ **ऐतिहासिक संगीतः**— ( आवृत्ति दुसरी. ) किंमत दीड आणा. साक्या, दिंड्या, पदें वगैरे कविता. **अभिप्रायः**—"यांतील कविता सरळ, सोपी व सहज रीतीनें केलेली आहे. इतिहासाचा नाद मुलांस लागण्यास हा चांगला मार्ग आहे." **ज्ञानचक्षु.**

# संसार.

श्लोक ( वसंततिलका ).

" संसार सार ह्मणती जन सर्व वेडे
ते भासती मज जसे मनुजांत रेडे । "
वाणी असें वदतसे कवि **वामनाची**
आहे प्रवृत्ति उलटी बहुधा जनांची ॥ १ ॥
संसार सार न तरी परमार्थ सार
तेव्हां प्रपंच अवघा ठरला असार ।
" संसार सार करितां परमार्थ जोडे"
हें **रामदास** कथितात जनांस कोडें[1] ॥ २ ॥
संसार सार अथवा परमार्थ सार
हें बोलणेंच मजला गमतें असार ।
संसार सार समयीं परमार्थ सार
हें योजनेंत अवलंबुन राहणार ॥ ३ ॥
संसार सार करुनी **जनकादिकांनीं**
तो साधिलाहि परमार्थ विशेष त्यांनीं ।
वैराग्य भाग्य समजून वरून त्याला
गेले **शुकादिक** मुनी बहु मान्यतेला ॥ ४ ॥
संसार सोडुनि तपाप्रति **गाधिजानें**
साधूनियां दवडिलें पळिं कामुकानें[2] ।
संसारिंही **अमृतराय** सदा विरक्त

---

१ कौतुकानें—आनंदानें. २ कामाधीन झालेल्यानें.

भोगून सौख्य ह्मणवी भगवंतभक्त ॥ ५ ॥
" जेणेंकरून भवतारक[1] वस्तु जोडे
तो सार मार्ग हृदयीं धरणार थोडे ।"
मानी प्रपंच परमार्थ पदार्थ दोन
वाटे असें कविचिया वचनावरून ॥ ६ ॥
हे दोन मार्ग अगदीं जरि भिन्न जाले
दोहींकडून फळ एक करास आलें ।
त्यां दोन एक अथवा जरि मानियेलें
शब्दाविणें इतर अंतर तें न जालें ॥ ७ ॥
" येथें सुखें गवसती सुरुची तयांची
जाणावयास न शके सहसा **विरिंची**[2] ।
दुःखें मुळीं न दिसतात कधीं प्रपंचीं"
वाणी असें वदतसे दुसऱ्या कवीची ॥ ८ ॥
सांगे तुह्मांस कवि एक भवास सोडा
सांगे दुजा इहसुखार्थ[3] **विरिंचि** वेडा ।
सोडावयास न लगे भव हा तुह्मांला
साधे प्रपंचि परमार्थ करावयाला ॥ ९ ॥
पाहून सुंदर वधूस करून लग्न
व्हावें तिच्यासह विलासरसीं निमग्न ।
प्रेमा करून बहु सौख्यहि एकमेकां
द्यावें, तसेंच सुख–लाड करून–तोकां ॥ १० ॥
उद्योग नित्य करुनी धन मेळवावें

१ संसारापासून सोडवणारी. २ ब्रह्मदेव. ३ एथल्या सुखाकरितां.

पाहून संचय मनामधिं धन्य व्हावें ।
खर्चून वित्त टुमदार करून कार्यें
आप्तांकडून बरवें ह्मणवून घ्यावें ॥ ११ ॥
खर्चून वित्त उभवून विशाल हर्म्यां[1]
निर्मूनियां उपवना जवळी सुरम्यां[2] ।
बांधून आंत जलपूरित[3] कूप थोर
व्हावें स्वकीय मनिं धन्य सदा अपार ॥ १२ ॥
संसार यास ह्मणतों, करितो प्रपंची
कार्यें अशीं सतत धन्यपणार्थ साचीं ।
"बा काय सार तरि यांत दिसे तुह्मांला"
ऐशा करी सुकवि **वामन** भाषणाला ॥ १३ ॥
"जो या जगा उपजवी करि तद्वयाला
रक्षीतसे सतत घेउनियां श्रमांला
ध्यावें अशा प्रभुचिया पदपंकजाला"
सांगे असें सुकवि **वामन** आपणांला ॥ १४ ॥
संसार सार करितां करितांहि येतें
जें **वामनें** कथित तें जरि आपणांतें
हा बोध नित्य बरवा स्वमनांत ठेवा
वाटे सुधारस[4] बुधें समजून प्यावा ॥ १५ ॥
"सोडा प्रपंच परमार्थ करा सदाही
टाका समूळ बहु दुष्ट कुवासना ही ।
एकान्त सेवुन सुखें हरिच्या पदाला

---

१ वाड्याला. २ अत्यंत सुंदर अशा. ३ पाण्यानें भरलेले. ४ अमृतरस.

गा हेंच होय भवतारक कीं तुह्मांला ॥ १६ ॥"
हा एक मार्ग कथिला कविनें जनांला
यांतील सार बघणें परि आपणांला ।
दुर्वासना न बरव्या अगदीं कुणाला
टाकून त्यांस भजणें हरिच्या पदाला ॥ १७ ॥
गावें प्रभूस विपिनीं[1] अथवा गृहीं ही
त्याचें समान फल होइल सत्य पाहीं ।
देवास चित्त रुचतें, स्थळ कोणतेंही
त्याच्या मनांत असला नच भेद राही ॥ १८ ॥
येथील सौख्य विधिला न मिळे कधींही
हें बोलणें न अगदींच असत्य पाहीं ।
स्वर्गावरी सकल तें सुख राहताहे
दुःखप्रभाव[2] तरि तेथ कळे न, पाहें ॥ १९ ॥
तेथें विपत्तिस जरी स्थळ सांपडेना
दातृत्व आणिक दया उपजेल कोणा ! ।
कैसा प्रसंग उपकार करावयाला
येईल तेथ, समजे न, पुसा मनाला ॥ २० ॥
केला प्रपंच हरिनेंच नरें न केला
तो तोषवील तरि कां न वदा प्रभूला ॥
तो नेटकां[3] जरि कराल झटून आंगें
नेईल तो निजपदांस[4] तुह्मांस वेगें ॥ २१ ॥
सामर्थ्य होय तरि द्या दुबळ्यास हात

१ रानांत. २ दुःखाचा पराक्रम. ३ चांगला. ४ मुक्तीला.

अन्नास वाण न, तरी क्षुधितास भात।
ज्ञानें करा सकळ मूर्खपणास दूर
संसार सार मग चित्त करील गार ॥ २२ ॥
जें जें तुह्मांस यश वैभव कीं मिळालें
जाईल तें सकल नाशुन शीघ्र काळें।
ठेवून हें स्वमनिं नीट मदास सोडा
दीनांस साह्य करण्यामधिं कीर्ति जोडा ॥ २३ ॥
" दुःखें अनेक असतात सदा प्रपंचीं
सोडा ह्मणून बहु संगति नीच याची।"
ऐसें अनेक वदती कवि थोरथोर
दुःखास काय विपिनांत मिळे न थार! ॥ २४ ॥
देहास कष्ट पडतात मिळे न खाया
जागाहि निर्भय अशी न मिळे रहाया।
रानांत रोग नसती न असेंहि कांहीं
केव्हां तरी असुख ये चुकणार नाहीं ॥ २५ ॥
आहे जिथें सुख तिथें असुखा न वाण[1]
त्यांतील एकच मिळेल कधीं न जाण।
व्हावें जरी सुख तरी असुखा तयार
व्हावें, असाच हरिचा दिसतो विचार! ॥ २६ ॥
कांहीं सुखेंहि असुखें असती प्रपंचीं
रानांत तेंवि असती, जरि भिन्न साचीं।
यांचें जगांत दिसतें जरि साहचर्य[2]

१ तोटा. २ एका ठिकाणीं असणें.

दोघांविणें तरि कुठून घडेल कार्य ! ॥ २७ ॥
भोगावयास सुखदुःख तयार व्हावें
चित्तीं सदा प्रभुचिया चरणा धरावें ।
दुःखांत साह्य सकलांस सदा करावें
लोकांत धन्य सहजीं ह्मणवून घ्यावें ॥ २८ ॥
झालें जरी सुख तरी न कधीं भुलावें
जाईल तें कधिंतरी स्वमनीं धरावें ।
दुःखें न चित्त अपुलें करपून द्यावें
येईल सौख्य पुढती स्वमनीं असावें ॥ २९ ॥
जावें उन्हांत तयिं शीतळ दाट छाया
होते जनांस बहु योग्य, सुखास द्याया ।
दुःखामुळें अधिक मोल सुखास येतें
येते प्रतीतिहि पदोपदिं आपणांतें ॥ ३० ॥
रोगामुळें पडतसे सहजीं अजारी
कंटाळतो बहुत सोसुन कष्ट भारी ।
आरोग्य त्यास गमतें मग मोलवान
दुःखामुळें अधिक मोल सुखास जाण ॥ ३१ ॥
जो चालतो, सुख तया बसण्यांत वाटे
बैसे तयास फिरतां सुख होय मोठें
उष्णांत काम करितां सुख सावलींत
जो सावलींत सुख त्यास गमे उन्हांत ॥ ३२ ॥
एका स्थितींत मनुजास न सौख्य वाटे
जें सौख्य तेंच गणि दुःख पळांत मोठें

एकास सौख्य, दुसऱ्याप्रति दुःख तेंच
मोठी चमत्कृति अशी जगतांत साच ॥ ३३ ॥
मोठीं बिळें करितसे जरि नित्य घूस
टाकावया मन तयार नसे घरास ।
संसार दुःखमय हा ह्मणुनी न सोडा
राहून त्यांत परमेशपदास जोडा ॥ ३४ ॥
दुःखाविणें सुख तुह्मांस मिळेल कैंचें
कीं साहचर्य जगतामधिं नित्य यांचें ।
हें मानणें परि असे अपुल्या मनाचें
सारेंच सौख्य गणितां मग दुःख कैंचें ! ॥ ३५ ॥
आहे विशाल जग केवळ रंगभूमी
पात्रें अनेक जन हीं दिसतात नामी ।
जें जें जयाप्रति पडे जयिं सोंग घेणें
घेऊन तें रमविणें प्रभुलागिं तेणें ॥ ३६ ॥
सोडून संग विपिनांत करी विहार
निःसंग मी ह्मणतसे बडिवार थोर ।
याचा गमे न नवलाव परी मनाला
वाटे न तो उतरला पुरता कसाला ॥ ३७ ॥
योद्धे उगाच करिती लटकी लढाई
ते मारिती निजमुखें नसती बढाई ।
चोहोंकडून करितां बहु शत्रु घाला
सोशील तो बहुत शूर गमे मनाला ॥ ३८ ॥
सोनें खरें हिणकशी अथवा असेल

अग्नींत टाकुन पहाल तर्यीं कळेल ।
सोडी न धैर्य जरि संकट ये अपार
तो शौर्यमेरु[1] सुजनीं विलसेल फार ॥ ३९ ॥
होईल दुःख ह्मणुनी भव सोडिला हा
रानीं तरी सतत सौख्य मिळे न पाहा ।
होवो मनास कधिं दुःखसुखें न बाधा
हा सौख्य नित्य वरण्यास उपाय साधा ॥ ४० ॥
स्वस्त्रीसवें बहु विलास सुखें करावे
ईशास गाउन मुखें, सुखभोग घ्यावे ।
मानून अन्य युवती गरलासमान
संसार सार करुनी तरला न कोण ! ॥ ४१ ॥
शक्ती असेल तरि वेंच परोपकारीं
दावीं तुझी परहितीं सगळी हुषारी ।
येथें परोपकृति हें अतिपुण्य आहे
**व्यासोक्ति[2] भारत**कथेंत[3] अशीच, पाहें ॥ ४२ ॥
जैसे परोपकृतिला मिळती भवांत
तैसे प्रसंग मिळती न कधीं वनांत ।
प्राणी मनुष्य सहवाससुखा भुकेला
एकान्त देइल कसा तरि त्या सुखाला ॥ ४३ ॥
यत्नें परस्परसुखाप्रति वाढवावें
घ्यावें तसेंच सहसवाससुखास द्यावें ।
नेत्रें भवांतिल चमत्कृतिला बघावें

---

१ शौर्य हाच मेरुपर्वत. २ व्यासाचें भाषण. ३ भारतांतील कथेंत.

वागून योग्य परमेशपदास जावें ॥ ४४ ॥
संसार सोडुन किती हरिच्या पदाला
गेले, उभारून जगांत यशोध्वजाला ।
संसार जोडुन कितीक कृतार्थ[१] झाले
त्यांचें परोपकृतिनें जगिं नाम चाले ॥ ४५ ॥
संसार सोडुन कितीक वनास रागें
गेले, मनास वनवास बरा न लागे ।
झाला फसून अनुताप तयीं तयांला
दोन्हींकडे जन किती मुकले सुखाला ॥ ४६ ॥
संसार सार करणें जरि आपणांला
वागावया तरि असें शिकवा मनाला ।
वाटेल योग्य वनवास सुखें करावा
मागें फिरून जन तो न जनांत यावा ॥ ४७ ॥
संसार हा न रुचता जरि ईश्वरास
देता न जन्म तरि तो युवतीनरांस ।
प्रेमांकुरा रुजविता न मनीं तयांच्या
प्रेमें कृपा न करिता वरि या जनांच्या ॥ ४८ ॥
येईल संकट न, धैर्य कसें दिसेल
वैरी नसेल तरी शौर्य कसें कळेल ।
दुःखां भिऊन नर जो विपिनीं पळाला
तो थोर कीं विजय जो मिळवून ठेला ॥ ४९ ॥
संसार सार ह्मणुनी न त्यजा तयाला

---

१ धर्म अर्थ काम मोक्ष हे चारी पुरुषार्थ ज्यांनीं साधले ते.

शब्दींच अर्थ विलसे कळवा मनाला ।
चित्तीं स्मरून जगदीशपदा असावें
येतां विपत्तिहि न त्यावरती रुसावें ॥ ९० ॥
जातो निघून वनवास करावयाला
फांशीतसे वरुन राख पहा तनूला ।
मध्यान्हकाळ[1] जरि त्याप्रति बाधताहे
कोठून होय परमार्थ तयास पाहें ॥ ९१ ॥
माळा गळ्यांत दिसती जरि फार जाड
देहांत काम जरि संतत घे बिऱ्हाड ।
डोईवरी जरि जटा दिसती अमोल
क्रोधामुळें सकल तें गमतेंच फोल ॥ ९२ ॥
राहे अशिक्षित वनांत करून वास
देहास आळवुन इंद्रियनिग्रहास ।
इच्छीतसे जरि बळेंच करावयाला
आयासही[2] करुन साध्य न होय त्याला ॥ ९३ ॥
यात्रा करी, फिरतसे बहु देश पाही
संस्कार चित्त न वरी जरि अल्प कांहीं
ज्ञानास तो न मिळवी जरि अल्पमात्र
तें व्यर्थ जेविं भरणें जलिं भग्न[3] पात्र ॥ ९४ ॥
सोशी हिमास जलदांसें[4] उन्हास नित्य
संस्कार चित्त न वरी जरि अल्प सत्य ।
तें ढोंग होय परमार्थ न त्यांत कांहीं

---

१ दोन प्रहरची वेळ—भुकेची वेळ. २ श्रम. ३ फुटलेलें. ४ पावसाला.

त्याचा तयास उपयोग मुळीं न पाहीं ॥ ९५ ॥

तोंडीं जपे जरि सदा हरिनाममाला
सांगे सदैव परमार्थ बरा जनांला।
संस्कार चित्त न वरी जरि अल्प त्याचें
ओझेंच वाहत असे न तया हितार्थ ॥ ९६ ॥

निःसंग होय तरि संग कधीं सुटेना
रानीं विहार करुनी ममता तुटेना।
ईशस्वरूप जरि बुद्धिस या पटेना
ही येरझार[1] जगतांतिल या फिटेना ॥ ९७ ॥

ईशें अनेक जगतामधिं वस्तु केल्या
त्या नाशिवंत कळलें जरि या मनाला।
त्यांचा विचार करणें तरि निंद्य नोहे
त्यांचा सुखार्थ उपयोगहि वंद्य पाहें ॥ ९८ ॥

तेजें हिरा झळकतो, परि कोळसा तो
काळा असे, उभयतांमधिं भेद होतो।
ते एकजाति ह्मणती बुध नित्य त्यांला
शोभे हिरा मुकुटिं मान न कोळशाला ॥ ९९ ॥

जाळावयास पडतो उपयोग त्याचा
होतो सदा सकल अग्निरथां[2] हिताचा
त्याचा घडे हि उपयोग अनेक कामीं
तो नाशिवंत ह्मणुनी न करा निकामी ॥ ६० ॥

पाहून वस्तु जगतांतिल रम्य सर्व

---

१ जाणें व येणें. जन्म व मरण. २ आगगाड्यांना.

घ्या तद्गुणांस न धरून मनांत गर्व ।
त्यांचा करा सदुपयोग म्हणून लोकीं
तें ईश्वरास रुचतें अवघें विलोकीं ।। ६१ ।।
निर्मीतसे बहु जगांत पदार्थ रम्य
त्याच्या गुणांस दुसरें न दिसेल साम्य ।
येतें मनांत सहजांत महत्व त्याचें
रंगे न चित्त चरणीं मग कां बुधाचें ।। ६२ ।।
वाईट वस्तु जगतांत मला दिसेना
ती चांगली हि म्हणणें मजला रुचेना ।
जैसा मनुष्य उपयोग तिचा करील
तैसीच ती सुखद दुःखद आढळेल ।। ६३ ।।
दुष्टास अग्नि मिळतां घर पेटवी तो
एकामुळें सकळ गांव जळून जातो ।
सुज्ञास तोच सुखदायक फार होतो
सुग्रास अन्न करण्यास सहाय देतो ।। ६४ ।।
दुष्टास सोमल मिळे तरि तो अनेकां
घालून मारित असे बहुधा विलोका ।
दे वैद्य रूप परि त्याप्रति औषधाचें
रोगांस दूर करि दुःख हरी जिवांचें ।। ६५ ।।
विद्युल्लता पडुनियां सकलांस मारी
भी ही जनांस गमली बहु आजवेरीं ।
ती कल्पकें बनविली परि आजि दासी
नेई पळांत निजवृत्त दुजा स्थळासी ।। ६६ ।।

संसार सारहि असार तसेंच आहे
हें व्यक्तिमात्रिं अवलंबुन सर्व राहे ।
द्रव्यास नीच ह्मणणेंहि तसेंच जाणा
कांतेस दूषण तसेंच वरें दिसेना ॥ ६७ ॥

कामादि षड्रिपु तसे असुखास दाते
हें बोलणेंहि बरवें न दिसे मनातें ।
योजूनियां सकळिकां बहु योग्य कामीं
घे धन्यता मज गमे नर तोच नामी ॥ ६८ ॥

द्रव्याविणें न बनती कधिं कूप वापी
द्रव्याविणें न उपजीवन हो कदापी ।
द्रव्याविणें न बनती कधिं धर्मशाळा
देवालयें न तरि शोभविती महीला ॥ ६९ ॥

द्रव्याविणें न दिसते सरितांस घाट
द्रव्याविणें न कधिं पूल भले अचाट ।
जी जी जगांत बरवी कृति दृश्य जाली
ती ती धनेंच सगळी परिपूर्ण केली ॥ ७० ॥

जे ग्रंथ धर्म कथिती, धन दे प्रसिद्धी
त्यांना, धनेंच मिळवी नर ऋद्धिसिद्धी ।
जे साधु सत्य कथिती जनतां[1]हितैषी
त्यांना सदोदित पहा धन तेंच पोषी ॥ ७१ ॥

ऐशा धना अव[2]र कां ह्मणतां उगाच
तें मेळवा धरुनियां वरमार्ग साच ।

---

१ लोकांचें हित इच्छिणारे. २ हलकें-नीच.

वेंचा तयास मग संतत योग्य कार्मीं
साधेल सत्य परमार्थ तुह्मांस धार्मीं ॥ ७२ ॥
संसार हा शकट दोन तयास चाकें
स्त्री आणखी पुरुष त्यांविण सद्म[1] ओकें ।
धर्मार्थकामपुरुषार्थ करावयाला
स्त्री साह्य दे सतत तोषुन या नराला ॥ ७३ ॥
शोभाच ते मज गमे अवश्या गृहाची
घे काळजी सतत जी झटुनी नराची ।
दुःखा सुखास असते अगदीं विभागी
गातां तिचें यश थकेल गमे मला गी[2] ॥ ७४ ॥
कार्यांत युक्ति कथिते हि सखी जिवाची
वागे सदैव वचनांत कधीं न जाची ।
संसार सार करण्यास अशा स्त्रियेची
होईल संगति नरास अलभ्य साची ॥ ७५ ॥
बाधो न काम ह्मणुनी करितो विवाह
पाहून अन्य युवती न वरीच मोह ।
ठेवी स्वकीय दयितेवरि मात्र चित्त
ईशास गाय, तरि तो दुसरा महंत[3] ॥ ७६ ॥
[4]क्रोधोद्भवास तरि कारण दुष्ट कृत्य
क्रोधामुळेंहि न घडे कधिं पाप सत्य ।
क्रोधास ठाव गवसे कधिं अन्यथा न
माथां जटा—अधिक काय—तरी धरून ॥ ७७ ॥

---

१ घर. २ वाणी. ३ साधु. ४ राग येण्याला.

जो मेळवी करुनियां बहु यत्न पैसा
खर्चीतसे परहितार्थ सदैव तैसा ।
दुष्कृत्य अल्प न करी न धरीच लोभ
वैराग्य काय मग हें असतां स्वयंभ ॥ ७८ ॥
ज्याची सदा मदत शक्ति करी पराला
द्रव्यामुळें अधिक नम्रपणा जयाला ।
रूपाहुनी सुबक वर्तन नित्य ज्याचें
त्याच्या मनीं मग मदास बिऱ्हाड कैचें ॥ ७९ ॥
व्हावा सुखी सकळ लोक सदा अपार
दुःखास अल्प न मिळो जगतांत थार ।
सेवा घडो निजकरें बऱ्या जनांची
हा काम ज्या निजमनामधिं फार जाची ॥ ८० ॥
अन्यायकर्म नयनांप्रति पाहवेना
निंदा अवंद्य[1] कधिं कर्णपुटीं शिरेना ।
वाचाळतेस वरिते न कधींहि वाणी
ज्याला असे सतत मत्सर या ठिकाणीं ॥ ८१ ॥
आह्मांस पूर्वसुकृतें[2] मनुजत्व आलें
अज्ञान यत्न करितां निरसून गेलें ।
या वाढवूं झटुनियां अपुल्या सुखाला
येथें सुकार्य करितां भय काय त्याला ! ॥ ८२ ॥
कामादिकांस वश जो सहसा न होतो
अन्यायकर्म करण्यास कधीं न जातो ।

---

१ निंद्य–वाईट. २ पूर्वीच्या पुण्यानें.

शास्त्रार्थसार सुविचार बघून वागे
त्याला प्रपंच करितां भय काय लागे ॥ ८३ ॥
कर्ता प्रभूच, मजलागिं न शक्ति त्याची
जाणे विचार वर हा मति नित्य ज्याची।
येती सुखें सहज हीं असुखें तशींच
तीं भोगणें धरुन योग्य मनीं विवेक ॥ ८४ ॥
देवें दिला बहुत सुंदर इंद्रियांचा
हा थोर लाभ मनुजास अलभ्य साचा।
केला बरा न विनियोग जरी तयांचा
होईल राग न कसा मग ईश्वराचा ॥ ८५ ॥
केलें उणें न हरिनें जरि आपणाला
घालून भार दुखवूं हि नये पराला।
यत्नें जगांत पडतें न उणें कुणाला
ठेवा मनीं सतत हें रुचतें प्रभूला ॥ ८६ ॥
उद्योग अल्प न करून बने भिकारी
लावून राख फिरतो मग दारदारीं।
पोटास मागत असे पसरून तोंड
यावी उरांत असलें करितांच धोंड ॥ ८७ ॥
पोटास काय कमती जरि यत्न केला
पक्षी कसे भरिति पोट पुसा मनाला।
सृष्टींतले सकल जीव न काय खाती!
कां वाटते मग जनांस उगाच भीती! ॥ ८८ ॥
हें सर्व सत्य परि दुःखमयप्रपंचीं

येती अनेक असुखें गणना न त्यांची ।
सोसावया गरज फार असे धिराची
सामान्य बुद्धि गमते मज तेथ कांची[1] ॥ ८९ ॥

हीं संकटें न दिसतील जरी वनांत
तेथें अनेक दुसरीं धरितील हात ।
जातींत भेद, असुखास मिळे न टाळा
दुःखीं सुखीं करुन भेद मना न जाळा ! ॥ ९० ॥

कोठें पती युवतिचा मरतो अकालीं
दुःखांत आप्त सगळे यमराज घाली ।
ऐसा प्रसंग मतिला अनिवार मोहीं
त्या सोसणें कठिण होय मतीस पाहीं ॥ ९१ ॥

कोठें पतीस सति ही असुखांत घाली
तेणें नरास न सुचे मति मंद झाली ।
भार्या दुजी करुनियां भरितो उणीव
लाधे न अन्य, तरि आकुल[2] होय जीव ! ॥ ९२ ॥

घेतात जन्म हि कुशींत अनेक बाळें
राहे न एक, बघतां मन फार पोळे ।
वाटे तयास नरजन्म नकोनकोसा
नासे विवेक धरिल्याविण शोक कैसा ! ॥ ९३ ॥

होती अनेक, जगतांत सशक्त ऐशीं
आहेत विन्मुख परी सुगुणांस कैशीं ! ।
दुष्कृत्यभार[3] करुनी जनतेस देती

---

१ भित्री–टिकाव न धरणारी. २ व्याकुळ. ३ वाईट कामांचें ओझें.

दुःखा, बघून पितरें मनिं खिन्न होती ! ॥ ९४ ॥
भार्या असे बहुगुणी पतिला न भावे
त्यानें कधीं न विहिताचरणा[1] पुसावें ।
गांजावयास सतिला न कमी करावें
पाहून हें मन न कैंवि [2]विदीर्ण व्हावें ! ॥ ९५ ॥
भर्ता सुरेख दयिता न सुखी तयानें
अन्यायकर्मच तिला अनिवार माने ।
पाहून निंद्य कृति कैंवि नरें असावें
चित्तीं सुखी, न असुखें हि कसें झुरावें ! ॥९६॥
न्यायें वसे, न कधिं दुष्कृतिला शिवे ही
अन्यास दुःख न करी, परताप साही ।
ऐसें असे तरि न दुःखपरंपरेला
ये टाळितां, वरि न खेद कसा मनाला ! ॥ ९७ ॥
अन्यायकर्म करुनी जरि राहताहे
अन्यास ताप करितां सुख मानिताहे ।
अन्यास सौख्य वरितां न वरी सुखाला
त्याचें महत्व न कसें दुखवी मनाला ॥ ९८ ॥
पाहून हें मन वरी बहुसाल आधी
संसार दुःखद असें वदते हि बुद्धी ।
सारें मनासम कसें मिळणार बोला
ऐशा सुखास भुलतां मिळणार झोला[3] ॥ ९९ ॥

---

१ योग्य आचरणाला. २ दुःखी. ३ झोका, हिसका.

पाहून ही असुखपंक्ति[1] कधीं न म्यावें
न्यायीं धरून रति वृत्तिस[2] धैर्य द्यावें ।
सन्मार्ग सोडुन कधीं सहसा न जावें
चित्तीं विवेक धरुनी प्रभुला मिळावें ॥ १०० ॥
वाईट तें जरि सुखास करील वाटे
त्याचा बघून परिणाम हि चित्त फाटे ।
केल्या अनेक कृति दुर्धर **रावणानें**
नेलें लयास कुळराज्य समग्र त्यानें ॥ १०१ ॥
ठेवा विवेक भ्रमतां मन आवरावें
ठेवील देव जगतांत तसें रहावें ।
हें नाशिवंत सगळें स्वमनीं असावें
ज्ञानें मनास अपुल्या बहु धैर्य द्यावें ॥ १०२ ॥
संबंध पूर्वसुकृतें घडतात लोकीं
तें संपतां बिघडतात पळें विलोकीं ।
आयुष्य सार अपुलें करणें असेल
टाका ममत्व मग मार्ग तुह्मां दिसेल ॥ १०३ ॥
हा देह ही जरि जिवाप्रति सोडणार
मातापितापतिसुतादि नको विचार ! ।
आधीं कुणी मग कुणी परि पावणार
पंचत्व[3] सर्व, असुखास करा न थार ! ॥ १०४ ॥
सन्मार्ग सौख्यद तयास कधीं न सोडा
दुष्कर्म दुःखंद, नको स्वपदांत खोडा ।

---

१ दुःखांची ओळ. २ मनाला. ३ मरण.

अन्यायकर्म करुनी नर घे सुखाला
ही भूल केवळ असे न भुला तियेला ! ॥१०
बाहेर वैभव दिसे, बहु दासदासी
ह्या राबती, तरि न सौख्य असे जिवासी ।
आहे जरी विपुल वित्त, सुखा ठिकाण
नाहीं, बघून मन कां तुमजेल जाण ! ॥ १०
ऐसें असेल सुख जें अगदीं दिखाऊ
मोहून त्यास तुमचें मन तें न जाऊ ।
औरंगजेब मरतां भयमीत झाला
वाटे मुळीं न भय टाळकुट्या तुक्याला ॥१०
जें सत्य तेंच वर, जें वर तें करावें
तेणें स्वकीय मन संतत सौख्य पावे ।
होतां विवेक, पळतां भ्रम या मतीचा
होईल लाभ सहजीं मग ईश्वराचा ॥
जातां ममत्व-फिरतां हृदयांत वृत्ती
दुःखोर्मि[1] नाश करितील; विवेक चित्तीं ।
आनंद थोर वसवील, सदैव जाण
होसील तूं निजसुखें स्वमनांत पूर्ण ॥ १०९ ॥
आत्मस्वरूप कळतां परमेश हाच
संसार देइल कसा मग यास जाच ! ।
दुःखासुखास मिळणार कुठून थारा
संसार होय परमार्थ तयास सारा ! ॥ ११० ॥

---

१ दुःखाच्या लाटा.

**यमुनाः**—श्लोकबद्ध. किंमत दीड आणा. **अभिप्रायः**—"१०४ श्लोक आहेत. छान आहे."

(पु. १८ अं. ७ अक्टोबर १८९८) **बालबोध.**

**शतकत्रयः**—श्लोकबद्ध. किंमत पांच आणे. **अभिप्रायः**—"शतकत्रयांतील कविता गोड आहेत. शब्दरचना सुंदर आहे."

(पु. ५ अं. २ आगष्ट १८९७) **मासिक मनोरंजन.**

**मुलांचें प्राथमिक शिक्षणः**— किंमत साडेपांच आणे. **अभिप्रायः**—" यांत लहान मुलांस प्रत्येक विषयांत प्राथमिक शिक्षण कसें द्यावें, हें सांगितलें आहे. हें साडे पांच आण्यांचें पुस्तक प्रत्येक शिक्षकास घेतां येणार आहे. व तें सर्व प्रकारें संग्रहणीय आहे." (पु. ५ अं. ४ एप्रिल १८९४) **शालापत्रक.**

**नशीब आणि उद्योगः**— किंमत साडे पांच आणे. **अभिप्रायः**—" रा. **लोंढे** यांची भाषा निसर्गतः सुबोध, गोड आणि साधी असून विषयवर्णन सप्रमाण व सयुक्तिक आहे. विषयविवेचन मुद्देसूद आणि मनोहर असल्यामुळें निबंध वाचनीय झाला आहे. तरुण जनांनीं अवश्य वाचावा." **काव्यसंग्रह.**

**[illegible]ी नाटकः**— किंमत बारा आणे. **अभिप्रायः**—"[illegible] शा नाटकांत ग्रंथकारानें सासवेचें दुःशीलत्व व सुने[illegible] ह्यांचें चित्र फार नामी काढलें आहे. हें नाटक लोकाश्रयास पात्र अतएव सर्वांनीं संग्रहणीय आहे."

(शास्तर वै. हा.ठाणें२०।१२।८७) **जनार्दन बाळाजी मोडक.**

**चारुचर्याः**—किंमत दीड आणा. श्लोकबद्ध. **अभिप्रायः**—"यांत व्यवहारनीतीचीं तत्त्वें सोदाहरण सांगितलीं आहेत, रीतीप्रमाणें अर्थबोधक टीपाही विपुल आहेत. हें छोटेखानी काव्य मुलांच्या हातीं देण्यास योग्य आहे." **विविधज्ञानविस्तार.**

( पु. ३१ अंक ११।१२ नवंबर व डिसेंबर १९०० )

## बक्षीस मिळालेलीं परंतु न छापलेलीं पुस्तकें

२० ध्रुवचरित्र, २१ दुष्काळवर्णन, २२ सुदामचरित्र, २३ बाजी परभु, २४ तरवार.